ग १०२

# नि:शस्त्रांचें राजकारण.

ग
१०२ — १४४६
७४ग
20 NOV 2013
17 JUL 2020

लेखक,
डॉ. श्री. व्यं. केतकर,
उत्पादक स्वयंनिर्णयी संघ, पुणें.

किंमत एक रुपया.

क्र १०२
कृपया ... वापरा
2 SEP 1996
20 NOV 2013
१४४६ / ७४७


# निःशस्त्रांचें राजकारण.

(स्वयंनिर्णयी संघाच्या स्थापनेसाठीं प्रथम ग्रंथ)


लेखक

**श्रीधर व्यंकटेश केतकर** एम्. ए. पीएच्. डी.

मुख्य संपादक महाराष्ट्रीय ज्ञानकोश, हिस्टरी आफ कास्ट इन इंडिया व्हा. १-२., इंडियन इकॉनॉमिक्स्, हिंदू लॉ, संकीर्ण लेख, गोंडवनांतील प्रियंवदा, इत्यादि पुस्तकांचे कर्ते.



प्रकाशक

श्री. व्यं. केतकर, उत्पादक स्वयंनिर्णयी संघ.

---

पुणें १९२६

# विद्यासेवक.

संपादक—रा. रा. यशवंत रामकृष्ण दाते
बी. ए. एल् एल् बी.

## महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळाचें मासिक.

वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. ४ आकार

रायल अष्टपत्री पृ. ६४

या मासिकांतून निःशस्त्रांच्या राजकारणाचे बरेचसे लेख बाहेर पडले. तर त्या मासिकासंबंधानें जास्त काय सांगावयास पाहिजे.

आज या मासिकाचें अग्रस्थान कोणी नाकारील असें वाटत नाहीं.

गोंडवनांतील प्रियंवदा ही कादंबरी या मासिकांतूनच बाहेर पडली. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, वाङ्मय इत्यादि क्षेत्रांतले लेख प्रत्येक अंकांत आहेत.

**महाराष्ट्रीय ज्ञानकोश भाग १--२०**
संपादक डॉ. श्री. व्यं. केतकर — किं. १६० रु.

**स्त्रियांचा कायदा**
ले. ल. के. भावे बी. ए. एल् एल् बी. — किं. १ रु.

**गोंडवनांतील प्रियंवदा**
एक सामाजिक कादंबरी — किं. १ रु.

**प्रत्येकाचा वेदाध्याय** — किं. १ रु.

---

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५–४९६ शनवार पेठ, पुणें शहर

प्रकाशकः—श्रीधर व्यंकटेश केतकर,
उत्पादक स्वयंनिर्णयी संघ पुणें.

१४४६
७४७१

# प्रस्तावना.

हिंदुस्थानाला स्वराज्य प्राप्त करून देणें हेंच पुढच्या आयुष्यांतील अनेक वर्षांचें कार्य ठेवावें असा माझा हेतु आहे. या कार्याकडे एकनिष्ठेनें मला ज्ञानकोशाच्या समाप्तीनंतर लागतां येईल. या कार्याकडे एकनिष्ठपणानें लागलें आणि तें करतांना निःशस्त्रांचें राजकारण आणि समाजसंघटना यांचीं तत्त्वें काळजीपूर्वक प्रचारांत आणलीं म्हणजे स्वराज्य प्राप्त करून घेणें ही गोष्ट मेहनत करावयास लावणारी पण साध्य वस्तु आहे असा माझा दृढविश्वास आहे.

ही मेहनत करण्याचें चुकविण्यांत तात्पर्य नाहीं. ती तयारी करणें ज्याचें काम असा वर्ग तयार करणें अवश्य आहे.

हिंदुस्थानास स्वराज्य देण्यांत इंग्लंडचें नुकसान नाहीं. इंग्लंडनें आपणांस स्वराज्य देण्यास मुख्य अडचण आपल्याच तयारीचा म्हणजे जबाबदारी पतकरण्यास योग्य अशा वर्गाचा अभाव होय. साम्राज्याबाहेर पडावें हा आपला हेतूच नाहीं. परचक्रापासून मुक्तता मिळवून अंतर्गत वाढ प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्या हिंदुस्थानास इंग्लंडच्या सहकार्याची जरुरी आहे, व इंग्लंडला हिंदुस्थानच्या सहकार्याची जरुरी आहे, व हिंदुस्थानांतील लोकांवर स्वराज्याची जबाबदारी टाकली तरच हिंदुस्थानाची उन्नति होईल आणि हिंदुस्थानची उन्नति होण्यांतच इंग्लंडचें कल्याण आहे अशीं माझीं स्थूल मतें आहेत. ही माझी विचारपध्दति मी येथें मांडली आहे.

अस्तित्वांत असलेल्या एखाद्या संस्थेंत शिरून मला काम करतां येणार नाहीं, आणि एक एक संस्था काबीज करणें या गोष्टीतहि शक्तीचा अपव्यय मी करूं इच्छीत नाहीं. पूर्वीच्या चळवळ करणाऱ्यांनीं जे निधी उत्पन्न केले त्यांचा मला लोभ नाहीं. माझे विचार आणि कार्यपद्धति हीं बरीच निश्चित झालीं आहेत, आणि माझ्या एकंदर कार्यांत विचारप्रसार हेंच मोठें कार्य आहे.

कार्याची व्याप्ति फार मोठी आहे. हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत चळवळ पाहिजे. त्याप्रमाणेंच इंग्लंड, वसाहती, अमेरिका व जिनिव्हा येथेंहि चळवळ करावी लागेल. हें काम कसें करावें याची कल्पना आज हिंदुस्थानांतील राजकारणी मंडळींना अजून चांगली समजली नाहीं अशी माझी समजूत आहे व यामुळें हें काम मी हातीं घेऊन सिद्धीस न्यावें असें मला वाटूं लागलें आहे.

या कार्यास मला ज्ञानकोशाच्या समाप्तीनंतर लागतां येईल. स्वराज्य मिळविण्यासाठीं अवश्य होणारा कार्यक्रम हातीं घेण्यापूर्वी तो कार्यक्रम देशांतील बऱ्याच मोठ्या वर्गास समजला पाहिजे. तर त्या कार्यक्रमाचें स्वरूप समजविण्याकरितां आज प्रयत्न करावा असा हेतु असल्यामुळें त्या प्रसाराच्या हेतूशीं सहानुभूति बाळगणारा एक संघ करावा एवढाच सध्यांच्या प्रयत्न आहे. या संघास, याचें इतर संघापासून पृथक्त्व दाखविण्यासाठीं "स्वयंनिर्णयी संघ" असें नांव देतों.

संघाचें कार्यस्वरूप दाखविणारीं सूत्रें पुढें दिलीं आहेत. या हेतूंच्या सिद्ध्यर्थ जो कार्यक्रम करावा लागावयाचा त्याची घटना पुढें तयार करावी लागेल, आणि कार्याच्या वृद्धीप्रमाणें तींत फेरफार करावे लागतील.

( १ ) हिंदुस्थानास स्वयंनिर्णयाचे पूर्ण हक्क प्राप्त करून घेणें म्हणजे हिंदुस्थानचा कारभार भारतीय जनतेच्या ताब्यांत पूर्णपणें आणणें आणि यासाठीं अवश्य लागणारी चळवळ करणें हें या संघाचें प्रथमकर्तव्य आहे.

संघाचा प्रयत्न १९२९ सालीं डोमिनियन स्टेटस प्राप्त करून घ्यावें हा आहे.

( २ ) डोमिनियन स्टेटसचे हक्क हिंदुस्थानाला मिळविण्यासाठीं हिंदुस्थानला अनुकूल परिस्थिति उत्पन्न करणें, आम्ही अत्यंत श्रेष्ठ अशा शासनतत्त्वांप्रमाणें आणि अर्वाचीन राष्ट्रास शोभतील अशाच शास्त्रीयपद्धतीनें हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवूं असें हिंदुस्थानतर्फे ब्रिटिशसरकार व जनता यांस अभिवचन देणें. हिंदुस्थानसरकार, ब्रिटिश साम्राज्य व राष्ट्रसंघ या संस्था जगाच्या शांततारक्षणास, दडपलेल्या राष्ट्रांच्या आणि राष्ट्रकांच्या उन्नतीस आणि स्वयंनिर्णयास साहाय्यक होतील असा प्रयत्न करणें आणि राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वामुळें उत्पन्न

होणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव उत्पन्न करणें आणि सर्व राष्ट्रांचें कल्याण प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र, तथापि सार्वराष्ट्रीय धर्मशास्त्राच्या उच्च तत्त्वांनीं बद्ध असण्यांत आणि मानवोन्नतिकारक प्रयत्नांत इतर राष्ट्रांशीं सहकारिता करणारें असण्यांतच आहे, एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या दौर्बल्याचा अयोग्य फायदा घेण्यांत नुकसान आहे, इत्यादि तत्त्वांचा सर्व राष्ट्रांत फैलाव होऊन जगाचें स्वास्थ्य वाढावें आणि जगाचा भौतिक शास्त्रीय आणि आर्थिक उत्कर्ष व्हावा या विचाराचा प्रसार करणें इत्यादि प्रयत्नांसाठीं या संस्थेचा जन्म आहे.

( ३ ) स्वयंनिर्णयी संघानें हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची जबाबदारी घ्यावयाची, ती पत्करावयासाठीं लोकांस तयार करावयाचें; आणि आम्हांवर जबाबदारी टाकण्यांत साम्राज्याचें, जगाचें व तसेच हिंदुस्थानचें हित आहे ही गोष्ट पूर्णपणें न पटल्यामुळें आपणांस जबाबदारी देण्यास जर साम्राज्यसरकार तयार नसेल तर त्या साम्राज्यसरकारनें उरावर बसविलेल्या शासकमंडळास निःशस्त्रोपायांनीं, आणि अत्यंत कायदेशीर मार्गानें, पण पद्धतशीर, सतत, आणि निकराचा विरोध करावयाचा, आणि त्यायोगेंकरून आपली स्वयंशासनार्हता सिद्ध करावयाची हा कार्यक्रम संघास पत्करावा लागणार असल्यामुळें पूर्ण स्वयंशासन पत्करावयाची तयारी करतांना, जर पूर्ण स्वराज्य मिळालें नाहीं तर ज्या विरोधाच्या क्रिया कराव्या लागतील त्यांची तयारी करून ठेवणें हाहि संघाच्या १९२९ च्या पूर्वीच्या कार्यक्रमाचा अवश्य भाग धरण्यांत येत आहे.

( ४ ) ज्या आकांक्षा साध्य करून घेण्यास किंवा जे अन्याय दूर करण्यास शस्त्रोपाय केला जातो त्या आकांक्षांची प्राप्ति आणि अन्यायांचें दूरीकरण या गोष्टी निःशस्त्रप्रतिकारानें देखील तितक्याच यशस्वितेनें साध्य होऊं शकतात असा आमचा विश्वास आहे.

( ५ ) देशाच्या शासनाची जबाबदारी पत्करण्याची देशांत इच्छा वृद्धिंगत करावयाची, देशशासनाचें ज्ञान जनतेंत वृद्धिंगत करावयाचें, आणि देशाच्या इच्छेला योग्य सन्मान साम्राज्यसरकारनें दाखविला नाहीं तर तो दाखवावा म्हणून कराव्या लागणाऱ्या कारवाईला लोकांस तयार करावयाचें, व हें शिक्षण ग्रंथप्रसारानें व पगारी उपदेशकांमार्फत द्यावयाचें

या क्रिया आपल्या देशांत करावयाच्या आहेत. त्याचप्रमाणें आपण हातीं घेतलेल्या कार्यक्रमाच्या गंभीर स्वरूपाची इंग्लंडच्या प्रधानमंडळास व तेथील जनतेस जाणीव करून द्यावयाची हेंहि कर्तव्य आहे. तसेंच हिंदुस्थानच्या प्रगतीस विरोध केल्यानें किंवा हिंदुस्थानास लुटण्यानें ब्रिटिश राष्ट्राचें कल्याण होत नाहीं याचीहि जाणीव करून द्यावयाची हा संघाच्या कार्यक्रमांतील प्रधान भाग आहे.

स्वयंनिर्णयीसंघाचीं हीं हेतुसूत्रें ठेवून संघ उत्पन्न करावयाचा आणि ज्ञानकोश संपल्यानंतर त्या हेतूंच्या सिद्ध्यर्थ कामास लागावयाचें हा विचार आहे आणि तो मी मोकळ्या मनानें माझ्या सर्व साहाय्यकांस कळविण्याची क्रिया आज करीत आहे, आणि त्यासाठीं निःशस्त्रांचें राजकारण या विषयावर हें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध करीत आहे, त्या पुस्तकांत या कराव्या लागणाऱ्या राजकारणाची पद्धति स्पष्ट केली आहे. हें पुस्तक महाराष्ट्रांत एक लक्ष वाचकांनीं वाचावें अशी इच्छा आहे. या पुस्तकाचा कांहीं भाग निबंधरूपानें " विद्यासेवक " मासिकांत येऊन गेला आहे.

या पुस्तकांत राज्याधिकार घेण्यासाठीं जो काय कार्यक्रम अंगिकारायाचा तोच दिला आहे. अधिकार हातीं घेऊन राज्यव्यवस्था कशी करावयाची हा पुढच्या पुस्तकाचा विषय आहे.

देशाच्या पारतंत्र्याबद्दल ज्या तरुणांस दुःख होत असेल अशा सर्व तरुणांस हें पुस्तक वाचून त्यावर विचार करून नंतर स्वयंनिर्णयी संघास मिळण्यास मी आमंत्रण करतों.

श्री. व्यं. केतकर.

श्रीमंत सौ. ग. पं. वाचनालय, औंध

# निःशस्त्रांचें राजकारण.

## ग्रंथसंक्षेप

### प्रकरण १ लें.

#### प्रास्ताविक विचार.

सशस्त्र चळवळ करून हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळविणें अशक्य आहे. तथापि आपणास अवश्य असलेलें स्वातंत्र्य निःशस्त्रोपायांनीं मिळण्याजोगें आहे; युद्ध करणें अशक्य आहे म्हणून निःशस्त्रोपायांचें अवलंबन केलें पाहिजे ही एक विचारपद्धति; संपन्न व बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यांत राहण्यानें आपले फायदे आहेत सबब स्वातंत्र्याची म्हणजे. साम्राज्यांतून वेगळे होण्याची संधि आली तरी तिचा फायदा घेऊं नये, ही दुसरी विचार पद्धति; आणि स्वतंत्र राष्ट्रांनीं देखील युद्ध करूं नये, कारण युद्धांत जय मिळाला तरी विजयी राष्ट्राच्या सर्व अपेक्षा तृप्त होत नाहींत, उलटपक्षीं राष्ट्राच्या स्वाभाविक अपेक्षा युद्धाखेरीजहि पुऱ्या करून घेतां येणें शक्य आहे असा काळ उत्तरोत्तर येत आहे; ही तिसरी विचारसरणी.

परतंत्र राष्ट्रास युद्धाखेरीज स्वातंत्र्य मिळणें शक्य आहे काय ? आणि जागतिक विकास म्हणजे सर्व राष्ट्रांचें कल्याण होण्याकरितां प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र असणें अवश्यच आहे काय ? (पृ. १–३) जितराष्ट्रांस स्वातंत्र्य दिल्यानें जितांची आर्थिक उन्नति झपाट्यानें होते, आणि जागतिक विकासाकरितां जगांतील प्रत्येक राष्ट्र भरभराटींत येणें जरूर आहे अशी नवीन वृत्ति अलीकडे जगाच्या राजकारणांत उत्पन्न झाली आहे. सशस्त्र युद्ध करून ज्या गोष्टी साधावयाच्या त्याच सामदानादि उपायांनीं साधणें अधिक सुलभ असतें हा विचार जुनाच आहे. हिंदुस्थानास निःशस्त्रो-

पायांनीं स्वातंत्र्य मिळवून दिल्यास जगद्विकासांत आपण महत्त्वाचें कार्य केलें असें होईल. हिंदुस्थानांतील प्रजा निःशस्त्र असल्यामुळें निःशस्त्र-प्रतिकाराचें राजकारण करण्यास हिंदुस्थान ही योग्य कर्मभूमि आहे. हिंदु-स्थानानें निःशस्त्र उपायांनीं स्वातंत्र्य मिळविल्यास इतर राष्ट्रांसहि शस्त्र-संन्यास करण्यास उत्तेजन येईल. पृ. ४–७

केवळ लूट, किंवा मुलूख, किंवा व्यापारी सवलती किंवा वाढत्या प्रजेला निवासक्षेत्र हीं मिळावीं म्हणून स्वतंत्र राष्ट्रांनीं पूर्वीं युद्धें केलीं. पण लुटीकरितां किंवा राजाला एखादी सुंदर स्त्री मिळवून देण्याकरितां किंवा दुसऱ्याचा मुलूख जिंकून तेथील लोकांना गुलाम बनविण्याकरितां युद्ध करणें ही अनीतीची आंकांक्षा धरणें आज कोणत्याहि राष्ट्रास शक्य नाहीं. पृ. ८–९.

तथापि पूर्वींच्या सर्व लढाया मूर्खपणाच्या होत्या, यापुढें जगामध्यें कोणत्याहि कारणास्तव युद्ध करणें चांगलें नाहीं आणि सर्व गोष्टी केवळ निःशस्त्रोपायांनींच साध्य होतील असें म्हणत नाहीं. उच्च शास्त्रीय विकास करून घेण्यास जे लोक असमर्थ आहेत त्यांनीं स्वतःला व त्याच्या ताब्यांत असलेल्या अफाट भूप्रदेशाला ऊर्जितावस्थेस आणण्याकरितां त्यांस जिंकण्याचें समर्थन. पृ. १९-११.

हिंदुस्थानचे लोक स्वतःची उन्नति करून घेण्यास व स्वातंत्र्याची म्हणजे शासनाची जबाबदारी पत्करण्यास लायक आहेत, म्हणून त्यांना स्वातंत्र्य पाहिजे. सांप्रतच्या हिंदी राजकारणांत पक्षविषयक चळवळींनांच प्राधान्य आहे. ती दृष्टि बदलून अर्थशास्त्रीय उपायांनीं देशविकास करण्याच्या मुत्सद्यांचें महत्त्व हिंदी राजकारणांत वाढलें पाहिजे. निःशस्त्र हिंदुस्थानास स्वातंत्र्य देण्याकरितांच केवळ निःशस्त्रांचें राजकारण यशस्वी करावयाचें नसून स्वतंत्र देशांत स्थानिक धडामोडींत व इलेक्शनच्या धामधुमींतहि सशस्त्र गडबडी व रक्तपात होतात ते बंद करून लोकराज्य यशस्वी करून दाखविण्याकरितांहि निःशस्त्राच्या राजकारणाचा धडा हिंदुस्थानानें अमेरिकेंतल्या कित्येक संस्थानांना घालून देणें आज जरूर आहे. पृ. १२-१३

हिंदुस्थानांत फार असंतोष होऊन मालमत्तेच्या असुरक्षितेचीं चिन्हें दिसावयास लागल्यास इंग्लंडचा सावकार असलेलें आणि हिंदुस्थानांत

मोठ्या प्रमाणावर धंदा करीत असलेलें युनैटेड स्टेटससारखें परकें राष्ट्रहि दोघांस निःशस्त्रता ठेवण्यास भाग पाडील असा बराच संभव आहे.
पृ. १४–१५.

## प्रकरण २ रें.

### स्वराज्यकल्पना, लोकजागृति व सरकारची कार्यक्षमता.

निःशस्त्रांचें राजकारण म्हणजे जरूर तर संग्राम ( प्रतिकार ) करावयाचा; पण तो निःशस्त्र करावयाचा; आणि शक्य तितक्या गोष्टी संग्रामाशिवायच साध्य करावयाच्या; ज्याप्रमाणें मँचेस्टरचा कारभार लंडनच्या लोकांच्या हातीं ठेवल्यास मँचेस्टरचा विकास चांगला होणार नाहीं व त्यामुळें मँचेस्टर व लंडन दोघांचें नुकसान आहे त्याप्रमाणें हिंदुस्थानचा कारभार इंग्रज जनतेस जबाबदार अशा नोकरशाहीच्या ताब्यांत राहिल्यानें हिंदुस्थानचा आर्थिक व शिक्षणविषयक विकास न होऊं देण्यांत हिंदुस्थानचें व इंग्लंडचें दोघांचेंहि नुकसान आहे. म्हणून हिंदुस्थानाला स्वराज्य मिळणें जरूर आहे. पृ. १५–१६.

स्वराज्य म्हणजे हिंदु राजा असणें व त्यानें मनुस्मृतिसारख्या धर्मग्रंथांतील विचाराप्रमाणें राज्य चालविणें असा पूर्वी अर्थ होता. पण आज स्वराज्य या शब्दाचा अर्थ प्रातिनिधिक संस्था असलेलें लोकांचें राज्य असा झाला आहे. स्वराज्याची म्ह. प्रातिनिधिक राज्यपद्धतीची आवड लोकांत उत्पन्न करणें ही आजच्या राजकारणांतल्या कार्यक्रमाची पहिली पायरी होय. प्रातिनिधिक संस्था म्ह. बारभाईचा कारभार असा वाईट अर्थ पुष्कळ लोक करतात आणि सर्व सत्ताधारी राजा प्रजाहितदक्ष असला तर एकतंत्री वागूनच थोडक्या काळांत प्रजेचें पुष्कळ हित करूं शकतो असें ते म्हणतात. पण प्रातिनिधिक राज्यपद्धतींत प्रधान मंडळाला कायदेमंडळातले शेंपाचशें लोक राज्यकारभारविषयक प्रश्न करण्यास सतत सज्ज असल्यामुळें बेजबाबदार बारभाईतले दोष पुष्कळ कमी होतात, आणि लोकसुधारणेचा प्रवाह जरी मंदगतीनें वाहिला तरी अधिक पद्धतशीर व अखंड वाहतो. पृ. १७–१८.

स्वराज्य म्हणजे प्रातिनिधिक संस्था आपण मागत आहों त्यालाच

'डोमिनियन स्टेटस ' किंवा साम्राज्यांतर्गत स्वराज्य हा शब्द रूढ झाला आहे. स्वराज्यरूपी हिंदी शासनयंत्राची रचना कशी असावी ह्या प्रश्नाचें उत्तर या शासनसंस्थेनें प्रजेसाठीं काय करावें या संबधीच्या अपेक्षेवर अवलंबून आहे. लोकांत आज केवळ वैय्यक्तिक आर्थिक आकांक्षा आहेत, म्हणजे आजचे राजकारणातले मध्यमवर्गातले पुढारी किंवा 'ब्राह्मणेतर ' चळवळीचे पुढारी यांचा मुख्यत्वेंकरून नोकरीचा हेतु असतो, स्वराज्याच्या चळवळींत पडणाऱ्या व्यापाऱ्यांचा सरकारी कंत्राटे व पैशाची मदत गोऱ्या व्यापाऱ्यांना न मिळतां स्वतःला मिळावी हा असतो. शेतकरी वर्ग अद्याप राजकारणांत पडूं लागलाच नाहीं. स्वराज्यापासून काय फायदे व्हावयाचे हें कळविण्याकरितां प्रत्येक वर्ग स्वतःच्या हिताच्या दृष्टीनें स्वराज्याकडे पाहूं लागला तर तें इष्टच आहे. कारण प्रत्येक वर्गानें संघीभूत होऊन आपलें साधावयाचें तर त्या सर्व वर्गांना प्रातिनिधिक संस्थांची आवश्यकता अधिक लवकर पटेल. जें एखाद्या संस्थानिकास किंवा त्याच्या कारभाऱ्यास सुचणार नाहीं अशा अनेक फायद्याच्या गोष्टी निरनिराळ्या वर्गांचे प्रतिनिधि एकत्र आल्यानें सहज सुचवूं शकतील आणि राज्य खरोखर सर्व लोकहितासाठीं चालेल. शिवाय हिंदी स्वराज्य चालविणारीं माणसें सर्व जगाच्या लोकमतास जबाबदार होणार; म्हणून लोकांमध्यें सामुच्चायिक जबाबदारीच्या कल्पनांचा प्रसार केला पाहिजे व तसें झाल्यानें लोकांच्या मनांतले अनेक विकल्प जाऊन त्यांच्यांत नैतिक सुधारणा वाढेल. पृ. १९–२२

स्वराज्याच्या चळवळीनें सरकारचाहि बोज वाढणार आहे. उदा. पोलीसखातें लोकांस जबाबदार नाहीं तोंपर्यंत या खात्याचा उपयोग स्वदेशाभिमानी लोकांस छळण्यास व पठाणापुढें दुर्बलता दाखविण्यांत होतो त्यामुळें लोकांत त्या खात्याला सहानूभूति किंवा प्रतिष्ठा कांहींच नाहीं. पण स्वराज्यांत हें खातें खरें लोकरक्षक व खरें लोकप्रिय होईल. करवसुली खातेंहि लोकहितांकरितां व लोकप्रतिनिधींच्या संमतीनें बसलेले कर वसूल करूं लागेल तेव्हांच तें पुष्कळ मोठें व खरें लोकप्रिय होईल. याप्रमाणें प्रत्येक खात्याची पत, कार्यक्षेत्र व लोकप्रियता वाढविण्याकरितांच स्वराज्याची चळवळ आहे. २३–२५

## प्रकरण ३ रें.

### सध्यांचे राजकीय पक्ष आणि त्यांचें कार्य.

स्वराज्य ( डोमिनियन स्टेटस ) प्राप्त करून घेणें आणि मागासलेल्या जनसमूहांची उन्नति करणें हीं दोन ध्येयें सर्व सुशिक्षित वर्गास मान्य आहेत. हीं ध्येयें साधण्यासाठीं आज अस्तित्वांत असलेल्या राजकीय पक्षांनीं काम निरनिराळ्या प्रकारें केलें आहे व त्यांच्यांत ध्येयप्राप्तीचीं साधनें व कार्यपद्धती यासंबंधीं तीव्र मतभेद आहेत. आज ( १ ) प्रागतिक पक्ष ( २ ) स्वराज्य पक्ष ( ३ ) गांधी पक्ष ( ४ ) ब्राह्मणेतर पक्ष ( ५ ) मुसलमान पक्ष ( ६ ) नवा तयार झालेला स्वतंत्रांचा पक्ष असे सहा पक्ष आहेत. अस्पृश्यवर्गानें राजकीय कार्यक्रम कांहींच हातीं घेतलेला नाहीं. ब्राह्मणेतर वर्गांत गुजराथ, उत्तर हिंदुस्थान व बंगाल मध्यें सुशिक्षित वर्ग बराच असल्यामुळें त्याच्या राजकीय आकांक्षा पहिल्या तीन पक्षाप्रमाणेंच आहेत. पण महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतरांत सुशिक्षित वर्ग थोडा असल्यामुळें सरकारांत अधिकाराच्या जागा मिळवून त्याचा फायदा स्वतःच्या जातीस द्यावयाचा एवढीच त्याची आकांक्षा दिसते. मुसलमान पक्षाची आकांक्षाहि तशीच आहे. म्हणून प्रागतिक, स्वराज्यवादी व नाफेरपक्ष हे तीनच मुख्य राजकीय पक्ष आहेत. २५—२९

लोकांच्या विशिष्ट मागण्या जाहीर रीतीनें मांडून त्या सरकारच्या कानीं घालणें हें काम पूर्वी कांग्रेस करीत असे, पण आतां तें काम कौंसिल मार्फत होत असून तें लिबरल व स्वराज्यपक्ष करीत आहे. म्हणून कांग्रेसला लोकसुधारणेचा स्वतंत्र विधायक कार्यक्रम आखणें जरुर झालें. म. गांधींनीं १९२१ सालीं आपला विशिष्ट कार्यक्रम कांग्रेसला दिला. त्यांत 'अनत्याचारी असहकारिता' हें तत्व फार उत्तम होतें. पण त्यांची खादी व बहिष्कारत्रयी याबद्दल एक वर्षाच्या अनुभवानंतर मतभेद होऊन महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या खटपटीनें कौंसिलप्रवेशवादी स्वराज्यपक्ष अस्तित्वांत आला, आणि गांधी तुरुंगांतून सुटल्यानंतरहि त्यांनीं कांग्रेस स्वराज्यपक्षाच्या हातीं सर्वस्वी दिली. ३०—४०

भोर

तथापि कौंसिल बाहेर लोकजागृतीचें व लोकसुधारणेचें काम पुष्कळ असल्यामुळें कांग्रेस ही कौंसिलांतील एखाद्या पक्षाच्या हातांतलें बाहुलें न बनूं देतां आपला स्वतंत्र कार्यक्रम आंखून कांग्रेसमार्फत पार पाडण्याचें ध्येय नाफेरपक्षानें ठेवावयास पाहिजे. आणि सरकार कायदेमंडळाचें न ऐकेल तर सरकारविरुद्ध चळवळ करण्याचें यंत्र कांग्रेसनें बनून राहिलें पाहिजे. याप्रमाणें कौंसिलें व कांग्रेस यांचा अन्योन्याश्रय असावा. ४१---४३

प्रागतिक पक्षानें कौंसिलांतून विधायक काम बरें केलें, पण सरकार ऐकत नाहीं अशा वेळीं जरुर तितका तीव्र विरोध केला नाहीं. स्वराज्यपक्षानें केवळ विरोधानेंच काम केलें. पण स्वतःचा सुधारणेचा विशिष्ट विधायक कार्यक्रम कौंसिलमार्फत हातीं घेतला नाहीं. नाफेरपक्षानें कांग्रेस मार्फत हरताळ, सत्याग्रह, वगैरे सरकारला विरोधाचें कांहीं कार्य चांगलें केलें, पण आतां कांग्रेस स्वराज्यपक्षाच्या ताब्यांत देऊन, स्वतः लोकाचा विश्वास उडालेल्या खादीशिवाय दुसरा कांहींच कार्यक्रम हातीं घेतला नहीं. याप्रमाणें या तीन प्रमुख पक्षाचें लोकांतील वजन फार कमी झालें आहे. पण लोकहिताच्या दृष्टीनें या तिन्ही पक्षांना कांग्रेस व कौंसिलें मिळून कार्य करण्यास भरपूर वाव आहे. ४१—४७

## प्रकरण ४ थें.

## लोकसंमुख कार्यक्रम.

राजकीय चळवळ करणारा वर्ग आतां वाढूं लागल्यामुळें या कार्याचें विशिष्टीकरण होणें जरुर आहे, आणि त्या विशिष्टीकरणाबरोबर भिन्नमार्गी मंडळींत एकसूत्रता स्थापणें व त्यांना एकमेकांचे सहकारी आणि दुसऱ्याचें मत व कार्य याचें सहिष्णु बनविणें जरूर आहे.कौंसिला बाहेरील नाफेरपक्षानें गांधींच्या राजकीय संन्याशानें गांगरून न जातां गांधींच्या कार्यातले गुणदोष नीट लक्षांत घेऊन लोकजागृतीचें काम पुढें चालू ठेविलें पाहिजे. ४८—५३

गांधींचे गुण, म्हणजे त्यांचीं तत्वें–( १ ) दुर्बलांसहि सुलभ अशी असहकारिता ( २ ) स्वराज्याची चळवळ ही ब्रिटिश जातीविरुद्ध नसून

परकी नोकरशाहीच्या अनियंत्रित राज्यपद्धतीविरुद्ध आहे ही शिकवण; ( ३ ) हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी वगैरे सर्व वर्गांत परस्पर विश्वास व बंधुप्रेम यांची जोपासना, ( ४ ) असहकारितेचें साधन वापरतांना ठेवावयाचा अनत्याचारीपणा; हीं एकाहून एक अधिक महत्वाचीं व अत्यंत सुंदर आहेत. गांधींच्या चुका म्ह. ( १ ) मुख्य कार्यक्रम अनेक आगंतुक गोष्टींमुळें अवजड व अव्यवहार्य बनविला. ( २ ) कोर्ट कौंसिल कॉलेज बहिष्कारामुळें शत्रू वाढविले. ( ३ ) चरख्यानें स्वराज्य असला सुशिक्षित बुद्धीस न पटणारा मंत्र सांगितला. ५४—५८

कायदेभंग किंवा करबंदी हें एकच खरें राजकीय निःशस्त्रप्रतिकाराचें शस्त्र १९२९ सालीं सरकारनें पूर्ण स्वराज्य ( डोमिनियन स्टेटस ) न दिल्यास १९३० सालीं हातीं घेण्याच्या हेतूनें 'स्वयंनिर्णयी संघ' अस्तित्वांत येऊन काम करणार आहे. हें काम म्हणजे येत्या चार वर्षांत सर्व राष्ट्रभर लोकांकडून करबंदीची चळवळ करावी लागल्यास सत्याग्रहींचीमत्ता सरकार जप्त करील ती मालमत्ता विकत न घेण्याबद्दलची अभिवचनें मिळविणें. याकरितां चांगले पगार देऊन ५००० प्रचारक संघ नेमील. करबंदीच्या मोहिमेच्या वेळीं सरकार पोलीस व रेल्वे या खात्यांमार्फत कायदेमंडळांस संमत नाहींत असे हुकूम काढून बजावूं लागल्यास तें मानणें न्यायाचें होईल काय वगैरे प्रश्न उपस्थित करून त्या खात्यांतील नोकरांची सहानुभूति मिळविणें, तेथल्या अँग्लो इंडियन व युरोपीयन समाजास स्वराज्याचे फायदे दाखवून त्यांना चळवळींत सामील करून घेणें वगैरे कामें संघ करील. करबंदीच्या वेळीं हिंदुस्थान सरकारला परदेशांत कर्ज मिळूं नये व देशांत कागदी चालन वाढवून खर्च चालवितां येऊं नये अशाकरितांहि संघ परदेशीं व स्वदेशीं चळवळ करील. ५९—६८

## प्रकरण ५ वें.

### सरकारचें बलाबल.

हिंदुस्थान सरकार हा दुर्भेद्य किल्ला नाहीं. सध्यांच्या नोकरशाहीचे अधिकार काढून घेण्याकरितां एकाद्या कंपनींत जुने डायरेक्टर काढून नवे डायरेक्टर नेमण्याकरितां ज्या युक्त्या शेअरहोल्डर योजतात त्याच

योजल्यानें कार्य होईल. हिंदुस्थान सरकार हें कर्ज देणाऱ्या लोकांना जबाबदार आहे. करांच्या पैशाचा मोबदला नोकरशाहीकडून योग्य तऱ्हेनें मिळत नाहीं म्हणून करबंदी करा, आणि नोकरशाहीचे अधिकार काढून घेऊन आमच्या हातीं द्या, व ते आम्ही अधिक लोककल्याणपर तऱ्हेनें वापरूं, असें आश्वासन जनतेला देऊन तें पार पाडण्यासाठींच स्वयंनिर्णयसंघ आहे. ६९—७३

हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न १३ कोटी पौंड आणि कर्ज ८९ कोटी पौंड आहे. म्हणजे साधारणतः पांच टक्क्यांप्रमाणें व्याजाची रक्कमच सुमारें उत्पन्नाच्या एकतृतियांश होते. अशा स्थितींत हिंदुस्थानचें सर्व उत्पन्न पूर्णपणें बंद करण्याची जरूर नाहीं. करबंदीनें जरी दहा टक्के वसूल कमी झाला तरी सरकारच्या सावकारांस व्याज मिळण्याची धास्ती वाटूं लागेल आणि हें सावकारमंडळच इंग्रज नोकरशाहीस दूर करून लोक-प्रतिनिधींच्या हातीं अधिकार देण्याचा आग्रह धरील. करबंदीच्या चळ-वळीनें उत्पन्न होणाऱ्या धोक्याची सूचना सावकारांना देण्याचें कामहि हाच संघ करील. ७४—७६

## प्रकरण ६ वें.

### स्वयंनिर्णयी संघाची कर्तव्यमीमांसा.

स्वयंनिर्णयी संघाचें राजकारण निराळ्या स्वरूपाचें आहे. त्याला अनु-रूप असा सामाजिक व नैतिक विचार तयार केला पाहिजे. स्वराज्याच्या प्राप्तीनें हिंदुस्थान व इंग्लंड या दोघांचाहि फायदा आहे अशी खात्री पट-ल्यानें चळवळ करणाऱ्यांच्या मनात निर्भयता येईल. तसेंच स्वराज्य-प्राप्तीनें राष्ट्र अधिक प्रगमनशील व सुखी होईल अशी हिंदी जनतेची खात्री पटवून दिल्यानें करबंदीची चळवळ हें धर्म ( न्याय्य ) युद्ध वाटून त्यांत सर्व लोक सामील होतील. चळवळ करणारे स्वतःच्या वचनास जागणारे व प्रतिपक्ष्याशींहि लबाडी न करणारे पाहिजेत. स्वराज्य मिळा-ल्यानें लायक इंग्रजास उपद्रव होणार नाहीं. हिंदुस्थानाला कर्ज बरेंच असल्यामुळें राज्यकारभार नीट चालून सावकारांत पत राहण्याकरितां लायक इंग्रज नोकर ठेवावे लागतील; आणि इंग्लंड रोकडवाला साव-

कार देश असल्यामुळें आणि हिंदुस्थानास उद्योगवृद्धीसाठीं आणि आगगाड्या कालवे करण्यासाठीं कर्ज पाहिजे म्हणून इंग्लंडशीं अधिक निकट संबंध ठेवावा लागेल. ७६—८६

स्वराज्यप्रात्प्यर्थ अवश्य असलेल्या दहा गोष्टी, आणि नऊ उच्च नैतिक तत्त्वें. ८७—९५

## प्रकरण ७ वें.

### इंग्लडचें हित हिंदुस्थानाविरुद्ध आहे काय?

इंग्लंडच्या खऱ्या हितास हिंदुस्थानचें स्वराज्य विघातक नाहीं हें पटण्यासाठीं जेतृजितसंबंधाचें अर्थशास्त्र लक्षांत घेतलें पाहिजे. लोभमूलक कल्पनांनीं व देशांतील विशिष्ट वर्गाच्या हितासाठीं इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं हिंदुस्थानच्या वृद्धीस अवरोध आजपर्यंत केला तरी भारतचौर्याच्या तत्त्वावर रचलेली ही राजनीति सत्फलदायी नाहीं ही गोष्ट इंग्लंडचें शासनशास्त्रीय ज्ञान वाढत असल्यामुळें त्यास लवकरच आढळून येईल. ९६—१०२

जेत्यांच्या नीतींत फरक होत जाण्याचीं सहा कारणें. जित हिंदुस्थानला सर्व खिस्ती बनवून आत्मसात् करणें किंवा केवळ नीग्रोप्रमाणें गुलामगिरींत ठेवणें शक्य नाहीं, हें इंग्लंडनें पूर्वींच जाणलें आहे. पूर्वी इंग्लंडांत नार्मन जेत्यांनीं केलें त्याप्रमाणें जित हिंदी लोकांच्या सर्व जमिनी हिसकावून घेऊन मोठा इंग्रज जमिनदार वर्ग, तोच पुढें राजसत्तेचा शत्रु होईल, या भीतीनें इंग्लंडनें येथें निर्माण केला नाहीं. व्यापाराच्या साधनानें इंग्लंड हिंदुस्थानचें वित्तचौर्य मात्र पुष्कळ वर्षें करीत आहे. १०३—१०९

स्वराज्यामुळें इंग्लंडचा व्यापार कमी होईल अशी भीति पुष्कळांस वाटते पण ती चूक आहे. फ्रान्स व इंग्लंड या स्वतंत्र देशांमध्येंहि परस्पर पक्क्या मालाची देवघेव चालूच आहे; त्याप्रमाणें स्वयंशासित हिंदुस्थान पक्का माल बनवूं लागला तरी इंग्लंडबरोबरचा व्यापार चालू राहील; कारण सर्वच पक्का माल प्रत्येक देशांत होत नाहीं; शिवाय यांत्रिक उत्पादन वाढल्यानें नगरवासी कामवर्ग वाढेल व त्याची खरे-

दीची शक्ति जास्त असल्यामुळें सर्व प्रकारच्या वस्तूंचा खप वाढेल व नव्या गरजा उत्पन्न होतील, हिंदुस्थाननें पक्का माल पुष्कळ उत्पन्न केल्यास तो परदेशीं नेऊन विकण्याचा व्यापारहि इंग्लंड करीत राहील. पण हे दूरचे फायदे इंग्लंडांतील मुत्सद्यांस दिसत नाहींत म्हणून हिंदी स्वराज्यास विरोधी आहेत. ११०—११५

## प्रकरण ८ वें.

### इंग्रज अधिकाऱ्यांची हकालपट्टी.

हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्यानें सर्व इंग्लंडदेशाचें नुकसान नसलें तरी इंग्रज नोकरवर्गाच्या नोकऱ्या जातील ह्या नुकसानीच्या भीतीनें इंग्रज नोकरवर्ग तरी स्वराज्याच्या चळवळीविरुद्ध राहील असें मत आहे, पण तेंहि चूक आहे. कारण देशी नोकरांपेक्षां इंग्रज लोकांची लायकी आज जास्त आहे आणि स्वराज्यांत देशी लायक नोकर तयार होईपर्यंत इंग्रजाचें नोकरीचें क्षेत्र बराच काळ टिकेल. परकी लोकांनीं चालविलेल्या सुराज्यापेक्षां वाईट तऱ्हेनें चालविलेलेंहि स्वराज्य हें बरें; ही विचारसरणी योग्य नाहीं. परकी अमलापेक्षां स्वराज्यांत स्वतःची लायकी वाढविण्यास पुष्कळ अधिक वाव मिळतो म्हणून स्वराज्य पाहिजे. ११७-१२१

भारतीय समाजाच्या दारिद्र्याबद्दल, कनिष्ठ राहणीबद्दल किंवा सांस्कृतिक अप्रगतीबद्दल लाज स्वराज्यांतील सरकारासच वाटेल. आजच्या परकी नोकरशाही सरकारास वाटणार नाहीं. म्हणून स्वराज्यांतच खरी राष्ट्रीय प्रगति जोरानें होईल पण अशा सार्वराष्ट्रीय प्रगतींत पुढारलेले व मागासलेले यांच्यामध्यें हितविरुद्धता आहे अशी एक समजूत आहे पण तीहि चुकीची आहे. ब्राह्मणेतरांच्या चळवळींत शिव्यामारामाऱ्यापर्यंत प्रकरण जातें तेव्हां ब्राह्मणांचें लक्ष तिकडे स्वाभाविकच जातें. पण केवळ सरकारी नोकऱ्या किंवा इलेक्शनमध्यें मिळवावयाच्या प्रातिनिधिक संस्थातील मानाच्या जागा ब्राह्मणेतरांनीं अधिक मिळविल्या तरी ब्राह्मणांना फारसें नुकसान पोंहचत नाहीं. ब्राह्मणेतरांत शिक्षण आजच्यापेक्षां दसपट वाढलें तरी त्या मानानें नोकऱ्यांचें क्षेत्रहि वाढत आहे. शिक्षक, संपादक, छापखानदार, कॉन्ट्रॅक्टर वगैरे सुशिक्षितांनीं करावयाचे धंदे

वाढत आहेत. जास्त पुढारलेल्या देशांत मध्यमवर्गाचीच अधिकाधिक वाढ होत जाते व ती वाढ मागसलेल्या वर्गांतील माणसांना शिक्षण मिळून त्यांचा मध्यमवर्गांत समावेश होऊन होते. असा मध्यमवर्ग केवळ ब्राह्मणवर्गापेक्षां पुष्कळ अधिक मोठा होण्याला हिंदुस्थानांत वाव आहे. १२२–१२७

ब्राह्मणब्राह्मणेतर स्पर्धेसारखाच इंग्रज हिंदी स्पर्धेचा प्रश्न आहे. आजची इंग्रज नोकरांची पिढी स्वराज्यांतहि त्यांच्या कर्तबगारीस्तव कायम ठेवावी लागेल. लष्करी खात्यांतले लोक तर अधिक काळ ठेवावे लागतील इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानचें स्वतंत्र आरमारी व वैमानिक दळ ठेवण्याकरितां अधिक इंग्रज तज्ज्ञ नेमावे लागतील. कलेक्टरांसारखा मुलकी अधिकाऱ्यांचें वजन व वचक देशी अधिकाऱ्यांपेक्षां अधिक असल्यामुळें करवसुली नीट होण्याकरितां त्यांनाहि कायम ठेवावें लागेल. यांत्रिक व इतर संशोधन इंग्लंडांत अधिक असल्यामुळें येथील नव्या नव्या कारखान्याकरितां इंग्रज तज्ज्ञ लागतील म्हणून स्वराज्योत्तर काळांत इंग्रज लोकांस कार्यक्षेत्र वाढून हिंदी व इंग्रजांमध्यें खरी मैत्री उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. १२८—१३८

## प्रकरण ९ वें.

### स्वराज्यप्राप्ति न होण्याची अशक्यता.

हिंदुस्थानास दुर्बळ व दुर्बुद्ध ठेवून इंग्लंडांतील नफेबाजांची धन करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानचा राज्यकारभार एक शतकभर चालविला गेला आहे या आक्षेपांत बरेंच सत्य आहे. तथापि हिंदुस्थानाला पारतंत्र्यांत ठेवणें इंग्लंडला नुकसानकारक आहे हें आर्थिक व शासनविषयक तत्व कांहीं इंग्रज मुत्सद्यांस समजूं लागलें आहे. तसेंच ज्याप्रमाणें कारखानदारांविरुद्ध मजुरांस आपलें हित रक्षण करण्यासाठीं संप करण्याच्या किंवा दोन देशांच्या एकमेकांतील तंट्यांत असहकारिता करण्याचा हक्क आहे तसाच देशांतील शासक वर्ग व प्रजा यांच्यामधील तंट्यांत असहकारिता करून राजकीय हक्क मिळविण्याचा आहे हें तत्व आज कोणासहि तात्विकदृष्ट्या अमान्य करतां येणार नाहीं. १३९—१४२

इंग्रज नोकरशाहीनें शेंदीडशें वर्षें राज्य केलें त्यांत देशसंरक्षण बरें केलें पण लष्करांत पैसा फार खर्चून शिक्षण, आरोग्य व आर्थिक सुधारणा अशक्य केल्या. कै. गोखल्यांचें सक्तीच्या शिक्षणाचें बिल फेंटाळत ठेवलें. सुधारलेल्या हल्लींच्या कौंसिलांतहि लोकप्रतिनिधींच्या योजना धूळखात ठेवण्याचे आणि स्वतःच्या फायद्याच्या गोष्टी गव्हर्नरचें अंतिम अधिकार वापरून पास करून घेण्याचें धोरण चालविलें आहे. लोकप्रतिनिधींस नालायक ठरविण्याचाहि प्रयत्न चालू आहे. डायार्की उर्फ द्विसत्ता पद्धतीमुळें हल्लींच्या कौंसिलांतील राजकारणाला ठकवाठकवीचें व रुसण्याफुगण्याचें जें स्वरूप आलें आहे तें नष्ट करण्याकरितां लोकप्रतिनिधींच्या हातीं सर्व सत्ता साम्राज्य सरकारनें देण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. १४३—१४८

स्वराज्यप्राप्ति न होण्याची अशक्यता दर्शविणारीं पांच कारणें. १४८—१४९

## प्रकरण १० वें.

## देशी संस्थानें.

हिंदुस्थान राष्ट्रसंघाचें सदस्य असल्यामुळें देशी संस्थानांसंबंधीं जबाबदारी ब्रिटिश मुलखांतील सत्ताधीशावर आहे. संस्थानी प्रश्नांच्या विचाराकरितां संस्थानी प्रजा परिषदा भरत आहेत. पण आमूलाग्र सुधारणेचे प्रश्न हातीं घेण्याचे त्यास धैर्य नाहीं. रा. राजवाडे यांनीं 'बडोद्यांतील सुधारणा' संबंधीं विचार प्रदर्शित केले आहेत पण ते सतराव्या शतकांतील जर्मन क्यामेरालिस्टांसारखे असल्यामुळें आज अव्यहार्य आहेत. देशी संस्थानें इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड करण्यास केंद्रस्थानें म्हणून, पन्नास वर्षें सतत उद्योग केला तरी, तयार होणें शक्य नाहीं. म्हणून त्यांच्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. १५०—१५२

सांप्रत हीं संस्थानें मनुष्यस्वातंत्र्यास विघातक आणि मनुष्याच्या अब्रूस व संपत्तीस भयप्रद आहेत. पण प्रजासत्ताक राज्य चालविण्याची प्रजेची आज तयारी नसल्यामुळें संस्थानिकांचें उच्चाटण करणेंहि इष्ट नाहीं. म्हणून तूर्त संस्थानी प्रजेस संस्थानिक पदच्युत करण्याचा अधि-

कार आहे; प्रजेविरुद्ध संस्थानिकास मदत हिंदुस्थान सरकार करणार नाहीं एवढें जाहीर करावें. म्हणजे स्वतःचें पद शाबूत राखण्याकरितां संस्थानिकांना प्रजेची प्रीति संपादावी लागेल. प्रजावलंबी संस्थानिक बनले कीं ( १ ) त्यांच्या खाजगी खर्चावर नियंत्रण घालणें, ( २ ) न्यायाच्या कामांत ढवळाढवळ न करूं देणें, ( ३ ) अनेक संस्थानें मिळून एक स्वतंत्र अपील कोर्ट स्थापणें व मोठा पगार देऊन उत्तम कायदेपंडितांस न्यायाधीश नेमणें, ( ४ ) संस्थानिकांना द्रव्यसंचय करूं न देतां जरूर तर कर्ज काढून रेल्वे, कालवे, कारखाने वगैरे सुधारणा करण्यास लावणें, वगैरे सुधारणा केल्यास संस्थानी प्रजेचा आयुष्यक्रम निर्भय व सुखकर होईल. १५३—१५५

उत्पन्न थोडें व खर्च मात्र सर्व खात्यांचा अशा लहानलहान संस्थानांनीं जमीनदारीचें स्टेटस पत्करणें अधिक चांगलें. १५५

## प्रकरण ११ वें.

### महात्मा गांधींशीं मुख्य मतभेद.

म. गांधींची असहकारिता अनत्याचारी होती; निःशस्त्रांचें राजकारणहि अनत्याचारीच आहे. आगगाड्या, तारायंत्रें, मोटारी वगैरे पाश्चात्य पद्धतीचा औद्योगिक विकास करणें, कोर्टमार्फत कायदेशीर इलाज करणें, जरूर तेव्हां स्वसंरक्षणाच्या कायद्याच्या आधारें प्रतिक्रिया करणें, या गोष्टी आम्हांस मंजूर आहेत. खेड्यांतल्या लोकांस वर्षांतील अनेक दिवस काम नसतें तें खादी किंवा दुसरे उद्योगधंदे काढून पुरविणें ही गोष्टहि स्वयंनिर्णयास मान्य आहे पण ही गोष्ट आजच्या राजकारणाच्या प्रत्यक्ष कार्यक्रमांत येत नाहीं. म. गांधींचीं सदरहु बाबतींतलीं मतें प्रसिद्धच आहेत व त्यांचें समर्थन कांहीं विशिष्ट विचारसरणीनें करतां येण्यासारखें आहे.

१५६—१५९

## प्रकरण १२ वें.

### समारोप.

प्रस्तुत पुस्तकांतील विचारांचा प्रसार सर्व भाषांतून हिंदुस्थानांतील सर्व जनतेंत प्रथम करावयाचा व त्यानें पुढील राजकीय कार्याबद्दल जन-

तेंत जो विश्वास उत्पन्न होईल त्यावर स्वयंनिर्णयीसंघ उभारावयाचा आहे. हिंदुस्थानांतील पावणेतीनशें जिल्हे व हजारावर तालुके या सर्व ठिकाणीं संघाचें प्रत्यक्ष काम करणारे व अप्रत्यक्ष सहकार करणारे समासद पाहिजेत. ही चळवळ वकील, व्यापारी, सुशिक्षित शेतकरी. तसेंच सरकारी नोकर या सर्वांमध्यें करावयाची आहे. या पुस्तकांतील तत्त्वज्ञानाचा फायदेशीर रीतीनें प्रसार करण्याचें कार्य करण्यास वकीलवर्ग विशेष लायक आहे. या वर्गाचा गेल्या असहकारितेच्या काळांत झालेला उपहास आम्हांस मान्य नाहीं. १५९-१६१

डोमिनियन स्टेटसमध्यें लष्करी सत्तेचा अन्तर्भाव होतो म्हणून लष्करी वर्ग हजार दीडहजार हिंदी तरुणांस परदेशी लष्करी शिक्षणार्थ धाडून दहापंधरा वर्षांत तयार केला पाहिजे. देशांतील शिक्षणविषयक, दानविषयक, समाजसुधारणाविषयक, संस्था सुधारल्या पाहिजेत. पण तें काम संघ अंगावर न घेतां त्याची दिशा दाखवील, स्वराज्य न दिल्यास सरकारास पेंचांत पाडण्याच्या कार्याची फक्त पूर्वतयारी संघ करणार. ज्या अनेकविध सामाजिक व राजकीय सुधारणा स्वराज्यांत करावयाच्या आहेत त्याबद्दलचें स्वतंत्र पुस्तक लवकरच प्रसिद्ध करूं.

# निःशस्त्रांचें राजकारण.

## प्रकरण १ लें.

### प्रास्ताविक विचार.

सशस्त्र चळवळ करून देशास स्वतंत्रता द्यावयाची, आणि देश स्वतंत्र करून स्वतःच्या उन्नतीचा मार्ग आपल्या ताब्यांत घ्यावयाचा, हा रस्ता आज अजीबात बंद झाला आहे. हा बंद असला तरी स्वस्थ न बसतां आपल्या उन्नतीसाठीं आणि त्या उन्नतीस अवश्य असलेल्या स्वातंत्र्यासाठीं आतां पुढें आपणांस राजकीय कर्तव्य कांहीं आहे किंवा नाहीं याचा विचार केला पाहिजे. हा विचार करणें, आणि त्याप्रमाणें आपलें सामुच्चयिक कार्य करीत जाणें, हाच पुढील राजकारणांतील कार्यक्रम आहे असें धरण्यास हरकत नाहीं. सशस्त्र चळवळ करून देश स्वतंत्र करणें ही गोष्ट शक्य आहे किंवा नाहीं हा विचार येथें अजीबात वगळीत आहे. यशस्वी युद्धास लागणाऱ्या अवश्य गोष्टी काय आहेत, त्यांपैकीं आपणांस काय साध्य आहेत, त्यांविषयीं विचार आज अनेक वर्षें होऊन युद्ध करून स्वातंत्र्य मिळविणें अशक्य आहे या मतास मी पोंचलों आहें. लाला हरदयाळ यांनीं या विषयावर विचार करून आणि शक्य तेवढी कृति करून, आणि तीहि इंग्लंड हें अत्यंत बलाढ्य अशा एका यूरोपीय राष्ट्राशीं युद्धांत गुंतलें असतां, झाला तो प्रयत्न करून, आतां सशस्त्र प्रतिकार करून स्वातंत्र्य मिळविण्याची कल्पना त्यांनीं कायमची सोडून

दिली आहे. सशस्त्र युद्धाचा प्रयत्न करणें हें सामान्य मध्यम वर्गांतील नागरिकांचें काम मुळींच नाहीं. तथापि जी कांहीं चळवळ केली ती मध्यम वर्गांतल्या मुलांनीं व तरुणांनींच केली.

जे असले सशस्त्र प्रयत्न देशांत झाले त्यांत संस्थानिक मुळींच पडले नाहींत, आणि ते आज पडले तरी त्यांसहि या प्रकारच्या प्रयत्नांत यश येईल अशी बिलकुल आशा नाहीं. प्रथम बाहेर देशाहून दारू-गोळा आणूनच युद्ध करावें लागणार, आणि त्या दारूगोळयाबद्दल पैसे देण्याची ऐपत पाहिजे, शिवाय दारूगोळा इंग्रजांच्या तावडींत न सांपडतां पोंचला पाहिजे, आणि जी फौज लढणार तिला वेळच्या वेळेवर पगार देण्याची ऐपत पाहिजे, आणि तो पगार देतां यावा म्हणून सर्व लोकांचे व्यवहार सुरळींत चालू ठेवून कर गोळा करीत रहाण्याची शासनविद्या पाहिजे, या सर्व गोष्टींचा कोणीहि मनुष्य आज जितका अधिकाधिक विचार करूं लागेल तितकी त्यास सशस्त्र युद्ध करून राज्यक्रांति करण्याच्या मार्गाची अशक्यता कळून येईल. देशास स्वातंत्र्य अवश्य आहे, आणि तें लोकांच्या उन्नतीसाठीं अवश्य आहे, आणि त्या स्वातंत्र्याची प्राप्ती करून घेण्यासाठीं युद्ध करणें आणि त्यांत यश मिळविणें या गोष्टी तर आज अशक्य आहेत, तर आपण आपल्या उन्नतीची आणि प्रगतीची आशाच सोडून द्यावी काय ? या प्रश्नास असें उत्तर आहे कीं, आपल्या उन्नतीसाठीं आपणांस ज्या क्रिया कराव्या लागणार त्या क्रिया करण्यासाठीं अवश्य असलेली स्वातंत्र्याची इच्छा टाकून देण्याचें मुळींच कारण नाहीं. आपणांस अवश्य असलेलें स्वातंत्र्य निःशस्त्रोपायांनीं मिळण्याजोगें आहे.

सशस्त्र प्रातिकार करून देश इंग्लंडपासून वियुक्त करणें अशक्य आहे आणि यासाठींच निःशस्त्रांचें राजकारण तेवढें करून आपली स्थिति होईल तितकी सुधारून घ्यावी ही एक तऱ्हेची विचारपद्धति

झाली. पण निःशस्त्रांच्या राजकारणाची व त्यानें प्राप्त होणाऱ्या फलाची शिफारस करण्यास कारण होणारी विचारपद्धति तेवढीच नाहीं. देशास स्वातंत्र्य, म्हणजे बलाढ्य व संपन्न ब्रिटिश साम्राज्यापासून वियुक्तता, असल्यानें फायदा होईल याविषयीं ज्यांस खात्री नाहीं, उलट ब्रिटिश साम्राज्याचे अवयव या नात्यानें जे आपले फायदे होत आहेत त्यांस आपण मुकूं, अशी ज्या लोकांची भावना आहे, ते लोक असेंहि म्हणतील कीं, ब्रिटिश साम्राज्याशीं आज जो संबंध जडला आहे तो तुटूं देऊं नये. आणि स्वातंत्र्याची म्हणजे साम्राज्यांतून वेगळें होण्याची संधि आपणांस जरी असली तरी त्या संधीचा फायदा घेऊं नये. ही दुसरी विचारपद्धति झाली.

याशिवाय तिसरी विचारपद्धति आहे, ती अशी: स्वतंत्र राष्ट्रांनीं देखील युद्ध करूं नये. युद्ध करून सैन्य विजयी झालें तरी युद्ध ज्या अपेक्षेनें केलें असेल ती अपेक्षा पुरी होत नाहीं. उलटपक्षीं ज्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठीं युद्ध केलें जातें त्या अपेक्षा जगांतील विकासाचा स्वाभाविक भाग असल्यास युद्धाशिवाय केवळ आर्थिक कारणांच्या परिणामामुळें पुऱ्या होतील, तर युद्ध हा अनवश्य खटाटोप होय. स्वतंत्र राष्ट्रांस इष्ट हेतूच्या प्राप्तीसाठीं युद्ध नको असेल, पण परतंत्र राष्ट्रानें स्वातंत्र्य कसें मिळवावें, कीं युद्ध नको म्हणून स्वातंत्र्याचीच इच्छा गाळून टाकावी, हा प्रश्न आहे. याकरितां युद्ध निरुपयोगी व अनवश्य आहे हा विचार स्वातंत्र्येच्छु परतंत्र राष्ट्रांस कितपत लावतां येईल तो पहावयाचा आहे. प्रत्येक राष्ट्रांस स्वातंत्र्यप्राप्ति हा जागतिक सामाजिक विकासाचा अवश्य भाग आहे काय, हें अवगमिलें पाहिजे.

राष्ट्रांस स्वातंत्र्य ही जागतिक कल्याणासाठीं अवश्य गोष्ट आहे काय, हें तपासून ती तशी आहे असें जर दिसलें, तर जगांतील स्वतंत्र राष्ट्रांची प्रवृत्ति परतंत्र राष्ट्रांस स्वातंत्र्य द्यावें या प्रकारची

होईल, आणि युद्धाची अनवश्यकता, आणि अन्यदृष्टीनें प्रयत्न करण्याची अवश्यकता हीं सिद्ध होतील. जित राष्ट्रांस स्वातंत्र्य मिळणें हा जागतिक विकासाचा म्हणजे सर्व राष्ट्रांच्या कल्याणाचा अवश्य भाग असला तर जितराष्ट्रें मुक्त करण्यासाठीं जगाची प्रवृत्ति होईल, व जितराष्ट्रांस युध्द करण्याचें कारण नाहीं, हें उघड आहे. पण प्रश्न असा कीं, जितराष्ट्रांस स्वातंत्र्य दिल्यानें जगाचें कल्याण तें कसें होणार ?

या प्रश्नावर सविस्तर विवेचन अवश्य आहे आणि तें तर येथें करतां येत नाहीं. तथापि थोडक्यांत कल्पना यावी यासाठीं त्याविषयीं एक दोनच गोष्टी येथें मांडतों. स्वातंत्र्याचा प्रश्न बाजूला ठेवला तरी जगांतल्या प्रत्येक राष्ट्रानें भरभराटीला यावें हें इतर राष्ट्रांस फायदेशीर आहे. जें राष्ट्र भरभराटतें, तें आपल्या राष्ट्रांत उत्पादन वाढवून अधिक काम उत्पन्न केल्यानें आणि शास्त्रीय प्रयत्न करून उत्पादनांतली प्रत्येक क्रिया अधिक परिणामकारी केल्यानें वाढतें. तर राष्ट्र भरभराटावयाचें म्हणजे त्याची काम करण्याची शक्ति वाढावयाची; आणि त्या राष्ट्रांतील व्यक्तींची विकत घेण्याची शक्ति वाढावयाची. जर एका राष्ट्राची भरभराट दुसऱ्या राष्ट्रास हितावह आहे तर सुधारलेल्या राष्ट्रांपुढें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, मागसलेलीं राष्ट्रें भरभराटीच्या मार्गास कशानें लागतील ? आणि इतर राष्ट्रांशीं आर्थिक सहकारिता करण्यास कशानें समर्थ होतील. त्यांस जर असें दिसून आलें कीं, जितराष्ट्रांस स्वातंत्र्य दिल्यानें,जितांच्या आर्थिक उन्नतीची क्रिया वृद्धिंगत होईल, तर जितांस स्वातंत्र्य देण्याची जेत्यांचीहि प्रवृत्ति होईल. या राजकारणविषयक नवीन वृत्तीमुळें व देशाच्या परिस्थितीमुळें आपणांस करावें लागणारें राजकारण जगांतील अनेक स्वातंत्र्यार्थ झालेल्या प्रयत्नांपेक्षां बऱ्याच निराळ्या स्वरूपाचें आहे. शिवाजी महाराजांचा कार्यक्रम अवलोकिला असतां असें दिसून

येईल कीं, एका लहानशा संस्थानानें, जुन्या रियासतींत तयार झालेले मुत्सद्दी हातीं घेऊन शेजारच्या राज्यांनां उपद्रव देण्याचें कांहीं दिवस काम चालविलें, आणि लहानसें राज्य निर्माण केलें. इटलीच्या स्वातंत्र्याचा इतिहास पाहिला असतां त्या लोकांचा प्रश्न फारसा कठिण नव्हता. इटली अनेक राज्यांत विभागला गेला होता, व त्यांपैकीं बहुतेक राज्यें लोकमतास मान देत नव्हतीं. त्या वेळचा मुख्य प्रश्न, लोकांस राज्य जबाबदार कसें करावें आणि सर्व राज्यें एकतंत्राखालीं कशीं आणावीं आणि लोकांच्या आत्मोन्नतीला अडथळा आणणारे आस्ट्रियाचे अधिराज्याचे हक्क कसे कमी करावेत एवढाच होतो. तो प्रश्न पिडमांटचें राज्य वाढवीत गेल्यानें सुटला. आपल्या पुढील राजकारणाचा प्रश्न निराळ्याच प्रकारचा आहे. आपल्याकडे त्या इटालियन लोकांनीं वापरांत आणलेल्या तऱ्हेनें प्रयत्न करावयाचा म्हणजे एखाद्या संस्थानास आपला मुलूख वाढविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न करावयाची आणि त्यास युद्धांत जय पावण्यासाठीं आपली एकसारखी सुधारणा करीत जाण्यास प्रेरित करावयाचें. या तऱ्हेनें अनेक दशकें कार्य करीत राहिल्यास युद्धाची तयारी करण्याच्या निमित्तानें त्या संस्थानाची भरभराट होत जाईल. पण असलें संस्थान युद्धहेतु असल्यास त्याची प्रगति करण्याची इच्छा ब्रिटिश राज्य कितपत चालूं देईल याचीहि वानवाच आहे. निजामापासून फाटक्या जहागिरदारापर्यंत आजचीं सर्व संस्थानें इतकीं दुर्बल आहेत कीं, चांगल्या शस्त्रयुक्त आणि अर्वाचीन हत्यारांनीं युक्त अशा थोडक्या हजारांच्या फौजेनें वाटेल तें संस्थान नामशेष करतां येईल. यासाठीं हिंदुस्थानांतील एखाद्या संस्थानाची महत्वाकांक्षा वाढवून त्यास युद्धक्षम आणि युध्देच्छु करण्याचा मार्ग आज मोकळा नाहीं.

निःशस्त्रांचें राजकारण ज्यांनां पसंत पडतें त्या वर्गाचें मुख्य म्हणणें असें आहे कीं, ज्या ज्या गोष्टी सशस्त्र होऊन साधण्याचा

राष्ट्रें प्रयत्न करतात त्याच गोष्टी सामदानादि प्रयत्नांनीं अधिक सुलभ आहेत हा विचार कांहीं नवीन नाहीं. हा विचार अनेक जिवंत राष्ट्रांत व्यक्त झाला आहे. हिंदुस्थानास जें करावयाचें आहे तें हेंच कीं या विचाराचें व्यावहारिक स्वरूप अत्यंत मोठ्या प्रमाणांत दाखवून शासनशास्त्रांत आणि सार्वराष्ट्रीय नीतिशास्त्रांत महत्त्वाची भर टाकावयाची आहे. पराभूत आणि परतंत्र राष्ट्रास आपण या निःशस्त्रोपायांनीं स्वातंत्र्य मिळवून दिलें म्हणजे जगद्विकासामध्यें हिंदुस्थानानें महत्त्वाचें कार्य केलें असें होईल आणि "ब्रह्मतजो बलं बलं" असें मोठ्या आवेशानें सांगणाऱ्या वसिष्ठाचे शब्द खरे केल्यासारखें होईल.

आपणास नवीन राजकारणाचें शास्त्र निर्माण करून आचरणांत आणावयास कांहीं विशिष्ट सोई आहेत हें प्रथम जाणलें पाहिजे. सशस्त्र तयारीनें युद्ध करणें ही गोष्ट स्वतंत्र राष्ट्रास कधीं कधीं अवश्य असते, म्हणजे युद्ध टाळावयाचें झालें तरी टाळतां येत नाहीं. एका राष्ट्रानें जरी आपण निःशस्त्र प्रतिकार करावयाचा असें ठरविलें तरी जें राष्ट्र त्या निःशस्त्रप्रतिकारानें वठणीस आणावयाचें तें राष्ट्र सशस्त्र प्रतिकार करण्यास तयार होण्याचा संभव असतो, म्हणून निःशस्त्रप्रतिकार करतां करतां दुसऱ्याविषयीं वाटणाऱ्या भीतीनें सशस्त्रप्रतिकाराची तयारी जय्यत ठेवावी लागते, आणि असें दोन्ही पक्षांकडून झालें म्हणजे कोणाकडून तरी प्रत्यक्ष लढाईस सुरवात होते. एकाच राज्याचे जे दोन विभाग असतील अशांस एकमेकांचा नाश करावयाचा नसतो; तथापि सरकारें भांडणांत पडलीं म्हणजे त्यास लढाईचें स्वरूप येतें. जें भांडण आपणांस इंग्लंडशीं भांडावयाचें आहे त्यांत हिंदुस्थान सरकार हा इंग्लंडशीं भांडणारा पक्ष नाहीं. तो तसा असता तर सशस्त्र प्रतिकाराची पद्धति या भांडणांत वापरण्यांत आली असती. येथें एक पक्ष निःशस्त्र प्रजा आहे; तेव्हां भांडणास लढाईचें

स्वरूप कधींच येणार नाहीं, हीहि इंग्रजांची पूर्ण खात्री आहे. त्यामुळें आपणांस निःशस्त्र लढाईच चालू ठेवण्याचें कौशल्य वाढविण्यास जागा आहे. आपली उमेद राज्यकारभार स्वायत्त करावा ही आहे, म्हणजे कारभाराच्या केवळ अटी बदलून घ्यावयाच्या आहेत. यासाठीं राज्याच्या घटनेंत बदल करणें, एका वर्गाच्या हातीं सत्ता असेल ती काढून घेऊन दुसऱ्या वर्गाच्या हातीं देणें, यांसारख्या सुधारणा करण्यास निःशस्त्रप्रतिकार हें उत्तम साधन आहे. आणि त्या प्रकारचें राजकारण मोठ्या प्रमाणावर करून प्रजेचें योग्य महत्त्व स्थापन करणें ही क्रिया करण्यास हिंदुस्थान ही योग्य कर्मभूमि आहे. निःशस्त्र राजकारण पूर्णतेस नेण्यास कोणत्याहि राष्ट्रास आज अवसर नाहीं. आपणांस आज हें राजकारण पूर्णत्वास नेण्यास अवसर आहे. एका राष्ट्रास पूर्ण स्वातंत्र्य केवळ निःशस्त्र उपायांनीं मिळवून दिलें म्हणजे स्वतंत्र राष्ट्रांसहि शस्त्रसंन्यास करण्यास उत्तेजन मिळेल.

स्वतंत्र राष्ट्राच्या ज्या स्वाभाविक महत्त्वाकांक्षा असतात त्या महत्त्वाकांक्षांचें पृथक्करण करून त्यांपैकीं कोणत्या महत्त्वाकांक्षा युद्धेतर उपायांनीं साध्य होणें शक्य आहे, याचा विचार करणें हा निःशस्त्रांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग आहे. हा विचार करतांना स्वतंत्र राष्ट्रें जी आपल्याच गैर फायद्याच्या गोष्टी करतात त्या गोष्टी आपणांस करतां येतील किंवा नाहीं याविषयीं विचार करणें अनवश्य आहे. स्वतंत्र राष्ट्रं युद्धें करतात तीं आपला मुलूख वाढविण्यासाठीं, किंवा कांहीं व्यापारी सवलती मिळण्यासाठीं, किंवा आपल्या वाढत्या प्रजेचा आपल्याशीं राजकीय संबंध राखून कांहीं निवासक्षेत्र मिळविण्यासाठीं करतात. पूर्वींच्या काळांत युद्धें केवळ लूट मिळविण्यासाठीं देखील होत असत.

या सर्व प्रकारच्या प्रयत्नांकडे लक्ष दिलें, तर ज्या हेतूंसाठीं

17 MAR 1990

अनेक राष्ट्रें लढतात त्यांपैकीं बरेच हेतु अन्य प्रकारांनीं साध्य करतां येतील अशी परिस्थिति आज आहे. आपणांस आज जाऊन दुसऱ्या राष्ट्राची लूट करतां यावयाची नाहीं, आणि या प्रकारच्या कार्यानें आपलें हितहि नाहीं. राष्ट्रांचा जो आपली संपत्ति वाढविण्याचा हेतु असतो तो आज केवळ लुटीनें साध्य होण्यासारखा नाहीं. लुटीची संपत्ति फार वेळ टिकत नाहीं. लूट म्हणून जी संपत्ति मिळाली ती फारच थोड्या दिवसांनीं नष्ट झाली, हा अनुभव स्वाऱ्या करणाऱ्या प्राचीन राष्ट्रांस आला, आणि त्यामुळें केवळ लुटीसाठीं होणाऱ्या स्वाऱ्या बंद पडल्या- लूट करून जें कांहीं आणावें तें किती कालपर्यंत टिकणार, भूक रोज लागते, कपडे तीन चार महिन्यांनीं लागतात. अशामुळें लूट करून तात्पुरते श्रीमंत बनलेल्या लुटारूंच्या लूट करून आणलेल्या वस्तू थोड्याच दिवसांत बाजारांत येतात आणि त्या उद्योगप्रिय राष्ट्रांत पुन्हा परत जातात. अनेक स्वाऱ्या करून अफगाण दरिद्री तें दरिद्रीच. यामुळें लुटीच्या स्वाऱ्या टाकून कायमचें राज्य करण्याची कल्पना गुलाम, घोरी वगैरे घराण्यांनीं पत्करली. महाराष्ट्रासहि तोच अनुभव आला. अनेक वर्षें मुलुखगिरी करून, महाराष्ट्रांतील सामान्य वर्गाची सांपत्तिक स्थिति फारशी सुधारली नाहीं. म्हणून लूट करण्यासारखे हेतू राजकारणांत दिवसानुदिवस निरुपयोगी होऊन स्वाऱ्या नष्ट झाल्या.

दोन प्रदेशांची संयुक्तता त्यांच्या इच्छेवर अवलंबून असावी, व एका प्रदेशानें दुसऱ्या प्रदेशास जुलमानें आपणाशीं निगडित करूं नये, हें राजनीतीचें तत्व प्रसार पावत आहे; व अशा प्रसंगीं हिंदुस्थानानें दुसऱ्या राष्ट्रांस जिंकावें व आपल्या तावडींत ठेवावें या महत्त्वाकांक्षेस क्षेत्र नसलें तर त्यांत मोठें नुकसान नाहीं. दुसऱ्याची लूट करणें, दुसऱ्या राष्ट्रांस गुलाम करणें, या अनीतीच्या आकांक्षा सोडून इतर सर्व आकांक्षा तृप्त करून घेण्याइतकें स्वराज्य मिळविणें आपणांस शक्य आहे. राष्ट्रांच्या

परराष्ट्रविषयक नीतीमध्यें वाढत्या लोकशाहीमुळें महत्त्वाचा फरक पडला आहे आणि पडणार आहे. राज्यव्यवहार राजाच्या किंवा वरिष्ठ वर्गाच्या वैयक्तिक सुखदु:खासाठीं नाहीं, तर तो सर्व प्रजेच्या हिताहितासाठीं आहे. हें तत्त्व एकदां मान्य झालें आणि लोकांच्या मनांत बाणलें गेलें म्हणजे राज्यकारभारावर परिणाम होणारच. राजाला अमुक देशाची राजकन्या मिळवून द्यावी यासाठीं लढाया आज अगदीं अतर्क्य आहेत एवढेंच नव्हे तर गेल्या तीनचारशें वर्षांत, कृष्णाकुमारीचें उदाहरण वगळतां, हिंदुस्थानांतहि झाल्या नाहींत. आज एखादी लढाई करावयाची झाली तर त्या लढाईमुळें सामान्य जनतेला काय प्राप्ति होणार याचा विचार करावा लागतो. राजाचें किंवा सरदार वर्गाचें किंवा कांहीं भांडवलवाल्या वर्गाचें खरोखर हित असून,सामान्य जनतेचें त्यांत हित आहे असें भासविलें जाऊन लढाया झाल्या आहेत. जसजसा सामान्य वर्गाचा राजकारणावर दाब वाढूं लागेल, तसतसे आर्थिक उन्नतीसाठीं दुसरे देश आपल्या ताब्यांत आणावयाचे, आणि त्यांनां पिळून काढण्याची खटपट करावयाची, या प्रकारच्या प्रयत्नांस आळा घालावा लागेल व घातला जात आहेहि.

लढाई जर नको आहे तर एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हिसकावणें किंवा त्याची जमीन काढून घेणें हेंहि नकोच आहे असें ओघानेंच प्राप्त होतें.तेव्हां एका राष्ट्रानें आपला मुलूख वाढविण्याचा प्रयत्न केला तर तोहि व्यर्थच असें होईल, ही गोष्ट आपण नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे. येथें कोणी असा प्रश्न करील कीं, जें राष्ट्र अधिक सुसंस्कृत झालें त्यास आपल्या मर्यादा वाढविण्यानें कांहींच फायदा नाहीं काय ? नाहीं असें धरलें तर अनेक लहान संस्थानें जाऊन राष्ट्र तयार व्हावें ही क्रियाहि अनवश्य किंवा चुकीची होती काय ? याला उत्तर हेंच कीं, निःशस्त्रांचें राजकारण जें पुढें मांडलें जात

आहे तें त्रिकालाबाधित सत्य म्हणून मांडलें जात नाहीं. जगांतील अनेक लढाया मूर्खपणाच्या आहेत किंवा होत्या असें जरी म्हटलें तरी सर्वच तशा होत्या असें म्हणण्यास मी तयार नाहीं; व जगाचा एकंदर विकासक्रम आज जो झाला आहे तो लढाया झाल्या नसत्या तरी तसाच असता असेंहि म्हणण्याचा भावार्थ नाहीं. लढाईनें साध्य करावयाचा इष्ट हेतु अन्य मार्गांनीं साध्य करतां येतो, यासहि अपवाद आहेतच, व लढायांच्या निरर्थकत्वाचा नियम सर्वत्र लागू पडेल असें नाहीं; आणि एका राष्ट्रानें दुसऱ्यास जिंकण्याचा प्रयत्न करण्यांत विशेष फायदा नाहीं या नियमासहि अपवाद असणें शक्य आहे. सध्यांपर्यंत झालेला विकास गृहीत धरून आजच्या सुसंस्कृत आणि आर्थिक महत्त्वाच्या राष्ट्रांस पुढील कार्यक्रमासाठीं निःशस्त्रांचें राजकारण उपदेशिलें जात आहे. सुधारलेल्या लोकांस गुलामगिरी वाईट आहे म्हणून ती बंद केली पाहिजे हा आजचा अनुभव आहे. परंतु उत्पादन-विकासास गुलामगिरीची संस्था प्राचीन काळींदेखील अनवश्य होती हें आज कसें म्हणावें ? युद्धाची अनवश्यकता पराभूत राष्ट्राच्या दृष्टीनेंहि पूर्णपणें स्थापित करतां येणार नाहीं, कां कीं, युद्ध करून जय मिळविल्यानें कधीं कधीं जित देशाचें कल्याण होतें. जे देश उच्च शास्त्रीय विकासाच्या बाबतींत मागें पडतात त्या देशांचा आर्थिक विकास फारसा होत नाहीं. आणि त्यामुळें जर तो देश उच्च सुधारलेल्या लोकांनीं जिंकला तर त्याचें सुधारलेल्या जगांत समर्थन होऊं शकतें; कां कीं, जो देश अप्रगत असतो त्याच्या अप्रगतीचें मुख्य कारण त्याचा शासकवर्ग अप्रगत असतो हें होय. शासकवर्ग म्हणजे प्रजेचा नेतृवर्ग आहे. असंस्कृत लोकांच्या तावडींत सत्ता राहूं देणें म्हणजे त्या देशांतील जे सामान्य लोक आहेत त्या सामान्य लोकांवर जुलमी, आणि रोगप्रसार व दारिद्र्य यांजवर जय मिळविण्यास असमर्थ, असें सरकार ठेवणें होय.

तसेंच एखादें थोड्याशा हजारांचें असंस्कृत राष्ट्र ज्या भूमीवर कोट्यावधि लोकांचें पोषण होईल त्या भूमीवर स्वतंत्रेनें रहात असलें आणि आपल्या प्रजेची निगा चांगली ठेवण्यास असमर्थ असलें व त्या जमिनीचा उपयोग चांगला करून असंख्य लोकांचें पोट भरण्याची विद्या दुसऱ्या राष्ट्रापाशीं असली, म्हणजे त्या दोन राष्ट्रांचे संबंध कोणत्या प्रकारच्या नीतीनें बांधले जावेत ? केवळ त्या भूमीवर विशिष्ट असंस्कृत राष्ट्र अगोदर आलें म्हणून त्याच्या स्वातंत्र्याचें रक्षण करावयाचें काय ? आणि त्या राष्ट्राला त्या जमिनीचा उपयोग स्वतःला करतां येत नाहीं व दुसऱ्यास होऊं द्यावयाचा नाहीं या प्रकारची नीति आचरूं द्यावयाची काय ? द्यावयाची म्हटली, तर आज अमेरिकाखंडांत दहा बारा लाख इंडियन जवळ जवळ पूर्वीच्याच स्थितींत असते, आणि त्या भूमीचा आज सर्व जगाला जो उपयोग होतो तो मुळींच झाला नसता. अमेरिकन इंडियन लोकांप्रमाणें स्वतःच्या सुधारणेला असमर्थ असे जर आपण असूं, तर आपणांस पारतंत्र्यांतच रहाणें योग्य आहे. आणि तसें म्हणजे शास्त्रविकास करून स्वतःची उन्नति करणें या क्रियेस असमर्थ जर आपण नसलों, तर आपण स्वातंत्र्याची म्हणजे शासनाची जबाबदारी पत्करण्यास लायक आहोंत असें होईल.

ज्या महत्त्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं आपणांस स्वातंत्र्य पाहिजे आणि ज्यांसाठीं लोकांवर कर लादण्याचा आणि करापासून उत्पन्न होणाऱ्या पैशाचा लोकांचें हित साधण्यासाठीं व्यय करण्याचा अधिकार पाहिजे, त्या महत्त्वाकांक्षांच्या कार्यक्रमांत सर्व अंतस्थ सुधारणेचे प्रश्न येतात. देशामध्यें उद्योगधंदा वाढावा, समाजांतील शिक्षण चांगलें वाढून प्रजा सुशिक्षित बनावी, रोगांचें नियंत्रण व्हावें, धंदा सुरळीत चालविण्यास लायक असे मोठे कार्यकारी निपजावेत, प्रत्येक व्यक्तीस आपल्या हिताहिताची जाणीव व्हावी यासारख्या

सर्व सुधारणा करण्यास लागणारें स्वातंत्र्य मिळविणें हा निःशस्त्र राजकारणाचा महत्त्वाचा भाग होय. राजकारण प्रत्येक देशांत जें झालें पाहिजे तें या प्रकारच्या खटपटीसाठीं होय. परंतु या राष्ट्रविकासाच्या गोष्टी ' राजकारणा ' चा भाग धरीत नाहींत किंवा या गोष्टी करणारास मोठा मुत्सद्दी असें मानण्यांत येत नाहीं. राजकारण करतांनां कर्तव्याची कल्पना व्यापक झाली पाहिजे. आज राजकारण म्हणजे पक्षविषयक चळवळी असेंच समजण्यांत येतें. जुन्या जगांत जो कळलाव्या आहे, दुसऱ्यास बुडवून आपलें किंवा आपल्या नियमित इष्ट वर्गाचें हित वाढविण्यासाठीं खटपटी करीत आहे, अशा व्यक्तीसच मोठे मुत्सद्दी म्हणण्याचा रिवाज पडला आहे. आपण जितके अधिकाधिक पश्चिमेस जाऊं तितकें तितकें अर्थशास्त्रीय उपायांनीं देशविकास करणाऱ्या मुत्सद्याचें महत्त्व वाढलेलें दिसतें.

निःशस्त्र राजकारणामध्यें केवळ लोकसुधारणेच्याच गोष्टी येतात असें नाहीं. तर अनेक पक्षविषयक गोष्टीहि येतात. तसेंच राष्ट्रांचें स्वातंत्र्य, दोन राष्ट्रांचा परस्परसंबंध हेहि प्रश्न येतात. आपणांस या निःशस्त्रराजकारणाचा प्रसार इंग्लंडशीं संबंध ठरविण्यासाठीं अवश्य आहे एवढेंच नव्हे,तर स्वातंत्र्य म्हणजे स्वयंशासन पत्करून जी लोकशाही आपण वापरूं इच्छितों तिच्या यशस्वीपणासाठीं देखील आहे. आणि हें खरोखर महत्त्वाचें काम आहे. निःशस्त्र राजकारणाच्या तत्त्वांचा प्रसार केवळ दोन राष्ट्रांमधील संग्राम टाळण्यास जरूर आहे असें नाहीं;स्थानिक घडामोडींतहि रक्तपात होतो तो बंद करून लोकराज्य यशस्वी करण्याचें काम पुष्कळ देशांत व्हावयाचें राहिलें आहे. समाजांतील एका पक्षाचे अधिकार दुसऱ्या पक्षास जाते वेळेस लोक जितके सशस्त्र गडबड करणार नाहींत तितकें तें लोकराज्य यशस्वी होय. दक्षिण अमेरिकेंतील संस्थानामध्यें इलेक्शनच्या वेळेस सुद्धां आपल्या बाजूच्या मंडळीचें संरक्षण करण्यास आणि दुसऱ्या पक्षास

भेवडावण्यास लोक बंदुका घेऊन बाहेर पडतात. आणि इलेक्शनच्या दिवशीं गोळीबार हा अनेक ठिकाणीं ठेवलेलाच. त्या दिवशीं नवरे घराबाहेर पडले म्हणजे ते परत येईपर्यंत बायकांचें हृदय धडधडत असतें. युनायटेडस्टेट्स मधील दक्षिण संस्थानांत इलेक्शनच्या दिवशीं बहुसंख्याक निग्रोंनां भेवडावण्यासाठीं गोरे लोक पोलच्या आसपास बंदुका घेऊन उभे असतात. आणि " निगर " जर पोलजवळ गेले तर त्यांच्यावर गोळी घाला अशा निनांवी जाहिरातीहि लावतात. एवंच,कायदेशीर हक्क बजावतांना देखील कायदेशीर प्रतिकार न करतां सशस्त्र प्रयत्न करण्याची चाल अजून आहे.

आजचें राजकारण ठरविण्यासाठीं ज्या क्रिया अवश्य आहेत त्यांत ज्या शक्तींनीं राष्ट्राचें कार्य करणाऱ्या मुत्सद्दयांचे प्रयत्नहि बांधले जात आहेत त्या शक्तींचें आकलन आपणांस आपला कार्यक्रम ठरविण्यासाठीं केलें पाहिजे. ज्या शक्ती प्रत्येक व्यक्तीवर परिणाम करून सर्व जगास बद्ध करितात त्या शक्तींनां आवरणें किंवा त्यांशीं विरोध करणें हें कोणत्याहि राष्ट्रास शक्य नाहीं आणि निरनिराळ्या राष्ट्रांत जे मुत्सद्दी काम करीत असतील, त्यांना त्या शक्तींशीं नमतें घ्यावें लागणार किंवा त्या शक्तींचें ज्ञान मिळवून आपला कार्यक्रम त्या शक्तींशीं जुळता करून घ्यावा लागणार. केवळ शांततेमुळें आणि कार्यक्षेत्रास मोठें स्थल सांपडल्यामुळें अमेरिकेचें जें आज शक्तिवर्धन झालें आहे त्याच्याशीं जगांतील कोणत्याहि राष्ट्रास संग्राम करणें कठिणच झालें आहे. अमेरिकेची जी शक्ति वाढलेली आहे ती केवळ युद्धविषयक नाहीं. भांडवलाचीं मोठीं एकीकरणें होऊन मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणें आणि विक्रय करणें, याच क्रिया झाल्या आहेत आणि द्रव्यहि पुष्कळ झाल्यामुळें आणि यूरोपांतील बहुतेक राष्ट्रें द्रव्यहीन झाल्यामुळें अमेरिकेस यूरोपचें धनकोपण करावें लागतें आहे; आणि यामुळें कोणतेंहि राष्ट्र चिरडलें

जाऊं लागलें किंवा आत्यंतिक नुकसान पावूं लागलें म्हणजे त्याच्या अस्तित्वाची काळजी त्याचा सावकार जी अमेरिका तीवर पडणार आहे; आणि यामुळें भावी राजकारणांत अमेरिका शांततेचें राजकारण म्हणजे निःशस्त्रांचें राजकारण जगावर लादील अशी अपेक्षा करण्याला जागा आहे. या अमेरिकेच्या शहापासून ग्रेटब्रिटनहि सुटलें नाहीं. हिंदुस्थान व वसाहती यांनींहि अमेरिकेच्या बाजारांत कर्ज काढलें आहे. कल्पना करा कीं, अमेरिकेचें पुष्कळसें भांडवल हिंदुस्थानांत गुंतलें आहे, आणि हिंदुस्थानांत फार असंतोष होऊन राज्यक्रांतीचीं नाहीं तरी मालमत्तेच्या असुरक्षिततेचीं चिन्हें दिसावयास लागलीं, तर इंग्लंडची सावकार अमेरिका, आणि हिंदुस्थानांत धंदा करीत असलेली अमेरिका, इंग्लंडला निग्रहात्मक "सल्ला" देण्यास चुकणार नाहीं. व तो सल्ला इंग्लंडला मानावाच लागेल. येथें या प्रकारच्या सर्व शक्तींची मोजदाद देण्याचा इरादा नाहीं, पण हिंदुस्थानच्या प्रजेचें राजकारण यशस्वी होण्यास बाहेरच्या शक्ती कशा उपयोगी पडतील त्याचें दिग्दर्शन करण्यासाठीं हा उल्लेख येथें केला आहे.

आतांपर्यंत झालेल्या विवेचनाचें सिंहावलोकन थोडक्यांत करावयाचें झाल्यास असें सांगतां येईल कीं, सशस्त्र राजकारण अशक्य आहे, एवढेंच नव्हें तर तें अनवश्य आहे. प्रत्येक राष्ट्रास स्वातंत्र्य असावें ही गोष्ट जर जागतिक हिताची असेल, तर तें हित जागतिक विकासाचा अवश्य भाग होईल; आणि ती तशी असल्यास स्वातंत्र्य संस्थापनेसाठीं देखील युद्ध न करतां युद्धेतर उपायांनीं तें कार्य साध्य होईल. हिंदुस्थानचें भावी राजकारण देशविकासाचें, तसेंच स्वातंत्र्य संस्थापनेचें म्हणजे हिंदुस्थानाच्या प्रजेचा इंग्लंडच्या दरबारी मंडळींशीं जो संबंध आहे तो बदलून घेण्याचें आहे. या प्रकारच्या राजकारणांत जर हिंदुस्थाननें किंवा इंग्लंडनें निःशस्त्रता

कायम ठेवली नाहीं तर अमेरिकेसारखें परकें राष्ट्रहि दोघांस निःशस्त्रता ठेवण्यास भाग पाडील असा बराच संभव आहे.

---

# प्रकरण २ रें.

## स्वराज्यकल्पना, लोकजागृति व सरकारची कार्यक्षमता.

निःशस्त्रांचें राजकारण करावयाचें म्हणजे संग्राम चुकवावयाचा असें नव्हे. संग्रामाशिवाय कोणतीच वस्तु साध्य होत नाहीं, आणि राष्ट्राचा राज्यकारभार चालवावयास लागणारी लायकीहि यावयाची नाहीं. हा संग्राम करावा लागणार तो निःशस्त्र होय. संग्राम चुकवावयाचा नाहीं हें जरी खरें आहे, तरी जी गोष्ट संग्रामाशिवाय साध्य होण्याजोगी आहे तीसाठीं विनाकारण संग्राम कशासाठीं? आपणांस यासाठीं काय साध्य करावयाचें तें निश्चित केलें पाहिजे.

आतांपर्यंतच्या अनुभवावरून आपणांस हें ठाऊक झालें आहे कीं, आपलें भवितव्य परक्या लोकांच्या हातीं ठेवणें हें बरोबर नाहीं. कोणी मनुष्य कितीहि प्रामाणिक असला तरी राज्यव्यवस्थेसाठीं जर ज्यावर तो राज्य करणार त्यापेक्षां अन्य व्यक्तीस किंवा मनुष्यसंघास जबाबदार असला तर त्याला ठेवणें किंवा काढणें हें ज्यांच्या हातांत आहे त्यांच्या हितासांठीं ज्यांवर तो राज्य करीत आहे त्यांचें अहित करावयास प्रवृत्त होईल. म्यान्चेस्टर शहराचा सर्व कारभार जर एका अधिकाऱ्याच्या ताब्यांत दिला आणि त्या अधिकाऱ्याला ठेवणें किंवा काढणें हें म्यान्चेस्टरच्या लोकांच्या हातांत न ठेवतां लंडनच्या लोकांच्या हातांत ठेवलें तर तो म्यान्चेस्टरचें हित पूर्णा-

कृपया ... वापरा

शानें पाहील काय ? या तऱ्हेच्या व्यवस्थेस म्यान्चेस्टरचे लोक क्षणभर तरी कबूल होतील काय ? अर्थात् नाहीं. तेथें लोक एक रक्ताचे कीं दोन रक्ताचे हा प्रश्न येत नाहीं. तरी देखील अशा व्यवहाराला कोणीहि कबूल होणार नाहीं. हिंदुस्थानाच्या राज्य-कारभाराची गोष्ट याहून निराळी नाहीं. हिंदुस्थानाचा राज्यकारभार हिंदुस्थानच्या लोकांस जबाबदार असावा असें म्हणणें हें प्रत्येक शहराचा कारभार दुसऱ्या शहराच्या लोकांनां जबाबदार नसून त्याच लोकांना जबाबदार असावा या तत्त्वाचेंच जास्त विस्तृत प्रमाणावर प्रसारण आहे. पुढें असें दाखविण्यांत येईल कीं, हिंदु-स्थानाचा आर्थिक विकास आणि शिक्षणविषयक विकास होऊं न देण्यांत इंग्लंडचेंहि कल्याण झालें नाहीं, म्यान्चेस्टरचा कारभार लंडनच्या लोकांच्या हातीं ठेवल्यानें म्यान्चेस्टरचें नुकसान झालेंच असतें, पण म्यान्चेस्टरचा विकास चांगला न झाल्यानें लंडनचेंहि नुकसान झालें असतें. एवंच कोणत्याहि मनुष्यवर्गाला दुसऱ्या मनुष्यवर्गाच्या तावडींत ठेवणें हें दोघांसहि अहितकारक आहे, आणि यासाठीं दोघांमध्यें संबंध श्रेष्ठकनिष्ठतेचे नसून सहकारित्वाचे असावेत हेंच योग्य आहे.

स्वराज्यासाठीं आज चळवळ चालली आहे तिचें यथार्थ स्वरूप लोकांस समजणें ही स्वराज्यस्थापनेची पहिली पायरी आहे. जुनी स्वराज्याची कल्पना म्हणजे हिंदु राजा असणें आणि त्यानें धर्मा-प्रमाणें म्हणजे सर्व लोकांस संमत असा जो कायदा असेल त्याप्र-माणें राज्य चालविणें ही होय. वेदकाळीं "स्वराज्य" म्हणजे काय होतें याची कल्पना स्पष्ट नाहीं. मंत्रपुष्पांजलींत स्वीकारलेलें वैदिक वाक्य जें 'ओं स्वस्ति साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं' यांतील स्वाराज्य शब्द म्हणजे दक्षिणेंतील स्वतंत्र राजे यांचा दर्शक होय, भोज्य म्हणजे राजपुताना व वैराज्य म्हणजे लोकसत्तात्मक राज्यें

असा अर्थ कांहीं संशोधक ( उदा० रमेशचंद्र दत्त) करीत आहेत; तर कांहीं लेखक "स्वराज्य" याचा अर्थ स्वतःच्या मनावर ताबा असा आध्यात्मिक करीत आहेत. पुढें शिवाजीच्या काळांत स्वराज्य हा शब्द निराळ्याच अर्थानें वापरला गेला. आज स्वराज्य या शब्दाचा अर्थ प्रातिनिधिक संस्था असलेलें लोकांचें राज्य असा झाला आहे. जुन्या बुधल्यांत नवीन दारू ओतण्याचा हा प्रयत्न आहे. या प्रयत्नाचा हेतु असा आहे कीं, स्वकीय जातीचा राजा असल्यानें जो राज्याविषयीं आपलेपणा उत्पन्न होतो तो आपलेपणा प्रातिनिधिक संस्था असलेल्या राज्यपद्धतीच्या ठायीं स्थापित व्हावा. प्रातिनिधिक राज्यपद्धति हें खरोखर स्वराज्य होय ही भावना लोकांत जागृत व्हावी.

ही एक तऱ्हेची चळवळ करणाऱ्यांची हातचलाखी होती. परराज्य नको, स्वराज्य पाहिजे असें प्रत्येक व्यक्तीस वाटतें. तेव्हां प्रातिनिधिक संस्था म्हणजेच स्वराज्य होय ही गोष्ट लोकांस पटावयास लागली म्हणजे लोकांत प्रातिनिधिक संस्थांची भूक उत्पन्न होईल; आणि प्रातिनिधिक संस्था उत्पन्न झाल्या म्हणजे राजा जातीनें इंग्रज असला तरीहि हरकत नाहीं. असा गेल्या पिढींतील दूरदर्शी राजकारणी मंडळींचा अभिप्राय होता. प्रातिनिधिक संस्थांची आवड उत्पन्न होणें ही त्या प्रकारच्या संस्था चालविण्याची पहिली तयारी होय. प्रातिनिधिक संस्था गेल्या पिढींतील सर्वच लोकांस ध्येयभूत वाटत होत्या असें नाहीं. लोकांस एकतंत्री राज्य माहीत होतें. त्यांस हें ठाऊक होतें कीं, राजा चांगला असला म्हणजे तो सर्वसत्ताधीश असतो आणि लोकांचें बरें वाईट करूं शकतो. प्रातिनिधिक संस्था म्हणजे बारभाईंचा कारभार, त्यांत एकसूत्रता नसावयाची, कोणाचें चांगलें करण्यास प्रत्येक मनुष्य दुसऱ्याच्या पक्षपाताच्या आरोपामुळें



11 JAN 1994

असमर्थ असावयाचा, अशा तऱ्हेची पुष्कळ लोकांची समजूत होती, आणि ती कांहीं अंशीं बरोबरहि आहे. तथापि ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जी बारभाई कोणासच जबाबदार नाहीं अशा मुत्सद्दीमंडळाच्या हातून होणाऱ्या कारभारासंबंधानें वरील कल्पना लोकांच्या मनांत खिळली आहे. जेव्हां शें दोनशें माणसें प्रधानमंडळानें अमुक गोष्ट कां केली असें विचारण्यास सज्ज असतात त्या प्रसंगीं बेजबाबदार बारभाईचे दोष बरेच कमी झालेले असतात.तथापि हेंहि खरें आहे कीं सर्वसत्ताधारी राजा कर्तृत्ववान आणि सर्वप्रजाहितदक्ष असा असला तर त्याच्या हातून थोड्या कालांत फार कामगिरी होते. प्रातिनिधिक संस्थांमुळें समाजाचा मध्यमवर्ग अधिक सुशिक्षित होत जातो. त्याच्यामध्यें जागृति होते, कर्तव्यकल्पना वाढतात; आणि त्यांचा कांहीं भाग जबाबदार मंत्रिमंडळाच्या डोक्यांत शिरून राज्यकारभारांत सुधारणा होत जाते. ही सुधारणेची क्रिया हुशार राजाच्या हाताखालीं होणाऱ्या सुधारणांपेक्षा जरी मंदगतीनें होते तरी या सुधारणापरतेचा प्रवाह अधिक पद्धतशीर व अधिक अखंड वाहतो.

आज आपण हिंदुस्थानची भावी राज्यव्यवस्था कशी पाहिजे या प्रश्नाकडे लक्ष देत आहों आणि स्वराज्य म्हणजे प्रतिनिधींची संस्था मागत आहों. अलीकडे "डोमिनियन स्टेटस" हा शब्द प्रचारांत आल्यापासून डोमिनियन स्टेटस हें मागत आहों. कधीं कधीं साम्राज्याबाहेर स्वराज्य पाहिजे कीं साम्राज्याच्या आंत स्वराज्य पाहिजे या तऱ्हेची मनोरंजक चर्चा गंभीरपणानें आजच्या राजकारणाचा विषय म्हणूनच करणारे सन १९२१ च्या अहमदाबाद कांग्रेससारखे लोकसमूह दृष्टीस पडतात. आणि कधीं कधीं साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें पूर्ण स्वातंत्र्यापेक्षां उच्चतर ध्येय आहे अशी कल्पनाहि मांडली जात आहे. अनेक माणसांचें, स्वाभाविकपणें उत्पन्न

होणाऱ्या सामाजिक गरजांचा पुरवठा व्हावा, व सामाजिक अडचणींस तोड निघावी, म्हणून शासकवर्गाकडे अथवा राज्यव्यवस्थेकडे लक्ष जातें,व त्यामुळें शासनसंस्थेनें प्रजेसाठीं काय करावें यासंबंधीं ज्या प्रजेच्या अपेक्षा असतील त्या अपेक्षांप्रमाणें शासनसंस्थेस रूप येऊं लागतें. सरकार हें यंत्र आहे, जसा माल काढावयाचा असेल तशी यंत्रयोजना होणार. समाजासाठीं कोणता माल काढावयाचा हें जसजसें ठरेल तसतशी सरकारयंत्राची योग्यायोग्यता ठरेल; सरकारनें लोकांकरतां काय करावें यासंबंधाच्या लोकांच्या अपेक्षा जसजशा वाढत जातात तसतसा शासनयंत्रावर परिणाम होऊं लागतो. लोकांत आज वैयक्तिक आर्थिक आकांक्षा आहेत आणि अस्तित्वांत असलेल्या संधीचा वांटा आपणांसहि मिळावा यासाठीं स्वराज्य पाहिजे एवढी लोकांत जाणीव झाली आहे. स्वराज्य कां मिळविलें पाहिजे याविषयीं सामान्यतः जे हेतू लोकांपुढें असतात त्यांत समाजांतील मध्यमवर्गापुढें मुख्यत्वेंकरून नोकरीचा हेतु असतो. आज जी "ब्राह्मणेतर" जागृति दिसूं लागली आहे ती त्याच प्रकारची आहे. ही खरी लोकजागृती नव्हे. लोकजागृती अजून व्हावयाचीच आहे. झालें आहे तें एवढेंच कीं, ब्राह्मणेतरांत उत्पन्न झालेला, अगदीं लहान असलेला मध्यमवर्ग इतर वर्गांबरोबर त्या नोकऱ्यांसाठींच भांडत आहे, कांहीं व्यापारी मंडळी अलीकडे स्वराज्यविषयक चळवळींत लक्ष देऊं लागली आहेत याचें कारण कंत्राटें देण्यांत व व्यापारास सरकाराकडून पैशाची मदत करण्यांत सरकार गोऱ्या व काळ्यांमध्यें भेद करतें आणि यासाठीं तसले अन्याय बंद करण्यास स्वराज्य पाहिजे, इतपत कल्पना व्यापारी वर्गाच्या मनांत आतां शिरूं लागली आहे. व्यापारी मनुष्य नाहीं तरी राजकारणाकडे दृष्टि न देणारा असाच होता. शेतकऱ्यांची राजकारणाकडे दृष्टि हवी तितकी वळली नाहीं. ती वळविण्यासाठीं शेत-

करी वर्गास आपल्या कार्याची खरी किंमत कळली पाहिजे; त्यानें जाणावें कीं जमीनीस किंमत वास्तविक मनुष्यश्रमानें येते; सरकार जो धारा घेतें तो सर्वस्वी अन्याय्य आहे, आपण जे पैसे सरकारांत भरतों ते आपल्या श्रमाचाच मुख्य भाग भरतों, आणि ते आपणांस होणाऱ्या प्राप्तीच्या मानानें फार भरतों, इत्यादि गोष्टी त्यांस जितक्या अधिक समजतील तितकी अधिक जागृति होईल.

प्रत्येक मनुष्यानें आपल्या वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें स्वराज्याकडे पहाणें ही दृष्टि कांहीं गैर नाहीं. राष्ट्र हा अत्यंत व्यापक आणि अत्यंत संकीर्ण असा समुच्चय असल्यामुळें सर्व वर्गांचें हित बरेंचसें पद्धतशीर प्रत्यक्षसंकलन केल्याशिवाय कोणासच सांगतां येणार नाहीं; यासाठीं प्रत्येक वर्गानें आपलें हित रक्षण करण्यासाठीं जागृत रहाणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. तथापि हें जागृत रहाणें केव्हां होणार? जागृत राहून कांहीं उपयोग असेल तर ना? जर गरजांप्रमाणें सरकाराकडून सोय करून घेण्याची शक्यता असेल तरच लोकांत जागृति उत्पन्न होते. तर लोकजागृतीस उत्तेजन येण्यासाठीं प्रत्येक वर्गानें संघीभूत होऊन आपलें हित साधण्याची सोय असली पाहिजे. ज्या वर्गाचें हित त्या वर्गानें सांगितलें नाहीं तर काय दुसरे सांगणार आहेत?

प्रातिनिधिक संस्थांचें महत्त्व आज लोकांस पटवून द्यावयाचें आहे एवढेंच नव्हे तर सरकारासहि तें पटवून द्यावयाचें आहे. या प्रातिनिधिक संस्थांनीं केवळ लोकांसच फायदे होणार आहेत असें नसून खुद्द शासनसंस्थेसहि फायदे होणार आहेत. हिंदुस्थानी लोकांत बंड करून स्वतंत्र होण्याच्या इच्छेपेक्षां प्रातिनिधिक संस्थनें युक्त अशी राज्यव्यवस्था घडवून आणण्याची इच्छा व्हावी अशी इंग्रज मुत्सद्यांची व हिंदी सुशिक्षितांची इच्छा झाली यास अनेक कारणें आहेत.

श्रीमंत श्री. भ. पं. ग्रंथालय, औंध



स्वराज्य पाहिजे याचा अर्थ सर्व लोकांस प्रातिनिधिवर्गामार्फत सरकार जबाबदार असलें पाहिजे हें समाजध्येय जुन्या स्वातंत्र्याच्या कल्पनेपेक्षां कमी योग्यतेचें नाहीं, उलट ही राष्ट्रविकासाची पुढची पायरी आहे. जुनी स्वातंत्र्याची कल्पना म्हणजे स्वजातीचा राजा असणें हीं होय. स्वजातीचा राजा असला म्हणजे लोकांस अधिक कार्यक्षेत्र मिळतें व लोकांच्या हिताच्या गोष्टी तो स्वभावतःच करील अशी सामान्य समजूत असते. परंतु ही समजूत सर्वथा खरी असते असें नाहीं. जें राज्य कमी सुशिक्षित लोकांनीं चालविलें आहे त्याच्या लोकहितपर कल्पना नियमितच असणार. उदाहरणार्थ बेकारी बंद करण्यासारखे प्रश्न घ्या. हिंदुस्थानांतील सर्व संस्थानांस ती बंद करण्यास लागतील ते कायदे पास करण्यास किंवा उद्योगयोजना करण्यास मोकळीक आहे. पण संस्थानिक आणि त्यांचे कारकूनवजा मुत्सद्दी यांचें ज्ञानच बेताचें असलें ह्मणजे दळणवळण वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे, व्यापार वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे, लोकांची उत्पादक शक्ति वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे, यांविषयींच्या कल्पना त्यांच्या डोक्यांत येणारच नाहींत. केवळ अल्पबुद्धि नोकरशाहीवर चाललेलें देशी संस्थानिकांचें राज्य सर्वलोकहितसाधक ज्ञानाच्या अभावानेंच दुर्बल असतें असें नाहीं, तर शासकवर्गाच्या सहानुभूतीस देखील त्याच्या वैयक्तिक स्थितीमुळें बऱ्याच मर्यादा उत्पन्न झालेल्या असतात. राजा विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा असल्यामुळें पुष्कळ प्रसंगीं तो सर्व जनतेचे आपण प्रतिनिधि आहों अशी कल्पना न करितां जनतेंतील कांहीं विशिष्ट भागाचेच आपण प्रतिनिधि आहोंत अशी कल्पना त्याच्या मनांत येऊं लागून तो राज्यांतील सर्व जनतेचा विकास या गोष्टीकडे पाहून राज्य न चालवितां कांहीं विशिष्ट लोकांच्या हितासाठीं सर्व जनतेपासून उत्पन्न होणारा वसूल वापरण्याचीच तयारी करतो,

आणि याहूनहि खालच्या दर्जाच्या बऱ्याचशा राजेलोकांची बुद्धि, आपल्या उपभोगासाठीं सर्व राज्य वापरावें अशा प्रकारची होते. जर राज्यांतल्या सर्व जनतेस आपलें हित पुढें मांडणें, आपलें हित पाहणारें मंत्रिमंडळ उत्पन्न करणें, या सारख्या गोष्टी शक्य झाल्या तर राज्यांतील सर्व वर्ग आत्महिताविषयीं दक्ष होऊं लागतील. जें राजास किंवा मुत्सद्दयास सुचणार नाहीं तें निरनिराळ्या वर्गांचे प्रतिनिधि सुचवितील, आणि राज्य खरोखर सर्व लोकहितासाठीं चालेल. स्वराज्याची चळवळ म्हणजे समाजांतील सर्व वर्ग जिवंत करण्यासाठीं, आणि राजास किंवा शासक वर्गास एकांगी न राहूं देतां अनेक अनेकांगी करण्यासाठीं, व सर्व लोकांच्या प्रयत्नास चालना देण्यासाठीं होय.

स्वराज्य म्हणजे सर्व लोकांचें रक्षण करणें व आपली सामुच्चयिक पत आहे ती कायम राखून वाढविणें या क्रिया करण्याची जबाबदारी लोकांनीं स्वतःवर घेणें होय. स्वराज्याची चळवळ राष्ट्र एकलकोंडे करण्यासाठीं खास नाहीं. राज्यकारभारांत लोकप्रतिनिधींचा हात शिरल्यामुळें, राष्ट्रापुढील अनेक प्रश्नांची जाणीव समाजांतील पुढारी वर्गास होत जाईल, आणि राष्ट्रास, बाहेरच्या राष्ट्रांमध्यें आपला दर्जा वाढला पाहिजे, ही जाणीव अधिक तीव्रतेनें भासूं लागेल. आणि असें झालें म्हणजे हिंदुस्थानांतील लोकांचीं राज्य चालविणारीं माणसें सर्व जगाच्या लोकमतास जबाबदार होणार. आपल्या लोकांस दक्षिण आफ्रिकेंत बहिष्कृतांप्रमाणें वागविण्यांत येऊं नये म्हणून ज्या सरकारास धडपडावें लागेल त्याच सरकारास परकीय मनुष्य आपल्या देशांत आला म्हणजे त्याला आपल्या लोकांच्या परकीयांचा विटाळ मानण्याच्या क्रियेविरुद्ध धडपडावें लागेल. राष्ट्र या नात्यानें जगांत प्रवेश करावयाचा म्हणजे सामुच्चयिक जबाबदारीच्या कल्पनांचा लोकांत चोंहोंकडे प्रसार केलाच पाहिजे, आणि असें झाल्यानें हिंदुस्थानांतील लोक जगाचे नागरिक व्हावयास इतर स्वतंत्र देशांइतके

योग्य होतील, आणि त्यांच्या मनांतील अनेक विकल्प जाऊन त्यांच्यांत नैतिक सुधारणा वाढेल.

स्वराज्याची चळवळ सरकारचा बोज कमी न करतां वाढविण्यासाठीं आहे. जेव्हां सरकारचें पोलिसखातें लोकांस जबाबदार नसतें आणि जेव्हां त्या खात्याचा उपयोग स्वदेशाभिमानी लोकांस छळण्यास आणि पठाणांपुढें दुर्बलता दाखविण्यास केला जातो, तेव्हां असल्या खात्याची लोकांत प्रतिष्ठा काय असणार, आणि त्या खात्याच्या लोकांस जनतेची सहानुभूति मिळणार तरी कशी ? पोलीस हे लोकांस आपले मित्र न वाटतां शत्रूच वाटणार. पण हें खातें लोकसत्तेस जबाबदार झालें म्हणजे या खात्याची काम करण्याची पद्धत लोकपीडक न होतां लोकरक्षकच अधिकाधिक होत जाईल, आणि लोकांची सहानुभूति गुन्हेगाराकडे न वळतां पोलीसकडे वळेल आणि पोलीसला काम करण्याला अधिक सौकर्य उत्पन्न होईल; म्हणजे स्वराज्याचा परिणाम कायद्याचें महत्त्व वाढविण्याकडे होईल.

जी गोष्ट पोलिसखात्यासंबंधानें आहे तीच गोष्ट वसुलासंबंधानें व करांसंबंधानें आहे. जर करांचा उपयोग लोकांच्याच हितासाठीं केला जातो, अशी लोकांची खात्री नसली तर कर वाढविण्यास लोकांचें मत विरुद्ध असणारच; पण करांचा उपयोग लोककल्याणासाठींच केला जात आहे अशी लोकांची खात्री झाली तर कर वाढविण्यास लोकमत अनुकूल होत जाणार. तथापि जेव्हां एखाद्या विशिष्ट लोकहिताच्या गोष्टीसाठीं पैसा पाहिजे असें सांगून सरकार नवीन कर उत्पन्न करतें आणि त्या लोकहिताच्या गोष्टीसाठीं पैसा अधिक खर्च न करतां भलत्याच गोष्टीसाठीं खर्च करूं लागतें तेव्हां सरकारविषयीं विश्वास उत्पन्न होत नाहीं. आणि जर लोकप्रतिनिधी त्या करास मंजुरी देऊं लागले तर ते लोकप्रतिनिधी लोकांत अविश्वासार्ह ठरतात. आज या प्रकारच्या गोष्टी पुष्कळ होतात. आज नोक-

रशाहीच्या हातीं कारभार आहे व प्रतिनिधिवर्ग दुर्बल आहे. तेव्हां अनेक लटपटी चालूच रहाणार. कां कीं नोकरशाहीचा सर्व वेळ राज्यव्यवस्थेसाठींच असल्यामुळें लबाड्या करण्यास व त्या कशा कराव्या याविषयीं विचार करण्यास तीस पुष्कळ संधि असते. पण हे अपूर्ण सत्तेचे लोकप्रतिनिधी फावल्या वेळांत राजकारण करणार; त्यांना नोकरशाहीच्या लबाड्या शोधीत रहाण्यास त्या प्रसिद्ध करण्यास आणि त्याविरुद्ध खटाटोप करण्यास संधि नसते. शिवाय कायदेमंडळाचा वेळ थोडा असल्यामुळें नोकरशाहीची पूर्ण उजळणी तेथें करण्यास अवकाशहि नसतो. तथापि हा नोकरशाहीचा जय नसून पराभव आहे. लोकांवरील कर न वाढवितां अधिक कर्ज काढून कारभार चालविण्याचें धोरण आज जें सरकार पत्करीत आहे आणि ज्या धोरणाचा परिणाम राष्ट्रीय कर्ज वाढण्यांत होत आहे ती गोष्ट सरकारच्या पराभवाची द्योतक नव्हे काय, आणि हें दौर्बल्य लोक प्रतिनिधींस सरकार फेटाळून लावीत असल्यामुळें उत्पन्न झालें नाहीं काय? यासाठीं प्रतिनिधींस जबाबदार अशीं माणसें सर्व नोकरशाहीच्यावर बसविलीं पाहिजेत. असें झालें म्हणजे लोकांचा राज्यकारभारावर विश्वास वाढेल आणि सरकारनें लोकसुधारणेच्या अधिकाधिक योजना कराव्यात आणि त्या योजना पार पाडण्यासाठीं लोकांनीं अधिकाधिक कर मंजूर करावेत ही प्रवृत्ति वाढेल. लोकांच्या प्रगतीसाठीं ज्या कांहीं गोष्टी कांहीं संस्था खासगी प्रयत्नानें आज करीत आहेत त्या उद्यां शासनसंस्थेमार्फत होत जातील.सर्व लोकांचा विमा उतरण्याची राष्ट्रीय योजना, प्रत्येक धंद्याचें शिक्षण, द्रव्योत्पादनास असमर्थ अशा प्रजेचें रक्षण उत्पानविकासाच्या राष्ट्रीय योजना इत्यादि गोष्टींकडे शासनसत्ता जोंपर्यंत लोकांस जबाबदार नाहीं तोंपर्यंत कधींहि चांगल्या तऱ्हेनें

लक्ष जाणार नाहीं. आणि येथील सरकार इतर सरकारांपेक्षां कमी योग्यतेचें ठरेल.

अर्थात स्वराज्याची चळवळ ही सरकारची पत वाढविण्यासाठीं आणि सरकारचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत करण्यासाठींच आहे, व यामुळें या चळवळीकडे इंग्लडनें त्यांचेंच काम आम्ही करीत आहों या भावनेनें पाहिलें पाहिजे. तसेंच सरकारची कार्यक्षमता लोकजागृतीमुळें, आणि लोकजागृती प्रातिनिधिक संस्थेच्या स्वराज्यानें वाढणार आहे, ही भावना जागृत ठेऊन राष्ट्रशासनाच्या पुनर्घटनेस जोरानें चालना दिली पाहिजे.

---

१४४६
७४७

## प्रकरण ३ रें.

### सध्यांचे राजकीय पक्ष आणि त्यांचें कार्य.

स्वराज्यप्राप्ति हें आज आपल्या राष्ट्रांतील सुशिक्षित वर्गाचें ध्येय म्हणून निश्चित झालें आहे, आणि तें प्राप्त करून घेण्यास कोणती पद्धति उपयोगी पडेल यावर मात्र आज मतभेद आहे. याबरोबरच जे जनसमूह कायमचे मागें पडले आहेत त्यांनीं पुढें आलें पाहिजे हेंहि समाज ध्येय मान्य आहे. हीं दोन्हीं ध्येयें वस्तुतः भिन्न नाहींत. तर निरनिराळ्या वर्गांच्या विचारकक्षेप्रमाणें आत्मोन्नतीचींच ध्येयें आहेत. या ध्येयांच्या परिपोषासाठीं कार्यक्रम काय असावा याविषयीं जे विचार प्रगट झाले असतील त्यांचें निरीक्षण आपणांस महत्त्वाचें आहे, व तसेंच त्या ध्येयाप्रमाणें किंवा ध्येयाच्या पूर्तीसाठीं देशांतील, राजकीय पक्षांनीं काय कार्यक्रम अंगिकारिला आहे तो जाणणें आणि त्याचीं युक्तायुक्तता तपासणें अवश्य आहे.

माणसें एकत्र जमतात तीं कांहीं तरी सामान्य आकांक्षामुळेंच जमतात. त्या आकांक्षांपैकीं कांहीं निकट असतात तर कांहीं दूरस्थ हिताविषयीं असतात. ध्येयाच्या वैशिष्ट्यामुळें किंवा ध्येयाच्या सिद्धी-साठीं उपाय कोणते योजावेत यासंबंधानें माणसामाणसांत जी भिन्नता असते तीमुळें कांहीं पंथ उत्पन्न होतात, तर कांहीं पंथ विशिष्ट हितसंबंध साधण्यासाठीं तयार होतात. मूळचे अल्पदृष्टीचे पक्ष मागाहून व्यापक प्रश्न हातीं घेऊं लागतात. उलट पक्षीं प्रथमतः मोठा व्यापक प्रश्न हातीं घेऊन त्यांतील भेदामुळें तयार झालेले पक्ष बारीक सारीक स्पर्धांत आणि भांडणांत मागाहून शिरतात. असा पक्षस्वरूपी मनुष्यसमुच्चयांचा विकासक्रम होतो. एकंदर समाजां-तील राजकीय भावना समजण्यासाठीं, निरनिराळ्या प्रकारच्या पक्षांचें अवलोकन आपणांस अवश्य आहे.

सध्यां निरनिराळे पक्ष प्रामुख्यासाठीं संग्राम करीत आहेत आणि त्यांचा संग्राम आणखी कांहीं दिवस चालेल. त्रयस्थांनां या सर्व पक्षांकडे पाहून या पक्षांच्या मुळें राजकीय प्रगतींत वाढ होईल काय,त्याप्रमाणेंच प्रत्येक पक्षाकडून कांहीं विशिष्ट राष्ट्रीय सेवा होणार आहे किंवा नाहीं व प्रत्येक पक्षाची कामगिरी खरोखर काय झाली याचा विचार करणें अवश्य आहे. प्रत्येक पक्ष आपल्या दृष्टीनें कांहीं सत्य पहात असतो, आणि समाजाच्या शक्ती अत्यंत विविध आणि गरजा व्यापक असल्यामुळें प्रत्येक पक्षाकडून प्रत्येक प्रकारच्या प्रयत्नाकडून कांहीं प्रत्यक्ष तर कांहीं अप्रत्यक्ष समाजाच्या कांहीं गरजांची पूर्णता करणारें इष्ट कार्य होत असतें. सध्यांच्या पक्षांकडे या दृष्टीनें अवलो-कन करून काय दिसतें तें आपण पाहूं.

निरनिराळ्या पक्षांची भावी चळवळ कोणत्या दिशेनें होईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याविषयीं आज कांहींच भविष्य करतां येणार नाहीं. तथापि प्रत्येक पक्षाची घटना म्हणजे आंतलीं माणसें व

त्यांच्या हातीं असलेला कार्यक्रम व जवळ असलेलें साहित्य यांवरून भवितव्याचा थोडा अजमास करतां येतो.

**पक्षांचें स्थूल अवलोकन**—देशामध्यें आज सहा पक्ष आहेत. (१) प्रागतिक पक्ष, (२) स्वराज्यपक्ष, (३) गांधी पक्ष, (४) ब्राह्मणेतर पक्ष, (५) मुसलमान पक्ष व (६) नवा तयार झालेल्या स्वतंत्रांचा पक्ष. हे आज महत्त्वाचे पक्ष आहेत. अस्पृश्यवर्गाच्या मंडळींनीं संघटित होऊन कांहीं विशिष्ट राजकीय कार्यक्रम हातीं घेतलेला दिसत नाहीं. तो वर्ग अत्यंत अशिक्षित व संपत्तीनें कनिष्ठ दर्जाचा असल्यामुळे त्यास आज कांहीं राजकीय दृष्टया महत्त्व नाहीं; एवढेंच कीं, या वर्गांतील थोड्याशा सशिक्षित लोकांच्या मनांत देशांत स्वराज्य झालें तर आपली उन्नति फारशी होणार नाहीं अशी समजूत आहे. व त्यामुळें स्वराज्य देऊं नका म्हणून कदाचित हा सांगेलहि. असल्या प्रकारच्या सांगण्याचा स्वराज्य दूर ढकलण्याकडे उपयोग फारसा नाहीं. हिंदुस्थानांतील लोक बलवान झाले नाहींत, तर अस्पृश्यांचें अस्तित्व नसूनहि इंग्लंड स्वराज्य देणार नाहीं. व हिंदुस्थानांत घटना बलवान होऊं लागली तर स्वराज्य देणें इंग्लंड अस्पृश्यांसाठीं दूर टाकणार नाहीं. उपयोगी मित्र किंवा भयंकर शत्रू या नात्यानें इंग्रजांस किंवा स्वराज्यवाद्यांस याचें महत्व भासत नाहीं. ब्राह्मणेतर पक्षाची गोष्ट जरा निराळी आहे. दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे विशेषेंकरून महाराष्ट्रांत व मद्रास इलाख्यांत या पक्षाचें अस्तित्व आहे. आणि या पक्षाचें धोरण या दोन भागांत कांहीं अंशीं स्वराज्यवाद्यांच्या प्रयत्नास अपकर्षक होईल. तथापि तें फारसें अपकर्षक होणार नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. जेथें ब्राह्मणेतर वर्ग सुशिक्षित आहे तेथें त्यास आपण आपल्या अकलेच्या जोरावर पुढें येऊं अशी धमक आहे. गुजराथेंत व उत्तर हिंदुस्थानामध्यें ब्राह्मणांइतकाच ब्राह्मणेतरांत सुशिक्षित वर्ग असल्यामुळें तेथें

11 JAN 1971

ब्राह्मणेतर पक्षाचें अस्तित्वच नाहीं; आणि मद्रास इलाख्यामध्यें ब्राह्मणेतरांमध्यें सुशिक्षित वर्ग ब्राह्मणांइतका जरी नाहीं तरी उपेक्षिण्याइतका अल्पसंख्याक नाहीं त्यामुळें तेथील ब्राह्मणेतर वर्ग सर्वसामान्य प्रकारच्या गोष्टींमध्यें जवळ जवळ ब्राह्मणांइतकाच पडतो, आणि ब्राह्मणेतरांतील अनेक माणसें दाक्षिणेंत अधिकारारूढ असल्यामुळें देशी लोकांच्या आकांक्षाप्रमाणें व हिताच्या दृष्टीनें राज्यकारभार होत नाहीं याची जाणीव तेथें ब्राह्मणांप्रमाणें ब्राह्मणेतरांसहि झाली आहे. महाराष्ट्रांत मात्र परिस्थिति निराळी आहे. मराठ्यांमध्यें सुशिक्षित वर्ग थोडा आहे. त्यामुळें कायदे करणाऱ्या मंडळांत किंवा सरकारी नोकरींत त्यांचा शिरकाव जितका व्हावा तितका झाला नाहीं. मराठ्यांमध्यें शिक्षण वाढून त्यांचा शासनयंत्रांत शिरकाव जितका अधिक होईल तितका त्यांच्यामध्यें देखील स्वराज्यवाद अधिक बळावत जाईल. मग त्यांच्या भिन्न आकांक्षा जर राहिल्या तर त्या एवढ्याच रहातील कीं स्वराज्य तर प्राप्त करून घ्यावयाचेंच पण हातीं अधिकार आला असतां त्याचा फायदा ब्राह्मणांपेक्षां ब्राह्मणेतरांस, विशेषेंकरून मराठा जातीला अधिक मिळवून द्यावयाचा. पण ही केवळ स्वजातीस आश्रय देण्याची इच्छाहि अंगावर जबाबदारी पडली असतां रहाणार नाहीं. जबाबदारी पडली म्हणजे माणसांच्या लायकीप्रमाणें त्यांस जागा मिळाव्या या धोरणाचाच तेहि पुरस्कार करतील. अर्थात् ब्राह्मणेतर पक्षाची आजची धडपड हा केवळ सामान्य चुरशीचा भाग होय. आज महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर वर्ग या सामान्य चुरशीच्या पलीकडे गेला नाहीं. प्रागतिक, स्वराज्य आणि कट्टर हे मुख्यतः जातिविशिष्ट आकांक्षा नसलेले म्हणजे खरे राजकीय ध्येयासंबंधाचे किंवा पद्धति संबंधीं पक्ष होत.

वर सांगितलेल्या पहिल्या पांच पक्षांशिवाय एक स्वतंत्रांचा पक्ष वरिष्ठ कौन्सिलांत अस्तित्वांत आला आहे; आणि जर स्वराज्यपक्षी-

यांचें धोरण देशहिताच्या विधायक गोष्टी करण्याऐवजीं केवळ सरकारी बऱ्या वाईट गोष्टींस खोडा घालण्याचेंच राहील तर हा स्वतंत्रांचा पक्ष वाढत जाण्याचा संभव आहे. कां कीं, स्वराजिस्ट निवळ खोडाच घालणार तर लोकांच्या गरजा कोणत्या तरी पक्षाच्या मार्फत पुढें आल्या पाहिजेत. स्वराज्य पक्षाचें लक्ष संग्रामांत असल्यामुळें विशिष्ट आर्थिक व सामाजिक सुधारणांची खटपट किंवा मनीषा त्यांमध्यें कमी आहे, आणि हीच गोष्ट स्वतंत्रांचें बल आहे. मुसलमान व ब्राह्मणेतर या पक्षांचें कार्यक्षेत्र नियमित आहे. मुसुलमान पक्ष हा हिंदूंशीं कांहीं कारणांकरितां युक्त होऊन म. गांधींचा अनुयायी बनला. त्या पक्षाचें मुख्य धोरण खिलाफतीची जोपासना करण्याचें होतें. पण खिलाफतीचें उच्चाटन खुद्द तुर्कस्तानांतूनच झाल्यामुळें हा पक्ष अदृष्टकार्य झाला आहे, व आतां या पक्षाचें धोरण अल्पसंख्याकांना संख्याबलापेक्षां अधिक फायदा व्हावा व अधिक मान्यता मिळावी या तऱ्हेचेंच होण्याचा संभव बराच आहे. ब्राह्मणेतर पक्ष मुसलमानांचें थोडेंबहुत अनुकरण करीत आहे; आणि आपणांकरितां स्वतंत्र जागा, व नोकरींत आपणांस अधिकाधिक प्रवेश या बाबतींत कांहीं दिवस खटपट करीत राहील. मुसलमान व ब्राह्मणेतर या दोन पक्षांच्या मागण्यांचा विचार करतां असें म्हणावें लागेल कीं, हे वस्तुतः राजकीय पक्ष नसून डब्बोल्याची देशांतल्या देशांत वांटणी जातिविषयक व्हावी येवढ्याच संबंधानें विचार करणारे आहेत. म्हणजे यांस मुख्य राजकीय पक्ष म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानचा व इंग्लंडचा संबंध कसा असावा प्रांतिक स्वायत्तता कितपत असावी इत्यादि बाबतींत विचार करणारे हे पक्ष नव्हत. या बाबतींत विचार करणारे पक्ष म्हणजे प्रागतिक, स्वराज्यवादि व नाफेर पक्ष हे होत.

स्वराज्यवाद्यांचा कार्यक्रम केवळ अडथळ्याचे डाव कसे टाका-

वेत एवढयाच पुरता आहे. देशविकासविषयक कार्यक्रम यांच्यापाशीं आज कांहीं नाहीं. जर उत्पन्न झाला तर इंडिपेंडंट पक्ष त्यांत किंवा प्रागतिकांत विलीन होईल. थोडाबहुत निश्चित कार्यक्रम इंडिपेंडंट व प्रागतिक यांच्यापाशीं आहे पण तोहि अपुरा आहे. शिवाय प्रागतिकांच्या पाठीमागें आज लोकांचें बळ नाहीं. नाफेर पक्षाला आज नाफेरपक्ष हें नांव शिल्लक रहातच नाहीं. कां कीं, गांधींनीं इतरांशीं जो तहनामा केला त्यामुळें याची स्थिति आज विचित्र झाली आहे. प्रश्न येवढाच येतो कीं, आतां हा ‘ अवशिष्ट ’ पक्ष स्वराज्यवाद्यांशीं पूर्णपणें एक होईल काय ? मनुष्यस्वभाववरून असें वाटतें कीं हा एकाएकीं त्यांशीं संलग्न होणार नाहीं. कौन्सिलांत जाऊन काम करणें हें फार थोड्यांसच शक्य आहे आणि तें काम फलदायी होईलच अशी याची भावना नाहीं. त्यामुळें या पक्षास एकतर गांधींचें नेतृत्व सोडून दिलें पाहिजे किंवा आपला कार्यक्रम निराळा आंखला पाहिजे किंवा गांधींना आपल्या पक्षांत कायम ठेवून व गांधींचें नेतृत्व कबूल करून गांधींना आपल्याकरितां कार्यक्रम तयार करावयास सांगितला पाहिजे.

या पक्षास निराळें अस्तित्व असण्याची अवश्यकता गेली आहे असें नाहीं. कां कीं, प्रागतिक पक्ष व स्वराज्यपक्ष यांचा बराचसा वेळ लोकशिक्षणाच्या ऐवजीं आपापल्या पक्षाची सरशी करण्यांत जाणार व लोकांनां शासनविषयक गोष्टींची अधिक माहिती करून देणें, निग्रहानुग्रहास जनतेस अधिक समर्थ करणें, स्वराज्यविषयक भावना अधिक उत्कट करणें, राष्ट्राच्या आकांक्षा वाढविणें व एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होण्यास अवश्य अशी नैतिक चळवळ करणें, धार्मिक भेदामुळें होणारा विरोध दूर करणें या गोष्टी करण्यास खटपट करणारा एखादा मनुष्यसंघ पाहिजे. लोकशिक्षणाचा विधायक कार्यक्रम खादीशिवायहि पुष्कळच आहे, आणि खादीप्रसारावरील लोकांचा

विश्वासहि कमी कमी होत चालला आहे. खादी व स्वराज्य यांतील कार्यकारण संबंध कोणासच पटला नाहीं. तर अशा प्रसंगीं सर्व प्रकारच्या लोकांस पटेल असलें विधायक कार्यहि उत्पन्न व्हावयाचें आहे. अशा स्थितीमध्यें ज्यास कौन्सिलप्रवेशाची आकांक्षा नाहीं व ज्यास जनतेची प्रगति हीच मुख्य साधावयाची आहे असा एखादा संघीभूत वर्ग समाजांत असला तर तो निःसंशय राष्ट्राच्या प्रगतीस उपयोगी होईल.

ज्या वर्गास लोकांमध्यें जागृति करावयाची आहे परंतु जागृति करण्याच्या खटपटीबद्दल ज्यास कौन्सिलप्रवेशासारखा प्रत्यक्ष वैयक्तिक फायदा नाहीं, त्या वर्गास कार्यप्रवृत्त होण्यासाठीं कांहीं अन्य पारितोषिक पाहिजे. केवळ घरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या कोणीहि भाजणार नाहीं. यासाठीं लोकशिक्षणाची चळवळ करण्याकडे जो वर्ग वाहिला असेल तो पगारी असला पाहिजे आणि त्या वर्गास पगार जो द्यावयाचा तो केवळ जेमतेम कसें तरी भागेल अशा प्रकारचा असतां कामा नये. तर चांगल्या तऱ्हेचा पगार पाहिजे. या अवशिष्ट पक्षाला जर कांग्रेस ताब्यांत ठेवतां आली तर कांग्रेस हीच लोकशिक्षणाचें यंत्र होईल आणि कांग्रेसला कांहीं तरी अधिक निश्चित कार्य उत्पन्न होईल. आणि यासाठीं या पक्षानें आपलें कार्य जोरानें चालू ठेवून कांग्रेसमध्यें महत्व प्राप्त करून घेण्याची आवश्यकता आहे.

**पक्षांच्या प्रयत्नांचें क्रीडास्थानः**—पक्षांचें एकत्व किंवा भिन्नत्व कांहीं अंशीं विचारमूलक असतें तर कांहीं अंशीं अनेकजनसमुच्चयांत कांहीं लोकांना आपलें इष्ट कार्य पार पाडतांना ज्या दोस्त्या कराव्या लागतात त्यांवर असतें. यामुळें पक्षांचें चरित्र अवलोकन करतांनां कौन्सिलें कांग्रेस सारख्या ज्या ज्या समुच्चयांत यां पक्षांनां काम करावें लागतें त्या समुच्चयांचेंहि चरित्र अवलोकन केलें

पाहिजे व त्यांत हे पक्ष काय कार्य करितात तें पाहून समजून घेतलें पाहिजे. तसें केलें म्हणजे पक्षांतील लोकांनीं व्यक्त केलेल्या विचारांचें व्यावहारिक स्वरूप समजत जातें, तसेंच विशिष्ट पक्ष विशिष्ट संस्थेला आपल्या विशिष्ट विचारामुळें कसें स्वरूप देतात हें समजतें. यासाठीं पक्षविशिष्ट विचारांचा इतिहास संस्थांच्या इतिहासाशीं संलग्नतेनें लिहिला पाहिजे. जसजशीं कौन्सिलें वाढत चाललीं तसतशी कांग्रेस निरुपयोगी होण्याचा संभव वाढला. अमृतसरपूर्व कांग्रेसचें स्वरूप लोकांच्या विशिष्ट गरजा ठराव करून प्रसिद्ध करण्याचें, आणि विशिष्ट मागण्या जाहीर करण्याचें होतें. कौन्सिलें वाढण्याचा स्वाभाविक परिणाम असा कीं ज्या विशिष्ट मागण्या कांग्रेसमध्यें उद्गीर्ण होत त्या कौन्सिलमध्यें उच्चारल्या गेल्यामुळें कांग्रेस अनवश्य ठरणार होती.

अशा प्रसंगीं कांग्रेस जर जिवंत रहावयाची असली तर तिला कांहीं तरी निराळें स्वरूप मिळालें तरच जगणार. निराळें स्वरूप द्यावयाचें तर कांहीं तरी कार्यक्रम पाहिजे. तो कार्यक्रम सरकारपाशीं मागणीच्या स्वरूपाचा असला तर तो कार्यक्रम आणि कौन्सिलांतील खटपट यांत संगति व एकसूत्रता पाहिजे. ही एकसूत्रता उत्पन्न करण्यासाठीं लो. टिळकांनीं "कांग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी" म्हणून एक पक्ष उत्पन्न केला. जें काम स्वराज्यसंघानें कांग्रेसमध्यें केलें तेंच काम या पक्षानें करावयाचें अशी मांडणी केली होती. हा पक्ष त्या वेळेस यशस्वी झाला असता तर त्याचा परिणाम असा झाला असता कीं, कांग्रेसचें ध्येय कौन्सिलांतून पार पडणारा पक्ष उत्पन्न झाला असता. कांग्रेसच्या बलामुळें तो पक्ष बलवान् झाला असता, लिबरल्स कांग्रेसमध्यें अंतर्भूत झाले असते तर त्यांना या नवीन पक्षांतहि अंतर्भूत व्हावें लागलें असतें, आणि कौन्सिलें कांग्रेसच्या तावडींत व कांग्रेस लो. टिळकांच्या तावडींत राहिली असती. याचा परिणाम असा

झाला कीं डेक्कन लिबरल्सचा पक्ष कांग्रेसच्या बाहेर अजिबात गेला. आणि त्या पक्षामार्फत निवडणुकी कांग्रेसविरुद्ध लढाव्या असें त्यांनीं ठरविलें. १ आगष्ट १९२० रोजीं लो. टिळकांच्या मृत्यूच्या योगानें परिस्थिति एकदम बदलली.

कांग्रेसचा कार्यक्रम सरकारपुढें मागणीचाच राहिला असता तर कांग्रेसला पूर्वींचें स्वरूप कायम राहिलें असतें. आणि कांहीं मागण्या कांग्रेसनें ठरविल्यानंतर त्या कौन्सिलांतून पार पाडण्याची जबाबदारी या पक्षानें निवडलेल्या लोकांवर पडली असती. व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम असा झाला असता कीं, कांग्रेस हें राष्ट्रीय पक्षाचें यंत्र झालें असतें.

कांग्रेसला विशिष्ट पक्षाचें तुणतुणें गाणारें यंत्र बनवावें अशी इच्छा सर्व राष्ट्राची असावी असें दिसत नाहीं. लो. टिळक जर जिवंत असते तर त्यांचा व म. गांधींचा एखादा खटका उडून मधला मार्ग काढावा लागला असता किंवा कदाचित् लो. टिळक यांचा तात्पुरता जय होऊन कांग्रेस विशिष्ट पक्षाची झाली असती.

महात्मा गांधींनीं कलकत्ता कांग्रेसमध्यें कांहीं अशक्य आणि भलताच कार्यक्रम मांडला व तो पासहि झाला. तो पास झाला याचा अर्थ जनतेला म. गांधींचा विशिष्ट कार्यक्रम, त्यांची खादी, त्यांची बहिष्कारत्रयी हीं सर्व पूर्णपणें पटलीं अशांतला भाग नाहीं. कां कीं, बरीच मंडळी या विषयावर विचार करूनहि आली नसतील आणि केवळ तात्पुरत्या व भाडोत्री मतांवर म. गांधींचे ठराव पास झाले असतील. एवढें मात्र खरें कीं कांग्रेसनें पुढें काय करावें या विषयावर त्यांचे विचार निश्चित जरी झाले नसले तरी विशिष्ट पक्षाची कौन्सिलांत बढती करण्यासाठीं कांग्रेस हीं संस्था वापरली जावी अशी राष्ट्राची त्यांवेळीं खास इच्छा नव्हती. त्यामुळें जुन्या लोकांचा

अनिश्चय आणि गांधींची तात्पुरत्या मतदारांची फौज व कांहीं तरी निश्चित कार्यक्रम यामुळें कांग्रेसमध्यें म. गांधींस जय मिळाला.

कलकत्ता कांग्रेसच्या वेळेस परिस्थिति येणेंप्रमाणें होती. लो. टिळक हयात असते तर कांग्रेस जरी पक्षविशिष्ट झाली असती तथापि कांहीं व्यापक जोरदार कार्यक्रम कौन्सिलांमार्फत लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीं होऊं शकेल व कांग्रेस त्या कार्यक्रमाचें साधन होईल अशी लोकांस आशा होती. लो. टिळक निवर्तल्यामुळें सर्व राष्ट्रास एकसूत्री करून त्यामार्फत विशिष्ट कार्यक्रम कौन्सिलमार्फत पार पाडील असा पुढारी नव्हता. लो. टिळकांच्या हस्तकांच्या मार्फत तसा कार्यक्रम पार पाडतां येण्याची शक्यताहि नव्हती. त्या वेळेस टिळकांच्या हस्तकांपैकीं कोणीहि मनुष्य सर्व हिंदुस्थानभर वजन पाडील अशी आशा करून व त्यास पुढें करून आपला कार्यनिश्चय करविणें हें लोकांस शक्य वाटत नव्हतें व कौन्सिलउमेदवारांपैकीं एका बाजूस आपलें सर्व बळ देणें इष्ट वाटत नव्हतें. कांग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष जो अस्तित्वांत आणण्याचा टिळकांनीं प्रयत्न केला त्यावर त्यांच्याच अनुयायांचा इतका अविश्वास होता कीं त्या पक्षाच्या तत्त्वांची सर्व हिंदुस्थानभर मांडणी करणें, त्यांत योग्य तसे फेरफार करून संघटना करणें इत्यादि कार्यें त्यांनां नेटानें करतां आलीं नाहींत. कांग्रेसला कौन्सिलांतील कारभाराचें यंत्र करविण्याची ताकद टिळकांच्या अनुयायांत नव्हती. ते अनुयायी स्वतःच्या जबाबदारीवर कोणतेंहि कार्य करण्यास तयार झालेले नव्हते. लोकमान्यांचे अगदीं निकटचे अनुयायी जन्मभर परतंत्र असल्यामुळें, जो कोणी पुढें जोरानें येईल त्याचे उपहस्तक बनणें, तो बाजूला झाला म्हणजे स्वतःचें थोडेसें चालविण्याची मसलत करणें एवढ्यापुरतीच त्यांची तयारी असल्यामुळें, म. गांधीनां त्यांच्याकडून प्रतिकार झाला नाहीं, व नाखुषीनें त्यांस गांधींचे अनुयायी व्हावें लागलें. यामुळें कलकत्त्यास व पुढें

नागपुरास जमलेल्या कांग्रेसमध्यें कांग्रेसला विशिष्ट पक्षाची बनणें शक्य नव्हतें. त्यामुळें महात्मा गांधींच्या प्रयत्नांस बरेंच यश आलें. गांधींनीं कौन्सिलांतील पक्ष बनविण्याचें बाजूलाच ठेवलें एवढेंच नव्हे तर कौन्सिलांतहि शिरण्यास मज्जाव करविला. राष्ट्राची इच्छा महात्मा गांधीस त्यावेळेस फारच अंधुकपणानें समजली असें आज म्हणतां येईल. कांग्रेस हें केवळ सरकारी कृत्यावर टीका करणारें किंवा कौन्सिलांतील एखाद्या पक्षाची जोपासना करणारें यंत्र न होतां, तिनें लोकांस कांहीं अधिक आकांक्षा उत्पन्न करणारा, लोकांस शिस्त लावून देणारा व कार्यक्षम करणारा असा स्वतःचा विधायक कार्यक्रम पत्करणारी संस्था असावी हें लोकांस पाहिजे होतें, पण लोकांस कांग्रेसच्या मनुष्यांनीं कौन्सिलांतहि चळवळ करावी हेंहि हवें होतें आणि गांधींस तें नको होतें. तेव्हां लोकांची वर सांगितलेली इच्छा स्थापन करण्यांत कांग्रेसमधील दोन्ही पक्षांचा कांहीं काळ लोटला.

भावी राजकीय चळवळींमध्यें महात्मा गांधींचें कार्यस्वरूप काय होईल यासंबंधानें आज विधान करणें व्यर्थ आहे. जनतेची बुद्धि ओळखण्याची आणि तिला चेतना देण्याची त्यांची तऱ्हा सामान्य नियमांच्या बाहेरची आहे. कांहीं कांहीं गोष्टींत त्यांनीं फारच मार्मिकता दाखविली आहे, तर कांहीं गोष्टींत त्यांनीं चुकीचे अजमास केले. त्यानां एक तत्त्व पूर्णपणें ठाऊक झालें तें हें कीं कार्यक्रम इतका सोपा पाहिजे कीं अत्यंत दुर्बलासहि त्यांत सहकारिता करतां येईल. जोंपर्यंत या तत्त्वाप्रमाणें ते एकसारखे चालत होते तोंपर्यंत त्यांस यश येत गेलें. सर्वांनीं उपास करावा, दुकानें बंद करावीं, इत्यादि गोष्टी प्रथम लोकांस सांगून त्यानीं आपल्या तंत्राप्रमाण लोकांस वागवावयास सुरुवात केली.सरकारविरुद्ध जी चळवळ करावयाची ती अनत्याचारी असली पाहिजे हेंहि सुंदर तत्त्व त्यानीं आवेशानें व

बऱ्याचशा यशस्वितेनें लोकांपुढें मांडलें. लोकांनीं प्रत्यक्ष कृति काय करावी हें सांगतांना मात्र त्यांस बरेच प्रयास पडले तथापि त्यांतहि त्यानीं बरीच कल्पकता दाखविली. सर्व लोकांस लांबलचक व्याख्यान चालत नाहीं, गुरुमंत्राप्रमाणें सूचक व सोप्या शब्दांचा प्रसार केला म्हणजे जनतेस निरोप त्वरेनें कळवितां येतो हें तत्त्व ओळखून त्यानीं " पॅसिव्हरेझिस्टन्स " हा मंत्र दिला. पण तो लोकांस पचेना; कां कीं " रेझिस्ट " म्हणजे प्रतिकार करावयाचा म्हणजे कांहीं तरी धोक्याची क्रिया करावी लागते. व ती क्रिया करण्याचें धैर्य मात्र लोकांस नसतें. हा शब्दप्रयोग फुकट गेल्यानंतर त्यानीं दुसरा गुरुमंत्र दिला तो " सिव्हिल डिसओबिडिअन्स " हा होय. हा शब्दहि फारसा प्रसृत होईना. त्यानीं मध्येंच " सत्याग्रह " शब्द काढून त्या शब्दास बढती द्यावयाची खटपट केली पण त्यांतहि यश आलें नाहीं. " सत्य " म्हणजे काय व " आग्रह " म्हणजे काय वगैरे अनेक गैरसोईचे प्रश्न उत्पन्न होऊन त्यांवर निरनिराळीं भाष्यें होऊं लागलीं, आणि महात्मा गांधींनांच त्यावर सुसंगत भाष्य करतां येईना.

गांधींनीं तिसरा शब्द काढला तो " नॉनकोऑपरेशन " हा होय " असहकारिता " आणि " असहयोग " या मंत्रशब्दांनीं त्याचें भाषांतर करण्यांत आलें. हे पंचाक्षरी व षडक्षरी मंत्र फारच परिणामकारी झाले. कां कीं यांनीं जो कार्यक्रम सूचित होई त्या कार्यक्रमांत अत्यंत धैर्यवानास त्याप्रमाणें अत्यंत दुर्बलास स्थान होतें. अत्यंत दुर्बलासहि आपण सहकारिता करावयाची नाहीं एवढें म्हणावयास येईल अशी सोय त्या शब्दांत होती. या अपेक्षेच्या अल्पत्वानें हा मंत्र अधिकजनव्यापी आणि त्यामुळें बलवान बनला. एक मंत्र म्हणून सर्व राष्ट्राला इशारा कळविण्याचें जादूगाराचें काम म. गांधींनीं केलें. आणि गांधींच्या विरुद्ध जरी अनेक गोष्टी मांडतां

येतील तरी त्यानीं वरील बाबतींत दाखविलेल्या कौशल्यामुळें त्यांची योग्यता मोठी आहे. म. गांधींनीं एक कोट रुपये जमविले आणि त्यांचा अपव्यय केला असा त्यांच्याविरुद्ध बऱ्याच अंशीं चुकीचा तथापि थोड्या अंशीं खरा आक्षेप आहे. पण आपण असें धरून चालूं कीं, त्यानीं एक कोट रुपये आपल्या चैनीसाठीं लावले. असें जरी झालें तरी तें अयोग्य होणार नाहीं. त्यानीं असहकारिता हा शब्द तरी निदान एक कोट लोकांस शिकविला असेल आणि या गुरुमंत्राची किंमत एक रुपया तरी खास आहे.

इ. स. १९२०च्या मार्च महिन्यांत महात्मा गांधी हे राजकारणाच्या हौद्यांत चंग बांधून उतरले. यानंतर त्यानीं मुसुलमानांच्या खिलाफतीचा पुरस्कार केला व मुसुलमान अनुयायी मिळविले. त्या मुसुलमानांच्या साहाय्यानें आणि टिळकांच्या मृत्यूनंतर साशंकमार्ग झालेल्या हिंदूंच्या कांहीं अंशीं साहाय्यानें आणि कांहीं अंशीं ताटस्थ्यामुळें कलकत्ता कांग्रेसमध्यें विजय मिळविला आणि जें प्रामुख्य मिळविलें तें तुरुंगांत जाईपर्यंत कसेंबसें कायम ठेवलें.

१९२० च्या जानेवारीच्या अगोदर महात्मा गांधींस सार्वजनिक चळवळींत फारसें महत्त्व नव्हतें. दक्षिण आफ्रिकेचा पुढारी, कांहीं विशिष्ट सामाजिक व धार्मिक मतांचा प्रवक्ता, दुष्काळानें गांजलेले शेतकरी व मळेवाल्यांनीं गांजलेले मजूर यांशीं सहानुभूति बाळगणारा, ख्रिस्ती लोकांविषयींहि सहानुभूति बाळगणारा, सदाचरणी, साधू मग ते कोणत्याहि देशांत जन्मलेले किंवा कोणत्याहि संप्रदायाचे ( ख्रिस्ती मुसुलमान वगैरे ) अनुयायी असोत त्याविषयीं आदर बाळगणारा, ध्येय आणि वागणूक यांत अंतर पडतें हें समजूनहि अशक्य ध्येय बोलण्यास न भिणारा, कदाचित् व्यवहारशून्य असलेला असा त्यांचा लौकिक होता. तथापि व्यवहारशून्य व ध्येयवादी असा त्यांचा लौकिक होण्यातच त्यांची व्यवहारज्ञता होती. कां कीं वैयक्तिक प्रामाणिकपणा-

विषयीं संशयातीतता त्याबरोबरच लोकांस पटे. १९१९ च्या अंतीं जी कांग्रेस अमृतसरला पार पडली तोंपर्यंत त्यांस सामान्य लोकांचा बराचसा आदर मिळाला होता पण अनुयायी मिळाले नव्हते. एकदां तर सबजेक्ट कमिटींत निवडून येण्यास त्यांस पंचाईत पडली होती. परंतु जेव्हां १९१९ च्या कांग्रेसनंतर त्यांस निश्चयात्मक अनुयायी मिळाले तेव्हां नंतर त्यांच्या विचाराचा पगडा देशावर बसण्यास सुरुवात झाली.

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर कलकत्त्यास कांग्रेसमध्यें प्रामुख्य मिळवून, देशास निव्वळ सुताळ बनविण्याच्या महात्मा गांधींच्या खटपटी चालू असतांच त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्रांत चळवळ सुरू झाली आणि तारीख १ डिसेंबर १९२१ रोजी अकोल्यास जी परिषद भरली होती तींत महाराष्ट्रांतील बऱ्याचशा राजकारणी मंडळींचा महात्मा गांधींशीं विरोध व्यक्त झाला. तथापि त्या विरोध करणाऱ्या मंडळीस आपल्या पायावर उभें रहाण्याची शक्ति तेव्हां नव्हती; आपला मवाळांपेक्षां निराळा सुसंबद्ध कार्यक्रम दाखविण्याची त्यांची तयारी नव्हती. व गांधींशीं जो विरोध होता तो देखील घरीं बसून बोटें मोडण्याच्या स्वरूपाचा होता. महाराष्ट्रीयांच्या स्तुतिपर अहमदाबादेस जेव्हां गांधींनीं कांग्रेसच्या अगो-दर भाषण केलें तेव्हां तो विरोध वितळला. आणि रा. नरसोपंत केळकरानां जेव्हां अहमदाबादेस व्यापाऱ्यांकडून मानपत्र गांधींनीं मिळवून दिलें तेव्हां तो अजीबात नष्ट झाला. गांधींशीं असंतुष्ट अस-लेल्या महाराष्ट्रीयांत त्या वेळेस आपला निराळा मार्ग निश्चयात्मक करण्याचीहि त्यांची धमक नव्हती पण म. गांधी तुरुंगांत गेल्यानंतर नाखुषीनें कौन्सिलबहिष्कारांत राहिलेल्या मंडळीस क्षेत्र मिळालें आणि नवीन पंथाची स्थापना करतां आली. ती कौन्सिलपार्टी पुढें स्वराज्यपक्ष हें नांव धारण करती झाली. त्यांस पुढच्या निवडणु-

पुण्या पासून अपूर्न मागित


कीच्या वेळेस यश मिळालें आणि त्यांचा पुढें कौन्सिलांत प्रवेश होतेवेळेस पुष्कळच लोकांनीं मत देण्याच्या अधिकाराचा उपयोग केला. आणि येणेंप्रमाणें गांधींच्या कौन्सिलबहिष्काराच्या प्रश्नास कायमचा खो मिळाला. कां कीं, जनता कौन्सिलबहिष्कारवादी नाहीं हें त्या वेळीं स्पष्टपणें दिसून आलें.

महात्मा गांधी तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर स्वराज्यपक्ष कौन्सिलांत शिरला असून सरकारविरुद्ध चळवळ आंत जाऊन करीत आहे, तथापि बहिष्कारत्रयीच्या विरुद्ध कौन्सिलवाले आहेत असें त्यांस दिसून आलें. महात्मा गांधींच्या मनांतील बहिष्कारत्रयी गेली नव्हती. उलट आपल्या या कार्यक्रमाविरुद्ध हे वेडे लोक कां जातात असें त्यांस वाटत होतें. त्यांच्या मनांत कॉंग्रेसमधून कौन्सिलवाल्या लोकांस हांकलून द्यावयाचें होतें व त्यासाठीं त्यानीं आपला पुढील कार्यक्रम आचरण्यास सुरवात केली; व ज्यांचा बहिष्कारत्रयीवर विश्वास नसेल त्यांनीं कॉंग्रेसच्या अधिकारपदावर राहूं नये अशी खटपट चालविली. व ती पार पडण्यासाठीं अहमदाबादेस तारीख २६ जून १९२४ रोजीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक भरविली तींत गांधीस आपल्या मतांवर लोकांचा अविश्वास किती आहे याचा कटु अनुभव आला. आणि पुढें गांधी स्वराजिस्टांपुढें अत्यंत दुर्बल आहेत असें सिद्ध झालें. बहिष्कारत्रयीस अनुकूल नसलेल्या लोकांस हांकलून लावण्याच्या प्रयत्नावर कोकोनाडा कॉंग्रसनें (डिसेंबर १९२३) प्रथम घाला घातला. आणि अहमदाबाद येथें गांधींचा कौन्सिलवाल्या लोकांस घालविण्याचा दुसरा प्रयत्न फसला आणि पुढें कलकत्त्यास ऐक्यासाठीं बोलावलेल्या परिषदेंत गांधींनीं स्वराज्य पक्षास संपूर्ण लोटांगण घातलें, आणि स्वराज्यपक्ष हा कांग्रेसचा प्रतिनिधि आहे ही गोष्ट कबूल केली आणि पुढें मुंबईस ऐक्यपरिषद नोव्हेंबर १९२४ च्या शेवटाला बोलाविली तींत स्वराज्यपक्ष

आणखी पुढें सरसावला आणि त्यानंतर महाराष्ट्राच्या कांग्रेस कमिटी-मध्येंहि स्वराजिस्टांनीं आपलें मताधिक्य स्थापन केलें.

या सर्व गोष्टींवरून असें दिसतें कीं कायदे करणाऱ्या संस्थांमध्यें लोकप्रतिनिधींनीं जाऊन काम करावें आणि त्या काम करणाऱ्यांचा कांग्रेसशींहि कांहीं संबंध असावा या प्रकारच्या विचारास जनता बरीच अनुकूल आहे.

आतां नाफेर किंवा कट्टर पक्षाची स्थिति पुढें काय होईल हा विचार आहे. सर्व हिंदुस्थानभर झालेली स्वराज्यपक्षाचीं आणि कट्टरांचीं भांडणें नाहींशीं होऊन त्यांचीं अंतःकरणें ताबडतोब एक होतील असा संभव नाहीं. गांधींच्या कट्टर अनुयायांनीं स्वराज्यपक्षास जोरानें हांकून देण्याच्या बाबतींत स्वतः जितकी मदत करावी तितकी केली नाहीं. उलट पक्षीं म. गांधींनींहि आपल्या अनुयायांस तोंडघशीं पाडलें, या सर्व गोष्टी उघड आहेत.

प्रश्न असा आहे कीं, आपापसांतील यादवी नाहींशीं होऊन एकमेकांस साहाय्य करण्यास हे दोन्ही पक्ष प्रवृत्त होतील काय ? कॉंग्रेस व स्वराज्यासारखा विशिष्ट पक्ष यांत संबंध काय असावा ? आणि कट्टरांनां सुतानें स्वर्गास जाण्यापलीकडे कांहीं विशिष्ट कार्यक्रम आहे कीं नाहीं ?

कौन्सिलांत जाऊन काम करण्याची इच्छा लोकांस मान्य होऊन स्वराज्यपक्ष यशस्वी झाला आहे, व कट्टर पराभूत झाले आहेत. पराभूत झालेल्या कट्टर पक्षाला कांहीं देशहिताच्या विशेष गोष्टी करतां येतील कीं नाहीं, त्यांनीं जो कौन्सिलांत विरोध दाखविला तें तत्वच चुकलें काय या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

अमुक एक पक्षाच्या बाजूला सर्व सत्य आहे अशी विचारसरणी शास्त्रीय पद्धतीनें विचार करणाऱ्यास साहाय्यक होत नाहीं. जेव्हां बरेचसे लोक एका विशिष्ट दृष्टीनें पहात असतात तेव्हां त्यांतहि

श्रीमंत लो. ग. व. ... , ...


कांहीं सत्य असतें. सर्व लोक मेंढरांसारखे आहेत. 'म. गांधींचें वेड्यासारखें अनुकरण करतात' या तऱ्हेची उपपत्ति सत्य स्पष्ट करीत नाहीं. कां कीं कट्टरांत म. गांधीसहि आपापल्या विचारानें जोरानें विरोध करणारी मंडळी आहेत.

यावरून कट्टरांनां केवळ गांधींच्या अनुयायित्वाशिवाय स्वतःची कांहीं तरी विचारपद्धति आहे. ते केवळ आंधळे अनुयायी नाहींत, आणि अनेकांनां पटणारें असे सत्य त्यांस कांहीं दिसत असल्याशिवाय ते संघीभूत व कार्यप्रवृत्त होत नाहींत असें जर आहे तर आपण असा विचार करावा कीं त्यांस आपल्यांतील चांगल्या लोकांनीं कौन्सिलांत जावें हें वाईट कां दिसतें. सामान्यतः त्यांची विचारसरणी येणेंप्रमाणें मांडतां येईल—

ज्या लोकांनां चळवळ करावयाची व लोकजागृति करावयाची त्यांस कौन्सिलमध्यें शिरण्याचा ध्यास उपयोगी नाहीं. तो त्यांस जोंपर्यंत आहे तोंपर्यंत त्यांचें लक्ष लोकसुधारणेपेक्षां मतें मिळविण्याच्या दृष्टीनें काम करण्याकडे राहील; व त्यांतच त्यांचा वेळ जाईल. कौन्सिलमध्यें मनुष्य शिरला म्हणजे दिवाण होण्याची महत्त्वाकांक्षा त्यामध्यें उत्पन्न होणार. सरकारचें उत्पन्न वाढविलें पाहिजे, निदान कायम राखलें पाहिजे अशी त्याची दृष्टि होणार; एवढच नव्हे तर त्याचा स्वतःचा पगार सरकारला पैसे वेळच्या वेळेवर मिळाले तरच मिळणार, या दृष्टीनें त्याची बुद्धि लोकांत चळवळ होऊं नये अशा तऱ्हेची होणार. लोकांनीं मद्यपाननिषेधार्थ चळवळ केली तर सरकारचा पैसा कमी होतो म्हणून दिवाणांचा जीव घाबरा घाबरा होणार अशा परिस्थितींत तो आपलें वजन कांग्रेसमध्यें चळवळीस बिघाड करण्यासाठीं खर्च करणार. तो चळवळ करणाऱ्या समूहामध्यें बखेडा उत्पन्न करण्यासाठीं, सरकारचा हस्तक होणार. या सर्व गोष्टींची शक्यता विसरून चालावयाचें नाहीं. ज्या लोकांनां

लोकांमध्यें जागृति करावयाची आहे त्या लोकांच्या कार्यांत दिवाणाची जागा मिळवूं इच्छिणारे लोक व्यत्यय केल्याशिवाय रहाणार नाहींत. चळवळ करणाऱ्यांस तुरुंगांत घालण्याची मसलत जर या लोकनियुक्त दिवाणांनीं केली नाहीं तर ते लोक सरकारी काम बरोबर करीत नाहींत असें होणार; व त्या दृष्टीनें जबाबदार जागेवर इंडियन लोक नालायक आहेत, त्यांनां जबाबदारीचीं कामें दिलीं तर शासनसंस्थेच्या शत्रूंस ते मिलाफ होतात असें होईल. या विचारसरणींत सत्य नाहीं असें कोण म्हणेल? तथापि संपूर्ण सत्य एवढ्यांत सर्व आलें असेंहि म्हणतां येणार नाहीं.

उलटपक्षीं लोकांत चळवळ करणारा वर्ग कायदेकौन्सिलांपासून अलिप्त रहावा असें म्हटलें तर तेंहि घातुकच आहे लोकांत स्वराज्यासाठीं चळवळ कां करावयाची तर सरकार कायदेमंडळाचें व लोकप्रतिनिधींचें ऐकत नाहीं म्हणूनच होय. जर लोकप्रतिनिधींनां लोकप्रतिनिधी म्हणून कबूल करावयाचें नाहीं, त्यांनां कांग्रेसमध्यें जमूं द्यावयाचें नाहीं तर तुम्हीं चळवळ करणारे टिकोजी कोण असा प्रश्न उत्पन्न होणारच. यासाठीं चळवळ करणारा वर्ग लोकप्रतिनिधींचा पाठिराखा झाला पाहिजे. सरकारला हें भासलें पाहिजे कीं, लोकप्रतिनिधींचें सरकार ऐकणार नाहीं तर सरकारविरुद्ध चळवळ करणारें यंत्र तयार आहे. तें सरकारची उजळणी सर्व देशभर करील. सरकारला अशी भीति वाटल्याखेरीज लोकप्रतिनिधींचें प्रतिनिधित्वहि फोल आहे.

या दोन परस्परविरोधी गोष्टी सांगितल्या. प्रश्न असा येतो कीं, कांग्रेसचा व कायदेमंडळाचा संबंध असावा तरी कसा? वरील परस्परविरोधास कांहीं तोड आहे कीं नाहीं?

महात्मा गांधींच्या चुका झाल्या त्यांपैकीं मुख्य मुख्य येणेंप्रमाणें होत. त्यांनीं राजकीय प्रश्नांत दुसरे अनेक प्रश्न मिसळले. स्वरा-

ज्याच्या चळवळीला आपल्या राजकारणेतर इतर कल्पना पुष्कळ जोडल्या. खादीची चळवळ स्वराज्याच्या चळवळींत मिसळण्याचें मुळींच कारण नव्हतें. शिवाय कोर्टांवर बहिष्कार घालून कोर्टांस शत्रु केलें, शाळांवर बहिष्कार घालून शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्यांस शत्रु केलें. कौन्सिलांवर बहिष्कार घालून कौन्सिलवाल्यांस शत्रु केलें. अशा तऱ्हेनें त्यांनीं शत्रुसंख्या वाढविली. अनियंत्रित नोकरशाही ही कौन्सिलांकडून नियंत्रित करावयाची आहे. तर नोकरशाहीच्या अनियंत्रित स्थितीस तेवढें निवडून शत्रु म्हणून लेखलें पाहिजे होतें. एवढेंच नव्हे तर त्यांनीं गिरण्यांवरहि हत्यार उपसलें. गांधींस यांत्रिक विकास नको असेल पण तेवढ्यानें तो राष्ट्रीय प्रश्न होत नाहीं. गांधींनां श्रीखंड किंवा चहा नको आहे म्हणून चहाविरुद्ध किंवा श्रीखंडाविरुद्ध चळवळ राष्ट्रीय कर्तव्य होत नाहीं. गांधींची शेवटची चूक म्हणजे स्वराज्यपक्षास लोटांगण घालणें होय. कांग्रेस, कायदे-मंडळाची पाठिराखी असावी विशिष्ट पक्षाची नसावी. हें महत्त्वाचें तत्त्व दुर्लक्षिलें गेलें आहे.

गेल्या पांच वर्षांत निरानिराळ्या पक्षांकडून झालेल्या खटपटींचा सारांश येणेंप्रमाणें देतां येईल.

( १ ) प्रा ग ति क प क्ष—हा अधिकारारूढ होता. यानें आपल्या शक्तीप्रमाणें कामागिरी पुष्कळ केली. कायदे बरे पास गेले व लेजि-स्लेटिव्ह असेम्ब्लीमध्यें आणि मध्यप्रांत व मद्रास या इलाख्यांत कामहि बरेंच चांगलें झालें. या पक्षाचें मुंबई इलाख्यांतील काम चांगलें झालें नाहीं. या पक्षाचे मंत्री वारंवार थप्पड व उपेक्षा सोसूनहि पुष्कळ प्रसंगीं अधिकाराची जागा धरून राहिले.

( २ ) स्व रा ज्य प क्ष—हा पक्ष राष्ट्रीय पक्षांतील एक भाग म्हणून कांग्रेसला चिकटून होता. गांधी तुरुंगाबाहेर होते तोंपर्यंत यास कार्य करण्यास क्षेत्र मिळालें नाहीं. गांधी तुरुंगांत गेल्यावर मात्र हा पुढें

आला आणि प्रागतिक पक्षाचा पराभव करून कौन्सिलमध्यें गेला. मुंबई इलाख्यांत हा पक्ष त्याच्या दुर्बलतेमुळें किंवा कौशल्याभावामुळें आपलें वजन कौन्सिलांमध्यें चांगल्या तऱ्हेनें पाडूं शकला नाहीं. तथापि अडथळा करणारा पक्ष या नात्यानें याचें काम मध्यप्रांत व बंगाल येथें चांगलें झालें. मात्र केवळ अडथळा करण्यानें राष्ट्रकार्य फारसें सरसावत नाहीं हेंहि त्यांतील मुख्य कार्यकर्त्यांस कळून आलें आणि १९२५ च्या कांग्रेसनंतर या पक्षाच्या मुख्य कार्यकर्त्यांनीं प्रतियोगी सहकारिता हें आपलें कार्यतत्त्व आहे असें सांगून स्वराज्यपक्षांतील सदस्यत्वाचा व कित्येकांनीं कौन्सिलांच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला.

( ३ ) ना फे र प क्ष—हा प्रागतिक पक्षांतील सुशिक्षित लोकांनीं द्विदल राज्यपद्धति चालवून पहाण्याचा प्रयत्न करूनहि त्यास अपयश आलें वगैरे गोष्टी पाहून कौन्सिलमध्यें राष्ट्रीय पक्षानें जाऊन तोच प्रकार करून घेऊं नये म्हणून धडपड करीत होता. तो पक्ष ज्यांचा कौन्सिलबहिष्कारावर विश्वास नाहीं त्यांनीं कांग्रेसमध्यें तरी निदान लुडबुड करूं नये अशी खटपट करीत होता. ती खटपट त्याची कांहीं काळ पार पडली आणि पुढें फुकट गेली. तथापि लोकांना गोळा करून सरकारी कृत्यांस सक्रिय असहकारिता पण ती देखील अनत्याचारीपणानें दाखविण्याची कामगिरी यान चांगली केली. मुळशी—प्रकरणांत या पक्षाचाच हात विशेष होता आणि नागपूरच्या राष्ट्रीय झेंड्याच्या प्रकरणांत या पक्षाचाच हात प्रामुख्यानें होता.

( ४ ) इ डि पें डं ट प क्ष—हा नवीनच आहे व याची कामगिरी अजून दिसावयाची आहे.

( ५ ) ब्रा ह्म णे त र प क्ष—हा स्वराज्यवर्धक वातावरणांत किंवा मोठमोठ्या प्रश्नांत शिरत नाहीं. प्राप्तीच्या जागा असतील त्या विशि

जातींस मिळविण्याची खटपट करीत आहे एवढेंच. यामुळें आज हा मुंबई इलाख्यांत केवळ सरकारचा तुकडेमागू पक्ष बनला आहे. तथापि मद्रासप्रांतांत यांतहि चांगलीं हुषार माणसं आहेत व त्यांनीं देशप्रगतींत महत्त्वाची मदत केली आहे. मुंबई इलाख्यांतहि या पक्षाच्या नेहमींच्या धोरणाला विरोध होतच आहे. कांहीं ब्राह्मणेतर स्वराज्य पार्टीचे व ब्राह्मणांस अनुकूल आहेत तर कांहीं ब्राह्मणेतर ब्राह्मणांविरुद्ध व सरकारविरुद्ध असे आहेत.

( ६ ) खि ला फ त प क्ष—हा पक्ष कौन्सिलबहिष्कारवादी व गांधींचा कट्टा अनुयायी म्हणवीत असल्यामुळें अधिकारारूढ झालाच नाहीं.

निरनिराळ्या पक्षांचें विवेचन राष्ट्रीय उपयुक्ततेच्या दृष्टीनें करावयाचें आहे. देशाच्या गरजा काय आहेत आणि त्यांपैकीं कोणता पक्ष कशा पुरवीत आहे याचा विचार केला म्हणजे निरनिराळ्या पक्षांची युक्तायुक्तता कळेल. राष्ट्राच्या निरनिराळ्या पक्षांकडून पार पाडण्यासारख्या मुख्य गरजा पुढीलप्रमाणें आहेत.

( १ ) लोकांच्या गरजा लक्षांत आणून त्या पार पाडणें हें काम तर कौन्सिलांत जाणाऱ्या लोकांनीं केलेंच पाहिजे. हें कार्य करण्यास अनेक पक्ष असले तरी चालतील.

( २ ) लोकांस आहेत ते अधिकार समजून द्यावयाचे; देशाच्या तर्फें कायदेमंडळास अधिकाधिक अधिकार किंवा पूर्ण स्वराज्य मागण्यासाठीं त्यांस जाणीव उत्पन्न करून द्यावयाची हीं दोन कामें विशेषतः लोकप्रतिनिधि म्हणून पुढें येऊं पहाणाऱ्या लोकांचींच आहेत. लोकांनीं विदेशी नोकरशाहीवर विश्वास ठेवूं नये पण कौन्सिलमध्यें शोभेसाठीं अगर नांवासाठीं जाणाऱ्या लोकांवर तरी विश्वास कां टाकावा हा लोकांपुढें प्रश्न आहे. लोकांना आपल्या हिताची थोडीबहुत जाणीव असते. आपलीं कामें कौन्सिलवाल्या लोकांमार्फत

होतील अशी त्यांची खात्री जसजशी होत जाईल तसतसा त्यांचा कायदेमंडळावर विश्वास वाढेल, तो वाढला तरच त्यास कायदेमंडळास अधिक बलवान् करण्याची मेहेनत करावी असें लोकांस वाटेल. अर्थात् तो विश्वास उत्पन्न होण्यासाठीं कायदेमंडळानें मिळालेल्या अधिकाराचा करतां येईल तितका उपयोग केला, पण त्यास अधिकार नसल्यामुळें त्या लोकांचा जास्त उपयोग होत नाहीं. एवढी तरी जाणीव देशांत उत्पन्न झाली पाहिजे. ही उत्पन्न करण्याचें काम प्रतिनिधींचेंच आहे हें सांगावयास नकोच.

(३) लोकप्रतिनिधींचें कार्य चांगलें होत आहे. पण त्यांच्या कार्यास, किंवा त्यांस जबाबदार असलेल्या दिवाणांच्या सदिच्छेस सरकारी अधिकाऱ्याकडून विनाकारण विरोध होतो आणि देशहिताचीं कृत्यें नोकरशाही धाब्यावर बसविते, यासाठीं राज्यघटनेंतच फरक केला पाहिजे हें लोकांस पटलें पाहिजे, आणि तो फरक करण्यासाठीं जनतेंतच सरकारास नियंत्रण करण्यास समर्थ घटना उत्पन्न करून सरकारी कृत्यांचा प्रतिकार करण्याचीहि धमक लोकांत उत्पन्न करून देण्याचें कार्यहि झालें पाहिजे. हें कार्य मुख्य कौन्सिलाबाहेरचें आहे.

(४) कौन्सिलामध्यें लोकानियुक्त सभासदांत एकी उत्पन्न करून त्यांत जोर उत्पन्न करणें, व नोकरसमुच्चयानें गव्हर्नरच्या पाठीमागें राहून कायदेमंडळाच्या व लोकांच्या इच्छा धाब्यावर बसविल्या तर त्यांस विरोध करणें हेंहि काम कोणीतरी केलेंच पाहिजे. हें कौन्सिलांतील प्रमुख पक्षाचें काम आहे.

वर सांगितलेल्या कामांपैकीं पहिलें काम आज केवळ भांडणांत गुंतलेल्या स्वराजिस्टांकडून होत नाहीं म्हणून इंडिपेंडंट वर्गाची आवश्यकता आहेच. लोकांमध्यें चेतना उत्पन्न करून त्यांस कार्यकारी बनविण्यासाठीं कट्टरांची आवश्यकता आहेच. कौन्सिलमध्यें

एकी उत्पन्न करण्यासाठीं एकजुटीनें तोंड देणाऱ्या स्वराज्यपक्षाचीहि आवश्यकता आहे. केवळ लोकांच्या गरजा पुढें मांडावयाच्या असल्या तर कौन्सिलें आहेत. लोकांस एकत्र करून त्यांत चेतना उत्पन्न करण्यासाठीं कांग्रेससारख्या स्वतंत्र संस्थेची आवश्यकता आहे. त्या संस्थेचें संपूर्ण पाठबळ स्वराज्यपक्षास देण्याची तडजोड गेल्या वर्षीं महात्मा गांधींनीं केली. हें जरीं गांधींनीं नाखुषीनें केलें असलें व इतरांनां गांधींनीं लोटांगण घातल्यासारखें जरी वाटत असलें तरी कायदेमंडळ व कांग्रेसमध्यें एकसूत्रता असण्याचें महत्त्व कमी होत नाहीं. एवढेंच कीं इतका जोर मिळूनहि स्वराज्यपक्षास कांहींहि करतां आलें नाहीं. तथापि तेवढ्यानें तत्त्व चुकलें असें म्हणतां येत नाहीं. कायदेमंडळानें मांडलेलें स्वत्वस्थापन आणि चळवळ करणाऱ्या आणि लोकांस प्रतिकारक्षम करण्याचें महत्त्व जाणणाऱ्या कट्टरांचे प्रयत्न यांमध्यें यामुळें एकसूत्रता उत्पन्न होणें शक्य आहे. ती एकसूत्रता कशी उत्पन्न होईल, व कट्टरांच्या चळवळीला आतां काय क्षेत्र आहे, आणि मागें सांगितलेल्या मिनिस्टरसारख्या पदाचें संपादन आणि सरकारविरुद्ध चळवळ यामध्यें येणारा विरोध दूर कसा करतां येईल, याविषयीं विचार आतां प्रगट करूं.

लोकांस कार्यक्षम करण्यास उत्सुक असा जो वर्ग असेल त्यानें संघभूत होणें आणि देशभवितव्य हातीं घेणें अवश्य आहे.

---

11 JAN 1994

# प्रकरण ४ थें.

## लोकसंमुख कार्यक्रम.

स्वयंनिर्णयीसंघ निर्माण करून कोणता कार्यक्रम हातीं घ्यावयाचा याची कल्पना आतां थोडक्यांत देतों. कार्य करणारा प्रथमतः कांहीं कामाची रूपरेषा आंखतो व त्यांत जरूरीप्रमाणें बदल करतो. त्याप्रमाणें पुढें दिलेल्या कार्यक्रमांत कमीजास्ती करावें लागलें तथापि विशिष्ट कार्यक्रमास आपली सहानुभूति द्यावी अगर देऊं नये याचा विचार करण्याची लोकांस संधि मिळावी म्हणून तो अंशरूपानें पुढें मांडीत आहें.

आपल्याकडे राजकीय चळवळ करणारा वर्ग आतां वाढूं लागला आहे. त्याच्या वाढीबरोबर चळवळींत विशिष्टीकरण होण्याचीहि आवश्यकता आहे. सर्वच चळवळी सर्वांनां करतां यावयाच्या नाहींत. राजकीय चळवळ करणारा वर्ग बऱ्याच अंशीं आणि आजतरी सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद किंवा कांग्रेस कमेटयांचे पगारी नोकर वगळले तर जवळ जवळ पूर्णांशानें पोटासाठीं अन्य धंदा करून फावल्या वेळांत शोकासाठीं म्हणा किंवा कांहींतरी धडपड करीत असावें म्हणून म्हणा कांहीं तरी कार्य करीत असतो. सध्यांच्या चळवळींत विशिष्टीकरण कांहींच झालें नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. कांहीं वर्ग मागसलेल्या लोकांनां पुढें आणण्यासाठीं विचार करीत आहे, तर कांहीं लोक स्वराज्यासाठीं लोकांत मागणी जास्त व्हावी म्हणून प्रयत्न करीत आहेत, तर कांहीं लोक आज आपणांस जे अधिकार आहेत ते कसे वापरावेत याचें शिक्षण घेत आहेत. कांहीं मंडळी इतरत्र गेलेल्या भारतीयांच्या स्थितीसंबंधीं

लोकमत जागृत करूं पहात आहेत. तथापि राजकीय चळवळींत पद्धतशीरपणा यावयास अजून अनेक प्रकारच्या चळवळींकडे लक्ष जावयास पाहिजे.

व्यापक कार्यक्रमाची एक मुख्य तयारी म्हटली म्हणजे कार्याचें विशिष्टीकरण व त्या विशिष्टीकरणाबरोबर त्या भिन्नमार्गी मंडळींची एकसूत्रता स्थापन करणें होय. आणि ती क्रिया होण्यासाठीं पहिली पायरी म्हणजे विशिष्ट मार्गांनीं जे काम करूं इच्छितात त्यांनीं आपल्यापेक्षां भिन्न मार्गांनीं जे काम करूं इच्छितात त्यांविषयीं आदर बाळगणें ही होय. सर्व काम करणारांस हें भासलें पाहिजे कीं, भिन्न मार्गानें काम करणारे लोक आपल्याविरुद्ध नसून सहकारी आहेत. राष्ट्र मोठें आहे. त्यापुढें काम फारच मोठें आणि विविध आहे. आणि खरोखर काम करणाऱ्या माणसांची कमतरता आहे. एका वर्गास समाजाची एखादी विशिष्ट गरज लक्षांत येऊन तो काम करूं लागेल तर दुसऱ्यास अगदीं निराळी गरज किंवा समाजव्यंग प्रेरणा उत्पन्न करील. हातीं घेतलेल्या कार्याला आवेश उत्पन्न होण्यासाठीं आपल्या अंगीकृत कार्याच्या महत्त्वाची जाणीव पाहिजे हें खरें. इतरांच्या कार्यापेक्षां आपण अंगीकारलेलें कार्य देशहिताच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें आहे अशी भावनाहि असली तर हितकरच आहे; पण आपण तेवढे कल्याणकर कार्यांत गुंतलों आहों व दुसरे अकल्याणकर कार्यांत गुंतले आहेत असा आग्रह धरून बसणें हा वेडा अहंकार होय. आध्यात्मिक चळवळींत ज्ञानमार्गी, कर्ममार्गी, उपासनामार्गी हे सर्व प्रकारचे लोक असतात, व त्यांपैकीं कित्येक आमचा मार्ग तेवढा खरा व इतरांचा खोटा असें म्हणणारे असतात, तर कित्येक आम्ही विशिष्ट मार्ग आवडीमुळें किंवा सोईमुळें पत्करितों पण दुसरे मार्गहि साधक आहेत असें म्हणणारे

असतात. पहिल्या प्रकारच्या लोकांस गोरा कुंभार कच्च्या मडक्यांत काढतो व दुसऱ्यास पक्क्या मडक्यांत घालतो. हें गोरा कुंभाराचें वर्गीकरण राजकारणांतहि लागू आहे व राजकारणांत पडूं इच्छिणारांस हेंच तत्त्व लक्षांत ठेवलें पाहिजे.

आपणांस "पद्धतशीर राजकीय चळवळ" या विषयाचें विवेचन करतांना कौन्सिलांत शिरून काय करावें आणि कौन्सिलाबाहेर काय काम आहे असे विवेचनाचे दोन भाग करतां येतील. तसेच भाग करून प्रथम विवेचन करूं. स्वराज्यपक्ष आणि प्रागतिकपक्ष हे दोन्ही कौन्सिलांमार्फत देशसेवा करूं पहाणारे पक्ष आहेत, स्वराज्यपक्षाची मंडळी आम्हांस विधायक कांहीं कर्तव्य नाहीं, आमचें कार्य द्विदलपद्धतीचें विध्वंसक आहे, अशा प्रकारची भाषा जरी बोलत असले तरी पुष्कळ प्रसंगीं त्यांनीं विधायक कामगिरी करण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, संस्थानोंदणीच्या कायद्यांत दुरुस्ती होऊन राजकीय संस्था देखील नोंदल्या जाव्यात म्हणून रा. रा. नरसोपंत केळकरांनीं केलेला प्रयत्न घ्या. हा प्रयत्न फार चांगला होता, आणि ही सुधारणा जर रा. केळकर यांनीं पुढें मागें घडवून आणली तर अत्यंत उच्च प्रकारची आणि देशाच्या प्रगतीस वेग देणारी कामगिरी करण्याचें श्रेय त्यांस मिळेल. तसेंच रा. भोपटकरांनीं म्युनिसिपालिट्यांच्या कायद्यांत सुधारणा करण्याचा प्रयत्न चालविला आहे तो लक्षांत घ्या. हे दोन्ही प्रयत्न म्हणचे स्वराज्यपक्षाची मंडळी विधायक कामगिरी करण्याच्या विरुद्ध आहेत असें जे म्हणतील त्यांस खोटें पाडतील. आतां एवढें खरें कीं शासनसंस्थांचा देशविकासाकडे उपयोग करून विधायक कामगिरी करण्याकडे स्वराज्यवाद्यांनीं फारच थोडें लक्ष दिलें. आणि याचें कारण त्यांची विधायक कार्यक्रमाविषयीं तयारी नव्हती हें होय. ही तयारी जसजशी अधिक होईल तसतसा स्वराजिस्टहि लोकोपयोगी कार्यक्रम हातीं घेऊं

शकतील. त्याच्या जुन्या विध्वंसक भाषेला फार महत्त्व देण्याचें कारण नाहीं. कौन्सिलांत शिरून काम करावें या कार्यासाठीं प्रत्येक ठिकाणीं स्पर्धा करणारे लोक असतात. ते कोणत्या तरी नांवाखालीं एकत्रित होतात. स्पर्धा करणाऱ्यांचा कार्यक्रम भिन्न असतोच असें नाहीं. व्यक्ती मात्र भिन्न असतात आणि भिन्न व्यक्तीस आपण दुसऱ्यापासून भिन्न आहों असें सांगण्यास कार्यक्रम हवा असतो. तथापि तो नेहमींच सांगतां येत नाहीं आणि यामुळें ज्याप्रकारची अडचण उत्पन्न होते त्याप्रकारची अडचण आज स्वराज्यवाद्यांस आपला प्रागतिकांपासून निराळेपणा दाखविण्यास भासत असली पाहिजे. त्यांचें आणि प्रागतिकांचें कार्य वस्तुतः भिन्न नाहीं.

कौन्सिलाबाहेर काय करावें हा प्रश्न आज कालप्रयोजनामुळें प्रथम विचारास घेऊं.

ज्या वर्गास कौन्सिलांत शिरून काम करावयास सवड किंवा इच्छा नाहीं, तथापि राजकीय चळवळींत प्रामुख्यानें भाग घ्यावयाचा आहे अशा वर्गास कर्तव्यक्षेत्र काय आहे याविषयीं थोडेसे विचार येथें व्यक्त करतों.

ज्या वर्गास कौन्सिलांत शिरण्यासाठीं धडपड करावयाची नाहीं किंवा त्यासाठीं लागणारी खरी खोटी आत्मस्तुति आणि परनिंदा करावयाची इच्छा नाहीं तो वर्ग फार महत्त्वाचा होय. या वर्गानें आपल्या पवित्रतेच्या अहंकारानें कौन्सिलांत प्रवेश करणाऱ्यांचा तिरस्कार मात्र करतां कामा नये. कां कीं, कौन्सिलप्रवेश करणारीं माणसें आंत जाऊन मान्यता पावत असलीं तरी तीं त्या मान्यतेसाठींच जातात असें नव्हे तर कांहीं तरी कर्तव्यबुद्धि असलेलीं माणसें यांत असतातच. आणि त्यांस लोककल्याण साधण्यासाठीं कर्तव्यक्षेत्र कायदेमंडळ करावयाचें असतें म्हणून तीं कौन्सिलांत शिरत असतात, आणि कौन्सिलांत शिरण्यासाठीं एकमेकांचीं उणीं काढण्याची क्रिया

निरुपाय म्हणून किंवा स्पर्धेतील क्रमप्राप्त भाग म्हणून करीत असतात. येथें यांचें काम, ज्या जनतेचे प्रतिनिधि म्हणून ते म्हणवितात त्या जनतेचें हित संभाळणें, अधिकारी वर्गाचा कारभार प्रतिनिधींमार्फत दृष्ट होणाऱ्या जनतेच्या हितासाठीं चालला आहे किंवा नाहीं हें पहाणें हें आहे. कौन्सिलांवर बहिष्कार घाला हें तत्त्व ज्यावेळेस पुकारलें गेलें त्यावेळेस जनतेनें जो जोर दिला तो एवढ्यासाठींच. कीं, कायदेमंडळास व त्यांच्या प्रतिनिधींस इतके तुटपुंजे अधिकार असतां लोकांचें कार्य फारसें होणार नाहीं. या गोष्टीची लोकांची जाणीव सरकारला भासवावी. ती भासवली गेली. त्या थोड्या अधिकाराबद्दल राग व्यक्त केला गेला, आणि लोक तेवढ्या तुकड्यावर संतुष्ट राहातील असें समजण्याचें कांहीं कारण उरलें नाहीं.

आतां कौन्सिलाबाहेर काम करूं इच्छिणाऱ्या वर्गास लोकांस अधिक कार्यक्षम करावयाचें या कार्यक्रमांत, काय करतां येईल तें पाहूं.

महात्मा गांधींचें अवतारकृत्य १९२४च्या कांग्रेस-आठवड्यांत संपलें, आणि त्यांच्या अवतारकृत्याच्या समाप्तीच्या प्रसंगीं सन्मान म्हणून राष्ट्रीय सभेचें आधिपत्य त्यांस दिलें ही गोष्टहि योग्य झाली. जो वर्ग कौन्सिलसंमुख नाहीं, जो जनताघटनाप्रिय आणि जनतेस कार्यक्षम करूं इच्छिणारा आहे, त्या वर्गास तुम्हीं सूत काढीत बसा नाहींतर अत्याचारीपणा कराल असें सांगण्याखेरीज महात्मा गांधींपाशीं कांहीं दुसरा कार्यक्रम नाहीं ही गोष्ट महात्माजींनीं मोकळ्या मनानें उघड केली आहे. म. गांधींनीं आपल्या शिक्षणसंपत्तीच्या आणि विचारसंपत्तीच्या साहाय्यानें चालू राजकारणास जें देण्यासारखें होतें तें शक्त्यनुसार दिलें आहे. त्यांनीं अधिक दिलें नाहीं म्हणून त्यांस दोष देण्याचेंहि कारण नाहीं. कार्यक्रम दिला नाहीं म्हणून जनतेनें गांधींनां दोष देणें आणि आपली कर्तव्यशक्ति एका व्यक्तीच्या बुद्धी-

वर अवलंबून ठेवणें ही गोष्ट स्वयंशासनास आम्हीं पात्र आहों म्हणून जे बाणा बाळगतात त्यांच्या अभिमानास साजेल अशी नाहीं. सर्व बल एकवटावें आणि कार्याची जोपासना व्हावी म्हणून एका व्यक्तीच्या तंत्रानें वागणें निराळें, आणि पुढारी दुर्बल झाला किंवा मेला म्हणून हातपाय गाळणें हें निराळें. महात्मा गांधींच्या शस्त्रसंन्यासामुळें काउन्सिलांबाहेरच मुख्य काम आहे. तें ओळखणाऱ्यांनीं गांगरून न जातां आपला कार्यक्रम आंखून आपलीं कार्यतत्त्वें आचरणांत आणलीं पाहिजेत. पुढाऱ्यानें रणत्याग केला तरी फौजेनें कचरतां कामा नये. वेळेवर आपला जोर एकत्र करून पुढाऱ्याला जोर दिला पाहिजे. नाहींतर प्रसंगीं नवीन पुढारी उत्पन्न करून आपलीं कार्यध्येयें आचरलीं पाहिजेत. जे लोक पुढाऱ्याच्या शस्त्रसंन्यासामुळें हतबुद्ध होतात ते लोक स्वयंशासित संस्था चालवावयास लायख कसे म्हणावयाचे ? आतांपर्यंत त्यांनीं महात्मा गांधींस सोडलें नाहीं हेंहि चांगलें केलें. कां कीं पुढाऱ्यास नेट देण्यांत अनुयायी जितका चिकटपणा दाखवितील तितका चांगलाच आहे.

ज्या लोकांस, लोक एकत्र करवून त्यांस प्रतिकारक्षम बनवावयाचें कार्य करावयाचें आहे त्यांस वळू धरून चरके फिरविण्याशिवाय कांहींएक कार्यक्रम नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. खरोखर महत्त्वाचा आणि स्वराज्यसाधनपर कार्यक्रम त्यांच्याच पुढें आहे आणि त्यांच्या परिश्रमाचें फल मात्र स्वराज्यवाद्यांस व प्रागतिकांस मिळावयाचें आहे. त्यांनीं अर्थात् जें कार्य करावयाचें तें कर्मयोगाच्या भावनेनेंच केलें पाहिजे. कां कीं टक्केटोणपे त्यांनां खावे लागणार, मेहेनत त्यांनांच करावी लागणार. चरखा फिरविण्यापेक्षां ही मेहनत खास निराळी आहे. आम्ही महात्मा गांधींस उलट असें म्हणतों कीं, कट्टरांची तेजस्विता चरख्यांत अडवून मारून टाकावयाची हा उपदेश अयोग्य झाला.

भोर

आतां पुढें जी चळवळ करावयाची ती करतांना महात्मा गांधीं-च्या पूर्वींच्या चळवळीचे गुणदोष पाहून पुढील पाऊल टाकलें पाहिजे. त्यांच्या चळवळींत कांहीं महत्त्वाचीं सुंदर तत्त्वें होतीं तर कांहीं चुकीचा कार्यक्रम होता. महात्मा गांधींनीं हें ओळखलें कीं आपणांस जो कार्यक्रम पाहिजे तो असा असावा कीं दुर्बल मनुष्यासहि त्या कार्यक्रमाशीं सहकारिता करतां येईल. यासाठीं त्यांनीं असहकारिता अथवा नॉनकोऑपरेशनचें सर्वजनव्यापी तत्त्व पुढें आणलें. महात्मा गांधींनीं दुसरी एक महत्त्वाची गोष्ट केली ती ही कीं, आपणांस चळवळ करावयाची ती ब्रिटिश जातीविरुद्ध नसून अनियंत्रित राज्य-पद्धतीविरुद्ध करावयाची आहे या मवाळांच्या व लो० टिळकांच्या जुन्या तत्त्वाचा महात्माजींनीं निर्मल चित्तानें व जोरानें पुरस्कार केला.

चळवळ करण्यासंबंधानें आणखी एक तत्त्व महात्मा गांधींनीं ओळखलें कीं स्वराज्य प्राप्त करून घेणें ही आध्यात्मिक चळवळ आहे. म्हणजे मनुष्याच्या मनाचा विकास असा झाला पाहिजे कीं, देशांतील लोकांचीं अंतःकरणें स्वराज्यास लायक अशीं बनलीं पाहि-जेत. त्यांच्या मनांत असलेलें कार्पण्य नष्ट झालें पाहिजे. स्वराज्याला लायख अशीं अंतःकरणें बनविणें हेंच अधिक महत्त्वाचें आहे हें त्यांनीं ओळखलें. स्वराज्य इंग्रजांना द्यावयाचें व आपण दान म्हणून तें घ्यावयाचे असा प्रकार मुळींच नसून व्यक्तीचें अंतःकरण, स्वातंत्र्य व समता यांनीं, आत्मविश्वासानें आणि एकमेकांवरील विश्वासानें प्रेरित होणें, आपले व इतरांचे हक्क ओळखणें, आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठीं जागृत असणें यांचाच स्वराज्य हा स्वाभाविक परिणाम आहे. मुसुलमानांच्या हितसंबंधाकारितां हिंदूनें बद्धपरिकर व्हावें इतकें समाजांतील निरनिराळ्या वर्गांत प्रेम उत्पन्न झालें पाहिजे. म्हणजे आत्मविश्वास, स्वत्वस्थापन व बंधुप्रेम यांची जोपासना करून आध्यात्मिक उन्नतीप्रत पोंचणें हें आपलें प्रधान आचारतत्व आहे.

आणि या सद्गुणांचा विकास करतां करतां स्वराज्यप्राप्ति ही स्वाभाविकपणें घडवून आणावयाची आहे.

म. गांधींचें याहूनहि मोठें तत्त्व म्हटलें म्हणजे या सर्व सुधारणा अनत्याचारीपणानें आणि असहकारितेचें शासन वापरून घडवून आणावयाच्या आहेत. हें तत्त्व खरोखर अत्यंत सुंदर तत्त्व होय. या तत्त्वाच्या योगानें जगाच्या भावी राजनीतीमध्यें मोठी क्रांति घडून येणार आहे. आणि ज्यामुळें सर्व जगांतील राजनीतिवेत्त्यांचें हिंदुस्थानाकडे आणि महात्माजींच्या कार्यक्रमाकडे लक्ष लावलें तें हेंच तत्त्व होय. हें तत्त्व पद्धतशीरपणें अमलांत आणणें ही गोष्ट कशी करतां येईल या गोष्टीकडे सर्व जगाचे डोळे लागले होते. पण हें सुंदर विचारतत्त्व मांडणीच्या पलीकडे गेलें नाहीं, म्हणून सर्व जगाची निराशाहि होण्याचा संभव आहे आणि यासाठीं म. गांधींच्या अनुयायांतील व्यवहारवेत्त्यांनीं अनत्याचारी असहकारितेची राष्ट्रीय योजना करण्याकडे लक्ष्य दिलें पाहिजे. महात्मा गांधींनां त्या तत्त्वाची मांडणी बरोबर करतां आली नाहीं. ती करतां येती तर तुम्ही चरखा फिरवीत रहा नाहींतर अत्याचारी व्हाल अशा तऱ्हेचा उपदेश करून ते मोकळे झाले नसते. म्हणून त्यांची कार्यदिशा त्यागावी किंवा त्यांचे निराशेचे उद्गार हें ब्रह्मवाक्य घेऊन चालावें, हेंहि सुशिक्षित समाजास योग्य नाहीं. एखादा शोधक आपल्या शोधाची मांडणी विशिष्ट मर्यादेपर्यंत करतो. पण त्या शोधाचा अंतिम विकास इतरांकडून व्हावयाचा असतो त्याप्रमाणेंच राजकारणांतहि आहे. विमानशास्त्राचा उत्पादक राइट हा विमानानें पन्नास यार्डांपेक्षां उंच जाणें शक्य किंवा योग्य नाहीं असें म्हणत असे; पण हजारों यार्ड म्हणजे कित्येक मैल विमानें त्याच्या अनुयायांनींच नेलीं नाहींत काय ? महात्मा गांधींनां अनत्याचारी असहकारितेची व्याप्ति राष्ट्रभर करण्याची कला प्राप्त झाली नाहीं म्हणून यापुढें इतरांस प्राप्त होणार

नाहीं हें म्हणणेंहि अप्रयोजक होईल व यासाठीं गांधीजींनीं एकदां उपदेशिलेल्या व नंतर टाकून दिलेल्या उपायाचा शांतपणानें व शास्त्रीय दृष्टीनें विचार केल्याशिवाय त्याग करणें हें तर अत्यंत दोषार्ह होईल. महात्मा गांधींनीं ओळखलें तें हें कीं, शासन, उत्पादन यांसारख्या क्रिया अन्योन्याश्रयी आहेत. ज्या घटकांनीं विशिष्ट क्रिया होते, त्यांपैकीं एकानें म्हणजे समाजाच्या एका अवयवानें असहकारिता केली म्हणजे सर्वच कार्य स्तब्ध होतें आणि उगाच मारामारी करून रक्तपात करण्यापेक्षां विशिष्ट राष्ट्रांतील एका अवयवानें कर्मत्याग केला तर सर्व राष्ट्र व त्यावरील सरकार हें वठणीस आणतां येतें. महात्माजींचें तत्त्व स्पष्ट करण्यासाठीं त्या तत्त्वाच्या उपयोगाचें एक सोपेसें सामाजिक उदाहरण घेऊं. उच्च जाती आपला विटाळ मानतात म्हणून अस्पृश्य जातींनीं वरच्या जातींचीं डोकीं फोडण्यापेक्षां असहकारितेचें तत्त्व वापरलें तर यशस्वी होणार नाहीं काय? समजा पुणें शहरांतील भंग्यांनीं संप केला आणि अस्पृश्य वर्गास कांहीं हक्क मागितले तर ते देणें लोकांस भाग पडेल कीं नाहीं एवढेंच नव्हे तर म्युनिसिपालिटीच्या सभासदांनीं आम्हीं आणून दिलेलें पाणी प्यायलें पाहिजे नाहीं तर आम्ही कामाला येत नाहीं असें सांगितलें तर अत्यंत महत्त्वाची सामाजिक सुधारणा त्यांनां अनत्याचारीपणानें करतां येणार नाहीं काय? अनत्याचारी असहकारितेच्या या महात्माजींच्या तत्त्वाचा विजय सर्व जगभर अधिक अधिक होत जाणार आहे. मग तो महात्माजींकडून होवो किंवा दुसऱ्या कोणाकडून तरी होवो.

महात्माजींच्या कार्यपद्धतींतील मुख्य दोष म्हटला म्हणजे त्यांनीं आपला कार्यक्रम अनेक आगंतुक गोष्टींनीं बद्ध करून अवजड व अव्यवहार्य केला. शिक्षणसंस्थांचा त्याग, कौन्सिलचा त्याग व कोर्टांनां बहिष्कार या गोष्टींनीं त्यांनीं शत्रू वाढविले. त्यांचें मुख्य कार्य जें

नोकरशाहीला आळा घालणें, तें बाजूला राहून खासगी विद्यालयें चालविणें इत्यादि अनेक खर्चाच्या गोष्टी आपल्या कार्यक्रमांत त्यांनीं घेतल्या. कोर्टाला शत्रू करणें, कायदे कौन्सिलांत जाऊन काम करणाऱ्यांस शत्रू करणें इत्यादि अनवश्यक गोष्टी त्यानीं केल्या. शत्रू निराळा काढणें आणि सर्व शक्ति एकवटून त्याला तंबी देणें त्या क्रिया न करतां त्यांनीं शत्र वाढविले आणि आपलें बळ मात्र अनेक व्यर्थ कार्यांत विभागिलें. उदाहरणार्थ चरखा घ्या. चरख्याची चळवळ पूर्णपणें अनवश्यक होती. सर्व जगांतील अनेक व्यवसाय करणारे लोक मूर्ख आहेत, आणि मी जादूगारानें जें हत्यार काढलें आहे त्याचा उपयोग करीत रहा अशा तऱ्हेनें सांगणें आणि चरख्याचा व स्वराज्याचा संबंध कधींच स्पष्टपणें व्यक्त न करतां केवळ अधिकारयुक्त वाणीनें त्याचा अवलंब करा म्हणजे तुम्हांस स्वर्ग दिसेल असें म्हणणें हें औद्धत्य होय आणि हे सुशिक्षितांच्या बुद्धीस केलेले पादत्राणाचे प्रहार होत.

जो पुढारी आपल्या कृत्याचा कार्यकारणसंबंध लोकांस पटवून देत नाहीं तो सर्व लोकांस मूर्ख समजत असला पाहिजे. व आपण जें सांगू तें लोकांनीं निमूटपणें ऐकलें पाहिजे इतक्या अहंकाराचा असला पाहिजे. शिवाय जर नोकरशाहीविरुद्ध चळवळ करावयाची आहे तर गिरणीवाले आणि आयातनिर्यात करणारे व्यापारी यांच्या कार्यांत निरर्थक व्यत्यय कां ? आणि त्यांचा तरी विरोध आणखी कां संपादा ? एकनिष्ठपणानें काम करण्यास ब्यूरॉक्रसीस लगाम लावण्याची चळवळ पुरी नाहीं काय ? कायदेभंगाच्या चळवळीपर्यंत म्हणजे कर भरूं न देण्याच्या चळवळीपर्यंत राष्ट्रास नेण्यास जो परिश्रम लागतो तितकः करून त्यापेक्षां अधिक परिश्रम करण्याची ताकद महात्माजींनीं कधीं दाखविली आहे काय ? मध्यें तर त्यांनीं चहाविरुद्ध चळवळ सुरू केली तो "अव्यापारेषु व्यापार" नव्हता

काय ? आमच्यामतें या सर्व गोष्टींत महात्मा गांधींनीं पैशाचा व त्याहूनहि अधिक किंमत असलेल्या तरुणांच्या उत्साहाचा अपव्यय केला आणि त्यांचें या दृष्टीनें झालेलें अकार्य त्यांच्या कार्याच्या श्रेयाचा बराचसा भाग कमी करतें.

महात्माजींचें एक तत्त्व पूर्णपणें लक्षांत येण्याजोगें आहे व तें हें कीं, कायदेभंग किंवा कर न देण्याची चळवळ; ही एकसारखी डोळ्यांसमोर ठेविल्याशिवाय लोकांच्या हातून हें कार्य व्हावयाचें नाहीं किंवा सरकारसहि त्याचा वचक वाटावयाचा नाहीं. ही चळवळ वस्तुतः त्यांनीं हातीं घेण्याचा विचारच केला होता. पण चौरीचौऱ्याच्या प्रकरणानंतर त्यांनीं हातपाय गाळले आणि त्यानंतरचें त्यांचें वर्तन एखाद्या मुत्सद्द्यास शोभण्यासारखें होतां केवळ भावनाप्रधान मनुष्यासारखें झालें. त्या वेळेस देश कायदेभंगाच्या चळवळीस किंवा कर न देण्याच्या चळवळीस तयार नव्हता हें जें त्यांस वाटलें तें सत्यच होतें. व तेव्हांपासून त्यांनीं निराळ्या दिशेनें कार्य करावयास सुरवात केली पाहिजे होती, ती त्यांनीं केली नाहीं. कारण त्यावेळेस त्यांस कदाचित मार्गहि सुचला नसेल. आतां आपण चौरीचौऱ्यापूर्वीच्या परिस्थितींत जाऊं आणि कर न देण्याच्या चळवळीचें ध्येय ठेवून अगोदर काय क्रिया केल्या पाहिजेत त्यांचा विचार करूं. कां कीं ही चळवळ यशस्वी करणें ही गोष्ट अत्यंत कठिण असल्यामुळें राष्ट्राभिमानी मनुष्यांचे मेंदू व कर्तबगार लोकांची कर्तव्यशक्ति त्या संग्रामाच्या यशस्वी परिणतीप्रीत्यर्थ खर्च झाली पाहिजे. याविषयीं अनेक लोक विचार करीतच असतील. मीहि यासंबंधीं आपले विचार पुढें मांडतों. हे विचार मांडतांनां "मांजराच्या गळ्यांत कोणी तरी घांट बांधावी" अशा भावनेनें न मांडतां स्वतःसच तो कार्यक्रम अंगिकारावा लागेल अशाच भावनेनें मांडतों.

स्वराज्य दिलें गेलें नाहीं तर चालू शासनसंस्थेशीं संग्राम करावा

लागणार आणि तो बऱ्याचशा यशस्वीतेनें करतां यावा म्हणून पुढचीं चार वर्षें देण्यांत यावीं. येत्या चार वर्षांत जें काम करावयाचें तें हें कीं, स्वराज्य हिसकण्याची तयारी पद्धतशीर करावी, आणि तीप्रीत्यर्थ अवश्य ती चळवळ करावी. स्वराज्य दिलें नाहीं तर कायदे-भंगाची अगर कर न देण्याची चळवळ करण्यास अनुकूल परिस्थिति उत्पन्न व्हावी. १९२९ सालीं पार्लमेंट किंवा ब्रिटिश मंत्रिमंडळ आपली तयारी पाहून स्वराज्याचा नवीन हप्ता किंवा डोमिनिअन स्टेटसहि देण्याविषयीं विचार करणार आहे. तर तोंपर्यंतचा काल तयारींत घालवावा आणि स्वराज्य न देणें हें व्यवहारदृष्टया अयोग्य होईल अशी परिस्थिति उत्पन्न करावी. १९२९ पर्यंतच्या काळांत जें करावयास सांगावयाचें तें अशक्य किंवा अव्यवहार्य कोटींतील असूं नये. अव्यवहार्य अभिवचनें मागणें म्हणजे लोकांस बेजबाबदार अभिवचनें देण्यास शिकवण्यासारखें आहे. आमच्या मतें आज लोकांच्याकडून अभिवचन एकच घ्यावें आणि तें आम्ही कर देणार नाहीं असें नव्हे; तर हें कीं, १९२९ सालीं सरकारनें संपूर्ण स्वराज्याचे हक्क दिले नाहींत आणि त्यामुळें जर लोकांनीं कर न देण्याची मोहीम सुरू केली आणि त्यामुळें सरकारनें सत्याग्रहींची मालमत्ता विकावयास काढली तर आपण ती मालमत्ता विकत घेणार नाहीं, किंवा ती विकत घेणाऱ्यास कोणत्याहि प्रकारें मदत करणार नाहीं, किंवा सहानुभूति दाखविणार नाहीं एवढ्यापुरतेंच निश्चित अभिवचन घ्यावें. प्रत्यक्ष कर न देण्याची चळवळ १९२९ पर्यंत मुळींच करावयाची नाहीं या तऱ्हेची राष्ट्रभर चळवळ केल्यानें आणि राष्ट्रभर अभिवचनें घेतल्यानें सत्याग्रहींच्या मार्गांतील एक मोठी अड-चण दूर होईल. कर न भरण्यासारखी क्रिया लोकांच्याकडून होण्यास मुख्य अडचण आहे ती हीच कीं जो कर देणार नाहीं त्याची मालमत्ता जप्त होईल. मालमत्ता जप्त झाली तर आपलाच शेजारी ती मालमत्ता

कमी किंमतीस विकत घेईल; आणि आपण नुकसान पावूं, आणि आपल्या शेजारच्या स्वार्थी इसमाची धन करूं, या भीतीमुळें लोक त्या प्रकारची चळवळ करणार नाहींत. आणि त्यासाठीं हें भीतीचें कारणच नष्ट केलें पाहिजे.

येतीं चार वर्षें सर्व देशभर प्रचारक पाठवून आम्हीं सत्याग्रहींची मालमत्ता विकत घेणार नाहीं एवढीं अभिवचनें घेण्यांतच खर्चीं पडतील. कर न देण्याच्या चळवळीस हीं पूर्वीचीं चार वर्षें तयारीसाठीं खरोखरीच पाहिजेत. कां कीं देश फार मोठा आहे. जोरानें काम केलें तरच चार वर्षें तयारी करावयास पुरतील. एखाद्या मनुष्यास मी कर देणार नाहीं, असलें अभिवचन देणें जड जाईल; तथापि सत्याग्रहींची इस्टेट विकत घेणार नाहीं किंवा घरभेद्यास सहानुभूति दाखविणार नाहीं असलें अभिवचन देणें व तें पार पाडणें शक्य आहे. या तऱ्हेची चळवळ प्रचारकांमार्फत प्रत्येक खेड्यांत जाऊन केली तर अशी परिस्थिति उत्पन्न होईल कीं, त्यामुळें कर न देण्याचें धाडसहि करणें लोकांस शक्य होईल. आमचें असें मत आहे कीं, सत्याग्रहींची इस्टेट विकत न घेण्याचें अभिवचन सर्व राष्ट्रभर घेतलें तर त्याचें प्रच्छन्न बळ सरकारासहि जाणवेल, आणि सरकार प्रत्यक्ष संग्रामाचा प्रसंग टाळील. मात्र हें बल सरकारास जाणविण्यासाठीं या मोहिमेची घटना, पद्धतशीर, एका हुकमानें चालणारी अशी असली पाहिजे. व ती तशी करण्यास पगारी एका हुकमाखालीं वागणारी प्रचारकांची फौज तयार केली पाहिजे. आणि या काम करणाऱ्या लोकांस तुम्हीं अर्धपोटी काम करा, व तुमच्या गरजा अत्यंत कमी असूं द्या, असल्या तऱ्हेचा उपदेश करण्याची वृत्ति नसावी. या मंडळींना पगार चांगले दिले पाहिजेत, आणि ते पगार देण्यासाठीं लागणारा खर्च राष्ट्रानें दिला पाहिजे. सर्व लोकांस १९२९ सालांत बद्धपरिकर करण्यास समारें

५००० पर्यंत पगारी माणसें लागतील. हींच माणसें त्याला लागणारा फंडहि जमवितील. हें कार्य यशस्वी होण्यासाठीं व माणसांस एका शिस्तीनें वागण्यास शिकविण्यास लायख असे नेतेहि लागतील ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं.

इकडे लोकांनां कार्यक्षम करावयाचें आहे तर सरकारला कमी कार्यक्षम करावयाचें आहे. सरकारच्या हातून त्वरित कार्य होऊं नये ही गोष्ट चळवळीच्या पथ्यावरच आहे आणि अडवणुकीच्या मार्गावर विश्वास असलेले स्वराजिस्ट सरकारचा पाय असल्या प्रसंगीं लंगडा करण्यास थोडेबहुत उपयोगी पडतील. अडवणुकीच्या मार्गाचा आज उपयोग आहे किंवा नाहीं याविषयींचें हें मत नसून १९३० सालीं लोकांमध्यें कर न देण्याची चळवळ चालू असतां केवळ त्रासदायक काम करणारें कायदेमंडळ उपयोगी पडेल आणि आज तें ज्या अडवणुकीच्या पद्धती तयार करीत आहेत त्यापेक्षां अधिक शिस्तवार अडवणुकीच्या पद्धती ते शिकून १९३० पर्यंत तयार होतील असा अजमास आहे.

सरकारची नोकरशाही ही अभेद्य आहे असें म्हणण्याचें मुळींच कारण नाहीं. नोकरशाहींतील पुष्कळशीं माणसें स्वराज्याच्या ध्येयास अनुकूल आहेत. आणि त्यांच्यामध्यें कांहीं निराळी चळवळ उत्पन्न करून आपणांस स्वराज्य मिळावें, या चळवळीस त्यांनां साहाय्यकहि बनतां येईल. केवळ नीतितत्त्वांवर कांहीं माणसें वळवून घेतां येतील. तर कित्येक व्यवहाराच्या तत्त्वावर आपलींशीं करून घेतां येतील. सरकार ज्या पोलीसच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे तें पोलीस खातें देखील आपणांस वळवून घेतां येईल. उदाहरणार्थ अहमदाबाद कॉंग्रेस संपतांच गुंटूर जिल्ह्यानें कर न देण्याची मोहीम सुरू करण्याचा विचार केला तेव्हां सरकारनें त्यांनां अशी धमकी दिली कीं, आम्हीं तुमच्या जमिनी घेऊं व त्या

17 MAR 1960

अस्पृश्य वर्गास देऊं. अशा तऱ्हेचीं उदाहरणें गोळा करून पोलीसखात्यांतील लोकांस सरळपणें विचारावें कीं, जातिविरुद्ध जाती उठवून देणें, समाजांतील कनिष्ठ वर्गास उच्च वर्गाच्या उरावर बसविणें असल्या तऱ्हेच्या बदमाषींच्या योजना सरकारनें केल्या तर त्या योजनांचे तुम्हीं हस्तक व्हाल काय? आणि सरकारनें वाटेल तसली गोष्ट तुम्हांस करावयास सांगितली व ती कायदेमंडळाच्या संमतीशिवाय सांगितली तर हूं कां चूं न करतां पार पाडणें हें तुम्हीं आपलें कर्तव्य समजतां काय? या सर्व गोष्टींचा तुम्हीं आपापल्या परिषदांत विचार करावा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या इच्छेस महत्त्व किती द्यावयाच व नीतिनियमांस किती द्यावयाचें याचाहि तुम्ही विचार करावा. अशा तऱ्हेची चळवळ पोलीसवर्गांत सुरू केली तर ती बेकायदेशीर व्हावयाची नाहीं किंवा फुकटहि जावयाची नाहीं.

मोहीम सुरू झाल्यानंतर त्या मोहिमेनें रेल्वेसारख्या सार्वजनिक संस्थांतील कामगारांनां देखील आपल्या बाजूचें करणें अवश्य आहे. आणि यासाठीं कामगारांच्या संस्थांनां प्रथम असा प्रश्न करावा कीं तुम्हीं स्वराज्याच्या ध्येयास अनुकूल आहां कीं प्रतिकूल आहां? व ते जर अनुकूल असले तर त्यांनां पुन्हा असा प्रश्न करावा कीं, या मोहिमेच्या कार्यकर्त्यांशीं तुम्हीं सहकारिता करण्यास तयार आहां कीं नाहीं? उदाहरणार्थ, या मोहिमेच्या कार्यकर्त्यांस जर सरकारनें तुरुंगांत टाकलें तर तुम्हीं हरताळ वगैरे पाडून रेल्वे सरकारला अनुपयुक्त करूं शकाल कीं नाहीं? असा विचार त्यांस खुल्या कान्फरेन्समध्यें करण्यास सांगावा; आणि त्यांनीं जरी या मोहिमेस अनुकूल असें उत्तर दिलें नाहीं तरी या गोष्टीचा त्यांच्यांत विचार झाल्यानें आणि राजकारणाच्या कार्यक्रमांत त्यांनां विश्वासांत घेतल्यामुळें बरेंच महत्त्वाचें कार्य होईल, व असेंहि होणें शक्य आहे कीं, योग्य वातावरण उत्पन्न झालें असतां कर्तृत्व अभिवचनापेक्षां

कधीं कधीं अधिक होतें या न्यायानें जेव्हां या मोहिमेचा नोकरशाहीशीं संग्राम सुरू होईल तेव्हां रेल्वेकामगार मोहिमेच्या पक्षास येऊन मिळतील हें अशक्य नाहीं.

या चळवळीमध्यें अँग्लोइंडियन व यूरोपियन यांस वगळून उपयोगी नाहीं. पैसे व माणसें यांनीं मोहिमेस साहाय्य करण्यास यूरोपियन लोकांसहि बोलवावें. कां कीं, स्वराज्याच्या चळवळीनें म्हणजे स्वराज्यानें देशांतील यूरोपियन लोकांचें नुकसान न होतां फायदाच होणार आहे. ज्या गोष्टी व्हाईटहॉल लंडन येथें ठरतात त्या दिल्लीच्या कारभाऱ्यांकडून व कायदेमंडळाकडून ठरणार; ही परिस्थिति निर्माण झाली तर मोठमोठालीं कंत्राटें जीं लंडनमध्यें दिलीं जातात तीं इकडे दिलीं जातील, आणि ज्याअर्थीं येथील यूरोपियन लोकांच्या व्यापारी कंपन्या चांगल्या कार्यक्षम आहेत त्याअर्थीं तीं कंत्राटें बरीचशीं त्यांनांच मिळतील. अँग्लोइंडियन लोकांनीं त्यांच्या कर्नल गिडने या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं जी चळवळ चालविली आहे ती स्वराज्यवाद्यांस अनुकूल अशी आहे, आणि यूरोपीय लोकांच्या असोसिएशननें स्वराज्यवाद्यांशीं अविरुद्धता वारंवार व्यक्त केली आहे. त्यांनां असें भासूं लागलें आहे कीं, हिंदुस्थानांतील ज्या पक्षामध्यें जातिविषयक भावना कमी आहे अशा मॉडरेट पक्षाच्या लोकांस आपण मिळावें, व त्यांनीं अशा प्रकारचे विचारहि अनेक वेळां स्पष्टपणें मांडले आहेत. त्यांनां हें भासणें व भासविणें शक्य आहे कीं जर त्यांनींच स्वराज्याच्या चळवळींत पुढाकार घेतला तर देशांत त्यांचें वजन वाढतच जाईल. व यूरोपीय लोक जर स्वराज्याच्या चळवळीस मिळाले तर चळवळीचा हा एक मोठा फायदा होईल कीं त्या चळवळीस जातिविद्वेषी चळवळीचें स्वरूप न येतां तिचें शुद्ध राजकीय चळवळीचें स्वरूप राहील.

आतां पूर्वोक्त विवेचनाचें थोडेसें सिंहावलोकन करूं. इ. स.

१९२९ च्या अगोदर लोकांनां तुम्ही कर भरूं नका वगैरे प्रकारचा उपदेश करण्यापासून अगदीं अलिप्त रहावयाचें, आणि सरकारच्या चालू कामाला कोणत्याहि प्रकारचा उपद्रव करावयाचा नाहीं. सरकारनें आपला व्यवसाय सुरळितपणें चालवावा, आणि चळवळीच्या चालकांनीं देशसंघटनेचें कार्य शिस्तवार करण्यांत तीन वर्षें खर्चावींत. लोकांनां सांगावयाचें कीं तुम्ही इतक्यांत सरकारविरुद्ध कांहीं एक करूं नका; फक्त १९३० सालीं डॉमिनिअन स्टेटस न मिळाल्यामुळें जो कार्यक्रम उत्पन्न होईल त्या कार्यक्रमास तयार व्हा. म्हणजे येतीं चार वर्षें उपयोगावयाचीं तीं पगारी प्रचारकांचा वर्ग उत्पन्न करणें, त्यांचा दौरा करविणें, क्वेटयापासून मणिपूरपर्यंत आणि हिंदुकूशपासून कन्याकुमारीपर्यंत १९३० सालीं अनत्याचारी युद्धप्रसंग उत्पन्न होणार, त्याचा इशारा देणें आणि सत्याग्रहाची मालमत्ता विकत घेणार नाहीं या तऱ्हेचीं अभिवचनें घेणें या कामीं खर्च करावींत.

याबरोबर सार्वजनिक नीतिमत्ता हीहि वाढविण्याचा उपदेश पाहिजे. लोकांनां असें सांगितलें पाहिजे कीं जीं अभिवचनें तुम्हांस पाळतां येतील, तींच द्या. आणि जीं पाळतां येणार नाहींत तीं देऊं नका. तुम्ही आपल्या कर्तव्यशक्तीचें आणि कर्तव्यबुद्धीचें खोटें प्रदर्शन करून पुढाऱ्यांनां फसवूं नका. महात्मा गांधींस बारडोली तालुक्यांत पुष्कळ लुच्या लोकांनीं फसविलें, आणि ज्या लोकांस दुसऱ्यांच्या जमिनी खरेदी करावयाच्या होत्या तेच लोक करबंदीस तालुका तयार आहे अशी महात्माजींस थाप देते झाले अशी बोलवा आहे.

ही चळवळ जी करावयाची ती विशेषतः आध्यात्मिक असल्यामुळें समता, परमतसहिष्णुता, भिन्नाचारसहिष्णुता, हींहि लोकांत उत्पन्न करावयाचीं आहेत. आणि मनुष्यांमनुष्यांतील अंतर कमी

करावयाचें आहे. असल्या नैतिक कार्यक्रमास महात्मा गांधीसारखा प्रवक्ता खरोखरच उपयोगी होईल. मनुष्यांतील अंतर कमी व्हावें, उच्च वर्ग व अस्पृश्य वर्ग यांच्या सोवळेपणाची व विटाळाची भावना कमी व्हावी म्हणून ईश्वराची प्रार्थना करावी आणि ईश्वर आपणांत बंधुत्व वाढविण्यास शक्ति देवो म्हणून त्याची याचना करावी यासाठीं सार्वजनिक प्रार्थनांचाहि उपयोग होईल. आणि असल्या प्रार्थनांच्या नेतृत्वास प्रार्थना, उपास यांवर श्रद्धा असलेला महात्मा गांधीसारखा पुढारी फारच युक्त होईल.

परक्या देशांतील चळवळ हा महत्वाचा कार्यक्रम नाहीं. पण तो उपेक्षितां येण्याजोगाहि नाहीं. आपला कार्यक्रम सर्व जगापुढें ठेवला पाहिजे. जगाला व विशेषेंकरून इंग्रजी जनतेला हें स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं १९२९ नंतर हिंदुस्थानसरकारास कर्ज विचारपूर्वक द्यावें. कां कीं, त्या सालीं जर हिंदुस्थानला डॉमिनियन स्टेटस मिळालें नाहीं तर त्यानंतर काढलेल्या कर्जास हिंदुस्थानांतील जनता खरोखर जबाबदार नाहीं. म्हणजे आपण करबंदीची चळवळ सुरू करण्यापूर्वीं सरकारनें आपला खर्च कर्ज काढून चालवूं नये म्हणून त्या मार्गांत विघ्नें उत्पन्न करून ठेविलीं पाहिजेत. शिवाय सरकारनें कागदी चलन वाढवून आपला खर्च चालवूं नये म्हणून उपाय योजण्याचाहि विचार केला पाहिजे.

ही सर्व चळवळ चालली असतां इंग्लंडांतील जनता आपल्याविरुद्ध जाणार नाहीं म्हणूनहि खटपट पाहिजेच. आणि यासाठीं व्हाईटहॉलचा हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेवर ताबा कमी होत गेल्यामुळें जें नुकसान झालेसें भासणार (खरोखर होणारच नाहीं) त्याचा मोबदला कांहीं तरी मिळावा म्हणून ब्रिटिश लोकांस कांहीं



दाखल नं .....
भोर

अभिवचनें दिलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, ब्रिटिश राजघराण्याच्या खर्चांतला कांहीं भाग आम्हीं सोसूं असेंहि अभिवचन द्यावें.

पूर्वोक्त विवेचनाचें पर्यालोचन थोडक्यांत येणें प्रमाणें:—लोक कौन्सिलांत जाऊन काम करूं इच्छितात, याबद्दल खेद बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं. शाळा, कोर्टें व कौन्सिलें यांवरील बहिष्कार हा कार्यक्रम राजकीय कार्यक्रमांतून काढून टाकला पाहिजे. आणि यंत्रानें केलेला माल न वापरतां खादी वापरींत जावी, ही गांधींची आवड विचारांतहि घेण्याचें कारण नाहीं; एवढेंच नव्हे तर शुद्ध राजकीय चळवळींत स्वदेशी देखील आणूं नये. राजकीय चळवळीनें स्वदेशीविषयींहि उदासीन असावें, जी चळवळ करावयाची ती ताबडतोब स्वराज्य पाहिजे म्हणून नव्हे, तर १९२९ मध्यें डोमिनिअन स्टेटस पाहिजे म्हणून होय. तें न मिळाल्यास १९३० सालीं करबंदीची चळवळ करावी लागेल आणि त्या वेळेस सत्याग्रहींची मालमत्ता कोणी घ्यावयाची नाहीं इतकींच अभिवचनें लोकांकडून घ्यावयाचीं आहेत, आणि हा कार्यक्रम चांगल्या पगारी लोकांकडून करून घ्यावयाचा आहे. इतर देशांतील लोकांस हिंदुस्थानामध्यें सरकार व लोक यांमध्यें होणाऱ्या शक्य लढ्याविषयीं व त्याप्रसंगीं हिंदुस्थान सरकारास कर्ज न देण्याविषयींहि इषारा दिला पाहिजे. हें कार्य देशांतील इतर सर्व पक्षांच्या म्हणजे प्रागतिकांच्या, स्वराजिस्टांच्या, मुसलमानांच्या, अँग्लोइंडियन व युरोपियन लोकांच्या सहकार्यानें व्हावें. पोलिस, रेल्वे इत्यादि सरकारी व सार्वजनिक नोकरांना देखील संपूर्ण स्वराज्यास आपली सहानुभूति व्यक्त करण्यास सांगावें.

या सर्व परिश्रमाच्या मुळाशीं कल्पना आहे ती अशी:—इ. स. १९२९ मध्यें सरकारनें आपण होऊनच डोमिनिअन स्टेटस द्यावें; आणि तें तसें मिळालें म्हणजे करबंदीची चळवळ आणि त्यापासून होणारी क्लेशपरंपरा वांचेल. तयारी चांगली झाली असली तर सरकार

आपण होऊनच स्वराज्य द्यावयास तयार होईल असा बराच संभव आहे. कां कीं, स्वराज्य दिलें नाहीं तर खालील अडचणी सरकारास दिसून येतील.

(१) करबंदीच्या चळवळीची पूर्वगामी तयारी झाली आहे.

(२) कर्ज काढून कारभार चालविणें सोपें नाहीं.

(३) सरकारी नोकरांमध्यें चळवळ करणाऱ्यांविषयीं सहानुभूति नाहीं असें नाहीं.

(४) रेल्वेसारखीं साधन पूर्णपणें विश्वसनीय नाहींत.

(५) कागदी चलन हवें तितकें वाढविणें या उपायाविरुद्ध देखील लोकांची कांहीं तरी योजना झालेली आहे.

(६) अँग्लोइंडियन व यूरोपियन हे देखील स्वराज्याच्या चळवळीस मिळालेले आहेत.

(७) ब्रिटिश जनता देखील या बाबतींत उदासीनपणानें अविरुद्ध किंवा अनुकूल आहे.

अशी परिस्थिति सरकारनें पाहिली म्हणजे त्यास असा प्रश्न पडेल कीं, सर्वाधिकार आपल्या हातीं ठेऊं पाहून अप्रिय व्हावयाचें हें कोणाकारितां ? असो.

ज्या लोकांचें लक्ष कौन्सिलप्रवेशाकडे मुख्यतः नसून लोकघटनेकडे आहे ते कट्टर होत, अशी व्याख्या करून त्या वर्गापुढें विचाराकारितां कौन्सिल बाहेरच्या कार्यक्रमाची ही योजना मांडली आहे. ही योजना कट्टर अंगावर घेत नसतील तर स्वयंनिर्णयी संघ अंगावर घेईल. लोकांस कार्यक्षम करण्याकारितां जी मोहीम करावयाची त्या मोहिमेची प्रत्यक्ष कायदेमंडळाशीं किंवा त्यांतील महत्वाच्या पक्षाशीं सहकारिता कशा प्रकारची असावी, हा प्रश्न पुढें विचारास घेऊं.

**कांग्रेस व कौन्सिलें:**—कांग्रेस व कौन्सिलें जे चळवळ करणारे लोक

17 JAN 1994

आहेत त्यांनीं कांग्रेसमध्यें रहावें व कांग्रेसमध्यें असलेल्या निरनिराळ्या पक्षांशीं सहानुभूति ठेवावी हें योग्य आहे. तथापि त्यांनीं स्वतःची स्वतंत्र संघटना बनवावी हें अत्यंत अवश्य आहे. कां कीं, त्यांनां आपला कार्यक्रम स्वतंत्र ठेवला पाहिजे, आणि तो आपल्याच अनन्यध्येय असलेल्या संस्थेमार्फतच चालविला पाहिजे. त्यांनीं कांग्रेसमधील किंवा कौन्सिलमधील विशिष्ट पक्षाला जवळ करून इतरांस दुखवावें असें करतां कामा नये. त्यांनीं नेहमीं चालणाऱ्या निवडणुकीच्या चळवळींमध्यें निरनिराळ्या पक्षासंबंधानें आपली तयस्थवृत्ति काळजीपूर्वक राखिली पाहिजे. कांग्रेसनें व गांधीपक्षानें स्वराज्यवाद्यांस निवडणुकीमध्यें मदत करावी म्हणून स्वराज्यपक्षाच्या मंडळीनें खटपट गेल्यासालींच केली. व म. गांधीनींहि लोकसंमुख कार्यक्रम सोडून स्वराजिस्टांची बढती करण्याचें अभिवचन दिलें. गांधींनीं प्रतिनिधींची फी कमी करण्यामुळें होणारी बचत दासबाबूकडे पाठविण्यासाठीं मजजवळ द्या म्हणून १९२४ सालच्या कांग्रेस प्रसंगीं दरबारी भाषेंत मागणी केली होती. अशा प्रसंगीं स्वराजिस्टांनीं उत्पन्न केलेल्या या पकडींत सांपडण्यासाठीं कट्टरांस मनोधैर्याची अत्यंत आवश्यकता आहे. जे लोकाभिमुख आणि लोकांस काम करावयास समर्थ करूं इच्छिणारे कट्टर आहेत त्यांनीं आपल्या कार्यावरच दृष्टि ठेवून कौन्सिलांतील विशिष्ट पक्षाविषयीं पक्षपात न दाखविण्याची काळजी इतकी निश्चयानें घेतली पाहिजे. कां कीं, निवडून येण्यासाठीं खटपटणाऱ्या पक्षांमध्यें कट्टरांच्या अन्यपक्षसहकारितेबद्दल संशयहि उत्पन्न होणार नाहीं.

---

# प्रकरण ५ वें.

## सरकारचें बलाबल.

आपल्या जनतेनें सत्तेचें स्थानांतर करण्यासाठीं जें राजकारण उपयोगांत आणावयाचें आहे तें आणतांना ज्यांच्या हातची सत्ता आपणांस घ्यावयाची आहे त्यांची शक्ती मोजली पाहिजे. प्रथम हा विचार केला पाहिजे कीं, हिंदुस्थानसरकार हें इतका दुर्भेद्य किल्ला आहे काय, कीं त्या किल्ल्याचें बल पाहून आपण अगदीं निराश व्हावें? सरकारच्या बलासंबंधानें जर अशा प्रकारची कल्पना असेल, तर त्या कल्पनेची सत्यता तपासली पाहिजे, आणि कल्पना असत्य असल्यास सरकार हा दुर्भेद्य किल्ला कां समजला जावा याचीं कारणेंहि पाहिलीं पाहिजेत.

जगांत कोणतीहि घटना दुर्भेद्य नाहीं. जी घटना अधिक अवयवांच्या सहकारितेनें बनते त्या घटनेस अवयवांस अप्रिय अशा तत्वानें राहातांच येणार नाहीं. अनेक अवयवांनीं युक्त असें हिंदुस्थान सरकार तें अवयवांच्या सहकारितेशिवाय कधींहि चालावयाचें नाहीं. आज सरकार हें अत्यंत बलवान् असें जें लोकांस वाटतें, त्याचें मुख्य कारण असें आहे कीं, दुसरें एखादें संस्थान आणि हिंदुस्थान सरकार यांची आपण तुलना करतों किंवा असंघटित जनता आणि सरकार यांची तुलना करितों, म्हणून हें सरकार आपणांस फार प्रबल वाटतें; आणि लोकांचें सरकारपुढें कांहीं एक चालावयाचें नाहीं असें वाटतें. तथापि अस्तित्वांत असलेल्या नोकरशाहीच्या पायाखालची जमीन पद्धतशीरपणें खणून त्या मातीवर आपण उभे राहूं इच्छिणारा वर्ग निघाला नाहीं म्हणूनच ही नोकरशाही फार बलवान् वाटत आहे.

इंग्रज नोकरशाही आपणांस नको आहे असें धरूं, आणि त्या नोकरशाहीचे महत्त्वाचे अधिकार काढून घेऊन ते अधिकार व त्या अधिकाराशीं संबद्ध जबाबदाऱ्या आपण स्वतः पत्करण्याची तयारी करूं, जुन्या व्यवस्थापकांस नालायक ठरवून आपण कारभार हातीं घेण्याची मसलत करणें या क्रिया आपणांस बऱ्याच परिचयाच्या आहेत. या क्रिया संस्थानांत, त्याचप्रमाणें एखाद्या कंपनीच्या व्यवस्थेंत चालूच असतात. जे लोक कंपनीचे डायरेक्टर होऊं पहातात, ते डायरेक्टर होण्यासाठीं ज्या खटपटी करतात त्यांत, चालू व्यवस्थापक पैसे खात आहेत, किंवा गैरकिफायतीचा कारभार करीत आहेत असा त्यांवर आरोप करावयाचा, त्याप्रमाणें शेअरहोल्डरांची समजूत करून द्यावयाची, आणि आम्ही डायरेक्टर झालों म्हणजे अमुक करूं तमुक करूं अशीं आश्वासनें द्यावयाचीं हे मुख्य प्रकार आहेत. इंग्रज नोकरशाहीला घालवून देण्यासाठीं करावें लागणारें राजकारण यापेक्षां वस्तुतः निराळें नाहीं, व त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या तयारीचें स्वरूपहि जवळ जवळ सारखेंच आहे.

इंग्रज नोकरशाहीला काढून टाकून देशाला स्वराज्य मिळवून देण्यास याच प्रकारची क्रिया करावयाची म्हणजे काय करावयाचें तें पाहूं. व्यापार करणारी कंपनी सावकारांस जबाबदार असते, त्यामुळें कंपनीची नोकरशाही सावकारांस जबाबदार असते. कां कीं कंपनी जर आपलें कर्ज परत देण्यास असमर्थ झाली तर कंपनी मोडण्यासाठीं सावकार कोर्टास अर्ज करूं शकतो. त्याचप्रमाणें एखादें राष्ट्र आपलें कर्ज परत देण्यास किंवा कर्जाचें व्याज नियमानें देण्यास असमर्थ झालें म्हणजे सावकारमंडळ आपल्या राष्ट्रास त्या सरकारविरुद्ध अर्ज करतें, आणि सावकार राष्ट्रास त्यामुळें ऋणको राष्ट्राच्या कारभारांत हात घालावा लागतो, आणि जेणेंकरून धनकोचे पैसे नियमानें वसूल होत जातील, अशी क्रिया करावी लागते. यामुळें

नोकरशाही सावकारमंडळास जबाबदार होते. कंपनीची नोकरशाही तशीच भागीदारांना जबाबदार आहे. शेअरहोल्डर आपल्या पैशाचा वापर कंपनीस देतात त्या वापराबद्दल योग्य मोबदला भागीदारांनां मिळावा लागतो. तो मिळाला नाहीं, तर भागीदारांनां नोकरशाहीस दम द्यावा लागतो, किंवा एक व्यवस्थापक बदलून दुसरा आणावा लागतो. हिंदुस्थानसरकार मुख्यत्वेंकरून दोघांनां जबाबदार आहे. तें सावकारांनां जबाबदार नियमानें व्याज देण्याबद्दल आहे आणि ज्या लोकांपासून कराच्या रूपानें सरकार पैसा घेतें, त्या लोकांनां पैशाचा अत्यंत योग्य मोबदला देण्यास नैतिक दृष्ट्या तें बांधलें गेलें आहे. नैतिक दृष्ट्या हे शब्द वापरण्याचें कारण एवढेंच कीं, आज तो हक्क बजावण्यास म्हणजे कारभारी मंडळीनीं पैशाचा अत्यंत योग्य उपयोग केला नाहीं तर कारभाऱ्यांचे कान उपटण्याचा किंवा त्यांस कामावरून काढून टाकण्याचा कायदा झाला नाहीं. कंपनीच्या शेअर होल्डरांच्या जागीं देशांतले कर भरणारे लोक आहेत. आणि कंपनीच्या सावकारांच्या जागीं देशाचे बाँड विकत घेणारे लोक आहेत. ज्याप्रमाणें कोणत्याहि कंपनीचें कारभारी मंडळ शेअर होल्डरांच्या इच्छेविरुद्ध आपल्या जागेवर राहूं शकत नाहीं त्याप्रमाणेंच कर भरणारांचे खरे प्रतिनिधि जे असतील त्यांच्या विरुद्ध सरकार कधींच जाऊं शकणार नाहीं. जरी कंपनीच्या चालकांनां शेअर होल्डरांविरुद्ध फारसें जातां येत नाहीं तरी पुष्कळ प्रसंगीं कंपनीचे व्यवस्थापक आपलें मताधिक्य कुशलतेनें राखूं शकतात. सामान्य शेअर होल्डरांमध्यें संघटना नसते आणि त्यामुळें व्यवस्थापक मंडळी अगदीं थोड्या शेअरचे मालक असून देखील कंपनी ताब्यांत ठेवतात. जेव्हां शेअर होल्डरांमध्यें संघटना होत जाते तेव्हां कधीं कधीं संपूर्ण व्यवस्था न बदलतां संघटित शेअर होल्डरांपैकीं कांहींनां आपल्यांत घेऊन कंपनीचें कारभारी मंडळ बलवान होत जातें,

९४४६
१०४७

व कांहीं प्रसंगीं बाहेरचा वर्ग चांगलाच संघटित असला आणि मोठा असला म्हणजे संपूर्ण कारभारच तो आपल्या ताब्यांत घेतो आणि चालू व्यवस्थापकांस ढकलून देतो. सध्याचें परकें सरकार काढून टाकून तेथें देशी लोकांचें सरकार आणण्याची क्रिया याहून भिन्न नाहीं. आणि प्रतिनिधि वर्ग जर कर भरणाऱ्यांचा खरा प्रतिनिधि असेल आणि त्यांच्या हातीं कारभार आला तर बरें होईल असें जर लोकांस खरोखर वाटेल, तर देशांत स्वराज्य उत्पन्न झाल्याशिवाय कधींहि रहाणार नाहीं.लोकप्रतिनिधींशीं चकवाचकवी करून त्यांच्या तोंडास पानें पुसावयाचीं किंवा त्यांच्यांत भेद पाडून आपलें चालवावयाचें, या प्रकारच्या क्रिया होणार नाहींत असें मुळींच नाहीं. त्या सर्व लटपटी झाल्याशिवाय लोकांमध्यें पार्लमेंटरी कौशल्यहि उत्पन्न व्हावयाचें नाहीं. तथापि हीं सर्व मार्गांतलीं सामान्य विश्रांतिस्थानेंच आहेत. प्रतिनिधींनीं प्रामाणिकपणें लोकहिताचीं कामें करण्यास खटपट करावी. जर आपण खटपट करूनहि सरकारनें योग्य सहानुभूति दाखविण्याचें नाकारलें तर आपल्या मतदारांकडे सरकारची तक्रार न्यावी या प्रकारच्या साध्या व प्रामाणिक प्रयत्नानें देशाची प्रगति पुष्कळ होईल यांत शंका नाहीं. आपली इच्छा गाजविण्यास कंपनीच्या शेअरहोल्डरांस जितकी संधी आहे त्या मानानें सरकारवर परिणाम घडवूं इच्छिणाऱ्या कर देणाऱ्यांस अधिक आहे. कंपनीमध्यें शेअरहोल्डरनें पैसे भरलेले असतात. त्याच्याकडून व्यवस्थापकांस जें काय मिळावयाचें तें मिळालेलें असतें, आणि या परिस्थितीचे दोन परिणाम होतात. शेअरहोल्डरांनी देणें बंद करून कंपनीस पेंचांत आणण्याची क्रिया त्यांच्याकडून होत नाहीं. आणि शेअरहोल्डरांनीं जें काय भरावयाचें तें भरलें असल्यामुळें त्यांनीं रकम सपाटून भरली असल्याशिवाय त्यांना कंपनीच्या व्यवस्थापकांच्या विरुद्ध कार्यप्रवृत्त होण्यास चोदना उत्पन्न होत नाहीं.

तथापि सरकारास लोकांच्याकडून कराच्या रूपानें येणाऱ्या पैशाची अपेक्षा दरसाल असल्यामुळें, सरकारास प्रजेच्या इच्छेकडे जास्त अधिक तीव्रतेनें पाहिलें पाहिजे. सरकार पांढऱ्या कातडीचें असलें आणि प्रजा काळ्या कातडीची असली तरी सरकारची करतंत्रता कोठून जाणार ? सरकार करतंत्र आहे, त्याअर्थी कर देणाऱ्यांच्या ताब्यांत सरकार असणें हें स्वाभाविक कार्य होय पण तें सोपें मात्र नाहीं. 'जर दिलेल्या पैशाचा मोबदला आम्हांस योग्य तऱ्हेनें मिळत नाहीं, व तो मिळाला पाहिजे आणि तो दिला नाहीं तर कर देणें योग्य होणार नाहीं.' अशी लोकांची समजूत झाली तरी करबंदीची चळवळ करणें सुलभ होईलसें वाटत नाहीं. ती सुलभ होण्यास लोकांमध्यें असा विश्वास उत्पन्न झाला पाहिजे कीं, इंग्रज नोकरशाहीपासून अधिकार काढून घेतला व दुसऱ्या कोणास तो अधिकार दिला तर ते तो अधिकार अधिक लोककल्याणपर तऱ्हेनें वापरतील. या तऱ्हेचा विश्वास काल्पनिक "आपल्या लोकां"वर उत्पन्न होत नाहीं. तर आमच्यावर विश्वास टाका म्हणून सांगणारा निश्चित उमेदवार वर्ग लागतो. तो राजकीय पक्ष असो किंवा एखादी निश्चित "लीग" असो. इंग्रजी नोकरशाहीच्या हातीं अधिकार ठेवूं नका, आम्हांस अधिकारावर आणा आणि तसें आणण्यासाठीं करबंदी वगैरे गोष्टी करा, आम्हीं तुम्हांसाठीं अमुक गोष्टी करूं असें एका निश्चित मनुष्यसंघानें सांगून शासनसंस्थेची जबाबदारी घेण्यास पुढें आलें पाहिजे. उदाहरणार्थ एखाद्या कंपनीची गोष्ट घ्या; जर कांहीं असंतुष्ट शेअरहोल्डर नुसता असा बोभाटा करतील कीं कंपनीची व्यवस्था वाईट आहे पण किफायत करून दाखविण्याचें अंगावर घेणार नाहींत, तर कंपनीच्या सभेस 'आहे अशीच व्यवस्था चालूं द्या' असें म्हणण्यापलीकडे काय करतां येईल, तशीच राज्यव्यवस्थेची गोष्ट आहे. राज्यव्यवस्था अंगावर घेण्यास आणि अधिक

चांगल्या तऱ्हेनें व्यवस्था चालविण्याचें विश्वासार्ह अभिवचन देण्यास मनुष्यसंघ निर्माण झाला पाहिजे. स्वयंनिर्णयीसंघ जो निर्माण करावयाचा आहे तो असली जबाबदारी अंगावर घेण्यासाठींच निर्मावयाचा आहे.

करबंदीची चळवळ जोरानें चालली पाहिजे हें लोक कबूल करतील. पण सरकारचें सर्व उत्पन्न पूर्णपणें बंद करणें शक्य आहे काय म्हणून प्रश्न करतील. या प्रश्नास आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, सरकारचें सर्व उत्पन्न बंद पाडण्याची आवश्यकताच नाहीं. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था हा धंदा किती नाजुक व गंभीर स्वरूपाचा आहे आणि त्यामुळें नोकरशाहीस किंवा तिच्या जागीं येणाऱ्या दुसऱ्या कारभाऱ्यांस पेंचांत टाकणें किती सोपें आहे हें समजावून सांगण्यासाठीं एकच गोष्ट पुढें मांडतों. इ. स. १९२३–२४ सालीं १३ कोट पौंड वसूल होता व कर्ज ८९ कोट पौंड होतें; म्हणजे हिंदुस्थान सरकारचें कर्ज आज त्याच्या वार्षिक वसुलाच्या सातपट आहे. अशा स्थितींत धंदा कसा करावयाचा याची कल्पना करावी. समजा एका संस्थेचा किंवा कंपनीचा वर्षाचा वसूल १०००० रुपये आहे आणि तिचें कर्ज ७०००० रु. आहे. या सत्तर हजारांचें सालचें व्याजच एकंदर पांच टक्क्यांप्रमाणें ३५०० रुपये होईल. म्हणजे १०००० प्राप्ती पैकीं ३५०० रुपये व्याजाकडे द्यावयाचे आणि उरलेला पैसा मालपगारासाठीं वापरावयाचा अशी एकंदर राज्यस्थिति आहे. जेथें व्याज जबर भरावयाचें तेथें देशांत सरकारच्या उत्पन्नास, नोकरशाहीस नालायख ठरवूं पाहणाऱ्यांच्या चळवळीनें अडचणी उत्पन्न झाल्या तर सावकाराचा भरणा नियमानें करणें सोपें जाणार नाहीं, जर सावकारांस असें भासून आलें कीं, आहे त्या राज्यव्यवस्थेकडून दिलेल्या कर्जाचें व्याजहि फिटत नाहीं तर सावकारवर्गच कारभारी वर्गांत किंवा घटनेंत बदल

व्हावा असें इच्छील. आणि नोकरशाहीवर प्रजेचा विश्वास नाहीं तर प्रजेचा ज्यावर विश्वास असेल अशा मंत्रिमंडळाकडे कारभार द्या असें म्हणावयास लागेल. व ज्या लोकांवर विश्वास उत्पन्न होऊन प्रजा कर द्यावयास तयार होईल अशांच्याच हातीं अधिकार द्या असा आग्रह धरील. पण असा विश्वास ज्याविषयीं उत्पन्न होईल असा वर्ग आमच्यांत तयार झाला पाहिजे. सावकाराचा असा जबर शह असतां, राज्यव्यवस्थेच्या कामांत विघ्नें उत्पन्न करणें आणि सरकारास पेंचांत पाडणें ही कठिण गोष्ट नाहीं. लोकांच्या चळवळीमुळें जरी दहा टक्के कमी वसूल झाला तरी सरकारास एकदम पंचाईत पडेल. हातीं कारभार घेण्याची तयारी करणें हीच कठिण गोष्ट आहे.

प्रस्तुत परिस्थितीचा फायदा घ्यावयाची पद्धति येणेंप्रमाणें राज्यकारभार आपल्या ताब्यांत घेण्याच्याच हेतूनें एक नवीन संस्था उत्पन्न करणें अवश्य आहे. स्वराज्यपक्ष व प्रागतिकपक्ष यांतील माणसें, आहे त्या स्थितींत जें कसेंबसें कार्य होईल तसें करण्याकडे लक्ष देतील व कौन्सिलांत जाऊन जें कांहीं देशाच्या फायद्याचें त्यांच्या बुद्धीप्रमाणें आणि त्यांना दिलेल्या सवडीप्रमाणें करतां येईल तें करून दाखवितील. पण याशिवाय करावयाची कामगिरी म्हणजे, देशाचा कारभार संपूर्ण हातीं घेण्याची आवश्यकता लोकांच्या मनावर पटविणें, आणि ती घेण्यासाठीं हुषार कर्तृत्ववानांचा संघ तयार करणें, त्या संघानें सध्यांची राज्यपद्धति नाहींशी करावी आणि आमची योजना पसंत करावी म्हणून बादशहांस सल्ला देणें, आणि त्या सल्ल्यास जें योग्य महत्त्व द्यावयाचें तें बादशहांच्या कारभारी मंडळानें न मिळू दिल्यास त्या सल्ल्याच्या उपेक्षेचें गंभीर स्वरूप दाखवून देणें, हिंदुस्थानच्या सावकारमंडळास हिंदुस्थानसरकारच्या उत्पन्नास कशा अडचणी उत्पन्न होतील त्याविषयीं आगाऊ सूचना देणें, आणि कर देणाऱ्या हिंदुस्थानास संघाच्या सल्ल्याशिवाय थैल्या

मोकळ्या न करण्याविषयीं सल्ला देणें इत्यादि गोष्टी करणें होय. या गोष्टी करण्यासाठींच स्वयंनिर्णयसंघ निर्मावयाचा आहे.

सरकारच्याविरुद्ध नियमानें काम करणारा वर्गच नाहीं. आणि सर्व जनतेला आमच्यावर विश्वास टाका, आमच्या सरकारला पेंचांत पाडण्याच्या प्रयत्नाला टेंकू द्या आणि आम्हीं सरकारसंस्था ताब्यांत घेऊन तुम्हांस आहे त्यापेक्षां अधिक सुखकर राज्यव्यवस्था देऊं अशी हमी घेणारा वर्ग निर्माण झाला म्हणजे लोकांस बेजबाबदार असलेल्या नोकरशाहीचें बल अधिक आहे कीं लोकांचें हित पहाण्यासाठीं सरकारघटनेंत फरक करूं मागणाऱ्या संघाचें बल अधिक आहे अशी कांहीं तुलना करतां येईल. शिवाय राष्ट्राची जबाबदारी पत्करण्यास तयार अशा वर्गाच्या प्रामाणिकपणासंबंधानें लोकांची खात्री पटली पाहिजे, आणि या गोष्टी झाल्या तरच त्यांच्या नेतृत्वाखालीं राज्यव्यवस्थेचा कायदा बदलण्यासाठीं निःशस्त्र राजकारण लोकांस करतां येईल. आज आमच्यावर विश्वास टाका आणि सरकारशीं दोन हात करा म्हणून सांगणारा वर्गच कोठें आहे. निःशस्त्रांचें राजकारण पूर्णपणें समजून राष्ट्राची जबाबदारी अंगावर घेण्यास जो वर्ग तयार होईल तोच स्वयंनिर्णयी संघ होय.

---

# प्रकरण ६ वें.

## स्वयंनिर्णयी संघाची कर्तव्यमीमांसा.

मागील प्रकरणांत स्वराज्यप्राप्तीसाठीं, व सरकारला पेंचांत पाडण्याची तयारी करण्यासाठीं जी योजना करतां येण्याजोगी आहे

तिचें सामान्य स्वरूप सांगितलें. तथापि हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं हत्यारें, तटबंदी इत्यादि गोष्टी देशसंरक्षण पूर्णपणें करीत नाहींत. हिंदुस्थानांतील लढायांत अनेक दुर्भेद्य स्थलें सहज जिंकलीं गेलीं असा अनुभव आहे. युद्धामध्यें प्रत्यक्ष खडाजंगीं कांहीं वेळ होऊन जयापजय अंशानें ठरतो, तर नैतिक जयापजय हा युद्धाचा पूर्णपणें निकाल लावतो. हत्यारें जरी तीक्ष्ण असलीं तरी तीं वापरणारा कुशल पाहिजे एवढेंच नव्हे तर तीं वापरणारास धैर्य पाहिजे. धैर्याचा कार्यक्रम आहे तो दुर्बल लोकांकडून अथवा अस्थिरबुद्धीकडून पूर्णत्वास जाणार नाहीं. स्वराज्याची तयारी करणें म्हणजे केवळ संस्थेचें नांव, तिची पाटी, तिचे नोटपेपर, तिच्या बैठका आणि आणाशपथांची यादी हीं तयार करणें नव्हे. या गोष्टींनीं स्वराज्यप्राप्ति कधींच होणार नाहीं.

आपणापुढें जी लोकजागृतीची आणि स्वराज्यप्राप्तीची चळवळ आहे तिचे मूलभूत सिद्धांत चळवळ करणाऱ्यांनीं काळजीपूर्वक लक्षांत घेतले पाहिजेत. ज्यांस तत्त्वें समजलीं नाहींत त्यांची उपयुक्तता कमी झालीच. अजाण मनुष्य एक तर भलतींच भयें मनांत बाळगून हीनशक्ति होईल किंवा तत्त्वें न समजल्यामुळें तो राजकीय चळवळीच्या योग्यायोग्यतेसंबंधानें जे नियम आहेत, आणि ज्या नियमांचा सरकारहि अंगीकार करतें, त्या नियमांचें अतिक्रमण करील; व नियमांचें अतिक्रमण केल्यामुळें तो अडचणींत पडेल आणि कामाचा खराबा करील. यासाठीं चालू राजकारणास लागणाऱ्या चळवळीचे मूलभूत सिद्धांत आणि चळवळीशीं संयुक्त असलेलें मानसशास्त्र हीं स्पष्टपणें अवगमिलीं पाहिजेत.

प्रस्तुत राजकारण महाराष्ट्रीय किंबहुना भारतीय इतिहासास परिचित असलेल्या राजकारणापेक्षां निराळ्याच कोटींतील असल्यामुळें याची तयारीहि निराळ्या प्रकारची आहे. हें स्पर्ध्यमान

दोन संस्थानांतील एका पक्षाचा अभिमान धरून करावयाचें राजकारण नाहीं; तर राज्यांतल्या एका मोठ्या वर्गाचें वजन सत्तेवर वाढविण्याचें राजकारण होय. या राजकारणाचे पहिले धडे दादाभाई नौरोजी, रानडे, टिळक, गोखले, गांधीं यांनीं शिकविले आहेत. सामाजिक सुधारणा हें त्या राजकीय कार्यक्रमाचेंच अंग आहे ही गोष्ट गेल्या पिढीस थोडी बहुत समजली होती. पण त्यावेळच्या सुधारकांची सामाजिक सुधारणेची कल्पनाच अल्प होती, व राजकीय अपेक्षाहि अल्पच होत्या. यामुळें नवीन सामाजिक विचाराचीहि आवश्यकता आहे. राजकारणासाठीं म्हणून अवश्य असलेल्या सामुच्चयिक नैतिक विकासाकडे तर म. गांधींखेरीज कोणीच लक्ष दिलें नाहीं. आपणांस आतां आपल्या वाढत्या राजकीय महत्त्वाकांक्षेस अनुरूप असा सामाजिक व नैतिक विचार तयार केला पाहिजे.

चळवळ करणारांच्या मनांत प्रथम निर्भयता पाहिजे. ही निर्भयता कायद्याच्या ज्ञानानें पुष्कळशी उत्पन्न होते. कार्यास कायदेशीर क्षेत्र किती व्यापक आहे हें लक्षांत आलें तर विनाकारण बेकायदेशीर प्रयत्नांत कोण पडेल? शिवाय कायदेशीरपणापेक्षांहि महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे व्यावहारिक युक्तता होय. आपण जें कार्य करूं इच्छीत आहों तें केवळ हिंदुस्थानासच नव्हे तर इंग्लंडला देखील हितकारक आहे अशी स्थिति जर असली आणि ती स्पष्टपणें लोकांच्या लक्षांत आली तर त्या कार्यास अधिकच शक्ति उत्पन्न होते. यासाठीं उभयतांच्या हिताहितांचें पृथक्करण चांगलें केलें पाहिजे. चळवळ करणाऱ्यांनीं हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे कीं हिंदुस्थानी व इंग्रज या दोन्हीं लोकांचा फायदा ज्यांत आहे त्या चळवळीस दोन्ही लोकांची सहानुभूति आणि शेवटीं यशप्राप्ति हीं ठेवलेलीच. एकाचा फायदा असला तर त्या योगानें दुसऱ्याचें नुकसान होतें असे व्यवहारांत कांहीं संबंध असतात, तर कांहीं संबंधांत दोघांचाहि

पुण्याचे पुस्तकें ज्ञान मंडळ



फायदाच असतो. जुगारांत किंवा हारजितीच्या खेळांत, एकास पैसे मिळाले तर दुसऱ्या कोणाचे तरी ते गेले पाहिजेत, व त्यांचें नुकसान झालें पाहिजे. कामकरी व त्यास कामास लावणारा यांचा संबंध निराळ्या प्रकारचा आहे. एक मेहनत करतो तर त्याचा मोबदला त्यास मिळून त्यास फायदा होतो. कामकऱ्याच्या कामापासून काम घेणाऱ्याचा कांहीं फायदा असल्याशिवाय कोणी दुसऱ्यास काम देणार नाहीं. तेव्हां योजक व कामकरी यांचा संबंध उभयतांच्या फायद्याचा आहे. क्रयविक्रयाची गोष्टहि अशीच आहे.

जेव्हां दोन व्यक्तींमधील संबंध उभयतांसहि फायदेशीर नसतो तेव्हां तो टिकत नाहीं, तर जेव्हां तो उभयतांस फायदेशीर असतो तेव्हांच तो टिकतो. जर हिंदुस्थानांतील लोकांच्या पासून अधिक पैसे घेऊन ब्रिटिश माल हिंदुस्थानावर लादावयाची योजना इंग्रज मुत्सद्द्यांच्या मनांत असेल आणि त्यासाठीं हिंदुस्थान इंग्लंडच्या ताबडींत ठेवण्याची योजना सरकार करीत असेल तर ती टिकण्याजोगी मुळींच नाहीं. हिंदुस्थानास स्वराज्य मिळाल्यास उभय देशांस फायदेशीर असलेलेच आर्थिक संबंध दोहोंमध्यें उत्पन्न होणार; आणि एकपक्षीय नफेबाजी नष्ट होणार, ही गोष्ट उघड आहे; आणि त्यामुळें स्वराज्याची मागणी व तें मिळविण्याची सर्व खटपट ही दोहोंमध्यें कायमचे आणि उभयतांस हितावह असे संबंध घडवून आणण्याची खटपट असल्यामुळें हिंदुस्थानांत स्वराज्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न हा इंग्लंडचा व्यापार अधिक न्यायाच्या तत्त्वावर आणि अधिक भक्कम पायावर आणण्याचा प्रयत्न आहे. जो धंदा चालविण्यासाठीं राजकारणांत लबाडी किंवा अन्याय करावा लागतो तो धंदा बांडगुळासारखा चोरटा होय. तो आस्तित्वास लायख नाहीं. तर असल्या चोरट्या धंद्यासाठीं साम्राज्यसरकारास आपल्या प्रतिकाराच्या अभावानें उत्तेजन देणें हें साम्राज्याविरुद्ध दरोबर मोठें

17 JAN 1941

पाप होय, ही भावना प्रत्येक राजकारणी मनुष्यांत असली पाहिजे. आणि इंग्लंडच्या मुत्सद्यांच्या मनांत एखाद्या चोरट्या धंद्याच्या फायद्यासाठीं हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क द्यावयाचे नसले तर त्याविरुद्ध प्रतिकार करून स्वराज्याचा हक्क स्थापित करणें हें आपलें कायदेशीरच केवळ नव्हे तर साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें उच्च नैतिक कर्तव्य होय.

राजकीय चळवळ ही उच्च नैतिक हेतूशिवाय यशस्वी व्हावयाची नाहीं. ‘ स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं ’ हें वाक्य वारंवार लोकमान्यांनीं पुढें मांडलें आहे. तें तर खरेंच आहे पण त्यांत त्यांनीं एकच बाजू मांडली आहे. याविषयीं आम्हीं असेंहि म्हणतों कीं सुराज्याशिवाय स्वराज्याचें समर्थन होणार नाहीं. आपल्यांतील पुढारी अशिक्षित आणि राज्य करण्यास नालायख असले तर जनतेचें जीवित त्यांच्या हातीं देणें अयोग्य होईल. स्वराज्याची प्राप्ती आम्हांस गुणाधिक्यावर करून घ्यावयाची आहे. लोकांस अशी खात्री पटली पाहिजे कीं, आहे त्या तऱ्हेनें राज्य चालण्यापेक्षां आपल्या लोकांच्या हातीं अधिकार आले तर राष्ट्र प्रगमनशील आणि सुखी करण्याच्या दृष्टीनें अधिक चांगलें होईल. ही गोष्ट आपल्या लोकांसहि पटविणें सोपें नाहीं. जनता आपलेपणाच्या भावनेनें बद्ध असली तरी देखील या बाबतींत ती बरीच तटस्थ असते हें विसरून चालणार नाहीं.

हें स्वत्वस्थापन लोकांस केवळ सामान्य युद्धच न वाटतां धर्मयुद्ध म्हणजे उच्च संस्कृतीच्या जोपासनेसाठीं चालू असलेलें युद्ध वाटलें पाहिजे. यासाठीं राजकीय चळवळ जितकी शुद्धस्वरूपांत राहील आणि ती चळवळ करणारे लोक जितके नीतीनें संग्राम करतील त्या मानानें ते जय पावतील. नोकरशाहीचा पक्ष जितक्या लबाडया अधिक करील तितका तो अधिकाधिक पराभूत होत

जाईल. इंग्रजांपुढें आपली लायकी गावयाची हें महत्त्वाचं काम नसून आपल्या लोकांचाच आपल्यावर विश्वास उत्पन्न करावयाचा हें मुख्य काम आहे. त्याशिवाय आपल्या लोकांच्याच नेतृत्वाखालीं आपले लोक जमावयाचे नाहींत. मग आपल्या नेतृत्वाखालीं लढणें दूरच राहिलें. नोकरशाहीची सत्ता केवळ खडया फौजेवर अवलंबून आहे आणि नोकरशाही पक्की बदमाष आहे, आम्हां लोकांचा इंग्रज नोकरांवर मुळींच विश्वास नाहीं अशा तऱ्हेची स्वतःची समजूत करून घेणें आणि तीप्रमाणें लोकांस सांगणें म्हणजे स्वतःस फसवून घेणें आहे. आज लोकांनां आपल्यांतील पुढाऱ्यांच्या न्यायीपणाविषयीं कितपत खात्री आहे ? आपआपसांतल्या लोकांचेच प्रश्न पुढें आलें असतां ते समबुद्धीनें सोडविले जातील असा विश्वास आहे काय ? आपल्या लोकांसच आपल्या बांधवांची नैतिक उच्चता भासत आहे काय? राष्ट्रांत आज मदनमोहन मालवीय, केळकर, लाला लजपतराय, नेहरू, शास्त्री, अल्लीबंधू इत्यादिकांवर त्यांच्या समतेबद्दल व सरळ वर्तनाबद्दल बराचसा विश्वास वाटतहि असेल. वाटतोच अशी माझी खात्री नाहीं. जरी वाटत असला तरी तेवढा पुरेसा नाहीं. आज हा पुढारी जाऊन दुसरा पुढारी येईल. मतें अधिक मिळवून पुढें येणारा मनुष्य पुष्कळदां हलक्या नीतीचा असतो. केवळ निवडणुकीच्या लठ्ठालठ्ठींत अधिक कुशलतेनें पविते टाकणारा पुढें येणें पुष्कळ शक्य आहे. कोणता मनुष्य पुढें येईल याची खात्री नसल्यामुळें, सर्व राष्ट्राची म्हणजे राष्ट्रांतील सुशिक्षित वर्गाची नैतिक उच्चता स्थापन होऊं लागली म्हणजेच आपल्या स्वराज्याचा पाया रोंवण्याचें महत्त्वाचें काम झालें असें मी समजेन.

ज्याप्रमाणें आर्थिक व्यवहारांत जो मनुष्य वचनास जागणारा, जें करीन म्हणून अभिवचन दिलें तें करण्यासाठीं जीव तोडून झट-

णारा, पैसे बरोबर परत करणारा असा मनुष्य असेल तो इतरांचा विश्वास संपादन करूं शकतो, तोच अनुभव राजकारणात आहे. लोकांस राजकारण करावें लागतें त्या राजकारणांत पुढाऱ्याविषयीं असा विश्वास लागतो कीं, पुढारी स्वतःपुरता बचाव करून घेऊन जनतेला फशीं पाडण्याचें कृत्य करणार नाहीं. एवढेंच नव्हे तर प्रतिपक्ष्याबरोबर देखील लबाडी करणार नाहीं. यासाठीं गेल्या पिढींत कित्येकांनीं राजकारण म्हणजे लबाडीचें क्रीडास्थान होय आणि ' मनुष्य खरा लबाड असल्याशिवाय तो खरा राजकारणी होणार नाहीं ' या तऱ्हेचा उपदेश केला त्याचा उघड निषेध केला पाहिजे. आम्ही असें म्हणूं शकतों कीं जो मनुष्य नैतिक उच्चतेचें ध्येय डोळ्यासमोर ठेवणार नाहीं तो भारतीय जनतेचा विश्वास कधींहि संपादन करणार नाहीं. आणि जो नैतिक उच्चतेचें ध्येय आपल्या अनुयायांत राखिणार नाहीं तो आपली परंपरा चिरस्थायी करूं शकणार नाहीं.

स्वराज्यप्राप्तीचें ध्येय म्हणजे काय याचा प्रथम निश्चय केला पाहिजे. स्वराज्य म्हणजे देशांतील कारभार स्वतः करणें आणि आपलें सांघिक म्हणजे सामुच्चयिक भवितव्य आपणच ठरविण्याचा अधिकार आपणच वापरणें हें होय. हें तत्व तात्विक दृष्ट्या सर्वांस मान्य आहे. अडचण कायती त्याच्या व्यावहारिक उपयोगासंबंधानें आहे. याविषयीं विचार करतांना आपणांस हें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपणांस जें आपलें स्वातंत्र्य स्थापित करावयाचें तें युद्धानें स्थापित होणें शक्य नाहीं. त्यास कांहीं अन्य उपाय पाहिला पाहिजे; आणि तो उपाय म्हणजे सामाजिक अन्योन्याश्रय लक्षांत घेऊन एक एक क्रिया स्वायत्त करणें हाच होय. यासच असहकारितेचें तत्त्व म्हटलें आहे; आणि ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे आपणांस जे उपाय करावयाचे त्यांस एक निश्चित मर्यादा आपो-

आपच उत्पन्न होते. स्वराज्यप्राप्ति ही क्रांतिकारक चळवळ न राहतां अंतस्थ सुधारणेचीच चळवळ होते.

आपणांस ही चळवळ निर्भयपणें करतां येण्याजोगी आहे. त्याचें कारण हें कीं या चळवळीचा अंतिम हेतू भिन्न राज्यस्थापना हा नसून देशांतील लोकांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दर्जा वाढविणें हा आहे. म्हणजे ज्याप्रमाणें अस्पृश्य वर्गानें आपली स्थिति व दर्जा सुधारावा म्हणून खटपट केली तर ती हिंदुत्वाविरुद्ध होणार नाहीं; त्याप्रमाणेंच नागरिकत्वाचा हक्क अधिकाधिक विस्तृत करणें आणि सर्व देशांतील कारभार प्रतिनिधींच्या सत्तेखालीं आणणें या क्रिया साम्राज्याच्या विरुद्ध नाहींत.एवढेंच नव्हे तर त्या साम्राज्याच्या ध्येयाला साधकच आहेत. देशांतील लोकांनीं आपला कारभार आपण चालविणें ही क्रिया शक्य होण्यासाठीं मुख्य तयारी म्हटली म्हणजे आपली पात्रता वाढविणें ही होय. महार आहेत त्या स्थितींत संतुष्ट न राहतां त्यांस ब्राह्मणांच्या बरोबरीची पदवी मिळणें, व ब्राह्मणांनीं बरोबरीच्या नात्यानें त्यांस वागविणें ही क्रिया शक्य होण्यासाठीं महारास ज्या गोष्टी कराव्या लागतील त्याच क्रिया इंग्रजांची बरोबरी करूं इच्छिणाऱ्या हिंदी राष्ट्रास कराव्या लागणार. ब्राह्मण महारांना सांगणार कीं तुम्हीं घाणेरडे न राहतां स्वच्छ रहावयास अगोदर लागा म्हणजे आम्हीं तुम्हांस बरोबरीचे मानूं. हिंदी लोकांची नालायखी दाखवून त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा उपहास करणारा इंग्रज असेंच बोलणार. महारास तुच्छ समजणाऱ्या ब्राह्मणास महार म्हणणार आम्हीं घाणेरडे आहों खरें पण जर तुमच्या बरोबरीनें समाजांत वागण्याची आम्हांला संधि दिली जाईल तरच आम्हांस तुमच्या बरोबरीचे होण्यासाठीं प्रयत्न करण्याची स्फूर्ति होईल. शिवाय तुमच्याबरोबर आम्हीं वागत असल्याशिवाय चांगल्या तऱ्हेची राहणी म्हणजे काय आहे हें आम्हांला कसें समजणार? दोन्ही

पक्षांच्या म्हणण्यांत अर्थ असतो. संधि असल्याशिवाय उत्साह उत्पन्न होत नाहीं व उत्साह उत्पन्न झाल्याशिवाय क्रियाहि होत नाहीं. याच तत्त्वावर आज आपली स्वराज्यार्थ मागणी आहे. महारांस उच्च आयुष्यक्रम देण्याची आणि नंतर सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या उच्चतर परिस्थितीप्रत पोंचविण्याची चळवळ आहे, तीपेक्षां स्वराज्यप्राप्तीची चळवळ निराळी नाहीं. स्वतःच्या उन्नतीसाठीं अवश्य असलेले राष्ट्रीय पंचायतीचे अधिकार मागणें आहे आणि या चळवळींत आपणांस मोकळ्या मनानें इंग्रजांस देखील घेण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थानास डोमिनियन स्टेटस जरी मिळालें तरी हिंदुस्थान आणि इंग्लंड यांमधील अन्योन्याश्रय कमी होणार नाहीं; उलट तो वृद्धिंगतच होईल. संबंध जेव्हां सत्तेचा असतो तेव्हां ज्यावर सत्ता असते तो पक्ष दुसऱ्या पक्षाच्या विरुद्ध असतो; पण जेव्हां दोन्ही पक्ष स्वतंत्र सहकारी असतात तेव्हां त्यांच्यांत स्नेहसंबंध बळावत जातो. आणि जेव्हां दोन पक्ष समतेच्या नात्यानें सहकार्य करीत असतात तेव्हां त्यांतील अन्योन्याश्रयाच्या अटीहि अशा बनतात कीं ज्या उभयतांसहि फायदेशीर असतात. एवढेंच नव्हे तर अशा प्रसंगीं संबंधाच्या फायदेशीरपणाची जाणीव दोघांलाहि असते. आणि त्यामुळें दोघांमध्यें सहकार्य अधिक चिरकाल, मनःपूर्वक आणि पद्धतशीर होतें.

इंग्लंडशीं संबंध असल्यानें हिंदुस्थानचे कांहीं महत्वाचे फायदे झाले आहेत. उदाहरणार्थ हिंदुस्थानाचें राष्ट्रीय कर्ज घ्या. या कर्जाचा बराचसा भाग हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीसाठीं म्हणजे रेल्वे, कालवे वगैरे सार्वजनिक उपयोगाचीं कामें वाढविण्याकडे झालेला आहे. हें कर्ज हिंदुस्थानास मिळालें तें इंग्लंडच्या इभ्रतीवर मिळालें. देशाची जमीन सुपीक असली तरी जर तेथील सरकार सावकाराचे पैसे वेळच्या वेळेवर देण्यास आणि व्याज अत्यंत नियमानें देण्यास समर्थ नसलें तर कर्ज उभारतां येत नाहीं. व्यवस्था चांगली नसली तर मोठ्या इस्टेटीवर

देखील काढलेल्या कर्जास व्याज जास्त द्यावें लागतें. पण सुव्यवस्थित इस्टेटीला कमी भावानें कर्ज मिळतें हा अनुभव रोजचा आहे. हीच गोष्ट राज्यांची आहे. हिंदुस्थानाला अनेक अब्जांचें कर्ज आहे. हें कर्ज देशी लोकांच्या हातीं कारभार असता तर मिळालें असतें कीं नाहीं याचा संशयच आहे. हिंदुस्थानसरकार जर स्वतंत्र असतें तर कांहीं तरी कर्ज मिळालें असतें; पण व्याज बरेंच द्यावें लागलें असतें. इंग्रज येथें राज्यकारभार चालवितात याचें कर्जाला व्याज कमी द्यावें लागतें, या दृष्टीनें आर्थिक दृष्ट्या समर्थन होतें; व इंग्रज लोक पगार जास्त घेतात या गोष्टींचेंहि त्याच दृष्टीनें समर्थन करतां येईल.कल्पना करा कीं,एखाद्या कंपनीला अधिक चांगला म्यानेजर आहे व दुसऱ्या कंपनीस कमी हुशार म्यानेजर आहे. कमी हुशार म्यानेजर असलेल्या कंपनीस कर्ज जर दहा टक्क्यांनीं घ्यावें लागलें व हुशार म्यानेजर असलेल्या कंपनीस सहा सात टक्क्यानें मिळालें तर हुशार म्यानेजर असलेल्या कंपनीनें त्यास जास्त पगार दिला तर त्याचें समर्थन होतें. याप्रमाणें केवळ आर्थिक तत्वावर आजच्या शासनविषयक अर्थशास्त्राचें बरेंचसें मंडन करतां येईल. स्वजनांना पुढें सारण्याच्या तत्वापेक्षां राज्याच्या कल्याणास अधिक महत्त्व दिलें गेलें तर बऱ्याचशा चालू कारभाराच्या बाबतींत क्रांतिकारक फेरफार आपल्या मुत्सद्यांस करतां येणार नाहींत. जेव्हां परक्या भारी पगाराच्या अधिकाऱ्यांचें आर्थिक दृष्ट्या समर्थन करितां येणार नाहीं, आणि नालायक असला तरी आपला आहे या भावनेनेंच सरकार इंग्रज नोकरांस देशी लोकांच्या वर बसवूं इच्छिल, तेव्हांच त्या नेमणुकी विरुद्ध किंवा बढतीविरुद्ध देशी लोकांना आक्षेप घ्यावा लागेल, तसल्या गोष्टीच असंतोषास कारणीभूत होतात. एवंच डोमिनियन स्टेटस हिंदुस्थानास मिळाल्यानें लायक इंग्रजांस उपद्रव होणार नाहीं व फक्त नालायक इंग्रजांस किफायत करून देण्याची प्रवृत्ति आहे

ती नष्ट होईल आणि येणेंप्रमाणें गुणोत्कर्षासच प्राधान्य मिळेल.

परंतु या सर्वांपेक्षां मोठा नैतिक फायदा म्हटला म्हणजे देशी लोकांचा विकास होय. जोंपर्यंत आपल्या अवनतीचें खापर इंग्रजांच्या डोक्यावर मारण्याची सोय आहे तोंपर्यंत लोकांकडून आपल्या उन्नतीसाठीं जोराचा प्रयत्न होणार नाहीं. पण ही सोय नष्ट झाली म्हणजे लोकांना हें भासेल कीं आतां जर आपण मागें राहिलों तर तें आपल्याच नालायकीमुळें राहिलों. आम्हांला ब्राह्मणांनीं मागें ठेवलें या तऱ्हेच्या वेड्या कागाळ्या ब्राह्मणेतर वर्ग आणि अस्पृश्य वर्ग करीत नाहीं काय ? तथापि त्या वर्गांस कायद्याच्या अडचणी आणि चालींच्या अडचणी जितक्या कमी होतील तितका त्या अडचणींचा अभाव त्यांच्या स्वयंप्रयत्नाला चेतना देण्यास उपयोगी पडणार नाहीं काय ? तीच गोष्ट सर्व हिंदी लोकांची आहे. विशेषत: मध्यम वर्गापैकीं जो वर्ग विचारतरंगांत व मनोराज्यांत मग्न होणारा, आपणांस राजकारण समजतें असें समजणारा आणि कर्तव्यतामूढ झालेला असेल त्या वर्गावर तर फारच इष्ट परिणाम होईल. एवंच स्वराज्याची चळवळ जी करावयाची ती हिंदुस्थान व साम्राज्य यांच्यामध्यें हेतुपुरस्सर सहकार्याची वाढ करण्यासाठीं, गुणाधिक्यास जगांत उत्कर्ष देण्यासाठीं, आणि प्रत्येक मनुष्यवर्गास आपल्या बऱ्यावाईट स्थितीबद्दल जबाबदार करण्यासाठीं आहे.

स्वराज्यप्राप्त्यर्थ ज्या कांहीं गोष्टी अवश्य आहेत आणि ज्यांच्यासाठीं उच्च राष्ट्रीय नीति अवश्य आहे त्यांमध्यें खालीं दिलेल्या गोष्टी मोडतात: —

( १ ) भारतीयांनीं राष्ट्रीय कर्जाबद्दल जबाबदारी घेणें.

( २ ) परकीय लोकांच्या सुरक्षिततेसंबंधानें परकीयांत विश्वास स्थापित करणें.

( ३ ) प्रगतिपर राष्ट्र राहील याबद्दल सर्व राष्ट्राचा आणि विशेषेंकरून आपल्या लोकांचा विश्वास उत्पन्न करणें.

( ४ ) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकसमूहांकडून आपणांवर जातिमूलक भावनेनें अन्याय होणार नाहीं असा हिंदुस्थानांतील लोकांचा विश्वास संपादन करणें.

( ५ ) देशाची राज्यव्यवस्था लोकांच्या स्वाधीन केल्यानेंच अधिक फायदेशीरपणें देशाशीं व्यवहार ठेवतां येईल अशी इंग्रज राष्ट्रास खात्री उत्पन्न करणें.

( ६ ) जातिविशिष्ट उच्चनीचतेची भावना नाहींशीं होऊन समतेची भावना इंग्रज लोकांत उत्पन्न होणें शक्य व्हावें या दृष्टीनें देशाची सामाजिक व रहाणीची सुधारणा करण्यासाठीं जोराचा प्रयत्न देशांत सुरू असणें.

( ७ ) इंग्रज व हिंदी या भावनेऐवजीं शासनविषयक ध्येयामुळें ज्या भावना उत्पन्न होतात त्यांचें महत्त्व राजकारणांत वाढविणें.

( ८ ) देशांत चळवळ अशी व्हावी कीं, देश अगोदरच स्वनिश्चित पुढाऱ्यांच्या तंत्रानें वागू लागावा.

( ९ ) देशास स्वराज्य दिल्यानें इंग्लंडचें नुकसान न होतां फायदाच होईल अशी इंग्लंडची व हिंदुस्थानाची खात्री व्हावी हेंहि अवश्य आहे.

( १० ) स्वराज्य मिळालें तरी इंग्लंडशीं संयुक्तता राहण्याबद्दल देशांत आत्महितमूलक उत्कट इच्छा जागृत रहावी हेंहि अवश्य आहे.

या सर्व गोष्टी नीट लक्षांत ठेवून चळवळ चालविली तर ती चळवळ उच्च प्रकारच्या सार्वराष्ट्रीय आणि साम्राज्यीय सुधारणेच्या कार्यक्रमांतील भाग होईल.

देशांत उत्पादन वाढविणें, व्यापार वाढविणें आणि त्यासाठीं आगगाड्या वगैरे चालू करणें यांची जबाबदारी आज देशी लोकां-

वर नाहीं आणि त्यामुळें देशाकरितां कर्ज मिळविणें लंडन, न्यूयॉर्क येथील रोकडबाजारांत आपली पत वाढविणें, यांचें महत्व आपणांस भासलें नाहीं. जर ती जबाबदारी देशी लोकांवर असती तर त्या कार्यासाठीं शिस्तीनें व कुशलतेनें राज्यकारभार करण्यास लायक माणसें आपल्या लोकांनींहि परदेशांतून आणलीं असतीं. परंतु ती जबाबदारी नसल्यानें आपल्या लोकांनीं परदेशामध्यें आपली पत कशी वाढेल किंवा आहे ती कशी राखतां येईल, यासंबंधानें विचारच केलेला नाहीं. आणि त्यामुळें इंग्रज लोक येथें येऊन फार पगार खातात ही एकच गोष्ट आपणांस दिसत आहे व त्यामुळें सरकारचा रागहि येत आहे. तथापि हा राग कायमचा टिकेल असें मुळींच नाहीं. जसजसें स्वराज्य अधिकाधिक मिळत जाईल तसतसे दोन परिणाम होतील. एक तर आपल्या देशांतील कारखानदार व कार्यप्रवर्तक, हे सरकारसंस्थेचा उपयोग उद्योगवृद्धीसाठीं करूं लागतील आणि त्यांनीं काढलेले निरनिराळे उद्योग असें चहातील कीं ने आण अधिक सोपी व कमी खर्चांत व्हावी, आगगाड्या अधिक बांधल्या जाव्यात; आणि या गोष्टी शक्य होण्यासाठीं सरकारला कर्ज सुलभतेनें व कमी भावानें मिळावें, यासाठीं आणि इंग्लंड रोकडवाला देश असल्यामुळें आणि हिंदुस्थानास रोकड हवी असल्यामुळें इंग्लंडचा आणि हिंदुस्थानाचा संबंध जितका दृढ होत जाईल तितका बरा; आणि इंग्लंडला हिंदुस्थानाविषयीं आपलेपणाच वाटावा. या परिणामाच्या सिद्धीसाठीं आपल्या देशांतील कार्यप्रवर्तक झटतील, आणि इंग्रजी नोकरवर्ग बराचसा आपखुषीनें देशांत आणतील आणि इंग्लंडशीं संबंध अधिकाधिक निकट होण्याचा प्रयत्न करतील. या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे भारतीय स्वराज्य आणि सार्वराष्ट्रीय उच्च आर्थिक आयुष्याचा विकास यांमध्यें किती निकट संबंध आहे हें ध्यानांत येईल.

जे लोक स्वतंत्र समाजाचे नागरिक व्हावयाचे त्यांचीं अंतःकरणें स्वतंत्र असलीं पाहिजेत. ज्या परिस्थितीच्या योगानें स्वतंत्र बुद्धीचा आणि भावनांचा विकास होण्यास व्यत्यय येतो ती परिस्थितीच नाहींशी करण्याचा प्रयत्न आपणांकडून झाला पाहिजे. स्वातंत्र्याच्या विकासास अपकर्षक ज्या अनेक गोष्टी आहेत त्यांत वैयक्तिक दुराग्रह हा प्रमुख होय. भिन्न मताचा किंवा आचाराचा उपमर्द करण्याची बुद्धि कमी होऊन दुसऱ्याच्या हक्काची जाणीव आपण दाखविणें यासारखी आपली मानसिक सुधारणा होत गेली पाहिजे. आपणा स्वतःस आपल्या विचारानें चालण्याचा हक्क जर हवा आहे तर तो हक्क आपण दुसऱ्यासहि दिला पाहिजे. आपल्या धार्मिक किंवा नैतिक समजुती आपण दुसऱ्यावर लादाव्या आणि दुसऱ्यानें त्या स्वीकारल्या नाहींत तर त्याचा छळ करावा ही बुद्धि उपयोगाची नाहीं. स्वतःच्या वागणुकीसाठीं व्यक्तीनें वाटेल तितका कठोर नियम आचरावा. पण दुसऱ्यासंबंधीं आपल्या अपेक्षा अत्यंत नियमित ठेवाव्यात. व्यक्तीनें वाटेल तर चहाहि पिऊं नये. पण दुसरा मधूनमधून दारू पितो किंवा मांसाहार करतो त्यास त्रास देऊं नये किंवा त्याचा उपमर्द करूं नये. दुसरी व्यक्ति मित्रच असेल तर प्रसंगीं उपदेशाचे चार शब्द बोलले तर तें ठीकच होईल; पण आपण दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा ज्यानें अपकर्ष होईल त्यापासून अलिप्त राहिलें पाहिजे. दुराग्रही समाज स्वतंत्र अंतःकरणाची जोपासना राष्ट्रांत करूं शकणार नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

एवंच लोकांमध्यें नैतिक आणि आर्थिक उच्च आयुष्यक्रमाची आवड अधिकाधिक वाढत गेली पाहिजे.

आपल्या चळवळीचें क्षेत्र केवळ सरकारी नोकरांबाहेरचा लोकसमाज करून चालावयाचें नाहीं सरकारी नोकरवर्गामध्यें उच्च ध्येयांचा प्रसार केल्याशिवाय रहाणें ही फार मोठी चूक होईल.

आपल्या लोकांचा दर्जा वाढवावयाच्या कार्यक्रमांत आजच्या सरकारी नोकरांनां अधिक कार्यक्षेत्र द्यावयाचें हा महत्वाचा भाग आहे. आणि तो कार्यक्रम व तदनुरूप सुधारणा आजच्याच नोकरवर्गांत झाल्याशिवाय पार पडणार नाहीं.

स्वराज्यासाठीं जी चळवळ करावयाची तींत सरकारी देशी नोकरांच्या पूर्व संस्काराचा विचार करतां आज त्या वर्गाकडे लक्ष देण फारच जरूर आहे, असें दिसून येईल. परकी नोकरशाही नको. हुद्यावर देशी लोक असले पाहिजेत म्हणून चळवळ करावयाची तींत सरकारी नोकरांकडे लक्ष द्यावयाचें नाहीं असें कसें करून चालेल. खरोखर ही चळवळ त्यांच्या फायद्यासाठीं आहे. आणि यासाठीं देशी नोकरवर्गानेंहि या चळवळीकडे सस्नेह अवलोकन केलेंच पाहिजे. एवढेंच नव्हे तर कायदेशीर मर्यादेंत स्वराज्यप्राप्तीसाठीं मदतहि केली पाहिंजे. त्यांनां सरकारविरुद्ध जेव्हां चळवळ होईल तात भाग घेतां येणार नाहीं, व घेणेंहि योग्य होणार नाहीं; तथापि तेवढ्यानें त्यांच स्वराज्यविषयक कर्तव्य चुकतें असें म्हणतां येणार नाहीं. स्वराज्य पाहिजे म्हणजे देशी नोकरांचा दर्जा वाढवावयास पाहिजे, तो वाढविण्याची त्यांनींच मोठ्या निकरानें खटपट केली पाहिजे. त्यांनीं जी खटपट करावयाची ती कांहीं अंशीं खातेशाहींतल्याच राजकीय चळवळीच्या स्वरूपाची तर कांहीं अंशीं नैतिक अशी आहे. स्वराज्यप्राप्तीन त्यांच्या हातीं अधिकार जास्त येत जाणार तर त्या अधिकाराला लायख अशी वृत्ति बनली पाहिजे म्हणजे जें काम पुढें येईल तें सद्सद्विवेकबुद्धीस अनुसरून आणि निर्भयपणानें करण्याची संवय त्यांनीं वाढविली पाहिजे. त्यांची आजपर्यंत स्थिति अशी होती कीं वरिष्ठ अधिकाऱ्यांची कृपा हेंच त्यांचें सर्वस्व. जेव्हां वरिष्ठ अधिकारी खालून मत मागवितो तेव्हां साहेबाला काय वाटतें, त्याचें काय मत आहे हें जाणून त्याप्रमाणें

आपलें मत लिहून पाठवावयाचें, या तऱ्हेच्या हुजरेपणांत तयार झालेलें मन एकाएकीं निर्भय, लोककल्याणपर व दूरदृष्टीनें आणि व्यापकपणानें विचार करणारें होत नाहीं. वरिष्ठास जो मनुष्य अप्रिय असेल तो पूर्णपणें निर्दोषी असला तरी निर्भयपणानें त्याचा पक्ष घेण्याचें धैर्य तर दूरच. तर आपण ज्या परिस्थितींत वाढत आलों ती सदोष आणि विचारस्वातंत्र्यास घातक होती याची पूर्णपणें जाणीव ठेवून कर्तव्यैकपरायणतेची जोपासना करण्याची संवय सरकारी नोकरांनीं ठेविली पाहिजे. ता जर ठेवली नाहीं तर खरोखरच ते स्वतंत्र लोकांच्या लोकसत्ताक राज्याचे नोकर होण्यास लायख नाहींत. ते स्वराज्यद्रोही होत. कां कीं स्वराज्यसंस्थेचा चांगुलपणा सिद्ध करण्याच्या प्रयत्नास अपकर्षक प्रयत्न करणारे ते प्राणी होत; आणि त्यांसारख्या लोकांच्या बढतीसाठीं स्वराज्याचे प्रयत्न खास नाहींत.

देशी सरकारी नोकरांना कर्तव्यैकदृष्टीनें काम करणें हें सोपें मात्र नाहीं. जुन्या संवयी एकदम जाणार नाहींत, ही एक गोष्ट झाली; पण दुसरी एक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांचें निर्भयत्व अधिकाधिक स्थापन झालें पाहिजे. म्हणजे एखादी गोष्ट सदसद्विवेकदृष्टीनें आणि धैर्यानें केली आणि ती वरच्या यूरोपीय अधिकाऱ्यांस नको असली तर तीसाठीं शेवटपर्यंत भांडण्यास त्यांस धैर्य पाहिजे. त्यांनीं हा विचार करावा कीं जसजसें देशी लोकांचें महत्त्व राजकारणांत वाढत जाणार तसतसें वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांचें लक्ष केवळ पगाराकडे रहाणार, तत्त्वांकडे राहणार नाहीं. यासाठीं उच्च तत्त्वें उराशीं बाळगणें आणि देशाचा कारभार साम्राज्याच्या इभ्रतीला शोभेल असा राखणें हें त्यांचें काम आहे. शिवाय त्यांनीं हेंहि लक्षांत ठेवावें कीं आम्हीं स्वयंनिर्णयी मंडळी स्वातंत्र्याचें निर्भयतेचें आणि एकमेकांवर विश्वासाचें वातावरण सर्वत्र पसरवीत आहों; असें

असतां अधिकारी उच्चभावनांशिवाय असेल या भीतीनें स्वतःच्या उच्चभावना दडपून टाकण्याचें कारण नाहीं.

देशी अधिकाऱ्यांमध्यें राजकीय चळवळ कोणत्या प्रकारची असावी, याविषयीं कांहीं विचार केले पाहिजेत. प्रथमतः त्यांनीं आपल्या वर्गाचे संघ स्थापन केले पाहिजेत, आणि प्रगमनशील राष्ट्र व्हावें यासाठीं खटपट चालविली पाहिजे.

या संघाचा उद्देश केवळ पगारवाढ हा नसावा. तर आपल्या धंद्यांत सुधारणा करणें, शेजारचीं सुधारलेलीं सरकारें लोकसुधारणे-साठीं ज्या गोष्टी करीत आहेत त्याविषयीं चर्चा करणें आणि राष्ट्रीय व सार्वराष्ट्रीय लोकमतास आपण जबाबदार आहों या कल्पनेचा नोकरवर्गांत विकास करणें, नोकरवर्ग केवळ हुकूम बजावणारा न बनतां हुकुमाच्या पाठीमागें जें तत्त्व आहे तें ओळखणारा बनेल असें करणें, इत्यादि हेतु सरकारी नोकरांच्या संस्थांमध्यें असावेत. राज्यव्यवस्थाशास्त्राची जोपासना करणाऱ्या संस्था व मासिकें यांनीं सुरू करून विचारास चालन द्यावें. हीं सुरू झालीं तर त्यांचे दोन परिणाम होतील. देशी अधिकारी लोकांनां आपले शासनविषयक विचार मांडण्यास स्थान उत्पन्न होईल आणि यूरोपियन अधिकाऱ्यांस आपली शासनविषयक खटपटीमध्यें उच्चता दाखवावयाची असल्यास त्यांसहि क्षेत्र उत्पन्न होईल. शासनविषयक प्रश्न नेहमीं सरकारी नोकरवर्गासच प्रथम कळणार, त्यांच्याकडून ते जनतेला कळणार, आणि ते शासनविषयक प्रश्न अधिकारीवर्ग कशा रीतीनें सोडवि-णार हें कळलें म्हणजे त्यांत बरें वाईट काय आहे, सरकारी योजना विशिष्ट वर्गास सहायक किंवा बाधक कशी होते तें जनता कळविणार. आज शासनविषयक संस्थांचा विचार करणारा, निर-निराळ्या देशांत काय चाललें आहे तें लक्षपूर्वक पाहणारा आणि आपल्या देशांतील खात्यांत सुधारणा करूं पहाणारा असा वर्ग देशी

नोकरवर्गांत कितपत सांपडेल! खात्याचा अभिमान धरून खात्यामध्यें श्रेष्ठता उत्पन्न व्हावी यासाठीं खटपट करणारे लोकहि अजून बहुतेक यूरोपियनच आहेत.

देशी नोकरवर्गास हे पाजी नोकरशाहीचे हस्तक म्हणून अस्पृश्यांसारखें वागवावें ही जी विचारपद्धति आपल्यांतील कित्येक देशभक्तांकडून प्रगट केली जाते ती जरी आम्हांस मुळींच पसंत नाहीं तरी देशी नोकरमंडळी आपणामध्यें उच्च ध्येयांची आणि उच्च प्रकारच्या लायखीची जोपासना पद्धतशीरपणें करीत नाहींत हें म्हटल्याविना मात्र रहावत नाहीं. राजकीय चळवळ करणारांनीं चळवळ करावी, आमच्या मदतीसाठीं धडपडावें, आम्हीं मात्र त्या चळवळीस मुळींच मदत करणार नाहीं, एवढेंच नव्हे तर आपली लायखी वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्नहि करणार नाहीं, या तऱ्हेची भावना जर आजचे तरुण सरकारी नोकर इतःपर चालू ठेवणार असले तर स्वराज्य मिळालें तरी आम्हांस आपखुषीनें परकी नोकरशाही ठेवण्यास ते भाग पाडतील, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे. देशी नोकरवर्गानें उच्च पदवी आपल्या लायखीवरच मिळविली पाहिजे. त्यांची केवळ देशी म्हणून बढती होऊं देऊं नये, इतकी प्रगतीची आणि लोकसुधारणेची आवड राजकारणांत पडणाऱ्या सुशिक्षित वर्गानें जोपासविली पाहिजे.

प्रस्तुत विषयाचें विवेचन पूर्वोक्त विचार व्यक्त केल्यानें पुरें झालें असें नाहीं, तथापि आतांपर्यंत केलेलें विवेचन सूत्ररूपानें पुन्हां सांगतों.

( १ ) स्वराज्यप्रीत्यर्थ चळवळ ही भिन्न राज्यस्थापक चळवळ नसून सामाजिक आणि राजकीय अंतस्थ सुधारणेची चळवळ आहे आणि तिचें स्वरूप अस्पृश्योद्धाराच्या चळवळीहून स्वरूपदृष्टीनें भिन्न नाहीं.

( २ ) समाजांतील अन्योन्याश्रयाची जाणीव हें या चळवळीचें बल होय. या अन्योन्याश्रयाची जाणीव ठेवून संघटना एकसारखी करीत जाणें हें काय होय.

( ३ ) ही चळवळ करतांना जी संघटना करावयाची तिच्या यशस्वितेसाठीं सर्व समाजांत निर्भयता उत्पन्न झाली पाहिजे आणि या निर्भयतेच्या विकासासाठीं चळवळीचा कायदेशीरपणा आणि या प्रकारच्या चळवळीनें इंग्लंड व हिंदुस्थान या दोहोंचा फायदा आहे ही गोष्ट ही लोकांच्या मनांत बाणलीं पाहिजेत.

( ४ ) भारतीय स्वराज्यानें भारतीयांचा इंग्लंडवर विश्वास वाढेल आणि कांहीं अर्थशास्त्राच्या स्वाभाविक नियमांचा अतिक्रम करून विशिष्ट धंदे पोसण्याचा प्रयत्न करण्याची घातुक चूक करण्याचा इंग्लंडला कमी मोह उत्पन्न होइल; आणि भारतीयांच्या बुद्धिपुरस्सर सहकारितेचा लाभ साम्राज्यास होईल. या गोष्टी लक्षांत घेतां स्वराज्याचा प्रयत्न जागतिक इष्ट विकासाचा एक भाग आहे.

( ५ ) असहकारिता किंवा सहकारिता यशस्वी तऱ्हेनें करण्यासाठीं, आणि तदर्थ घटना करावयाची ती शक्य होण्यासाठीं लोकांचा पुढाऱ्यांवर किंबहुना स्वतःवर विश्वास वाढला पाहिजे.

( ६ ) आपली सव चळवळ अत्यंत शुद्ध नीतीच्या मार्गानेंच करण्याचा निश्चय झाला पाहिजे. उच्च ध्येयानें, उच्च नीतीनें पुढाऱ्यांनीं वागण्याचा आणि आपल्या हाताखालील लोकांस वागविण्याचा निश्चय केला, आणि सर्व सुशिक्षित जनतेंत उच्च नैतिक अपेक्षा उत्पन्न केल्या तरच लोकांत आत्मविश्वास उत्पन्न होऊन संघटनेस जोर येईल. एऱ्हवीं येणार नाहीं.

( ७ ) लोकांत धैर्य, निर्भयता इत्यादि गुणांचा विकास झाल्याशिवाय स्वराज्यासाठीं योग्य प्रयत्न लोकांकडून होणार नाहीं, आणि

या गुणांचा विकास परमतसहिष्णुतेशिवाय होणें शक्य नाहीं. यासाठीं देशांत परमतसहिष्णुता वृद्धिंगत झाली पाहिजे.

( ८ ) ज्याअर्थी शासनतंत्रांतील उच्च जागांवर भारतीयांची अधिक भरती करण्याची सुधारणा आपण करूं पहातों, त्याअर्थी आज जे सरकारी नोकर आहेत त्यांच्यामध्यें नैतिक जबाबदारी, आणि नैतिक निर्भयत्व हीं स्थापन झालीं पाहिजेत. यासाठीं चळवळ त्यांत वाढविली पाहिजे.

( ९ ) जगाचा हिंदुस्थानांतील लोकांच्या कर्तृत्वावर, दानतीवर, प्रगमनशीलतेवर, विश्वास वाढल्याशिवाय हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याची योजना इंग्लंडांतील जनताच काय पण जगांतील कोणतेंच राष्ट्र कबूल करणार नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेऊन अर्वाचीन सुधारणांच्या प्रसाराकडे दृष्टी ठेवली पाहिजे.

या अनेक नैतिक सुधारणा स्वराज्य प्राप्तीसाठीं अवश्य आहेत म्हणून सांगितलें त्यावरून असे समजावयाचें नाहीं कीं, देशाचा नैतिक बदल झाल्याशिवाय स्वराज्याची मागणीच करावयाची नाहीं व स्वराज्य मिळणेंहि शक्य नाहीं. कांकीं, या बऱ्याचशा सुधारणांनां राजकीय महत्त्वाकांक्षेशिवाय किंवा उन्नत्तीशिवाय चोदनाहि प्राप्त होणार नाहीं. हीं नैतिक तत्त्वें सांगण्याचा हेतु एवढाच कीं, जो स्वयंनिर्णयी संघ आपल्या अंगावर स्वराज्यस्थापनेची जबाबदारी घेत आहे तो कोणतें नैतिक ध्येय धरून एकत्रित व्हावयाचा आहे हें लोकांस कळावें व त्याच्या नीतितत्त्वांशीं जनतेनें सहकारिता करावी.

---

17 MAR 1990

# प्रकरण ७ वें.

## इंग्लंडचें हित हिंदुस्थानाविरुद्ध आहे काय ?

मागच्या प्रकरणांत स्वराज्यप्राप्तीसाठीं करावयाच्या प्रयत्नांचीं जीं तत्त्वें सांगितलीं त्यांत प्रयत्न करणाऱ्यांच्या मनांत निर्भयत्व पाहिजे ही गोष्ट प्रामुख्यानें सांगितली, आणि तें निर्भयत्व उत्पन्न होण्यास आपणांस वस्तुस्थितीच्या पृथक्करणानें कशी मदत होईल हें सांगितलें. त्यांत असें दाखविलें आहे कीं स्वराज्याची चळवळ म्हणजे भिन्न-राज्यस्थापक चळवळ नाहीं. तर मागासलेल्या वर्गास पुढें आणण्याची आणि देशांतील अंतस्थ कारभार ज्या वर्गाच्या तंत्रानें चालतो तो वर्ग बदलण्याची साधीच चळवळ आहे. त्याबरोबर हेंहि सांगितलें कीं ही चळवळ हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही देशांस फायदेशीर आहे, म्हणून तींत यशःप्राप्ति ही ठेवलेलीच आहे.

**इंग्लंडच्या हिताच्या परीक्षणाची आवश्यकताः**—हिंदुस्थानास अंतर्गत पूर्ण स्वातंत्र्य हें इंग्लंडच्या खऱ्या हितास विघातक नाहीं, या प्रश्नाचें विवरण अधिक केलें पाहिजे. आणि यासाठीं जेतृ-जितसंबंधाचें अर्थशास्त्र विवेचिलें पाहिजे. या अर्थशास्त्राच्या अंगांच्या स्पष्ट आणि अस्पष्ट ज्ञानानें राजनीतींत फेरबदल कसे होतात, व इंग्लंडच्या राजनीतींत कसे झाले याच्याकडे लक्ष दिलें पाहिजे. या प्रश्नाच्या सोपपत्तिक विवेचनाची आवश्यकता आहे. कां कीं, प्रत्येक व्यवहारांत तो यशस्वी तऱ्हेनें करण्यासाठीं आपण ज्याशीं तो व्यवहार करूं इच्छितों त्याच्या कार्यपद्धतीची, मनोरचनेची आणि हिताहिताची माहिती पाहिजे. आपण जेव्हां एखाद्याबरोबर करार करूं इच्छितों तेव्हां त्या कराराचें विशिष्ट स्वरूप दुसऱ्या पक्षाच्याहि

हिताचें आहे असें आपण त्यास भासवावयास पहातों. प्रसंगीं जेव्हां आपण चिरकाल टिकणारा संबंध उत्पन्न करूं पहातों तेव्हां तर दुसऱ्या पक्षाचें विनाकारण नुकसान होणार नाहीं ,उलट त्या पक्षास तो फायद्याचाच होईल हेंहि आपणांस पहावें लागतें. दुसऱ्या पक्षाच्या मनोवृत्तीची व तीपासून उत्पन्न होणाऱ्या त्याच्या कार्यक्रमाची जाणीव असणें सामान्य व्यवहारांत जितकें अवश्य आहे त्यापेक्षां राजकारणांत अधिकच अवश्य आहे, कारण राजकारण म्हणजे अब्जावधि रकमेचा व्यवहार होय. ज्या योजनेंत उभयतांचें हित असतें ती योजना टिकते, अन्य टिकत नाहीं. म्हणून दुसऱ्या पक्षाचेंहि हिताहित समजून घेतलें पाहिजे. मित्रत्वाचा किंवा व्यावहारिक कराराचा संबंध जोडतांना आपणांस जसें दुसऱ्या पक्षाचें हिताहित पहावें लागतें तसेंच आत्महितस्थापनासाठीं राजकारणांतील दुसऱ्या पक्षाशीं संग्राम करण्याच्या योजनेंतहि पाहिलें पाहिजे. प्रत्येक संग्रामाचा हेतु पूर्वींच्या करारांनीं किंवा अन्य कारणांनीं उत्पन्न झालेले संबंध बदलण्याचा असतो. एका पक्षास संबंध ज्या स्वरूपांत पाहिजे त्या स्वरूपांत तो करण्यास दुसरा पक्ष अनुकूल नसतो. तेव्हां इष्ट हेतु साध्य करण्यास लढाई न करतां तडजोडीचा प्रयत्न अगोदर होत असतो व त्यांत वकिली करण्याकरितां गेलेला मुत्सद्दी त्यास साध्य करून घ्यावयाची गोष्ट उभयतांच्याहि हिताची असल्यास त्या बळावरच ती साध्य करूं शकतो. हिंदुस्थानास स्वराज्य ही गोष्टहि उभयतांच्या हिताच्या तत्त्वावरच आपणांस साध्य करून घेतां येईल.

आपण स्वराज्य मिळविण्याचें एक कर्तव्य उत्पन्न करून बसलों आहों तर आपलें स्वराज्याचें ध्येय साध्य होण्यासाठीं आपणांस जो प्रयत्न करावयाचा तो करतांना आपणांस असें पाहिलें पाहिजे कीं तें ध्येय पार पाडण्यास इंग्लंडचा हितसंबंध आडवा येत आहे काय?

आपणांस स्वराज्य देण्यांत इंग्लंडचें नुकसान होत असेल, तर तें कोणच्या बाबतींत होत आहे ? आपणांस स्वराज्य देण्यांत इंग्लंडचें नुकसान होत असेल तर इंग्लंड आपणांस स्वराज्य देण्यास फारसें प्रवृत्त होणार नाहीं. जर त्यांत इंग्लंडचें नुकसान नसून हितच असलें तर आपणांस आपली स्वराज्याची योजना इंग्लंडला स्वीकारावयास लावणें सोपें होतें. जर इंग्लंडचें आम्हास स्वराज्य देण्यांत हित असलें तर त्या प्रकारच्या विचाराचा प्रसार करून इंग्लंडच्या विचारांत बदल करणें हें आपलें महत्त्वाचें कर्तव्य होतें. यासाठीं इंग्लंडच्या हिताहिताचेंच परीक्षण आपणांस केलें पाहिजे. हिताहिताचें चांगलें पृथक्करण अज्ञानमूलक खोटीं भयें घालवील.

माझें मत असें झालें आहे कीं, हिंदुस्थानास स्वराज्य देणें ही गोष्ट इंग्लंडच्या हिताचीच आहे, आणि जगांत एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करणें ही गोष्ट दोहोंसहि विघातक आहे; हिंदुस्थानला स्वराज्य दिलें तरी हिंदुस्थान आत्महितसाधनेसाठीं इंग्लंडला घट्ट धरून ठेवील; हिंदुस्थानला स्वराज्य चांगलें चालवितां आलें, हिंदुस्थानाची पत जगाच्या रोकडबाजारांत इंग्लंडइतकी राहिली व हिंदुस्थानामध्यें प्रगतिपर धोरण राहिलें, आणि इंग्लंडला लढाईच्या प्रसंगीं हिंदुस्थानाची सहकारिता चांगल्या तऱ्हेनें करतां येण्याजोगी स्थिति राहिली तर हिंदुस्थानाला स्वराज्य देण्यांत इंग्लंडचें नुकसान नाहीं, आणि ही गोष्ट इंग्लंडला पटविणें शक्य आहे व सुलभहि आहे. व हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याला मुख्य अडचण जर सध्यांच्या नोकरशाहीच्या चालू स्थितींतील किफायतीमुळेंच असली तर ती अडचणहि फारशी नाहीं. कां कीं स्वराज्य मिळालें तरी आपले प्रतिनिधि देखील दहा पंधरा वर्षेंपर्यंत हा सरकारी नोकरांचा वर्ग ठेवतील, आणि इंग्लंडमधील मध्यम वर्गास काम करण्याची संधि, महत्त्वाकांक्षी व अनेक व्यवहार वाढवूं इच्छिणाऱ्या

हिंदुस्थानांत वाढणारच आहे, कमी होणार नाहीं. तरी इंग्रज मध्यम वर्गाची हिंदुस्थानांत नोकरी करण्याची संधि थोडी कमी झाली तरी त्यामुळें त्या वर्गाचें फारसें नुकसानहि होणार नाहीं, इतकें व्यापक कार्यक्षेत्र त्यांस येथें सरकारी नोकरीच्या बाहेरहि आहे.

**इंग्लंडच्या साम्राज्यविषयक नीतिचा विकासः**—इंग्लंडची साम्राज्यविषयक नीति हळू हळू विकास पावत आहे. तिची पूर्तता केवळ इंग्लंडकडून होणें शक्य नाहीं. या नीतिशास्त्राची पूर्तता भारतीयांकडूनच व्हावयाची आहे. सदृश राष्ट्रांच्या समुच्चयाऐवजीं सदृश आणि विसदृश राष्ट्रें यांचा अनोन्यहितपर संबंध कसा पूर्णत्वास जाईल हे शासनशास्त्रांतील धडे जगास हिंदुस्थानच शिकवील. अनोन्यहितावर अगदीं भिन्न राष्ट्रांत संयुक्तता उत्पन्न करण्याचा हा प्रसंग नवीनच असल्यामुळें तो वाटल्यास अपूर्व समजावा. तथापि ज्या गोष्टी पूर्व कालांत अशक्य वाटत होत्या त्यांस आज अशक्य मानण्याचें कारण नाहीं.

इंग्लंडच्या हिंदुस्थानसंबंधींच्या नीतीचें स्पष्ट ज्ञान होण्यासाठीं आपणांस ज्या गोष्टी लक्षांत घ्यावयाच्या त्या केवळ विशिष्टकालीन गोष्टी लक्षांत न घेतां अनेक काळाच्या गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत, म्हणजे राजकीय बाबतींत नीतिविकास कसा होत गेला हें लक्षांत येईल, आणि त्या विकासाचीं पुढील कोणतीं अंगें आपण पूर्ण केलीं पाहिजेत हें समजेल.

जेतृजितभाव हा जगांत कायमचा वस्ती करण्यास आला नाहीं. जगांत स्थिर असें कांहींच नसतें. आपण मृताचें दुःख किंवा प्राप्तीचा आनंद हीं काल लोटल्यानंतर विसरतो, तसेंच राष्ट्राराष्ट्रांतील अरिमित्रभावाचें आहे. ज्याविषयीं आज द्वेष वाटत आहे त्याविषयीं उद्यां वाटेनासा होतो. आज जी नीति द्वेषानें ठरविली जाते ती उद्यां वाईट ठरली जाते. या प्रवृत्तीमुळें राजनीतींतहि फरक होत असतो. जेत्याची जिता-

2 SEP 1996

विषयीं राजनीति आपण तपासूं लागलों तर तींत कांहीं विकास दृष्टीस पडतो. आज जे जेतृजितसंबंध असतात ते जाऊन उद्यां एका अवयवीचे आपण दोघे अवयव आहों अशा भावनेचे संबंध उत्पन्न होतात, हें परिवर्तन एका प्रदेशानें दुसरा सदृश प्रदेश जिंकला असतां फारच लवकर दिसूं लागतें. उदाहरणार्थ अमेरिकेंतील उत्तरेकडील संस्थानांनीं दक्षिणेकडील संस्थानें जिंकून घेतलीं तीं घ्या. आज त्यांत जेतृजितभाव कोठें आहे. दोघेहि लोक एकाच रक्ताचे आहेत तरी द्वेषभाव अगदींच नव्हता असें मात्र नाहीं, कां कीं दक्षिण जिंकल्यानंतर मध्यवर्ती सरकारनें दक्षिणेकडील गोऱ्या लोकांवर त्यांस ज्या जातीचा द्वेष वाटे त्या निग्रो जातीचे अधिकारी पाठविले होते. तथापि आज आपण जिंकलेले लोक आहोंत असें दक्षिण संस्थानांतील नागरिकांस वाटत नाहीं किंवा आपण जिंकणारे आहोंत असें उत्तरेकडील नागरिकांस वाटत नाहीं.

या सर्व गोष्टी सदृश लोकांपुरत्या बरोबर आहेत. पण प्रश्न असा उत्पन्न होतो कीं जे लोक विसदृश आहेत त्यांच्या मध्यें जेते व जित ही भावना कमी कशी होणार, आणि जेता वर्ग सदृशांस जरी सारख्या योग्यतेनें वागवावयास तयार झाला तरी तो विसदृश लोकांसंबंधानें साधुत्वाची नीति कशी आचरील. विसदृशांस आपलेपणानें वागविण्यांत त्याचें हित काय आहे. याच्या स्पष्टीकरणासाठीं जेत्याच्या कार्यक्रमांतील स्वाभाविक क्रियांचें ज्ञान मिळविलें पाहिजे आणि त्यांत जित लोकांचें विसादृश्य, भिन्न नीति कोणत्या बाबतींत आणि ती कां आचारावयास लावते याचें अवगमन केलें पाहिजे.

याचें तात्त्विक विवेचन करतांना पूर्वानुभवास कितपत महत्त्व द्यावयाचें याचा विचार झाला पाहिजे. आमच्या मतें पूर्वकृत्यांवरून पुढचें धोरण निश्चित करतां येतें या नियमास कांहीं स्पष्ट मर्यादा आहेत; आणि त्या लक्षांत घेतल्याशिवाय नियम तयार करणें आणि

त्यावरून भवितव्य वर्तविणें योग्य होणार नाहीं. समाजशास्त्रीय आणि शासनशास्त्रीय तत्त्ववेत्त्यानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं जिंकणाऱ्या देशाचीं पूर्वींचीं दुष्कृत्यें त्यांना, किंवा त्या राष्ट्रांतील कालपरवांच्या किंबहुना आजच्या मुत्सद्यांच्या विचारांना जें महत्त्व द्यावयाचें तें फारच जपून द्यावें. त्या मुत्सद्यांचे आजचे विचार आहेत ते कायमचे नाहींत. हिताहितविषयक त्यांच्या कल्पना काल होत्या त्या आज नाहींत, आणि आज आहेत त्या उद्यां रहाणार नाहींत. प्रत्येक राष्ट्र शासनविषयक कौशल्य पूर्वानुभवानें अधिकाधिक शिकत आहे. राष्ट्रांच्या शासनविषयक कल्पनांत एकसारखा फरक पडत चालला आहे. वर्गविषयक भावना आणि स्त्रीपुरुषांदि भावना यांचें शासनव्यवहारांत महत्त्व कमी होत चाललें नाहीं काय? फायदा कशांत आहे याविषयींच्या कल्पनांत फरक झाल्यास एकतंत्री राजाच्या व्यवहारांतहि फरक पडतो. एखादा राजा प्रजेला लुटणारा निघतो पण त्यामुळें त्यास पुढें असें दिसून येतें कीं त्याच्या तसल्या कृत्यांवरून धनाढ्य लोक त्याच्या राज्यांत निवास करूं इच्छीत नाहींत, आणि व्यापार मंदावतो आणि त्यामुळें त्यास पद्धतशीर राज्यव्यवस्थेचें महत्त्व कळून येतें. स्वदेशशासनविषयक नीतींत जसा याप्रमाणें फेरफार होत जातो तसाच तो अन्यदेशशासनविषयक नीतींतहि होतो.

लोभमूलक कल्पनांनीं किंवा स्वदेशांतील उद्योगसंस्थांच्या अभिमानानें इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं हिंदुस्थानच्या वृद्धीस अवरोध केला हा जरी आजचा अनुभव आहे तरी देखील ती क्रिया हळूहळू बंदच होत जाईल असें आम्ही म्हणतों. देशांतील विशिष्ट वर्गाच्या हितासाठीं देशांतील इतर वर्गांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्याची क्रिया त्यांच्या देशांतहि झाली आहे, व या चुका अज्ञानमूलक आहेत. व हिंदुस्थानाविरुद्ध जी दुष्ट राजनीति आचरली गेली, ती त्या प्रका-

रच्या अज्ञानाचाच परिणाम आहे. सरकारच्या शासनशास्त्रीय ज्ञानाची संपत्ति जेव्हां कमी असते तेव्हां सरकाराकडून जशा स्वदेशशासनविषयक घातुक चुका होतात तशा त्या अन्यराष्ट्रशासनांतहि होतात, आणि त्यासाठीं पूर्वी ज्या प्रकारची नीति अदूरदृष्टीनें इंग्लंडनें वापरली ती नीति इंग्लंड पुढें वापरलीच असें समजण्याचें कारण नाहीं, कांकीं भारतचौर्याच्या तत्वावर रचलेली राजनीति सत्फलदायी नाहीं असें त्यांस लवकरच आढळून येईल, व त्यांची हिंदुस्थानविषयक नीति आत्माहितभावनेनेंच पण अत्यंत उदारपणाची होईल ही शक्यता आहे. एवढेंच नव्हे तर माझ्या मतानें ती भवितव्यता आहे.

जेत्याच्या नीतींत फरक होत जातो तो तसा होत जाण्याचीं कारणें अनेक आहेत त्यांपैकीं कांहीं येथें देतों.

( १ ) प्रदेशाचें उत्पन्न वाढविण्याचें धोरण.

( २ ) जेत्याच्या प्रदेशाचा जिंकलेल्या प्रदेशाशीं व्यापार वाढणें.

( ३ ) जेत्याच्या गृह्य कारभारावर ज्या वर्गाचें दडपण पडतें त्यांत फरक होत जाणें.

( ४ ) जित प्रदेशांत भिन्न राज्यस्थापक चळवळी नाहींशा होणें.

( ५ ) जित प्रदेशाच्या अंतःकरणपूर्वक सहकारितेचें महत्त्व वाढणें.

( ६ ) स्वार्थाची कल्पना अधिक व्यापक होणें. जिंकलेल्या प्रदेशामार्फत आपलें आर्थिक हित वृद्धिंगत करण्यासाठीं त्यांचा विकास करण्याची आवश्यकता भासणें.

वरील सहाहि मुद्दे विस्तृतपणानें विवेचिण्याजोगे आहेत. त्यांवर अधिक लिहिण्यास अवकाश नाहीं. तथापि वाचकांनीं त्यांवर स्वतः विचार केला असतां ते सहज लक्षांत येतील.

जर भारतीयांच्या विकासावरच इंग्लंडचें हित अवलंबून असेल तर भारतीय विकासाकडे इंग्लंड लक्ष देईल, आणि भारतीयांच्या नुकसानीनें जर इंग्लंडचा फायदा होणार नसेल तरच इंग्लंड हिंदु-

स्थानची नुकसानी टाळील. मनुष्य परहिताच्या हेतूनें प्रेरित होऊन कार्यें फारच क्वचित् करतो, आणि राष्ट्राची नीतीहि परहितपर हेतूनें प्रेरित न होतां स्वार्थाच्या हेतूनेंच प्रेरित असते, तरी अन्योन्याश्रयी व्यवहारांत स्वार्थाच्या हेतूचें जें परहितपर कार्य होतें तें थोडेंथोडकें नसतें. इंग्लंडचें हित जर हिंदुस्थानाच्या विकास करण्यांत आहे तर इंग्लंड आपला विकास करीलच; आपणांस ही धडपड कशाला करायला पाहिजे; अशी शंका कोणी उपस्थित करील तर त्यास उत्तर एवढेंच कीं, आत्महित विकारासाठीं जो देश अधिक धडपड करील त्याच्याशींच प्रथम सहकारिता करण्यांत इंग्लंडची शक्ति खर्च होईल, आणि हिंदुस्थान मागें पडेल, यासाठीं आपणांसच पुढाकार घेतला पाहिजे.

जेव्हां एखादा देश दुसरा देश जिंकण्याची खटपट करतो, तेव्हां त्याचा हेतु प्रथमतः केवळ लोभमूलक असतो व त्यामुळें तो तेथील द्रव्याची लूट करतो. परंतु तो पुढें त्या प्रदेशावर कायमचें राज्य करूं लागला म्हणजे त्याची प्रवृत्ति बदलते. व जित प्रदेशाशीं जिंकणाऱ्या प्रदेशाचा व्यवहार सुरू झाला म्हणजे जेत्याची वृत्ति आणखी बदलते. तो प्रदेश जिंकण्यापूर्वींचे हेतु व तो प्रदेश जिंकल्यानंतर जेता जी नीति आचरतो ती, यांमध्यें फरक होतो; जिंकल्यानंतर जेत्याची दृष्टी अशी होते कीं, जिंकलेला प्रदेश जिंकणाऱ्या राष्ट्राचें कायमचें बळ व्हावें. उदा० जेव्हां जिंकणाऱ्या देशाला आणखी विजयाचें काम करावयाचें असेल तेव्हां पूर्वीं जिंकलेल्या देशाची मदत व्हावी; आणि हा हेतु साध्य होण्यासाठीं जेता अनेक तऱ्हेचे उपाय योजितो.

जितांचा आपणांस उपयोग व्हावा म्हणून जिंकणारें राष्ट्र जिंकलेल्या प्रदेशाचाहि विकास करूं पहातें. तथापि तेव्हां त्यांचा हेतु जिंकलेल्या राष्ट्राचें हित पहावयाचें हा प्राधान्यानें नसून जिंक-

णाऱ्या राष्ट्राचें हित पहाण्याचा असतो. गुलामगिरी वाईट खरी, पण अगदीं कनिष्ठ संस्कृतींतील लोकांचें गुलामगिरीनेंहि हित झालें आहे. नीग्रोंची शिक्षणविषयक आणि आर्थिक स्थिति वन्य स्थितींतील लोकांपेक्षां पुष्कळच सुधारली. गुलामाला धष्टपुष्ट करणें, त्याला विद्या किंवा कला शिकविणें या गोष्टी गुलामांचे मालक करितात. त्याप्रमाणेंच जित राष्ट्रांचे हितसंबंध जेत्यांस पहावे लागतात. तेथें नवीन भांडवल नेणें, अधिक पद्धतशीर कायदेपद्धति नेणें, ज्या सुधारणांशिवाय प्रगत लोकांचें चालत नाहीं त्या सुधारणा नेणें, इत्यादि गोष्टी जित देशांत जेत्यांनीं केल्या आहेत. ज्याप्रमाणें गुलामांचे परिश्रम गुलामांच्या मालकांस किफायतवार नाहींत असें कांहीं काळानंतर गुलामांच्या मालकांस आढळून येतें, त्याप्रमाणेंच जितजेतृभाव आणि त्यामुळें उत्पन्न होणारे सामाजिक आणि राजकीय संबंध उभयतांच्या हिताचे नाहींत हें दिवसानुदिवस लोकांना आढळून येऊं लागेल, आणि जेतृवर्ग आपल्या हितासाठींच ही भावना नष्ट करूं लागेल.

जेता जे उपाय योजतो त्यांमध्यें जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांना जिंकणाऱ्या लोकांविषयीं आपलेपणा उत्पन्न होईल आणि जिंकलेले लोक जेतृवर्गांत विलीन होतील असे उपाय करूं पहातो. मुसलमानांनीं नवीन जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांस मुसलमान करून या तऱ्हेनें कार्य अनेकदां केलें आहे. स्पानिश आणि पोर्तुगीज लोकांनीं तेंच कार्य दक्षिण अमेरिकेंत केलें आहे. हा हेतु ब्रिटिश राजनीतींत आयर्लंडाबाहेर फारसा आचरला गेला नाहीं.

जेव्हां जिंकलेली प्रजा आपल्या समाजांत समाविष्ट करून घेण्याचा हेतु नसतो तेव्हां कधीं कधीं जिंकलेल्या लोकांस गुलाम बनाविणें आणि त्यांस राबविणें हा हेतु असतो. गोऱ्या लोकांनीं अनेकदां हा प्रकार केला, तथापि हा प्रकारहि आतां पुन्हां उद्भुत

होणें शक्य नाहीं. आणि त्या प्रकारची नीति इंग्रजांनीं हिंदुस्थानांत फारशी आचरली नाहीं. गुलामगिरी ही गैरफायदेशीर आहे म्हणून ती अर्वाचीन जीवनकलहांत आपोआपच नष्ट होणार हें सुधारलेल्या राष्ट्रांस समजतें. हिंदुस्थानविषयक राजनीति जेव्हां इंग्रज लोक ठरवूं लागले तेव्हां त्यांस गुलामगिरीची गैरकिफायत कळून आली असावी किंवा राजकीय व सामाजिक परिस्थितीमुळें ती त्यांस शक्यहि नसावी.

**भूमिभक्षक नीतिचा पाडावः**—जिंकलेल्या प्रदेशापासून आपला आर्थिक फायदा करून घ्यावा यासाठीं जिंकणाऱ्या राष्ट्रां-कडून ज्या पद्धति आचरल्या जातात त्यांपैकीं एक म्हणजे जितांच्या जमिनी हिसकाऊन घेऊन जिंकणाऱ्या लोकांस वाटून देणें ही होय. या तऱ्हेची क्रिया नार्मन लोकांनीं इंग्लंडांत केली. ती क्रिया करतांना पुष्कळदां असें झालें कीं, जे लोक मोठमोठे जमीनदार केले गेले व ज्यांस सामंतासारखे अधिकार दिले गेले त्यांचेच वंशज पुढें राज-सत्तेचे शत्रू झाले. या तऱ्हेचा पूर्वानुभवामुळें इंग्रज लोकांचा मोठा जमीनदार वर्ग हिंदुस्थानांत इंग्रजांनीं निर्माण केला नाहीं. डच लोकांनीं जाव्हामध्यें मोठमोठ्या जमिनी आपल्या देशांतील कंपन्यांना आणि जमीनदारांना देऊन एक प्रकारची गुलामगिरीची पद्धत सुरू केली होती त्या पद्धतींत जमीन व तीवर रहाणारे लोक या सर्वांवर मालकी जमीनदारांची असे. डच लोकांना या प्रकारची पद्धत पुढें बंद करणें भाग पडलें. कां कीं, त्या पद्धतीनें देशाचा विकास आणि सरकारी उत्पन्न यांची जोपासना होईना. जेव्हां सरकार प्रत्यक्ष कर-वसुली व प्रत्यक्ष राज्यव्यवस्था मोठमोठ्या प्रदेशावर करण्यास दुर्बल असतें म्हणजे एका ठिकाणावर बसून बराच व्यापक व्यवहार करण्यास लागणारी हुषारी शासनसंस्थांत वाढली नसते, तेव्हां हा दुय्यम सरकाररूपी जमीनदार सामंताचा वर्ग निर्माण करून शासन चालविणें, सरकारास सोपें जातें, आणि त्यामुळें आर्थिक स्वातंत्र्यास

विघातक अशा संस्थांची जोपासना सरकारकडून होऊं लागते. परंतु अशा संधींत जेव्हां व्यापारी व कारखानदार यांचा वर्ग बळावत जातो आणि त्यास मोठ्या प्रमाणावर उत्पादन व विक्री हीं करावीं लागतात तेव्हां, कारखानदारांना या गुलामगिरीच्या संस्था अनवश्यक आणि घातक वाटूं लागतात; व ते कारखानदार शासनसंस्थेवर आपलें वजन पाडतात. शिवाय मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि विक्रय यांच्या योजना जेव्हां होऊं लागतात तेव्हां ती शक्ति सरकारी खात्यांतहि दृग्गोचर होते, आणि मोठमोठ्या इस्टेटी कांहीं व्यक्तींना वाटून देणें आणि त्यांच्यावरच न्याय वगैरे सोंपविणें, यासारख्या गोष्टी सरकारासहि नकोशा होतात, व सरकारची प्रवृत्ति स्वतंत्र कामकरीवर्ग निर्माण करण्याकडे होते. या औद्योगिक परिवर्तनाचे शासनसंस्थांवर परिणाम झाले ते सर्व जगभर झाले, आणि सर्व जगभर सर्व प्रकारच्या जुलमी पद्धती आतां बंद होऊन स्वतंत्र कामकऱ्यांची संस्था चोहोंकडे स्थापन होऊं लागली आहे.

जेव्हां जेता आपणांस सर्व जनतेचा प्रतिनिधि समजत नाहीं तेव्हांची त्याची राजनीति, आणि जेव्हां तो आपल्या देशांतील अनेक वर्गांचा किंबहुना सर्व राष्ट्राचा प्रतिनिधि समजतो तेव्हां त्याची असलेली राजनीति यामध्यें फरक असतो. तर जेत्याचें या बाबतींत होत असलेलें स्थित्यंतर राजकारणाच्या अभ्यासकानेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. जेव्हां जेता कोणाचाच प्रतिनिधि नसतो, आपल्यासाठीं सर्व प्रजा अशी त्याची भावना असते तेव्हां तो परकें राष्ट्र जिंकावें, तेथें लूट करावी एवढाच विचार करतो. तथापि जेता एका व्यक्तीपुरतें पहातो असें क्वचित् होतें. तो निदान फौजेकडे पहातो किंवा सरदारवर्गाकडे पहातो. तसें तो पाहूं लागला म्हणजे फौजेस किंवा सरदारवर्गास जमीनी देणें वगैरे गोष्टी त्यास कराव्या लागतात जेव्हां तो प्रदेश जिंकून तेथें कायमचा अंमल बसवितो तेव्हां मात्र

तेथील प्रजेकडेहि त्यास पहावें लागतें. जेव्हां जेत्याच्या देशांतील लोक राजकारणांत अधिकाधिक भाग घेऊं लागतात तेव्हां त्यांच्यांतल्या कांहीं व्यक्तींनां श्रीमंत आणि माजोर करण्यासाठीं राष्ट्रांतील सर्व लोकांचें बल खर्च व्हावें हें त्यांस पटत नाहीं. हें न पटण्यास केवळ जितांविषयीं न्यायबुद्धि व उदात्त तत्त्वें कारणीभूत होतात असें नव्हे तर सर्व राष्ट्राचें बल खर्च व्हावें आणि त्याचा फायदा मात्र कांहीं थोड्या व्यक्तींस मिळावा या तऱ्हेचा अन्याय देशांतल्या देशांतच होऊं नये ही भावना असते, हें होय. इंग्लंडांत लोकशाही वाढूं लागल्यामुळें इंग्लंडचें हित अधिक पद्धतशीर करतां यावें, केवळ कांहीं घराण्यांना गबर करण्याचें ध्येय ब्रिटिश राजसत्तेचें नसावें अशी भावना वाढणें स्वाभाविक आहे. म्हणजे जितवित्तचौर्याची भावना मुत्सद्यांच्या डोक्यांतून गेली असते असें मुळींच नव्हे, तर हें जितवित्तचौर्य अधिक चिरकाळ आणि सर्व जनांच्या फायद्याचें कसें करतां येईल एवढ्याच प्रश्नाकडे लक्ष ओढलें जातें.

**पद्धतशीर चोरीची कल्पनाः**—हिंदुस्थानच्या वित्ताची चोरी करण्याकडे इंग्लंडांतील मुत्सद्यांचें थोडेंथोडकें लक्ष नव्हतें. लॉर्ड साल्सबरीनें तरी हिंदुस्थानचें रक्त काढलें पाहिजे हें राजनीतिसूत्र सांगितलें होतें. जेव्हां म्यांचेस्टरच्या कपडयाला हिंदुस्थानांत अधिक वाव मिळावी म्हणून वीस नंबरावरील सुताच्या कपडयावर कर बसविण्यांत आला तेव्हां हिंदुस्थानी सत्तेचा उपयोग इंग्लंडांतील कारखानदारासाठीं करण्यांत आला. मध्यें तर इंग्लंडांतील गिरणीवाल्यांनीं हिंदुस्थानाला यंत्रसामुग्री मिळूं नये म्हणून खटपट चालविली, पण ती इंग्लंडांतील लोखंडाच्या कारखान्यांचे मालक त्या चळवळीच्या विरुद्ध गेले त्यामुळें त्या प्रकारचा अन्याय इंग्लंडकडून झाला नाहीं. सर्वांत ताजें उदाहरण म्हणजे जर्मन रंग इंग्लंडामार्फत मागवावे हें हिंदुस्थान सरकारनें युद्धोत्तर काळीं केलेलें नियंत्रण

होय. तथापि हेंहि सांगितलें पाहिजे कीं जर इंग्लंडांतील सर्व प्रकारचे धंदे करणारे लोक त्यांचा हिंदुस्थानाशीं असलेला संबंध हितावह करण्यांची खटपट करतील तर एकाच्या आप्पलपोटेपणामुळें दुसऱ्या वर्गाचें नुकसान करणारे कायदे किंवा लबाडीची सरकारी कृत्यें कमी होतील, आणि दोन्ही देशांतले आर्थिक संबंध एकमेकांच्या हिताचेच करण्याकडे लक्ष वाढेल. म्हणजे सर्व लोकांच्या हिताऐवजीं कांहीं विशिष्ट वर्गांच्या हितासाठीं हिंदुस्थानचें वित्तचौर्य इंग्लंड करीत आहे आणि त्यामुळें सर्व देशाविरुद्ध हिंदुस्थानांत भावना प्रक्षुब्ध होणार आहे हें कळलें म्हणजे हिंदुस्थानाचें वित्तचौर्य करण्याची प्रवृत्ति कमी होईल.

हिंदुस्थानचें वित्तचौर्य इंग्लंडकडून सर्व इंग्रज जनतेच्या कल्याणाकरितां कधींच झालें नसून नेहेमीं विशिष्ट वर्गांच्या कल्याणासाठीं झालें आहे ही गोष्ट विसरतां कामा नये.

**पद्धतशीर चोरीदेखील अल्पसंख्याकांसाठीं होते**—जेव्हां विशिष्ट वर्गाच्या फायद्यासाठीं वित्तचौर्य करण्याची संधीं नसते तेव्हां पालकत्वाची आवडहि कमी होत जाते. ट्रस्टीपणा किंवा पालकत्व कायद्यानें बद्ध होत गेलें म्हणजे पालकास कमी किफायतवार होत जातें; आणि तें तसें होत गेलें म्हणजे आपल्या हातीं पालकत्व ठेवण्याची भूकहि मनुष्यांत कमी होत जाते, त्याप्रमाणेंच राष्ट्राचें आहे. हिंदुस्थानाचें पालकत्व कांहीं विशिष्ट वर्गास स्वतःला किफायतवार करून घ्यावयाचें आहे; त्यासाठीं तो इंग्लंडच्या हिताच्या गोष्टी बोलत आहे एवढेंच. खरोखर तो इंग्लंडचें हित साधीत आहे किंवा नाहीं याची वानवाच आहे. मित्रावर उपकार करण्यासाठीं आणि शत्रूस अपाय करण्यासाठीं राजाश्रय अथवा सत्ता मिळविण्याची भानगड करावयाची; नाहीं तर करावयाची नाहीं ही मनःप्रवृत्ति पंचतंत्रासारख्या मुलांसाठीं लिहिलेल्या नीतिग्रंथांत स्पष्ट आहे.

इंग्लंडांतील मुत्सद्दी हिंदुस्थानावरचा ताबा सोडण्यास आज तयार नाहींत. त्यांचा हेतु स्वार्थमूलक जरी असला तरी ते आपल्या पक्षाची मांडणी करतांना हिंदुस्थानाच्या दृष्टीनें विचार करून हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क दिल्यास देशामध्यें जबाबदारीच्या कल्पनेचा विकास झाला नाहीं वगैरे कारणें देत असतात. त्या मुद्याच्या सत्यतेकडे मात्र विसरून चालतां येणार नाहीं.

**संयोगवियोगाचें स्वातंत्र्यः**–एका मनुष्याचा दुसऱ्या मनुष्यावर कायद्यानें मालकीसंबंध उत्पन्न होणें आणि एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्रावर मालकीसारखा संबंध उत्पन्न होणें या प्रकारचे व्यवहार दोन्ही पक्षांस हितावह नाहींत; हें तत्त्व मोठ्या बिकट आणि कटु अनुभवानंतर जगास ज्ञात झालें आहे.दोन प्रदेशांमधील संयुक्तस्थिति सक्तीची असूं नये तर दोघांच्या खुषीवर अवलंबून असावी हें तत्त्व राजकारणांत हळुहळू मान्य होत चाललें आहे. मात्र अजून असें आहे कीं कोणी कोणाशीं संयुक्त व्हावें याविषयीं पूर्ण स्वातंत्र्य देणें हें बोल्शेव्हिकांखेरीज कोणासहि मान्य नाहीं. बोल्शेव्हिकांनीं मात्र हें तत्त्व मोठ्या धैर्यानें पुढें मांडलें आहे. त्यांच्या शासनपद्धतीची घटना ज्ञानकोशाचा पहिल्या विभागांत दिली आहे तीवरून या तत्त्वांचा अनुवाद त्यांनीं कितीं धैर्यानें केला आहे हें लक्षांत येईल.

आज या बाबतींचें स्वातंत्र्य लोकसमुच्चयांस द्यावयास जगांतील कोणतेंही राष्ट्र तयार होणार नाहीं. कां कीं जगांतील प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राबरोबर स्पर्धेची जाणीव असलेलें आहे. आणि तें राष्ट्र आपल्या घटकांस जर वाटेल तिकडे जाण्याचें स्वातंत्र्य देऊं लागलें तर असेंहि होण्याचा संभव आहे कीं राष्ट्राची घटित स्थिति नष्ट होऊन तें राष्ट्र इतरांबरोबर स्पर्धा करण्यांत अपाय पावेल. परंतु राष्ट्रसंघाची सत्ता जर पुढें मागें बळावत गेली आणि त्यास कर्तुमकर्तुम् शक्ति उत्पन्न झाली तर मात्र राष्ट्र आणि राष्ट्रांतर्गत घटक,

तसेंच साम्राज्य आणि साम्राज्यांतर्गत घटक यांचे संबंध आहेत त्यां-पेक्षांहि अधिक स्वयंनिर्णयपर होतील.

**व्यापारविषयक विरुद्धतेची कल्पना नष्ट झाली पाहिजे.**— इंग्लंड हा देश पक्का माल करणारा आहे, आणि हिंदुस्थान हा पक्का माल घेणारा देश आहे. उलटपक्षीं हिंदुस्थान हा कच्चा माल विकणारा देश आहे आणि इंग्लंड हा कच्चा माल घेणारा देश आहे. त्यामुळें दोघांचा व्यापार एकमेकांच्या गरजा पुरविणारा आहे. तथापि या परिस्थितीमुळें अशी शंका उपस्थित होते कीं, इंग्लंड ज्या अर्थी हिंदुस्थानापासून कच्चा माल घेऊन त्यास पक्का माल देणारा आहे त्या अर्थी इंग्लंड हिंदुस्थानची कारखानी वाढ व्हावी याच्या विरुद्ध जाणार नाहीं काय ? हिंदुस्थानांतले लोक आपला कपडा स्वतः करूं लागले म्हणजे स्वाभाविकपणें इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं व्यापार कमी होईल आणि त्यामुळें हिंदुस्थानास आर्थिक स्वातंत्र्य देण्याच्या विरुद्ध इंग्लंडांतील लोकांची वृत्ति होणार नाहीं काय ? प्रस्तुत भय आपल्या देशांतील सुशिक्षितांसहि वाटत आहे, आणि हिंदुस्थानाला इंग्लंडच्या पकडींत ठेवावें म्हणून म्हणणारा इंग्लंडांत जो वर्ग आहे त्यांतील बऱ्याच लोकांस हिंदुस्थानावरील ताबा सोडण्यांत इंग्लंडचें नुकसान आहे असें वाटत आहे, यामुळें इंग्लंड हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त व्हावें या योजनेविरुद्ध असणारच अशी बऱ्याच लोकांची भावना असल्यामुळें त्याविषयीं अधिक सविस्तर विचार करणें प्राप्त होतें. इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्या हितविरुद्धतेच्या कल्पनेचे दोन परिणाम होतात. स्वराज्यदानविषयक भाषा इंग्लंडांतील जे मुत्सद्दी बोलतात ते लबाड वाटूं लागतात, आणि जे आत्मशासनपर हक्क आम्हांस मिळाले ते आम्ही व्याख्यानें आणि वर्तमानपत्रांतील लेख यांमार्फत ज्या धमक्या दिल्या त्यांना भिऊन इंग्लंडनें दिले अशी वेडी समजूत होते.

या विषयावर अगदीं पद्धतशीर विवेचन करावयास येथें अवकाश नाहीं. तथापि कांहीं अर्थशास्त्रीय प्रवृत्तीविषयीं लिहिलें तर दोन राष्ट्रांत हितविरुद्धता कां नाहीं याचीं तत्त्वें लक्षांत येण्यास अडचण पडणार नाहीं.

जो देश पक्का माल करणारा बनतो त्या देशाशीं पक्का माल करणाऱ्या दुसऱ्या देशाला व्यवहार कमी होत न जातां उलट वाढत जातो. यास कारणें अनेक आहेत. एक तर सगळ्याच गोष्टी सगळींच राष्ट्रें किफायतवार करूं शकत नाहींत; आणि त्यामुळें पक्का माल करणाऱ्या राष्ट्रांत उत्पादनाचें विशिष्टीकरण होऊं लागतें. उदाहरणार्थ इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांतलाच व्यवहार घ्या. यांत पक्क्या म्हणजे मॅनुफॅक्चर्ड मालाचीच देवघेव कशी काय झाली तें पाहूं. १९१४ सालीं (म्हणजे युद्धपूर्व सात महिने व युद्धाचे पांच महिने) फ्रान्समधून इंग्लंडमध्यें ८० लक्ष पौंडाचें कापड व कपडे गेले, तर त्याच काळांत त्या प्रकारचा माल फ्रान्समध्यें इंग्लंडहून २६ लक्ष पौंडांचा गेला. इंग्लंडमधून त्यासालीं फ्रान्समध्यें सोळा लाख पौंडांची मशीनरी गेली तर फ्रान्समधून इंग्लंडमध्यें १८ लक्ष पौंडांच्या मोटारी गेल्या. फ्रान्समधून हा जो पुष्कळ माल इंग्लंडमध्यें गेला आणि त्यामुळें फ्रान्सच्या कारखान्यास किफायत झाली तरी त्या कारखान्यांच्या वाढीबरोबर ७७ लक्ष पौंड किंमतीचा कोळसाच इंग्लंडमधून फ्रान्समध्यें गेला. यावरूनही दोन्ही देश पक्का माल उत्पन्न करणारे झाले तर एकमेकांशीं व्यवहार कमी न होतां उलटा वाढूं लागतो, आणि उत्पादनाचें विशिष्टीकरण होऊं लागतें हें लक्षांत येईल; आणि त्यामुळें हिंदुस्थानाच्या वाढत्या यांत्रिक उत्पादनामुळें इंग्लंडचें नुकसान न होतां उत्पादनामध्यें व देवघेवीमध्यें विशिष्टीकरणच कसें होत जाईल हें लक्षांत येईल.

हिंदुस्थानामध्यें यांत्रिक उत्पादन वाढविण्यानें यंत्रें व गिर-

ण्यास लागणारा माल यांचा आयात वाढत जाणार हें सांगावयास नकोच.

याशिवाय तिसरा एक परिणाम हा होतो कीं, यांत्रिक उत्पादन वाढत चाललें म्हणजे नगरवासी कामकरी वर्ग वाढत जातो. नगरवासी कामकऱ्यांमध्यें शेतांवरील मजुरांपेक्षां खरेदीची शक्ति जास्त असते. आणि त्यामुळें देशांतील सर्व प्रकारच्या वस्तूंचा खप वाढतच जातो. व नव्या गरजा उत्पन्न होतात. व जो देश अधिक गरजांचा असतो तो बाहेर देशचा मालहि अधिक घेतो.

याप्रमाणें देशाची ग्रहणशक्तीच वाढत गेली तर ती गोष्ट पक्का माल करणाऱ्या इंग्लंडसारख्या राष्ट्राच्या पथ्यावरच आहे. मालाच्या रूपांतरांतील पायऱ्या लक्षांत घेतल्याशिवाय कच्च्या मालाचा पक्का माल बनविण्याच्या बाबतींत स्पर्धेवरील विवेचन अपूर्ण होतें. देशांत कारखाने वाढले तरी ते कशा क्रमानें वाढणार याविषयींहि नियम आहे. येथें कारखाने वाढत गेले तर असें होईल कीं, जो माल पूर्ण कच्चा जावयाचा तो अर्धामुर्धा पक्का जाऊं लागतो. सर्वच क्रिया एकदम होत नाहींत. उदाहरणार्थ आपल्याकडे सरकी काढण्याचे व कापूस दाबण्याचे कारखाने घ्या. हें अर्धामुर्धा पक्का माल करण्याचेंच उदाहरण आहे. या प्रकारच्या व्यवहारांत एका देशांतील सवंग उत्पादनाची तयारी दुसऱ्या देशास फायदेशीर होते, आपल्याकडून इंग्लंडमध्यें गहूं जातो, पीठ फारसें जात नाहीं. गहूं इंग्लंड आणतें त्याप्रमाणें पीठहि आणतें. आपण गव्हाचें पीठ करून पाठवावयास लागलों तर तें इंग्लंडला नको थोडेंच आहे ! कां कीं हिंदुस्थानांतून इंग्लंड गहूं नेतें त्यापेक्षां किती तरी पटीनें अमेरिका व कानडा येथून इंग्लंडास पीठ जातें. त्यांत हिंदुस्थानानें स्पर्धा केली तर इंग्लंडचाच फायदा होणार. इंग्लंडांत पिठाचे पाव किंवा बिसकुटें करण्याचे कारखाने आहेत आणि त्या कारखान्यांना हिंदुस्थानांतून खात्रीलायक पीठ

पुण्या पुस्तके अदल बदल



मिळेल तर तेंहि त्यांस हवेंच आहे. शिवाय खात्रीलायक पीठ आपल्याकडे होऊं लागलें तर आपल्याकडेहि घरोघर पिठाचाच खप जास्त होऊं लागेल. उलटपक्षीं हिंदुस्थानांतहि इंग्लंडचाच अर्धामुर्धा पक्का माल घेऊन पुरा पक्का माल करण्याची क्रिया पुष्कळ होते. उदाहरणार्थ परदेशी कागद घेऊन पुस्तकें छापण्याचा धंदा घ्या. हा त्याच क्रियेचें उदाहरण आहे.

याशिवाय दुसरा एक मुद्दा लक्षांत घेण्याजोगा आहे. इंग्लंड केवळ आपलाच माल विकणारें राष्ट्र नाहीं. दुसऱ्या देशाहून माल आणून तो तिसऱ्या देशांत विकण्याचा धंदा इंग्लंडचा इतका मोठा आहे कीं, हिंदुस्थानास पुरून उरण्याइतका माल जरी येथें तयार झाला तरी त्याला इंग्लंड गिऱ्हाईक पाहूं शकेल. हिंदुस्थानचा बाहेर देशीं जाणारा माल सवादोन अब्ज रुपये किंमतीचा आहे; आणि त्यापेक्षां कांहीं कमी इतक्या किंमतीचा माल हिंदुस्थान बाहेर देशाहून विकत घेतें. पण इंग्लंडचा दुसऱ्या देशांतील माल विकत घेऊन तिसऱ्या देशांत विकण्याचा व्यापारच दोन अब्ज रुपयांचा आहे. तर अशा स्थितींत हिंदुस्थाननें माल जास्त तयार केला तर तो वाटेल तेथें नेऊन विकावयास इंग्लंड समर्थ आहे. एवंच हिंदुस्थाननें पक्का माल उत्पन्न करण्याची तयारी अधिकाधिक सुरू केली तर इंग्लंडास हेवा वाटण्याचें कांहीं कारण नसून इंग्लंडची या बाबतींत सहानुभूति मिळण्याचाच उलट संभव आहे.

याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, हिंदुस्थानाच्या व्यापारविकासास इंग्लंडच्या व्यापारविकासाशीं सहकारिता करण्याचें धोरण राहिल्यानेंच हिंदुस्थानचा अधिक फायदा होण्याचा संभव आहे. पक्का माल होतांना ज्या अनेक क्रिया होतात त्यांपैकीं कांहीं क्रिया करून माल इंग्लंडला पाठविणें किंवा कांहीं क्रिया झालेला माल इंग्लंडहून किंवा



11 JAN 1006

अन्य देशाहून आणवून त्यावर पुढील क्रिया येथें करणें हीच उद्योग विकासाची स्वाभाविक पद्धति आहे; आणि या गोष्टीकडे लक्ष दिलें असतां इंग्लंडांतील व्यापारविषयक मुत्सद्यांची प्रवृत्ति हिंदुस्थानांतील कारखाने वाढविण्याकडे आज नाहीं तरी उद्यां होईलच. एवंच हिंदुस्थानास औद्योगिक आणि व्यापारविषयक कारणासाठीं इंग्लंडच्या तावडींत ठेवण्याचें मुळींच कारण नाहीं.

विशिष्ट देश लुटण्यानें किफायत होत असली तरी ती किती जणांना होणार? कल्पना करा कीं, हिंदुस्थानच्या प्रजेपासून व्यापाराच्या रूपानें जो पैसा इंग्लंडांत जातो त्यापासून सर्व राष्ट्राचा नफा फारसा होत नाहीं. इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं जो निर्यात व्यापार आहे तो आज (१९२४) इंग्लंडच्या एकंदर निर्यातीच्या एक नवमांश आहे. आणि तो व्यापार एकसारखा वाढतच आहे आणि इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं जो व्यापार चालतो त्यांत कापडाच्या व्यापाराचें महत्त्व कमी झालें आहे. पण एकंदर इंग्लंडची गिऱ्हाईकी वाढतच आहे. १९१३सालीं इंग्लंडची हिंदुस्थानाकडे जी निर्यात होती तींत निम्मी निर्यात कापडाची होती. त्या कापडाची निर्यात (१९२२) एकंदर निर्यातीच्या तृतीयांश झाली. याचा अर्थ कापड फार कमी आलें असा नाहीं तर इतर वस्तूंचा व्यापार अधिक वाढला. यंत्रांची आयात पूर्वीपेक्षां तिप्पट किंमतीची झाली. आगगाडीच्या एंजिनांची आयातहि बरीच अधिक किंमतीची झाली. आणि कापड जरी कमी आलें तरी सुताची आयात दुपटीहून जास्त झाली. कापड, कापसाचें सूत व इतर मालाची गिऱ्हाईकी एकंदर केली तर त्या व्यापारांत अगदीं थोडा संकोच झालेला दिसतो. ३७२ लाख पौंडांच्या मालाऐवजीं ३४० लाख पौंड किंमतीचा माल आला.

हा परिणाम केवळ यंत्रें वगैरे उत्पादनाचीं साधनें यांवरच दिसून आला असें नाहीं तर चैनीच्या वस्तूंवरहि दिसून आला. १९१३

सालीं २॥ लाख पौंड किंमतीची तंबाखू येत होती पण दहा वर्षांत तीच आयात साडेनऊ लाख पौंडांची झाली. म्हणजे उद्यम वाढलेला हिंदुस्थान यंत्रांनांच ग्राहक होतो असें नाहीं तर चैनीच्या वस्तूंनाहि ग्राहक होतो. असें जरी आहे तरी दूरस्थ फायद्याकडे लक्ष न देतां तात्पुरता फायदा करून घेण्याची बुद्धी ज्याप्रमाणें सर्व लोकांत असते त्याप्रमाणें इंग्लंडच्या मुत्सद्यांत आहेच. हिंदुस्थानच्या विकासास जर विरोध केला नाहीं तर हिंदुस्थानचे लोक उच्चतर गरजांचा आयुष्यक्रम आचरूं लागतील आणि त्यामुळें इंग्लंडचा व्यापार वाढेल ही गोष्ट लक्षांत धरून त्याप्रमाणें आचरण करण्यास मुख्य अडचण ही कीं, तो फायदा जरासा दूर असल्यामुळें इंग्लंडांतील मुत्सद्यांस दिसत नाहीं आणि हिंदुस्थानच्या प्रगतीस अवरोध करून आपला माल ताबडतोब खपविल्यामुळें होणारा फायदा समोर दिसतो त्यामुळें आणि ज्यांच्या मतांवर मुत्सद्दी अधिकाराधिष्ठित रहातात त्यांचें वजन पडल्यामुळें इंग्लंडच्या मुत्सद्यांकडून हिंदुस्थानास अन्याय होतो. अर्थात अन्यायाचें कारण हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्या हितसंबंधांतील विरुद्धता हें नसून त्या मुत्सद्यांची अदूरदृष्टि होय.

पूर्वोक्त विवेचनावरून वाचकांस असें दिसून येईल कीं, जेतृपदाचें हित जितवर्गास लुटण्यानें साधत नाहीं, आणि हिंदुस्थानास लुटण्याच्या खटपटीत ब्रिटिश मधानमंडळानें सर्व इंग्लिश राष्ट्राचें हित पाहिलें नसून त्यांच्या कानाजवळ तोंड असलेल्या कांहीं मतलबी लोकांचें मात्र हित पाहिलें. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे. तो उद्योगप्रधान जरी होऊं लागला तरी त्यामुळें इंग्लंडच्या उद्योगवृद्धीस किंवा व्यापारास कोणत्याही तऱ्हेनें हरकत यावयाची नाहीं आणि या सर्व गोष्टी इंग्रज मुत्सद्यांच्या लक्षांत आल्यास भार-

तीयांच्या स्वराज्यविषयक प्रयत्नास इंग्लंडच्या मुत्सद्यांना विरुद्ध जाण्याचें कांहींच कारण नाहीं.

या विवेचनावरून वाचकांस असें मात्र वाटण्याचा संभव आहे कीं, केवळ आत्महिताच्या भावनेनें इंग्लंडचें धोरण नेहमीं हिंदुस्थानास न्यायीपणाचें राहील. तसें मात्र समजण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें ट्रस्टींना त्यांच्या व्यवहारांत विश्वासनिधींच्या रकमेपासून फारसा फायदा नसतो, तथापि तो पैसा हातीं असला व ट्रस्टी स्वतः सावकारांच्या पेंचांत सांपडला म्हणजे विश्वासनिधींतले पैसे वापरण्याचा मोह त्यास होतो त्याप्रमाणें तीस कोट लोकांचें बरें-वाईट करण्याचा अधिकार असलेलें ब्रिटिश प्रधानमंडळ ज्या चोरट्यांचा व प्रच्छन्न मदतनिसांचा त्यांच्यावर शह बसतो त्यांस खूष ठेवण्यासाठीं किंवा त्यांना चूप बसविण्यासाठीं हिंदुस्थानच्या दौलतीवर वरात देण्याचा संभव बराच असतो. जो लोकसमूह मूक असतो, जो स्वहिताविषयीं जागृत नसतो, त्याच्या पैशानें संतर्पण करण्यास ब्रिटिश प्रधानमंडळ कमी करीत नाहीं ही गोष्ट आपणांस पूर्णपणें परिचित आहे. आपणांस स्वराज्याची आवश्यकता आहे ती यासाठींच आहे. साम्राज्याच्या मंत्रिमंडळास चोरांच्या तावडींत सांपडण्याची संधीच आम्हीं त्यांस देतां कामा नये. साम्राज्याचें मंत्रिमंडळ सीझरच्या बायकोप्रमाणें संशयातीत राहिलें पाहिजे. अर्थात भारतीयांचा स्वराज्यार्थ प्रयत्न हा साम्राज्याचा व्यवहार आजच्यापेक्षां अधिक उच्च व निर्मळ तत्त्वावर चालविण्यासाठीं आणि साम्राज्यसंस्था अधिक यशस्वी तऱ्हेनें चालविण्यासाठीं आहे. अर्थात् या चळवळीस अज्ञानाखेरीज कोणीहि दुसरा शत्रू नाहीं हें समजून आपलें स्वत्वस्थापनेचें कार्य आपण निर्भयपणें करीत असलें पाहिजे.

# प्रकरण ८ वें.

## इंग्रज अधिकाऱ्यांची हकालपट्टी.

जेतृत्व प्राप्त झालें तरी जिंकलेल्या लोकांस लुटण्याच्या हेतूनें कायदे करण्याची किंवा व्यवहारनीति ठेवण्याची पद्धति जिंकणाऱ्या लोकांच्या विशिष्ट वर्गास फायदेशीर होईल, पण सर्व राष्ट्रास ती फायदेशीर नाहीं. उलट जिंकलेल्या राष्ट्रास न्यायानें वागविणें आणि त्याचा विकास करण्याचा प्रयत्न करणें ही गोष्टच जिंकणाऱ्या राष्ट्रास फायदेशीर आहे, आणि यासाठीं स्वराज्य न देण्यांत इंग्लंडचा कांहीं फायदा नाहीं आणि देण्यांतहि इंग्लंडचें कांहीं नुकसान नाहीं, या गोष्टीचें विवेचन मागें केलें आहे.

आतां कोणी असा प्रश्न करील कीं, इंग्लंडचा फायदा तोटा नसला तरी त्यांत इंग्रज नोकरवर्गाचा फायदातोटा आहे कीं नाहीं आणि राष्ट्राचा फायदा असला, आणि नोकरवर्गाचा तोटा असला, तर तो नोकरवर्ग स्वराज्यस्थापनेस आडवा जाईल किंवा नाहीं ? यावर हें उत्तर देतां येईल कीं, इंग्रज जातीच्या आजच्या नोकरवर्गाचें आमूलाग्र उच्चाटण करून तेथें देशी नोकर ठेवण्याचा सपाटा चालविला तर तो इंग्रज नोकरास नुकसानकारक होईलच, पण त्यापेक्षां तो देशाला अधिकच नुकसानकारक होईल, पण इंग्रजांच्या नोकरीचा प्रश्न देशहितावर अवलंबून ठेविला तर बऱ्याच इंग्रज लोकांच्या नोकऱ्या एकदम जातील किंवा त्यांचें नुकसान होईल असें वाटत नाहीं. कां कीं, इंग्रज नोकरांचें अस्तित्व आज केवळ नेमणाऱ्याच्या इच्छेवर नसून किंवा इंग्रजपणावरहि नसून इतर अनेक गोष्टींवर अवलंबून आहे.

आज त्यांची अधिक लायखी आहे आणि आपली लायखी कमी आहे आणि आपलीं लायख मनुष्यें वाढवून त्यांस उत्तेजन देण्याची क्रिया करीत गेलें तरी इंग्रजांचें नोकरीचें क्षेत्र नाहींसें होण्यास फार काळ लागेल, इतके आपण मागसलेले आहों आणि आपणांस स्वराज्य मिळालें नाहीं तर आपण तसे मागसलेले कायमचे राहूं.

भारतीयांस स्वराज्य मिळणें ही गोष्ट सिद्ध होण्यास जी मानसिक तयारी झाली पाहिजे तींत पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे स्वराज्याच्या आवश्यतेची सर्वत्र जाणीव ही होय. हें कार्य देखील अजून फारसें झालें नाहीं. भारतीय समाजांतील निरनिराळ्या वर्गांस देशांत आपले प्रतिनिधि निवडून त्यांच्या हातीं सर्व अधिकार द्यावे ही गोष्ट अजून पूर्णपणें पटलेली नाहीं. या गोष्टीस शिक्षणाभाव हें तर कारण असेलच; तथापि समाजांतील निरनिराळ्या वर्गांत एकमेकांविषयीं अविश्वास आणि त्याचा अवश्य परिणाम जो आत्मविश्वासाचा अभाव हेंहि एक महत्त्वाचें कारण आहे. पण यापेक्षांहि महत्त्वाचें कारण हें कीं, सामुच्चयिक हेतु उत्पन्न करणाऱ्या तत्त्वज्ञानाचा अभाव हें होय.

स्वराज्य हें कांहीं अत्यंत श्रेष्ठ सामाजिक हेतूंच्या साधनेसाठीं आहे ही गोष्ट पूर्णपणें न पटतां स्वराज्याची चळवळ इंग्रजांस दूर करण्यासाठीं आहे अशीच बऱ्याच लोकांची समजूत आहे. स्वराज्याची चळवळ म्हणजे इंग्रजांचा द्वेष अशी कांहीं हिंदी लोकांची व इंग्रजांची समजूत झाली आहे. स्वराज्य मिळवून तुम्हांस अशा कोणत्या गोष्टी करावयाच्या आहेत कीं ज्या करण्यास सध्यां क्षेत्र नाहीं, व स्वराज्य मिळालें असतांच क्षेत्र मिळेल ? असा प्रश्न विचारला तर बरेचसे राजकारणी पुरुष घोटाळ्यांत पडतील; कां कीं, स्वराज्याची चळवळ सामाजिक ध्येयमूलक नसून केवळ सुशिक्षित-महत्त्वाकांक्षामूलक आहे. आज अत्यंत सुशिक्षित राजकारणी वर्गा-

साहि स्वराज्योत्तर कर्मपरंपरेची कल्पना नाहीं. अधिकाराच्या जागेवर इंग्रज आहेत, त्याऐवजीं देशी सुशिक्षित वर्ग पाहिजे यापलीकडे राष्ट्राचा विचारक्रम गेला आहे असें म्हणवत नाहीं. बोल्शेव्हिकांची विचारमाला अगोदर जन्मास आली आणि राज्याधिकार त्यांस मागाहून मिळाले. त्यामुळें त्यांची कर्तव्यपरंपरा पूर्वींच निश्चित झाली असून तिला व्यावहारिक स्वरूप देण्याचाच प्रश्न त्यांपुढें होता. स्वराज्य हेंच केवळ ज्याचें साधन आहे असें सामाजिक ध्येय जर राष्ट्रापुढें राहील तर तें स्वराज्यासाठीं लोकांचीं मनें उत्सुक करण्यास बरेंच उपयोगी पडेल. भारतीय शासनसंस्था चालवावयास ज्या कांहीं गोष्टी आवश्यक आहेत त्यांचीहि स्पष्ट कल्पना आपणांस पाहिजे. जी शासनसंस्था इंग्रजांनीं चालविली आहे ती त्यांच्यापासून घेऊन आपणांस अधिक यशस्वी तऱ्हेनें चालवावयाची आहे. आपण इंग्रजांपेक्षां अधिक यशस्वी तऱ्हेनें जर ती चालविली तरच स्वराज्यकल्पनेचें समर्थन होईल. "एखादा व्यापारी व्यवहार, कांहीं विशिष्ट लोकांना तो चालवावयाची धमक यावी म्हणून तो त्यांच्या हातीं देण्याची व्यवस्था कधीं कधीं आपण करतों, व त्यामुळें येणारें नुकसानहि सोसावयास आपण तयार होतों. तसेंच राज्यासंबंधीं करा व कांहीं दिवस देशी लोकांना राज्य जसें करतां येईल तसें करूं द्या," असाहि वाद आपण उपस्थित करतों. त्या वादांत थोडेसें सत्यही आहे; पण त्या प्रकारची विचारपद्धति ही गैरव्यवस्थेनें राज्य चालविण्याची सनद मात्र होतां कामा नये. नागरिकांचा फायदा ही राज्यपद्धतीच्या चांगूलपणाची खरी कसोटी आहे. राज्यपद्धति कोणतीहि असो, ती लोकसत्ताक असो अगर एकसत्ताक असो, राज्यव्यवस्था नेहमीं अगदीं थोडक्यांच्या हातांत असते ही गोष्ट विसरतां कामा नये. देशाचा व्यापार मंदावला, पोलीस खातें बिघडलें व कर्तव्यपराङ्मुख झालें, सुरक्षितता कमी झाली, पैसेवाले

सावकार देश सोडून अन्यत्र वस्ती करावयास जाऊं लागले, आणि देशांतल्या रोगांशीं सरकारास झगडतां न आल्यामुळें हजारों माणसें मृत्युमुखीं पडलीं, सरकारी अधिकाऱ्यांचे पगार वेळच्यावेळीं देतां आले नाहींत, लष्कराचे पगार थकले, सरकारला थोडक्या व्याजानें कर्ज मिळेनासें झालें आणि अधिकार मात्र काळ्या चामडीच्या लोकांच्या हातीं राहिला म्हणजे तो देश स्पृहणीय स्थितींत आहे असें कोण म्हणेल? आणि स्वराज्याचें समर्थन तरी कसें होईल? स्वराज्य आपणांस पाहिजे तें देशी लोकांपैकीं कांहीं चळवळ करणाऱ्यांस अधिक महत्त्वाची जागा मिळावी यासाठीं खास नव्हे, तर जी लोकसुधारणा करण्यास आजचें परकी सरकार सहानुभूतीच्या मर्यादितत्त्वामुळें आणि देशांतील लोकांविषयीं अभिमानाच्या अभावामुळें कमी समर्थ आहे तें नाहींसें होऊन अधिक सहानुभूतीचें, देशसुधारणेविषयीं तत्पर आणि देशांतील लोकांच्या दुःस्थितीबद्दल लाज बाळगणारें सरकार लोकांस मिळावें यासाठीं होय. देशसुधारणेची कल्पना जितकी व्यापक होत जाईल, व त्या सुधारणा घडवून आणण्याविषयींच्या सरकारच्या कर्तव्याविषयीं आपल्या अपेक्षा जितक्या अधिक वाढत जातील तितकें आजचें सरकार राज्य करण्यास कमी लायख ठरूं लागेल; व राज्य आपणच चालविलें पाहिजे असें आपणांस वाटेल. स्वराज्य केवळ आपणांस अधिकारासाठीं नसून कांहीं उच्चतर देशसेवा करण्यासाठीं पाहिजे आहे ही आपली भावना झाली पाहिजे. आपल्या देशांतील इंग्रज नोकरवर्गास ज्या शिव्या दिल्या जातात त्यांपैकीं कांहीं अयथार्थ असतील तरी त्याच्या परकेपणामुळें त्याच्या उपयुक्ततेस मर्यादा उत्पन्न होते ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. कांहीं बाबतींत त्याच्याकडून होत जाणारी लोकसेवा कमी योग्यतेची होईल व कांहीं बाबतींत त्याच्या परकेपणामुळें ती अधिक योग्यतेची होईल. व त्यांच्याकडून होणाऱ्या

लोकसेवेच्या उच्चत्वावर त्यांचे अधिकार त्यांच्या हातांत राहतील किंवा जातील.

परकी लोकांनीं सुराज्य चालविणें यापेक्षां वाईट तऱ्हेनें चालविलेलेंहि स्वराज्य बरें ही गोष्ट वारंवार मांडण्यांत येते. पण हींत सत्य अत्यंत नियमित आहे. स्वराज्याविषयीं, राष्ट्रीयत्वाविषयीं आणि स्वातंत्र्याविषयीं आक्रोश केवळ मध्यम वर्गाचा असतो. आणि शेतकरी किंवा मजूर वर्ग यासंबंधानें उदासीन असतो; "जो वर्ग उदासीन असतो तो शेळपट आणि स्वाभिमानशून्य आहे दुसरें कांहीं नाहीं." या तऱ्हेचें स्पष्टीकरण करणें म्हणजे सत्य लपविणें आहे. पेशव्यांचें राज्य असो कीं इंग्रजांचें राज्य असो खानदेशांतल्या भिल्लांची किंवा माथेरानच्या कातकऱ्यांची स्थिति सारखीच असणार आणि तशीच शेतकरीवर्गाची सामान्यतः स्थिति असणार. असें आहे तर त्यांनीं स्वराज्य पाहिजे म्हणून आक्रोश करणाऱ्यांस कां मिळावें ? आणि ते मिळाले नाहींत तर त्यांस दोष कां द्यावा ? स्वराज्याविषयीं मागणी करणारांनीं कारकूनवर्गाकडे दृष्टि ठेवून मागणी चालविली आहे, कीं देशांतील अत्यंत कनिष्ठ स्थितींतला जो बहुजनसमाज आहे त्याच्याकडे लक्ष देऊन मागणी चालविली आहे याचा विचार केला पाहिजे. हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं सामान्य जनता आपलें हित समजते आणि तें हित इंग्रजांकडून अधिक संरक्षिलें जाईल कीं हिंदी मध्यमवर्गाकडून संरक्षिलें जाईल याविषयीं तिला कांहीं अनुभवानें विचार करतां येतो आणि त्या जनतेचा शब्द परिणामकारी होतो. आणि तिला इंग्रजांविषयीं विश्वास अधिक वाटला आणि तिनें तो व्यक्त केला तर त्यास गैर कां म्हणावें ? मी उलट असें म्हणेन कीं तिनें तो धैर्यानें व्यक्त करणें तिचें राजकीय कर्तव्य आहे. सामान्य जनतेचा आपल्या समाजांत मध्यम वर्गावर इंग्रज लोकांपेक्षां अधिक विश्वास उत्पन्न होईल अशी स्थिति येऊं

लागली म्हणजेच स्वराज्याचा जन्म झाला असें मी समजेन. पण तसा विश्वास नसतां जनतेनें आहे असें लोकलज्जेच्या भीतीनें सांगणें मला नको आहे.

स्वराज्यप्राप्तीसाठीं आपणांस जी धडपड करावयाची ती केवळ इंग्रजांस बाजूस सारून ती जागा भारतीयांनीं भरून काढण्यासाठीं नव्हे; तर भारतीय समाजाचा अभिमान बाळगणारें व भारतीय समाजाच्या दारिद्र्याबद्दल, कनिष्ठ राहाणीबद्दल किंवा सांस्कृतिक अप्रगतीबद्दल ज्यास लाज वाटेल असें हें सरकार बनलें पाहिजे आणि तें तसें बनणें ही गोष्ट देशांत स्वराज्य स्थापित झाल्याशिवाय व्हावयाची नाहीं आणि सरकारच्या मानसिक स्थितींत वर सांगितलेली सुधारणा झाल्याशिवाय उन्नति होणार नाहीं. यासाठीं स्वराज्य पाहिजे. त्या तऱ्हेची नोकरशाहींत भावनात्मक सुधारणा झाली तर इंग्रज नोकरांचा वर्ग देखील आम्हांस नको असें नाहीं. आम्ही त्या नोकरांनीं या राष्ट्राचें अंतःकरणपूर्वक नागरिकत्व पत्करलें असें म्हणूं आणि त्यांचा गौरव करूं. इंग्रज लोक उच्च आर्थिक स्थितीशीं परिचित असल्यामुळें इंग्रज नोकरांनीं भारतीयांची आर्थिक स्थिति व सामाजिक स्थिति सुधारण्याचें मनावर घेतल्यास ते अत्यंत उपयुक्त सेवा करूं शकतील यांत शंका नाहीं. वर सांगितलेली इंग्रजांची भावनात्मक सुधारणा उच्च वृत्तीचे भारतीय श्रेष्ठ अधिकारावर आल्याशिवाय होणार नाहीं. हिंदुस्थानांतील शासनाधिकार देशी लोकांच्या हातीं येऊं लागल्यानें प्रथमतः हें अधिकारांतर कदाचित इंग्रज नोकरांस गैरफायद्याचें वाटेल; कां कीं देशी लोक अधिकाराच्या जागा अधिकाधिक पटकावतील; पण इंग्रज नोकरवर्गाचेंहि नुकसान न होतां उलट त्यास कार्यक्षेत्र वाढेल असा माझा अजमास आहे. हें म्हणणें जरा विलक्षण वाटेल आणि यासाठीं तें विस्तारानें विवेचिलें पाहिजे आणि त्याचें स्पष्टीकरण करण्यास

जगांतील सांपत्तिक व बौद्धिक दृष्टीनें भिन्न पायऱ्यांवर असलेल्या समाजांच्या स्पर्धेच्या प्रश्नांकडे पाहिलें पाहिजे, आणि जातिस्पर्धेपासून होणारी परिणामपरंपरा समजावून घेतली पाहिजे.

ब्राह्मणेतर आपणांस बरी स्थिति प्राप्त व्हावी म्हणून खटपट करीत आहेत, आणि त्यामुळें पुढारलेले आणि मागसलेले यांच्यामध्यें स्वाभाविकतःच हितविरुद्धता आहे, ही गोष्ट जितपत खरीखोटी आहे तशीच सुशिक्षित इंग्रज व सुशिक्षित हिंदू यांच्यामध्यें हितविरुद्धता आहे हीहि कल्पना तितपतच खरीखोटी आहे. इंग्रज हिंदूंपेक्षां पुढारलेले लोक आहेत. त्यामुळें ब्रिटिश राज्यांतली पुढारलेली जात इंग्रज आणि मागासलेली जात हिंदी अशी मांडणी केल्यास त्यांत चूक काय आहे बरें? आणि हिंदुस्थानांतल्या महारमांगांस शिक्षण दिल्यानें आणि नोकऱ्या वगैरे देऊन उत्तेजन दिल्यानें जितपत उच्चवर्गाचें नुकसान होत असेल तितपतच हिंदी लोकांस राज्याधिकार दिल्यानें इंग्रज लोकांचें नुकसान होईल.

इंग्रज मध्यमवर्गाची आणि हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाची जशी स्पर्धा आहे तशीच हिंदुस्थानांतच पुढारलेल्या आणि मागासलेल्या जातींत स्पर्धा आहे. तर स्पष्टीकरणाच्या सौकर्यासाठीं प्रथम ब्राह्मणब्राह्मणेतर जातींतली स्पर्धा विचारास घेऊं आणि त्या स्पर्धेमुळें देशांतल्या दोन्ही वर्गांत वैर रहाणार कीं काय हा प्रश्न विचारास घेऊं, आणि त्या विचारापासून उत्पन्न होणारीं सामाजिक विकासाचीं तत्त्वें हिंदी-इंग्रज या स्पर्धेच्या विवरणास कशीं लागू पडतात हें पाहूं. ब्राह्मणब्राह्मणेतर प्रश्न आणि हिंदी--इंग्रज प्रश्न हे जरी पूर्णपणें सारखे नाहींत, तरी त्यांत पुष्कळ साम्य आहे, हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं. आणि जर ब्राह्मणेतरांची उन्नति ही ब्राह्मणांच्या नुकसानीस कारण होत असेल तर त्या नियमानें हिंदी लोकांची उन्नति नोकरी करणाऱ्या इंग्रजांच्या नुकसानीस कारण

होईल, व ब्राह्मणेतरांच्या प्रवृत्तीची ब्राह्मणांस भीति वाटण्यास कारण असेल तरच हिंदी लोकांच्या प्रगमनशील प्रवृत्तीची इंग्रजांस भीति वाटण्याचें कारण आहे, असा या दोन्ही प्रश्नांतील सारखेपणा आहे.

यासंबंधानें माझें मत असें झालें आहे कीं, ब्राह्मणेतरांमध्यें जरी महत्त्वाकांक्षा वाढत आहे तरी तीपासून ब्राह्मणांचें नुकसान होण्याचा फारसा संभव नाहीं; आणि आज ब्राह्मणेतरांच्या स्वत्व-स्थापनेसाठीं चाललेल्या धडपडीकडे ब्राह्मणवर्ग जो अजून बराचसा उदासीनपणानें पहात आहे त्याचें कारण ब्राह्मणेतरांच्या स्पर्धेपासून नुकसान भासत नसावें असें वाटतें. इकडे ब्राह्मणांविरुद्ध बरीच चळवळ चालवावी आणि ब्राह्मणांनीं मात्र तिकडे बरेंच उदासीन-पणानें पहावें या तऱ्हेच्या प्रवृत्तीचें कारण काय असावें हा प्रश्न विचारास घेतला पाहिजे.

ब्राह्मणेतरांच्या चळवळींपैकीं जेव्हां शांतताभंगाची चळवळ सुरू होते, आणि मारामाऱ्यापर्यंत प्रकरण जातें तेव्हां तिजकडे मात्र स्वाभाविकपणें ब्राह्मणाचें लक्ष जातें एवढेंच नव्हे तर स्वतःच्या संरक्षणासंबंधानें भीति उत्पन्न होते. तथापि नोकरींत अधिकाधिक शिरकाव व्हावा म्हणून ब्राह्मणेतरांची चळवळ आहे तिकडे ब्राह्म-णांचें फारसें जात लक्ष्य नाहीं,आणि त्यांच्या मागण्यास तीव्र विरोधहि ब्राह्मण करतांना दिसत नाहींत. याचें मुख्य कारण ब्राह्मणांच्या एकंदर द्रव्यार्जनाच्या संधिवर ब्राह्मणेतरांच्या महत्त्वाकांक्षेमुळें फारसा परिणाम घडत नाहीं हें होय. म्युनिसिपल निवडणुकीच्या प्रसंगीं ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांनीं चीत केलें तरी त्याचें त्यांना कांहींच वाटत नाहीं. त्यांचें दुःख उमेदवारांपुरतेंच असतें. एकंदर ब्राह्मणजनतेस तो आपला पराभव म्हणून भासत नाहीं. इलेक्शनमध्यें निवडून येणें ही आर्थिक फायद्याची गोष्ट नसून मानाची गोष्ट आहे आणि निवडून आलेल्या लोकांच्या हातीं प्रत्यक्ष फारसें नसल्यामुळें त्यांत

पराभव हें समाजास फारच थोडें नुकसान वाटतें, असें त्याचें फार तर स्पष्टीकरण करतां येईल. पण नोकऱ्या पटकावण्याच्या बाबतींत जी ब्राह्मणेतर धडपड आहे तीसंबंधानें उदासीनपणा कां असावा ? आहे हें खरें; पण याचें कारण नोकरीच्या अभावामुळें ब्राह्मणांमध्यें फारशी बेकारी वाढली नाहीं हें होय; व ती न वाढण्यास कारणें अनेक आहेत. ब्राह्मणेतरांस नोकऱ्या मिळाल्या तरी त्या त्यांच्यांत शिक्षण वाढलें तरच मिळणार आणि ब्राह्मणेतरांत शिक्षण इतकें कमी आहे व त्याची वाढहि इतकी कमी होत आहे कीं सध्यां उत्पन्न झालेला ब्राह्मणेतरांतील सुशिक्षित वर्ग फारच लहान पडतो. ब्राह्मणेतरांची नोकरींतील संख्या अजून फार थोडी आहे आणि शिक्षण आजच्या दहापट वाढलें तरी ब्राह्मणांच्या नोकरीमार्फत द्रव्यार्जन करण्याच्या संधीवर बराच परिणाम घडेल किंवा नाहीं याची शंका आहे. शिवाय गेल्या तीस वर्षांत सुशिक्षित ब्राह्मण 'नोकरी ही निरुपाय म्हणून करावी, त्यापेक्षां स्वतंत्र धंदा असलेला चांगला,' असल्या विचारावर पोसला जात आहे.

ब्राह्मणेतरांचा ज्या मानानें नोकरींत प्रवेश झाला आहे किंवा येत्या दहापंधरा वर्षांत होण्याचा संभव आहे, त्यापेक्षां व्यापार व धंदे यांत आपला प्रवेश करून घेण्याची ब्राह्मणांची प्रवृत्ति अधिक जास्त आहे. याशिवाय सुशिक्षित वर्गास ज्या नोकऱ्या आवडतात त्या नोकऱ्यांचें क्षेत्रहि वाढत चाललें आहे. त्यामुळें इतर जातींच्या उन्नतीमुळें ब्राह्मणांचें नुकसान होत नाहीं. उदाहरणार्थ, प्रॉव्हिन्शियल सर्व्हिसमध्यें जितके मराठे सांपडतील त्याच्या कितीतरी अधिक पटीनें एंजिनिअर, स्पिनिंगमास्तर, वीव्हिंगमास्तर, व गिरणीमॅनेजर ब्राह्मणांत सांपडतील व दोन्ही वर्गांत पगार जवळ जवळ सारखाच मिळतो. या परिस्थितीमुळें शिक्षणाची धडपड सपाटून होऊन आजच्या अनेकपट सुशिक्षित मराठे उत्पन्न झाले तरी त्यांच्या उन्न-

तीमुळें ब्राह्मणवर्गाची चांगल्या तऱ्हेनें उपजीविका मिळविण्यास अडचण होईल असें नाहीं. कां कीं, मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि विक्रय, आणि त्यामुळें उत्पन्न होणारी व्यवहारपद्धति यांचा परिणाम असा होत आहे कीं, समाजांत आजच्या अनेकपट सुशिक्षित मध्यमवर्गाची जरूरी उत्पन्न होत आहे; आणि ती आजच्यापेक्षां उद्यां वाढतच जाणार. जास्त पुढारलेल्या देशांत या मध्यमवर्गाचीच वाढ अधिकाधिक होत जाते, आणि या मध्यमवर्गाचें राहणीचें स्वरूप अधिकाधिक उच्च तऱ्हेचें होत जाऊन त्याचा एकंदर समाजावर परिणाम होतो. ही जी मध्यमवर्गाची वाढ होत जाते ती केवळ पूर्वकालीन मध्यमवर्गाच्या वंशवृद्धीनें होत नाहीं, तर अशिक्षित आणि गरीब वर्गांतील माणसांना शिक्षण मिळत जाऊन त्यांचा मध्यम वर्गांत समावेश होऊं लागतो, यामुळें होते. मध्यमवर्गाच्या गरजा जशजशा वाढतात तसतसा त्या पुरविणारा मध्यमवर्गहि वाढूं लागतो. मध्यमवर्गाला रहावयास जास्त चांगलीं घरें लागूं लागलीं म्हणजे तीं बांधणारे एंजिनीअर व कॉंट्रॅक्टर हे वाढावयाचेच. एक घरें बांधणारा कॉंट्रॅक्टर आपल्या आयुष्यांत बऱ्या प्रकाचीं ६० पासून १००पर्यंत घरें बांधतो. तर लोकांची रहाणी सुधारत गेल्यास किती एंजीनिअरांची जरूर वाढेल बरें ? शिक्षण अधिक लागूं लागलें म्हणजे शिक्षक वर्ग वाढायचाच. ३० मुलांना एक शिक्षक हें प्रमाण धरलें तर आणखी शिक्षकरूपी मधमवर्ग कितीतरी वाढणार आहे. याशिवाय शिक्षण वाढल्यामुळें छापखानदार, संपादकवर्ग हाहि वाढावयाचाच. प्रुफें वाचणारा आणि सामान्य प्रतीचा शिक्षक यांची सांपत्तिक आणि सामाजिक स्थिति भिन्न नसते. या स्वाभाविक क्रियेमुळें समाजामध्यें मध्यमवर्ग वाढणार. मध्यवमर्गाची उच्चतर रहाणी, नवीन नवीन होणाऱ्या सुधारणा आणि उत्पादन व विक्रय हीं मोठ्या प्रमाणावर करण्याच्या प्रवृत्तीचा

विकास यामुळें मध्यमवर्गाची वाढ एकसारखी होत जाणार आहे आणि वरील तीन प्रकारच्या वाढीमुळें जें कार्यक्षेत्र उत्पन्न होत आहे तें पुरवून रिकामा राहील इतका सुशिक्षितवर्ग उत्पन्न करील इतकें हिंदुस्थानांतील शिक्षण वाढलें नाहीं आणि यामुळें ब्राह्मणवर्गास ब्राह्मणेतरवर्गामध्यें शिक्षणप्रसार झाला आणि त्यांनीं सरकारी नोकऱ्या जराशा अधिक मिळविल्या तरी त्यापासून फारसें नुकसान होणार नाहीं, एवढेंच नव्हे तर मध्यमवर्ग वाढविण्यास ब्राह्मणेतरांचीहि मदत होणार आणि यामुळें ब्राह्मणांस कार्यक्षेत्रहि अधिक वाढणार. शिक्षण फार झालें इतक्यांना नोकऱ्या कुठून मिळतील, अशा कुरकुरी आज आपण तीस वर्षें ऐकत नाहीं काय? असें असूनहि चांगलीं माणसें कामाला मिळत नाहींत अशा तऱ्हेची खासगी धंद्यांच्या मालकांची ओरड नाहीं काय? रेल्वेसारख्या कंपन्यांचीहि चांगलीं सुशिक्षित माणसें मिळत नाहींत म्हणून ओरड नाहीं काय? जे लोक युनिव्हर्सिटयांतून बाहेर पडतात त्यांपैकीं रिकामे किती रहातात?

ब्राह्मणांच्या बदलणाऱ्या आकांक्षा, व उत्पादनादि आर्थिक क्रियांच्या पद्धतींत जे बदल होतात त्यामुळें मध्यमवर्गाची होणारी वाढ या अनेक कारणांमुळें, ब्राह्मणेतरांची सुधारणा आणि त्यांचा सरकारी नोकरींत प्रवेश या गोष्टींनीं, ब्राह्मणवर्गाचें नुकसान होण्याचा संभव नाहीं; आणि त्यामुळें महत्त्वाकांक्षी ब्राह्मणेतर आणि ब्राह्मण यांच्यामध्यें हितविरुद्धता नाहीं.

इंग्रज नोकरांचेंहि फारसें नुकसान न होतां त्यांस अधिक कर्तव्यक्षेत्र सांपडून स्वराज्यामुळें त्यांची आपणांस अधिक जरूरी कशी लागेल? जी नोकरशाही आज हिंदुस्थानाचा कारभार चालवीत आहे त्या नोकरशाहीच्या नोकरीस धक्का पोंचून तिचें नुकसान होईल कीं नाहीं? आणि नोकरशाही अदृश्य व व्यापक हिताकडे

दुर्लक्ष्य करून निकट दिसणारें व्यक्तिहित साधण्याचा प्रयत्न करणार नाहीं काय ? आणि भारतीयांच्या महत्त्वाकांक्षेच्या विरुद्ध प्रयत्न करणार नाहीं काय ?

वर ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा प्रश्न चर्चेस घेऊन त्यांत असें दाखविलें कीं हा प्रश्न स्वरूपतः इंग्रज शासकवर्ग आणि देशी सुशिक्षितांचा वर्ग यांच्या संबंधाच्या प्रश्नापासून भिन्न नाहीं; आणि तेथें असेंहि दाखविलें आहे कीं, ब्राह्मणेतर वर्ग सुशिक्षित झाल्यानें ब्राह्मणांचें नुकसान न होतां झाला तर फायदाच होईल. ब्राह्मण-वर्ग सरकारी नोकरीबाहेर जो किफायतीचा एकंदर व्यवहार आहे तिकडे लक्ष्य देईल, मध्यमवर्गाची संख्यावृद्धि होईल आणि तीमुळें नवीन उत्पन्न होणाऱ्या गरजा पुरविणारा वर्ग वाढेल. जरी ब्राह्मणेतर वर्गाचा शिक्षणविकास आणि महत्त्वविकास झाल्यानें ब्राह्मणांचें नुकसान होणार नाहीं असें असलें, तरी ब्राह्मणेतरांच्या प्रगतीनें ब्राह्मणांचें नुकसान होईल या कल्पनेनें एखाद दुसरा अल्पदृष्टि ब्राह्मण, ब्राह्मणेतरांच्या शिक्षणविकासाविरुद्ध असणें शक्य आहे. त्याप्रमाणेंच इंग्रज नोकरशाहीचे अदूरदृष्टि अवयव भारतीय स्वराज्य-विकासाविरुद्ध असणें शक्य आहे. म्हणून भारतीयांची स्वराज्यापेक्षी महत्त्वाकांक्षा इंग्रजांस कितपत भोंवेल याचा विचार केला पाहिजे. आणि तो मोकळेपणानें इंग्रजांपुढेंहि मांडला पाहिजे,

या प्रश्नावर विचार करितांना आपणांला प्रथम स्वराज्योत्तर इंग्रजांची अनवश्यकता एकदम स्थापित होईल कीं कालांतरानें स्थापित होईल याचा विचार केला पाहिजे. आत्मशासनार्थ प्रयत्नाचा अंतिम परिणाम जर इंग्रजांची शासनसंस्थेंत अनवश्यकता हा असेल पण तो कालांतरानें म्हणजे सुमारें २५ वर्षांनीं दिसून येणार असेल तर आजच्या इंग्रज नोकरवर्गास स्वतःच्या स्थानासंबंधानें प्रश्न उपस्थित होत नाहीं. त्यांना त्यांच्या मुलांसाठीं धंद्याचा किंवा कार्य-

क्षेत्राचा प्रश्न येईल आणि तो फारसा बिकट नाहीं. त्यांस सर्व जग मोकळें आहे. इंग्रज नोकरांच्या मुलांना हिंदुस्थानांतच नोकरी पाहिजे असें नाहीं; आणि मुलानें हिंदुस्थानांत नोकरींत शिरावें म्हणून बापाची इच्छा असली तरी मुलाची तशीच असली पाहिजे ना ? इंग्रज लोकांचा विरोध न होण्यास असलीं कारणें आहेत. तथापि स्वराज्य प्राप्त झालें म्हणजे, आहेत ते इंग्रज ताबडतोब घालवून देण्याचीच मसलत करावयाची असेल तर मात्र नोकरशाहीचा सपाटून विरोध होईल. पण त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, इंग्रजांचे अधिकारी या नात्यानें जें स्थान आहे तें केवळ स्टेट सेक्रेटरी व ब्रिटिश सरकारच्या खुशीवरच अवलंबून असेल व त्याच्या अस्तित्वाचें समर्थन करणारीं दुसरीं कारणें नसतील तरच त्यांचें स्थान जाईल. तथापि जोंपर्यंत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींचा स्वकीयेतर हिंदी मंडळीपेक्षां त्रयस्थ इंग्रजांवर विश्वास अधिक आहे, व इंग्रजांच्या कामाच्या हुशारीवर अधिक विश्वास आहे तोंपर्यंत इंग्रजांचें उच्चाटन होणें अशक्य गोष्ट आहे. देशाला स्वराज्याचे पूर्ण हक्क मिळाले तरी लष्करी अधिकाराच्या जागांवरून इंग्रजांची हकालपट्टी आज होईल असें वाटत नाहीं. त्या तऱ्हेची योजनाहि करण्याइतका लष्करी आत्मविश्वास आपल्या लोकांत आला नाहीं. आपल्या लोकांचा कटाक्ष विशेषेंकरून मुलकी जागांवर आहे. इंग्रज मुलकी नोकरांचा वर्ग येथें सुमारें अडीच हजार आहे. आणि राज्यकारभाराचें हिंदीकरण करावयाचें म्हणजे फक्त या अडीच हजार लोकांपुरता प्रश्न आहे.

जर आज संपूर्ण स्वराज्य प्राप्त झालें तर इंग्रज नोकरवर्गापैकीं कांहीं माणसें आपखुषीनें परिस्थिति बदलली म्हणून नोकरी सोडून चालते होतील; पण बरीचशी माणसें नोकरी सोडून जाणार नाहींत व

आपले प्रतिनिधीहि त्यांस घालवूनहि देणार नाहींत असें वाटतें. राज्यकारभाराचें कसेंहि होवो, इंग्रज आहेत ते जावोत असें म्हणण्याइतका आपला प्रतिनिधिवर्ग बेजबाबदार असेलसें वाटत नाहीं. कां कीं तो स्वराज्य चालविण्याच्या अडचणी प्रसंग आल्यावर जाणालें. कांहीं देशी संस्थानांचा कारभार बराचसा पद्धतशीर चाललेला असतो त्यावरून स्वराज्य चालविणें म्हणजे देशी संस्थानांचा कारभार चालविण्याइतकें सोपें आहे अशी समजूत असल्यास ती चुकीची आहे. स्वराज्य म्हणजे देशी लोकांच्या नोकरशाहीचें राज्य नाहीं. आजची स्वराज्याची कल्पना लोकशाहीची आहे, आणि लोकशाही ही चालविण्यास राजसत्तेपेक्षां किंवा नोकरशाहीच्या सुलतानी पद्धतीपेक्षां अधिक कठीण शासनपद्धति होय. केवळ देशी नोकरशाहीच्या हुकमी सत्तेनें राज्य चालविणें जितकें कठीण आहे, त्यापेक्षां लोकशाहीस जागृत करून तिच्या सहकारितेनें राज्य चालविणें अधिक कठिण आहे. स्वराज्य चालविणे म्हणजे काय याची माहिती देखील देशांतील बहुजनसमाजास पाहिजे. ती कल्पना नसली तर स्वराज्याची कल्पना कधींहि यशस्वी होणार नाहीं.

हिंदुस्थानचें राज्य चालविण्यासाठीं पत्करतांना आपणांस प्रथमतः ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागेल कीं, राष्ट्राचें कर्ज नव्वद कोट पौंड आहे, आणि त्याबद्दल राष्ट्रास दरसाल सुमारें ४॥ कोट पौंड व्याज भरावें लागतें. तें व्याज वेळेवर भरतां न आलें म्हणजे हिंदुस्थानाची रोकड बाजारांतील पत जाईल आणि धनकोच्या हितासाठीं धनकोला योग्य वाटणारी व्यवस्था करावी लागणार; म्हणजे सर्व स्वराज्याचे हक्क नाहींसे करून इंग्लंडला पुन्हां हिंदुस्थानाचा कारभार हातीं घ्यावा लागणार आणि तसें करावयास इंग्लंडला जग भाग पाडील.

साडेचार कोट पौंड व्याज ज्या रकमेंतून भरावयाचें ती वार्षिक उत्पन्नाची बाब होय. हें वार्षिक उत्पन्न तेरा कोट पौंड आहे.

म्हणजे दोनशें कोट रुपये दरसाल जमा करावयाचे. त्यांतील ६० कोट व्याजासाठीं द्यावयाचे आणि उरलेले रक्षणविकासादि कार्यांकडे लावावयाचे असा हा मोठा धंदा आहे. हा धंदा नेहमीं कायमच्या नोकरशाहीकडूनच चालावयाचा आहे आणि निवडून येणाऱ्या लोकांस याची जबाबदारी त्या मानानें कमीच वाटावयाची. जर कर शिस्तीनें गोळा केला गेला नाहीं, व वसूल गोळा करण्यासाठीं साडेतीनशें कलेक्टरांनीं शिकस्त केली नाहीं तर कर्जाचें व्याज फिटण्याचें राहूंच द्या, पण सरकारी अधिकाऱ्यांचे पगारहि वेळच्या वेळेवर मिळणार नाहींत. यासाठीं पैसे वसूल करण्याच्या जागांवर खंबीर माणसें ठेवण्याची प्रवृत्ति रहाणार, आणि यासाठीं ज्यांस लोक भितात अशा अधिकाऱ्यांचीच नेमणूक करण्याकडे लोकांची प्रवृत्ति रहाणार. कर वेळच्या वेळेवर वसूल होण्यास ज्या गोष्टी लागतात, त्यांमध्यें लोकांस कर देण्याचें कर्तव्य समजणारी जनता तयार होणें किंवा कर उत्पन्न करणाऱ्या अधिकाऱ्यांचें भय वाटणें या गोष्टी आहेत. अशा वेळीं जरी सर्व सत्ता लोकांस जबाबदार असलेल्या दिवाणांच्या हातीं आली तरी ते दिवाणहि परकी नोकरशाही बरेच दिवस आपल्या हितासाठींच चालू ठेवतील असा संभव आहे, बंगालमधले मोठमोठे जमीनदार आपल्या रकमेची वसूली करण्यासाठीं पठाण नेमतात, व ते नेमतांना जी वृत्ति पाठीमागें असते, तीच वृत्ति करवसूलीच्या कारभारावर परकी नोकरशाही ठेवण्यास उत्तेजन देईल.

प्रश्न असा उत्पन्न होईल कीं, परदेशांत स्वराज्य आहे ना ? तेथेंही स्वकीय नोकरशाहीनेंच कारभार चालविला आहेना ? तर हिंदुस्थानांतच कारभार चालू रहाण्यास आणि सक्तीनें कर वसूल होण्यास परकीय नोकरशाही कां ठेवावी लागेल ? इतर स्वतंत्र देशांचें कसें चालतें ? याला उत्तर द्यावयाचें म्हणजे जगाच्या व्यव-

हाराकडे नजर फेंकली पाहिजे. जेथें राजशासन जाऊन प्रजाशासन आलें अशा प्रसंगीं बऱ्याच वेळां सरकारी पैशाच्या वसूलीची अडचणहि झाली आहे. लहान लहान राष्ट्रें तर मुख्यतः जकातींवरच चाललेलीं आहेत, आणि लोकसत्ताक राज्यांत अप्रत्यक्ष कराचें स्तोम पुष्कळच आहे. अमेरिकेंत संयुक्त संस्थानांचें सरकार मुख्यतः जकातींवरच चालतें. संस्थानसरकार मुख्यतः लायसेन्सचे पैसे, कंपन्यावर कर, वारशावर कर इत्यादिकांवर चालतें, आणि नगर किंवा खेडें हें जमीनींच्या करावर चालतें. म्हणजे जें सरकार जितकें दूर व त्यापासून होणारे फायदेहि जितके दूरस्थ तितकें त्या सरकारास अप्रत्यक्ष करांकडे वळावें लागतें. जेव्हां ज्या कराचा फायदा प्रत्यक्ष लोकांना दिसत आहे, तेव्हां तो वसूल करणें सोपें जातें. यासाठीं शिक्षणासारख्या बऱ्याचशा गोष्टींचा बोजा स्थानिक संस्थांकडे टाकण्याची आणि त्याबद्दल त्यांनांच पैसा उभारावयाला लावावयाची शक्कल सध्यांच्या मुंबई सरकारनें अंगिकारिली आहे, आणि ती बरीचशी सशास्त्र आहे. आपल्या देशांत आतां करपद्धति ही शासनपद्धतीबरोबर बदलत जाणार आहे. कर प्रत्यक्षफल होत जाण्याची क्रिया हळुहळु होत जाईल, व प्रजेची कराबद्दल सहानुभूति वाढत जाईल. पण तोंपर्यंत कर अधिकाराच्या जोरावर वसूल करण्याची क्रियाच करावी लागणार.

आपल्या देशांतील कारभार आपणांस पूर्वीप्रमाणेंच चालवावा लागणार नसून त्यांत फारच बदल करावा लागणार आहे. म्हणजे भविष्यकालीन राज्यकारभार म्हणजे सुरू केलेले यंत्र फिरवीत रहाणें नव्हे, तर विशिष्ट क्रिया करण्यासाठीं नवीन यंत्रयोजना करणें आहे. उदाहरणार्थ—आपली करपद्धतिच घ्या. ही करपद्धति सुलतानी कारभारास साजेल अशी आहे, लोकसत्ताक कारभारास साजेलशी करपद्धति नव्हे. त्यामुळें बदललेल्या शासनपद्धतीस योग्य अशी

करपद्धति बनवीत गेलें पाहिजे, आणि ती करपद्धति बदलतांना देखील देशाच्या कारभाराची पत राखिली पाहिजे देशांतील शासन-संस्था जर एकसत्तास्वरूपी असेल तर राज्य चालविणें सोपें असतें. राजाचें पद अढळ असतें, त्याच्या हातीं सर्व सत्ता असते, प्रजेनें हूं कां चूं केलें तर प्रजेस रट्टे लगावून सरळ करतां येतें, आणि वसूल बिनबोभाट होतो, त्यामुळें सरकारला नोकरांना द्यावा लागणारा पगार वसूल करतां येतो. राजाचें पद जाऊन तेथें निवडलेला अधिकारी आला म्हणजे त्याला लोकांवर हवे तसे कर लादतां येत नाहींत. त्याला पुन्हां निवडून यावयाचें असते, व त्याचें लक्ष, कोणते कर लौकर वसूल होतील, कोणत्या कराचें दृश्य फल लोकांस दाखवितां येऊन करलादणीस जोर मिळेल इत्यादि गोष्टींवर असतें. एवंच व लोकशाहीमध्यें लोकांची मनोरचना ओळखून शासनसंस्थेला अवश्यक असे ठराव पास करून घेण्यांचा बोजा कायम अधिकारीवर्गावर पडतो, व यासाठीं लोकांना वळवून, कृप्त्या लढवून वाटेल तें पास करून घेण्यांत तरबेज असलेले लोक इंग्रजांत मिळतील व आपले सत्ताधारी लोक त्यांस पसंत करतील असा बराच संभव आहे.

आज जे नोकरी करीत आहेत त्यांची नोकरी शाबूद राहील ही गोष्ट इंग्रज अधिकाऱ्यांच्या नजरेस आली म्हणजे त्यांचा लोकशाहीस विरोध कमी कमीच होत जाणार. त्यांस हिंदुस्थानची चाकरी वंश-परंपरेनें करावयाची आहे असें नाहीं. बापाची योजना मुलास थोडीच पसंत पडत असते. मुलगा स्वतःसाठीं योजना स्वतःच करीत असतो. जे आज हिंदुस्थानचे नोकर आहेत त्यांचे मुलगे इंग्लंडांत राहतील किंवा कानडा, दक्षिण आफ्रिका व आस्ट्रेलिया इकडे देखील जातील. आपल्याकडे इंग्रज अधिकाऱ्यास जे पगार मिळतात ते दिसतांना जरी मोठें दिसतात तरी संपन्न राष्ट्राच्या मानानें

ते पगार कांहीं विशेष नाहींत. कानडामध्यें सुतार किंवा गवंडी २५ पासून ३० रुपये रोज मिळवितो, त्यापुढें हिंदुस्थानांतील मजरचा पगार काय? हुषार गवंडी किंवा सुतार आपल्या आयुष्याच्या उत्तर भागांत कॉंट्रॅक्टर होतो व तो सालचे दहा हजार डॉलरपर्यंत मिळवूं शकतो. खुद्द इंग्लंडमध्यें पगार कमी आहेत; पण तेथेंहि कंपाझिटर किंवा प्रेसमन रोजचा १ पौंड घेतो. अशी जर स्थिति आहे तर सुशिक्षित इंग्रजांस हिंदुस्थानांतील जागा हें इतकें मोठें घबाड वाटत नाहीं कीं त्यासाठीं त्यांनीं साम्राज्याच्या हिताकडे दुर्लक्ष करावें; आजच अशी स्थिति झाली आहे कीं, इंग्लंडांतील सुशिक्षित तरुण त्यांचें स्वागत करण्यास जो देश तयार नाहीं म्हणून त्यांची समजूत झाली आहे त्या हिंदुस्थानांत नोकर म्हणून यावयास तयार नाहींत.

आजच्या इंग्रज नोकरवर्गाची भाकरी स्वराज्य आलें तरी जवळ जवळ आहे तशीच चालू राहीलसें वाटतें. पण अशीहि शक्यता आहे कीं, इंग्रज नोकरांचें अस्तित्व, आणि इतर इंग्रजांचें समाजांतील प्रतिष्ठित स्थान, स्वराज्य प्राप्त झालें तरीहि चालूच राहील, आणि असें होण्यास आर्थिक कारणें आहेत. आणि आज इंग्रज जो केवळ हातांत चाबूक असलेला मनुष्य अशी कल्पना आहे ती नाहींशी होऊन देशाच्या प्रगतीस सहाय्यक अशी कल्पना होऊन इंग्रजांचें प्रामुख्य रहाणार आहे. मात्र तसें होण्यास आजच्यापेक्षां निराळे इंग्रज हिंदुस्थानांत यावे लागतील व नोकरींत नवीन शिरणाऱ्या इंग्रजांस निराळ्या भावनांनीं काम हातीं घ्यावें लागेल. हिंदुस्थान सरकारनें आतांपर्यंत जें राज्य चालविलें तें चालविण्यांत सरकारची इभ्रत देखील लोकांत पूर्णपणें राखली नाहीं. सरकारच्या इभ्रतीपेक्षां गोऱ्या कातडीची इभ्रत अधिक राखली. गोऱ्या गुन्हेगारास स्वयं-प्रेरणेनें पकडण्याची काळ्या अधिकाऱ्याची छाती क्वचितच होई.

जातीची इभ्रत लोकांत राखण्याच्या इच्छेनें बदमाष इंग्रजांस सरकारनें जें संरक्षण दिलें त्यामुळें व शासनसंस्थेच्या सुलतानी पद्धतीमुळें इंग्रज नुसता हुकूम करणारा आणि पगार खाणारा अशी कल्पना झाली आहे व यामुळें आपल्या राष्ट्रीय विकासास मदतनीस या दृष्टीनें आपण इंग्रजांकडे पहात नाहीं. पण त्या दृष्टीनें देखील मदत करण्याची इंग्रजांची योग्यता आहे, आणि तसें करूं शकणारा वर्ग त्यांच्यामध्यें आहे. आणि तो आपल्याकडे येईल असा मला दृढ भरंवसा आहे. स्वराज्यांत इंग्रज नोकर हिंदुस्थानांत येणार नाहींत असें नाहीं. उलट केवळ उपयुक्ततेच्या तत्त्वावर ( जेतृवर्गाचा प्रतिनिधि म्हणून नव्हे ) पुष्कळ इंग्रज येथें येण्याचा संभव आहे. ज्या कला आज हिंदुस्थानांत नाहींत व इंग्लंडमध्यें आहेत त्या येथें येणारच आणि त्या इंग्रज मनुष्यांमार्फत येतील. नवीन शोध लागले म्हणजे त्या शोधामुळें जी कार्यपरंपरा उत्पन्न होते ती प्रथम इंग्लंडांत होणार व नंतर तिला व्यावहारिक स्वरूप आलें म्हणजे ती कला इकडेहि येईल. येथें इंग्लंडांतून कायमचे नोकर जरी आले नाहींत तरी तात्पुरते असें पुष्कळच येतील.

जगाचा एकंदर व्यवहार वाढूं लागला म्हणजे भांडवल व मजूरी यांचें स्थलांतर होत जातें. फिजीमध्यें इंग्लंडचें भांडवल व हिंदुस्थानाची मजूरी मिळून तेथील प्रदेश भरभराटला. जेथें सुधारणा अधिक प्रगत झाली आहे, तेथून उत्पादनक्रियेच्या वरच्या जागा पटकवणारा वर्ग येतो व भांडवल येतें; आणि कमी सुधारलेल्या देशांत उत्पादन वाढूं लागतें आणि लोकांची स्थिति सुधारत जाते. एक कर्ता मनुष्य आला म्हणजे तो शेंकडों लोकांस उद्योगास लावतो असा अनुभव आहे. जो कुशल फोरमन शेंकडों लोकांना कामाला लावून त्यांच्याकडून काम काढून घेतो, तो गिरणी मालकांनां हवा असतो; त्याप्रमाणेंच जो अधिकारी स्वास्थ्य व शांतता राखून लोकांना परि-

श्रम करून पैसे मिळविण्यास उत्तेजन देतो तो राजे लोकांस व जबाबदार अधिकाऱ्यांत हवा असतो. इंग्लंडमध्यें उत्पादनाची क्रिया अधिक विकासली आहे; आणि हिंदुस्थानांत ती विकासावयाची आहे. त्यामुळें येथील वाढते धंदे आणि व्यवहार हीं चालविण्यास इंग्लंडासारख्या देशांतील माणसांची गरज लागणारच. इंग्लंडपेक्षां अमेरिकेमध्यें कांहीं गोष्टी अधिक वृद्धिंगत झाल्या आहेत, त्यामुळें त्या गोष्टी इंग्लंडांत सुरू होऊं लागल्या म्हणजे इंग्रज लोक अमेरिकन माणसें आणतात. माझी अशी समजूत आहे कीं, हिंदुस्थानांत जितके इंग्रज चांगल्या पगाराच्या जागेवर आहेत त्यांपेक्षां अधिक अमेरिकन इंग्लंडांत नोकरीला असतील. हिंदुस्थानी मंडळीस आपल्या धंद्यासाठीं नव्हे, तर सामाजिक व राजकीय सुधारणेसाठीं देखील पाश्चात्य मंडळांची गरज लागेल. राजकीय चळवळींना देखील इंग्रज धुरीण आपणांस चालतो आणि आपल्यासाठीं तो चांगलें काम करूं शकतो असा अनुभव आहे. तशीच गोष्ट सामाजिक व्यवहारांची आहे.

लोकशाही चालवावयास जी यंत्रसामुग्री लागते ती आपल्याकडे कालान्तरानेंच तयार होईल; पण इंग्लंडमध्यें व अमेरिकेमध्यें आजच तयार असून लोकशाहीच्या संवर्धनाच्या प्रसंगीं ती आयती येण्याचा संभव आहे. लोकांस जागृत करण्यासाठीं ज्या मोहिमा तयार कराव्या लागतात त्या मोहिमांचे व्यवस्थापक देखील आपल्याकडील एकमेकांविरुद्ध लढणारे पक्ष इंग्रजांतूनच घेतील. लोकांत चळवळ व्हावी व लोकमतामध्यें जोर उत्पन्न व्हावा म्हणून आपल्याकडील चळवळीसाठीं काढलेलीं वर्तमानपत्रें इंग्रज संपादक नेमीत नाहींत काय? लोकमान्य टिळकांच्या खालोखाल नोकरशाहीस उपद्व्यापी व त्रासदायक वर्तमानपत्रकार म्हणून भासणाऱ्या हार्निमनला आपल्याच लोकांनीं आणलें नाहीं काय? सोशॅलिझमला अनुकूल अशीं मतें आपल्या देशांत पसरत आहेत, अशा प्रसंगीं सोशॅलिझमची तरफ-

दारी व प्रचार करूं पहाणारे इंग्रज आपल्या देशांत आले तर ते स्वाभाविकपणें येथलि तद्विध लोकांचे पुढारी बनणार नाहींत काय? आणि पुढारी बनून मंत्रिपदापर्यंत पोंहोंचूं शकणार नाहींत काय? या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या असतां लोकशाही म्हणजे केवळ देशी लोकांना मोठ्या किफायतवार जागांची खैरात व इंग्रजांची हकालपट्टी असें मुळींच होणार नाहीं; आणि इंग्रजांची अनवश्यकताहि उत्पन्न होणार नाहीं; लोकशाहीमध्यें सरकार हें लोकांचें नेतृस्थान आहे, आणि अधिकार नेतृत्वाच्या गुणावर मिळतो हें खरें; पण नेतृत्वास लागणारे गुण उत्पन्न होण्याची शाळा म्हणजे अधिक प्रगतराष्ट्रें होत व अधिक प्रगत राष्ट्रांत तयार झालेले लोक स्वाभाविकपणें अप्रगत राष्ट्रांत प्रामुख्य मिळवतील. अशी कल्पना करा कीं, निरनिराळ्या देवळांत जमा होणारा पैसा हा लोकसुधारणेसाठीं शिस्तवार खर्च करावयाचा आहे, तर तो पैसा खर्च कसा करावा? देवळांचें दृश्य सुधारण्यासाठीं, देवळें आरोग्यकारक करण्यासाठीं, समाजांतील सुशिक्षित वर्गास तीं आकर्षक करण्यासाठीं आणि नैतिक आचरणाचा समाजांत परिपोष करणारें यंत्र किंवा प्राचीन विद्येचें स्थान बनविण्यासाठीं किंवा समाजाच्या दानशक्तीचें केंद्रस्थान म्हणून देवळांचें नैतिक समर्थन होण्यासाठीं देवळांची सुधारणा कशी करावी, या गोष्टी सांगण्यास आणि लोकांचें मन वळवून त्या सर्व गोष्टी कायदेशीर व पद्धतशीर रीतीनें घडवून आणण्यास पाश्चात्य दानसंस्थानांत काम करून तयार झालेलीं माणसेंच अधिक उपयोगी पडतील. तोच प्रकार निकृष्ट वर्ग सुधारण्यासाठीं प्रयत्न करतांना दिसून येईल. कामकारी वर्गाची एकंदर आयुष्यक्रमाची सुधारणा व्हावी म्हणून जर प्रयत्न करावयाचा असेल तर त्यांच्यामध्यें घटना घडवून आणणें, त्यांच्या सुखाकडे अधिक लक्ष दिल्यानें धंद्याचें कसें कल्याण होतें हें मालकांस भासविणें, माल-

काच्या किफायतीवर मजुरांचा फायदा अवलंबून आहे इत्यादि गोष्टी मजुरांच्या मनांत ठसविणें, त्यांचे संप मालकांस बुडूं न देतां मजुरांस फायदेशीर करविणें, मजुरांस कर्जबाजारीपणांतून मोकळे करणें, त्यांची रहाणी सुधारण्यासाठीं त्यांच्याच अपेक्षा वाढविणें, मजुरांच्या गरजा वर्तमानपत्रांतून व्यक्त करणें, त्यांच्या मतांचें म्हणजे संघांचें स्थानिक शासनसंस्थांवर वजन पाडणें इत्यादि गोष्टी करण्यास इंग्रज कामकऱ्यांच्या पुढाऱ्यांतून येथें काम करण्यास कोणी आले तर तेच अधिकच चांगल्या तऱ्हेनें काम करतील.

पूर्वोक्त विवेचनावरून असें दिसून येईल कीं, लोकांच्या हातीं सत्ता आली तरी इंग्रज नोकरांचें त्यापासून फारसें नुकसान नाहीं. लष्करी अधिकारी सर्व हिंदी करा व इंग्रजांस काढून टाका असें आज कोणी म्हणणार नाहीं, व मुलकी अधिकाऱ्याकडे लक्ष दिलें तरी व्याज-फेडीच्या जबाबदारीमुळें राज्य लोकतंत्रानुसारी झालें तरी सरकारास लागणारा खर्च चालविण्याच्या आवश्यकतेमुळें आजच्या लोकांस कर्तबगार इंग्रजांस आमचे दिवाण एकाएकीं काढून टाकणार नाहींत. एवढेंच नव्हे, तर पुढें इंग्रजांची जरूर निराळ्या कारणानें लागणार आणि इंग्रज हुकूम सोडणारा आणि सर्व उत्पन्न खाणारा राक्षस या स्वरूपांत लोकांस न दिसतां आमच्या विकासास सहाय्यक आणि समाज-विकासविषयक अनुभव आमच्या अगोदर घेतलेला मनुष्य या नात्यानें येऊन त्याचें स्वागत या देशांत अधिक अंतःकरणपूर्वक होईल. म्हणजे इंग्रज व हिंदी यांमध्यें स्वराज्योत्तरकालांत खरी मैत्री व खरें प्रेम वाढल्यावांचून रहाणार नाहीं. एवंच स्वराज्यजोपासनेविरुद्ध नोकरशाहीचा विरोधहि काढून टाकतां येण्याजोगा आहे. व त्यासाठीं देखील प्रयत्न पाहिजे. देशांतील लोकांस महत्त्वाचें स्थान यांची लायखी त्यांनीं वाढविल्यानेंच प्राप्त होत जाईल. म्हणून देशांत शिक्षणविकास करणें हें देशाचें मुख्य कर्तव्य होतें.

# प्रकरण ९ वें.

## स्वराज्यप्राप्ति न होण्याची अशक्यता.

जर स्वराज्यासाठीं चळवळ करण्यास आज पद्धतशीर प्रारंभ करावयाचा झाला तर या चळवळीची केवळ आत्मोन्नतिपरता लक्षांत आली पाहिजे. आपल्या उन्नतीच्या मार्गांत जर कोणतें अत्यंत मोठें विघ्न असेल तर सर्व जग आपल्या उलट आहे ही खोटी व उत्साहभंजक कल्पना लोकांच्या मनांत भरली आहे हें होय. ही कल्पना इंग्रज विरुद्ध हिंदी उदाहरणें पाहून, आणि पैसेखाऊ इंग्रज अधिकारी कसे सुटून जातात त्याचा अनुभव घेऊन लोकांत सहज आली व पुष्कळ अंशीं आपल्यांतील राजकारणी मंडळी शासनविषयक प्रश्नावर विचार करून ज्या निर्णयास पोंचली तो निर्णय लोकांत पसरला त्यामुळें आली. त्याबरोबर अविश्वास मात्र अमर्याद वाढला. इंग्लंडमधील लोक लुच्चे आहेत, सरकारी अधिकारी महालुच्चे आहेत, त्यांचें प्रत्येक करणें देशाचें नुकसान व्हावें म्हणून योजलेलें आहे. आम्ही दुर्बळ व्हावें दुर्बुद्ध व्हावें असा सरकारचा हेतु आहे, आणि इंग्लंडांतील सर्व लोकांचें पोट हिंदुस्थानच्या चोरीवर अवलंबून आहे इत्यादि गोष्टी गेल्या पिढीच्या मनांत फारच पक्क्या बसल्या होत्या. या कल्पना जुन्या काळीं देखील सर्वांशीं सत्य नव्हत्या. इंग्लंडांतील कांहीं ब्रिटिश मुत्सद्दयांच्या व हिंदुस्थानांतील विशिष्ट अधिकाऱ्यांच्या मनांत कदाचित् हिंदुस्थानानें दुर्बल राहिलें पाहिजे, हिंदुस्थानाची प्रगति म्हणजे ब्रिटिश राज्याची समाप्ति होय, इत्यादि भावना असतील यांत शंका नाहीं, व हिंदुस्थानच्या देशविकासाचें तत्त्वहि येथील इंग्रज अधिकाऱ्यांस पूर्णपणें कबूल नसेल, आणि हिंदुस्थानावरील अधिकाराचा

दुरुपयोग करून इंग्लंडांतील व्यापाऱ्यांची धन करावी या गोष्टीस ते देशाभिमान समजत असतील, किंवा ब्रिटिश व्यापारी व कारखानदार यांस नफा मिळवून द्यावयाचे प्रयत्न केवळ देशाभिमानामुळें होत नसून गुप्तपणें मिळणाऱ्या कमिशनमुळें होत असतील. वरील प्रकारच्या दोन देशांतील हितवैरुद्ध्याच्या कल्पना इंग्लंडांतील अनेक मुत्सद्यांच्या अजून मनांत असतील असें वाटतें. गेल्या पिढींतल्या हितवैरुद्ध्याच्या कल्पनेच्या प्राबल्यामुळें इंग्लंड आमचें वाटोळें करण्यासाठीं बसलें आहे अशा तऱ्हेचा समज लोकांत प्रसृत झाला असल्यास त्यांत नवल नाहीं. व ज्यांनीं तो प्रसृत केला असेल त्यांच्यावरहि दोष नाहीं. आजहि आपण जर असें विधान केलें कीं, हिंदुस्थान सरकार अजून सर्व ब्रिटिश जनतेचे प्रतिनिधि झालें नाहीं, तर कांहीं अंशीं ब्रिटिश चोरटेमंडळाचें हस्तक आहे आणि ते बादशहाच्या नांवानें अधिकार चालवून हिंदुस्थानांतील लोकांची तर सोडूनच द्या पण ब्रिटिश जनतेची सेवा बरोबर करीत नसून कांहीं इंग्लंडांतील नफेबाजांची धन करण्याकरितां राज्यकारभार चालवीत आहे, तर तें विधान पूर्णपणें खोडलें जाणार नाहीं. तथापि हेंहि सांगितलें पाहिजे कीं चोरटेमंडळाचें प्रातिनिधित्व हिंदुस्थानसरकारच्या कारभारांत कमी कमी होत असावें, आणि कारभार कालच्यापेक्षां आज अधिक न्यायतत्त्वावर चालत असावा. दिवसानुदिवस हिंदुस्थानांत न्याय होत जाईल अशी अपेक्षा आज उत्पन्न झाली आहे आणि यासाठीं सनदशीर चळवळीवर विश्वास वादविण्यास आणि राज्यक्रांतीच्या आवश्यकतेच्या कल्पना लोकांच्या मनांतून घालवण्यास आणि त्याबरोबर प्रयत्न करण्यास प्रवृत्त करणारी आशा उत्पन्न करण्यास आज काल अनुकूल आहे.

आमची आजची आशामयता उत्पन्न होण्याचें कारण इंग्लंडांतील लोकांचा व मुत्सद्यांचा स्वभाव यक्षिणीची कांडी वापरली

जाऊन एकदम पालटून गेला त्यामुळें उत्पन्न झाली अशांतला भाग नाहीं. तसा जर पालटला असता आणि उदारबुद्धीचें वातावरण एकदम उत्पन्न होऊन हिंदुस्थानाला जर अधिक न्याय मिळत गेला असता, तर इंग्लंडवर आमचा विश्वास मुळींच नसता. कॉलनी हातची गेली तरी हरकत नाहीं, पण न्यायाचें व समतेचें तत्त्व मरतां कामा नये अशा तऱ्हेचें वातावरण फार दिवस टिकत नाहीं. या प्रकारची वृत्ति फ्रान्सनें एकदांच आणि ती तत्त्वोत्साहाच्या भरांत दाखविली होती. आज इंग्लंडची नीति अधिकाधिक उदार होत चालली आहे ती भावनात्मक औदार्याच्या लाटेनें उत्पन्न झाली नसून अधिक व्यवहारज्ञतेनें उत्पन्न झाली असें आमचें मत झालें आहे आणि तोच आमचा विश्वासस्तंभ आहे. हिंदुस्थानास अधिक स्वातंत्र्य मिळाल्यानें देशाचा विकास होत जाईल, तो इंग्लंडशीं आर्थिक सहकारिता अधिक चांगली करूं शकेल, हिंदुस्थानांत उद्योगधंदे वाढावे हें इंग्लंडच्या फायद्याचें आहे आणि हिंदुस्थानास पारतंत्र्यांत ठेवणें इंग्लंडला नुकसानकारक आहे हें आर्थिक व शासनविषयक तत्त्व कांहीं मुत्सद्यांस समजूं लागलें आहे. तथापि बऱ्याच इंग्रज मुत्सद्दयांस व कांहीं अधिकाऱ्यांस हें समजलें असून उमजलें नाहीं असें दिसतें; व कांहींस समजलेंहि नाहीं ही आजची स्थिति आहे. या दोन देशांच्या आर्थिक विकासांतील अन्योन्याश्रय स्पष्ट दिसत असल्यामुळें आम्हांस असा विश्वास वाटतो कीं, जितप्रदेशाची चोरी करावी असल्या तऱ्हेचे विचार व मूर्ख कल्पना जर इंग्लंडांतील मुत्सद्दयांच्या डोक्यांत असतील तर त्याहि आम्ही काढून टाकूं आणि हिंदुस्थानाला स्वराज्य देण्यास इंग्लंडांतील मुत्सद्दी आज जरी एकजात विरुद्ध असले तरी त्यांचाहि विरोध काढून टाकूं शकूं.

ज्याप्रमाणें कारखानदार व मजूर यांचें हितसंबंध एकमेकांच्या हिताशीं संलग्न असतात. त्याप्रमाणेंच दोन देशांतले संबंध असतात

आणि ज्याप्रमाणें मजुरांस आपलें हितरक्षण करण्यासाठीं संप करावा लागला तर ती गोष्ट बेकायदेशीर ठरली जात नाहीं त्याप्रमाणेंच दोन देशांच्या एकमेकांतील संबंधाची गोष्ट आहे. समाजांतील शासकवर्ग आणि प्रजा यांच्यासंबंधींची गोष्टहि तशीच आहे. दोन पक्षांमध्यें जे संबंध आज अस्तित्वांत आहेत त्या संबंधांतल्या कांहीं अटीमुळें एखादा पक्ष जर नुकसान पावत असला तर नुकसान पावत असलेल्या पक्षास प्रसंगीं असहकारिता करून, अस्तित्वांत असलेल्या संबंधाच्या अटी बदलून घेण्याचा आणि ज्यामुळें व्यापार आणि दळणवळण वगैरे सुखानें चालेल अशा अटी स्थापन करून घेण्याचा अखत्यार जसा नेहमींच्या व्यवहारांत आहे, तसाच तो राजकारणांतहि स्थापन करावयास हरकत नाहीं हें तत्त्व आज कोणासहि तात्त्विक दृष्ट्या अमान्य करतां येणार नाहीं तथापि राजकारणांत हातून वठत नाहीं ही गोष्ट जर्मनीस दोस्त सरकारें किती लज्जास्पद रीतीनें वागवीत आहेत त्यावरून दिसून येईल. पण युरोपांतील सर्व राष्ट्रं अमेरिकेचीं ऋणको झाल्यामुळें सर्व राष्ट्रांतील लोकांचे उद्योगधंदे चालले पाहिजेत असें अमेरिकेस वाटून अमेरिका यूरोपांतील राष्ट्रांना सहकारितेचें तत्त्व स्वीकारावयास लावील. ज्याप्रमाणें मजूर व कारखानदार यांमध्यें लढा जुंपतो त्यांत आणि मजूरवर्गाची यशस्विता त्यांच्या घटनेवर अवलंबून असते, तशीच गोष्ट हिंदुस्थान व इंग्लंड यांतील आजच्या संबंधाविषयीं म्हणतां येईल. हिंदुस्थानांतील सर्व लोक त्यांच्या उत्पादक व ग्राहक या नात्यानीं इंग्लंडशीं संबद्ध आहेत आणि त्यामुळें राजकारणाचा प्रश्न म्हणजे केवळ आर्थिक प्रश्न आहे. म्हणून राजकीय प्रश्नांस आर्थिक संग्रामांतील उपाय लावण्यास हरकत नाहीं. अर्थात् आजची राजकारणाची चळवळ अनिष्ट संबंध काढून टाकून इष्ट संबंध स्थापन करण्याकरितां

आहे म्हणजे इंग्लंडचा हिंदुस्थानशीं संबंध अधिक न्यायाचा व अधिक भक्कम पायावर उभारावयासाठीं आहे.

आम्हांस हिंदुस्थान आणि इंग्लंड किंवा जनता आणि शासकवर्ग यांच्या अटी तात्पुरत्या फायद्यातोटयासाठीं बदलून पाहिजेत असें नाहीं. तर सध्यांच्या सरकारापेक्षां उच्च प्रकारचीं व अधिक सेवाक्षम शासनसंस्था लोकांस द्यावयाची आहे म्हणून बदलून पाहिजेत.

लोकांकडून कर गोळा करणें हें सरकारचें प्रधान कर्तव्य नव्हे तर लोकरक्षण व लोकसुधारणा हीं मुख्य कर्तव्यें आहेत व कर बसविणें इत्यादि गोष्टी ती कर्तव्यें साध्य होण्यास साधन म्हणूनच आहेत. नाहीं तर कर उत्पन्न करण्याचें प्रयोजनच नाहीं. ज्या नोकरशाहीच्या तावडींत आज दीडशें वर्षें हिंदुस्थान पडलें आहे त्या नोकरशाहीनें लोकसुधारणेचें काम आजपर्यंत काय केलें ? संरक्षणाचें काम 'बरें' केलें आहे, असें नोकरशाहीच्या तर्फेनें म्हणतां येईल. तथापि " चांगलें केलें आहे " असें शब्द नोकरशाहीस कितीहि अनुकूल बुद्धी ठेवली तरी तोंडांतून निघत नाहींत. परचक्रापासून रक्षण केलें पण पैसे लष्करी खर्चांत अडकवून सर्व प्रकारच्या आर्थिक व आरोग्यविषयक सुधारणा अशक्य केल्या, त्यामुळें लढाईपेक्षां अधिक लोक मृत्यु पावतात. लोकप्रगति आज १५० वर्षें खुंटली आहे. असली नोकरशाही फार वर्षें चालू राहील तर लोकप्रगति व लोकशिक्षण कधींच होणार नाहीं. तीस कोट लोकांचें भवितव्य आतां नोकरशाहीच्या ताब्यांत ठेवणें व देशांतील सर्व देशाभिमानी लोक तिच्यापुढें दुर्बल व कस्पटासमान ठेवणें या तऱ्हेची शासनपद्धति इतःपर चालू राहिल्यास आणि ती हिंदुस्थानांतील लोकांनीं निमूटपणें चालूं दिल्यास हिंदुस्थानांतील लोक स्वदेशद्रोहाच्या भयंकर पापाचे धनी होतील. नोकरशाहीच्या नालायखीचें एकच उदाहरण देतों:— कै. ना गोखले यानीं पंधरा

वर्षांपूर्वीं सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करून घेण्यासाठीं प्रयत्न केला. त्या प्रयत्नाच्या अगोदरच यास सुशिक्षितांचें मत अनुकूल होतें असें आढळून आलें. असें असतां सर्वोत्पन्नभक्षक नोकरशाहीनें या कायद्यानें सुधारणा करण्याच्या योजनेस फारसें पुढें जाऊं दिलें नाहीं. दरसाल ती चळवळ पुढें ढकलण्यास अगर फेंटाळून लावण्यास कांहीं तरी कारण असायचेंच. कोणतें तरी कारण काढून ती योजना फेंटाळण्यांत यावयाची आणि सरकारी कौशल्य, लोकांनीं पुढें आणलेली खटपट लाथाडून कशी टाकावयाची, आपले पगार कसे वाढवून घ्यावयाचे आणि लोकप्रतिनिधींपैकीं कांहींनां दिवाणगिरीसारखी पदवी देऊन अपयशाचें खापर त्यांच्या माथीं कसें फोडायचें असल्या हुशारींत खर्च झालें आहे, हें लक्षण नोकरशाहीच्या विश्वासार्हतेचेंच काय? नोकरशाहीमध्यें प्रगतीच्या उत्साहाचा अभाव आहे एवढेंच नव्हे तर तिचें आज नैतिक अधःपतन झालें आहे, आणि त्यास मुख्य आजची डायार्की कारण आहे. तीमुळें कौन्सिलांतील वातावरणच इतकें दूषित झालें आहे कीं, तेथील राजकारणास केवळ 'ठकवाठकवीचें पवित्रे कसे टाकावे तें दाखविण्याचें स्थान,' असें घाणेरडें स्वरूप आलें आहे. आपल्यांतील प्रतिनिधींनीं कौन्सिलमध्यें नोकरशाहीविरुद्ध यशस्वी काम करावयाचें म्हणजे काय? तर असल्या लपंडावाच्या गोष्टींतून पार पडण्यासाठीं कुटिलतेचा तरबेजपणा संपादावयाचा हें होय. अशा प्रसंगीं सामान्य मनुष्य प्रश्न करितो कीं शासनसंस्था कौटिल्याची जोपासना करण्यासाठीं आहेत कीं, सुधारणेसाठीं आहेत?

सध्यांची राजकीय परिस्थिती समजण्यास आपण दुसरें सोंपेसे उदाहरण घेऊं. कल्पना करा कीं, मोठ्या जमीनदाराचा अगर संस्थानिकाचा कारभार सरकारनियुक्त कारभारी पहात आहे. त्या कारभाऱ्याला काढून टाकण्याचा अखत्यार, संस्थानिकांस नाहीं.

त्यानें एक जोडकारभारी द्यावा व दोघांनीं मिळून एकमतानें कारभार पहावा असा ठराव आहे. कारभाऱ्याचें आणि जोडकारभाऱ्याचें जुळलें नाहीं तरी कारभारी कलेक्टरकडून मंजुरी आणवून जोडकारभाऱ्यास आणि मालकास चूप करणार एवढेंच नव्हे तर जोडकारभाऱ्याच्या हाताखालचे कारकूनहि तसेंच करणार. त्या कारकुनास देखील शिक्षा करण्यास जोडकारभाऱ्यास अधिकार नाहीं. सरकारनियुक्त कारभारी एकसारखा लबाड्या करीत आहे आणि मालक किंवा मालकाचा हितचिंतक यास त्याला काढून टाकण्याची शक्ति नाहीं असें झालें म्हणजे जोडकारभारी मालकास बेमान होऊन कारभाऱ्याच्या पैसेखाऊ आणि कलेक्टरांस चारू योजनांस मिलाफ होऊन योग्य आणि यशस्वी जोडकारभारी ठरणार, आणि दोघेहि मालकांस बुडविणार, किंवा मालक व जोडकारभारी यांचें सर्व लक्ष त्या कारकुनाची लबाडी हुडकण्यांत आणि त्याविरुद्ध दुर्बल धुसपुसणें करण्यांत जाणार, व इतर व्यवहार बाजूला रहाणार. या तऱ्हेचें गलिच्छ वातावरण आज कौन्सिलांत खेळत आहे. स्वराज्य पक्षाचा आतां ( १९२५ अखेर ) पर्यंतचा कार्यक्रम हा केवळ त्या वातावरणाचाच परिणाम आहे.

एकाद्या मालकानें कारकून जें करील त्याच्या विरुद्ध मी करीत जाणार असें म्हणणें म्हणजे ज्या सत्तेच्या साहाय्यानें कारकुनाच्या हातीं इस्टेटीचा कारभार आला त्या सत्तेस व कारकूनास लाजरवाणी गोष्ट आहे. तथापि या तत्त्वाकडे दुर्लक्ष करून उलट मालकाला म्हणजे देशाच्या प्रतिनिधिवर्गाला आणखीं पेंचांत पाडण्याचा कार्यक्रम नोकरशाहीनें अंगिकारिला आहे.

लोकप्रतिनिधींनीं आपली विरोधाची नीति स्पष्टपणें अगोदर सांगितली असतां ते निवडून आले त्यावरून प्रतिनिधीस निवडून देणाऱ्या

जनतेस कारकूनसंघाविषयीं ऊर्फ नोकरशाहीविषयीं विश्वास नव्हता हें उघडच होतें, आणि नोकरशाहीविषयीं जो अविश्वास लोकांनीं या प्रसंगीं व्यक्त केला तो प्रथमतः नोकरशाहीशीं सहकारिता करण्यास तयार असलेले लोक प्रथम पाठवून त्यांचा अनुभव घेतल्यानंतर केला. आणि नोकरशाहीनें त्याविरुद्ध असा डाव केला कीं, ज्या गोष्टी नोकरशाहीच्याच फायद्याच्या असतील त्या गोष्टी गव्हर्नरचे अंतिम अधिकार वापरून पास करून घ्यावयाच्या आणि ज्या गोष्टी लोकांच्या हिताच्या असतील त्या गोष्टी तशाच राहूं द्यावयाच्या; अशा तऱ्हेनें प्रतिनिधिमंडळास लोकांमध्यें अप्रिय करावयाचें.

कल्पना करा कीं, मालक किंवा त्यानें नेमलेला जोडकारकून मुख्य कारकुनाच्या लबाडीशीं रोज झगडण्यामुळें कंटाळून गेला आहे आणि जमाखर्चाचें अंदाजपत्रक मला तूं दाखवूं नको, तुमचाच हस्तक बनणारा किंवा मला निरुपयोगी होणारा मी जोडकारकून नेमीत नाहीं, असें त्रागयानें म्हणाला आहे तर कारकून पुढें काय हुषारी दर्शवितो—आपला पगार, आपल्या घरच्या नाचगाण्यासाठीं पैसे, आणि आपल्या मित्रांच्या जेवणासाठीं पैसे हे सर्व जमीनदारांच्या खासगी उत्पन्नावर चैन करूं पाहणाऱ्या चोरट्या कलेक्टरादि अधिकाऱ्यांकडून पास करून घेतो व मालकाच्या मुलासाठीं दूध, मालकाच्या बायकोकरितां लुगडें, मालकाच्या मोठ्या मुलांच्या शिक्षणासाठीं लागणारा खर्च इत्यादि गोष्टी नामंजूर झाल्या आहेत असें ठरवितो; आणि मालकाची बायको, मुलगा व मुलगी यांची उपासमार करून आणि उलट मालकाच्या बायकामुलांना असें सांगूं लागतो कीं, तुमचा शत्रु मालकच आहे, तोच तुम्हांस खाऊं पिऊं देत नाहीं, तुम्ही घरधन्यास पाहिजे तर वेडा ठरविण्याच्या प्रयत्नांत आम्हाला सामील व्हा; असें जर कारभारी बोलूं लागला तर त्या कारभाऱ्यावर कितपत विश्वास ठेवावा? तसल्या कारभा-

त्यावर विश्वास बिलकूल रहाणार नाहीं असें मात्र नाहीं. कां कीं, तसल्या बोलण्यास फसून घरधन्याविरुद्ध कारस्थानें करणाऱ्या आणि नंतर पश्चात्ताप करणाऱ्या बायका असतात हें देशी संस्थानच्या इतिहासाकडे पाहिलें असतां आपणांस वारंवार दिसून येतें. व त्याप्रमाणें लोकप्रतिनिधींस नालायक ठरवूं पहाण्याच्या प्रयत्नामुळें आपल्यांतीलहि अशिक्षित लोक फसतील व मागाहून पस्तावतील यांत शंका नाहीं.

सध्याचें कौन्सिलांतील वातावरण त्या सांखळयांत ठेवलेल्या जमीनदार व पोलिटिकल एजंटानें त्याच्या उरावर बसविलेला कारकून यांच्या संबंधाइतकें क्षुद्र गलिच्छ व नीच आहे. आणि हें वातावरण अगोदर बदलून टाकावयाचें तर नोकरशाहीस लोकप्रतिनिधींस पूर्णपणें जबाबदार केलें पाहिजे.

साम्राज्यापुढें प्रश्न ठेवावयाचा तो असा कीं, देशविकास होण्यामध्यें तुमचा फायदा आहे, आणि तुमच्यापुढें एवढाच प्रश्न आहे कीं, देशासंबंधानें कळकळ बाळगून त्याला प्रगतीच्या रस्त्यावर आणावयाचें ही क्रिया साम्राज्य दीड हजार गोऱ्या मुलकी नोकरांवर गेल्या शंभर वर्षांच्या अनुभवावरून विश्वासूं शकते काय? देशाच्या प्रत्येक भागामध्यें प्रत्येक ठिकाणीं मनुष्यांमध्यें जी स्वाभाविक समाजविकासात्मक आणि आत्महितपर भावना असते त्या भावनेस,लोकांस दुर्बळ करून, अवरोध केल्यानें देशाचें कल्याण होईल कीं, त्या भावनेला चेतना देऊन कल्याण होईल ? सध्यां जी डायार्की ऊर्फ द्विसत्तापद्धति आहे त्या पद्धतीनें देशांतील लोकांस कांहीं अंशीं जागृत केलें आहे आणि खरा अधिकार मात्र नोकरशाहीच्या हातांत ठेविला आहे. यामुळें ब्रिटिश सत्तेविषयीं लोकांत विश्वास वाढेल कीं अविश्वास वाढेल ? लोकांत नोकरशाहीविरुद्ध अविश्वास उत्पन्न करणें, लोकांस दुर्बल करणें आणि लोकप्रतिनिधि आणि लोकशाही यांमध्यें

सारखे झगडे चालू ठेवणें ही पद्धती चालू ठेवण्यामध्यें तुम्हीं नोकरशाहीचें तरी कल्याण काय साधतां ? सरकारी नोकरांनां लोकांच्या विश्वासास पात्र करावयाचें आणि जनतेचीं प्रागतिक बुद्धी आणि राष्ट्रविकासविषयक भावना यांस व्यावहारिक स्वरूप द्यावयाचें हीं कामें नोकरवर्गास नेहमीं अविश्वासांत ठेऊन तुम्हीं पार कशीं पाडणार ? तुम्हीं सध्यां जो खेळ चालू ठेविला आहे हा केवळ जनतेचा छळ आहे एवढेंच नव्हे तर हा मुलकी नोकरांचाही छळच आहे, आणि आमची अशी ठाम समजूत आहे कीं, ज्या दिवशीं तुम्ही या छळापासून नोकरवर्गास मुक्त कराल तेव्हां जनता व नोकरवर्ग हे दोन्हीही तुमचे आभारी होतील आणि कौन्सिलांतील राजकारणास जें आज ठकवाठकवीचें आणि रुसण्याफुगण्याचें स्वरूप आलें आहे तें नष्ट होऊन एकमेकाशीं सहकारिता करण्याचें स्वरूप येईल.

लोकप्रतिनिधींनीं सरकारशीं सहकारिता करावी कीं न करावी हा वादच लोकांस भूल पाडणारा आणि खरें शासनतत्त्व लपविणारा आहे.खरें तत्त्व म्हटलें म्हणजे नोकरशाहीनें लोकप्रतिनिधींशीं सहकारिता करावीं हें आहे. प्रत्येक ठिकाणीं स्थानिक आकांक्षा उत्पन्न होतात त्यांच्या एकीकरणामुळें राष्ट्रीय नीति तयार होते. आणि नोकरशाहीचें मुख्य काम प्रत्येक ठिकाणीं उत्पन्न झालेल्या स्थानिक आकांक्षामध्यें संगति उत्पन्न करून राष्ट्रनीति परिस्फुटित करण्याचें होतें.

स्वराज्यप्राप्ति न होण्याची अशक्यता आमच्या मतें खालील गोष्टींमुळें आहे.

( १ ) हिंदुस्थानाची राज्यव्यवस्था सुसंघटित शासनसंस्था या नात्यानें फारच हलक्या प्रतीची आहे, अर्वाचीन राज्य लोकसुधारणेसाठीं ज्या गोष्टी धैर्यानें आणि देशाभिमानानें करतें त्या गोष्टी करण्याचें धैर्य आणि निश्चय या नोकरशाहीस कधींहि उत्पन्न व्हावयाचा नाहीं.

( २ ) राज्याचा अभिमान जनतेस नाहीं; कांकीं, तिला या शासनव्यवस्थेविषयीं आपलेपणा वाटत नाहीं, आणि अधिक योग्य वर्ग शासनव्यवस्था आपल्या अंगावर घेण्यास उत्पन्न झाला तर त्यास जनतेची सहानुभूति मिळेल.

( ३ )जो वर्ग जनतेची सहानुभूति आपल्या कर्तव्यनिष्ठेनें मिळवील त्या वर्गाच्या हातीं राज्यकारभार जर साम्राज्याच्या मंत्रिमंडळानें दिला नाहीं तर सरकारच्या नित्य व्यवसायास अडथळा करणें हें काम दिसतें तितकें कठिण नाहीं, कां कीं सरकारला कर्जच फार आहे.

( ४ ) साम्राज्याच्या मंत्रिमंडळाला तुम्ही आमच्यावर विश्वास टाका असें म्हणणें आणि त्यांजकडून तो मिळविणें आपण कारभाराला खरोखर लायख असलों तर अशक्य नाहीं. कां कीं हिंदुस्थानाला स्वराज्य देण्यांत इंग्लंडचें नुकसान नाहीं.

(५) नोकरशाहीचा विरोध काढून टाकणें दिसतें तितकें कठीण नाहीं, कां कीं, इंग्रज नोकरांची हकालपट्टी एकाएकी होणार नाहीं, नवीन माणसें आपलीं येणार तीं जुन्या नोकरांच्या हाताखालीं तयार होऊन शासनक्षम होणार, या क्रिया होतां होतांच सध्यांच्या नोकरांची नोकरी सोडण्याची वेळ येईल.

पूर्वोक्त विवेचनावरून सध्यांचे शासनसंबंध व्यावहारिक मूढपणाच्या तत्त्वावर रचले गेले आहेत आणि त्यामुळें ते टिकविणें हें नोकरशाही अगर लोकप्रतिनिधी यांपैकीं कोणासहि इष्ट नाहीं, ही गोष्ट साम्राज्यसरकारास दिसून येईल,आणि यामुळें द्विदलराज्यपद्धति आज नाहीं उद्यां जाणारच, असें भाविष्य करणें प्राप्त होतें. आणि त्यामुळें राजकीय चळवळ करणारांचें कर्तव्य निश्चित होतें, तें हें कीं, या लोकशाहीकडे चाललेल्या प्रगतीस अधिक वेग कसा द्यावा व लोकशाही उत्पन्न झाली असतां तिची जबाबदारी घेण्याची तयारी कशी करावी.

---

# प्रकरण १० वें.

## देशी संस्थानें.

स्वयंनिर्णयीसंघ आपलें कर्तव्य ब्रिटिश मुलखापुरतें मर्यादित करूं इच्छीत नाहीं हिंदुस्थान राष्ट्रसंघाचें सदस्य असल्यामुळें आपल्यावर जबाबदारी आपल्या शेजाऱ्यांविषयींहि आहे. असें असतां आपणांस आपल्या देशांतलाच महत्त्वाचा देशी संस्थानांसंबंधीचा प्रश्न आपल्या प्रयत्नक्षेत्रांतून वगळून कसें चालेल. ?

आपणांस ज्या सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत त्या जनतेच्या सुखवर्धनासाठीं आहेत. जुल्म करण्याचा हक्क इंग्रजांच्या ऐवजीं काळ्या कातडीच्या लोकांस देण्यासाठीं नाहीं. यासाठीं आपणांस ब्रिटिश हिंदुस्थानाकडेसच केवळ लक्ष देऊन उपयोगी नाहीं. अधिकारहिसकी हें आपलें ध्येय नसून जनतासेवा हें ध्येय आहे, आणि अधिकारग्रहण हें त्या ध्येयाचें साधन आहे. सर्व जनता ही निर्भय आणि आत्मोन्नतीसाठीं धडपड करणारी बनवावयाची तर तेथें देशी संस्थानांच्या अधिपतींची व कारभाऱ्यांची गय काय करावयाची ? देशी संस्थानांच्या सुधारणेकडे थोडेंबहुत लक्ष लागूं लागलें आहे आणि संस्थानांच्या प्रजेच्या परिषदाहि ब्रिटिश मुलखांत उत्पन्न होऊं लागल्या आहेत. त्या आज लहानसहानच प्रश्न हातीं घेत आहेत पण पुढें मोठमोठे प्रश्न हातीं घेऊं लागतील असा अजमास आहे. त्या परिषदा आज एकदम धैर्यानें मोठे प्रश्न हातीं घेणार नाहींत व संस्थानांच्या आमूलाग्र सुधारणेचा प्रश्नहि हातीं घ्यावयास त्यांस संस्थानिकांची भीति वाटेल. तथापि याविषयीं स्वतंत्रपणें विचार करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे यांत शंका नाहीं.

संस्थानसुधारणेवर विचार करणारे लोक थोडे आहेत. रा. राजवाडे यांनीं 'बडोद्यांतील सुधारणा' या विषयावर जे विचार प्रदर्शित केले ते विशिष्ट संस्थान बलिष्ठ होऊन भोंवतालच्या परिस्थितींत डोकें कसें काढील या दृष्टीनें त्यांनीं व्यक्त केले आहेत.ते विचार सतराव्या शतकांतील जर्मन क्यामेरालिस्टांस शोभण्यासारखे आहेत. त्यांत संस्थानांतील जनतेसंबंधानें प्राधान्यानें विचार केलेला नाहीं; आणि क्यामेरालिस्टांप्रमाणें त्यांनीं जी मुत्सद्दीगिरी उपदेशिली ती फारशी फलप्रद होण्याचा संभव नाहीं. कोणतेंहि संस्थान आपली सुधारणा करून ब्रिटिश सत्तेशीं युद्ध करूं शकेल हें इतःपर अशक्य आहे. सर्वांत मोठ्या संस्थानानें पन्नास वर्षें एकसारखीं देशविकासांत घालविलीं तरी त्यास ब्रिटिश सत्तेशीं सामना करतां येण्याजोगा नाहीं. ही गोष्ट जाणून आज संस्थानविषयक कर्तव्यविचार करावयाचा आहे. आपल्याकडे जेव्हां संस्थानिकांचे अधिकार कमी करण्याची ब्रिटिश सरकार योजना करितें तेव्हां आपल्या लोकांस त्याबद्दल दुःख होतें आणि त्याचें कारण एवढेंच कीं,संस्थानें हीं अर्ध्यामुर्ध्या स्वातंत्र्याचीं स्थानें आहेत; त्यांचें स्वातंत्र्य कमी करणें म्हणजे आपलें राजकीय स्वातंत्र्य गमावणें होय, अशी लोकांत भावना असते. स्पष्ट बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं त्यांस दुर्बल करणें म्हणजे, जर कधीं इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड करण्याची संधि प्राप्त झालीच तर सत्तेचें केंद्रस्थान म्हणून हीं संस्थानें उपयोगीं पडतील व देशाचे पांग फेडतील, ही संधि गमावणें आहे. या तऱ्हेच्या भ्रामक अपेक्षेमुळें संस्थानिकांकडे मृदु अंतःकरणानें पहाण्याची इंग्रजी मुलुखांतील देशी लोकांस सवय झाली आहे. गेल्या महायुद्धामध्यें जी युद्धविषयक सुधारणा दिसून आली. तीवरून आणि युद्धांत यशस्विता उत्पन्न होण्यास मालाचा पुरवठा त्यास पैसे देण्याची शक्ति, देशाची उत्पादक शक्ति, निरनिराळ्या तऱ्हेचा माल

उत्पन्न करण्यास लागणाऱ्या शिक्षणाची देशांत तयारी, सर्व देश अत्यंत सुशिक्षित असण्याची आवश्यकता, या सर्व गोष्टी नजरेस आल्यामुळें इंग्रजी सत्तेविरुद्ध यशस्वी बंडाची अशक्यता आणि त्या प्रकारच्या कामास संस्थानिक मिळण्याची अशक्यता या सर्व गोष्टी नजरेस आल्यामुळें संस्थानिकांच्या संस्थानिक या नात्यानें अस्तित्वाची निरवश्यकता, या सर्व गोष्टी आज लोकांस पूर्णपणें पटल्या आहेत असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय आहे असें वाटत नाहीं. संस्थानांचा उपयोग देशस्वातंत्र्याकडे जर होणार नाहीं तर त्यांच्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

संस्थानिक इंग्रजांशीं नपुंसकाप्रमाणें वागतात व आपल्या प्रजेशीं त्यांच्या आयुष्याचे मालक या नात्यानें वागतात. इंग्रजी सत्तेस एखादा मनुष्य नावडता असला आणि त्यास कायद्यानें पेंचांत आणणें कठिण असलें म्हणजे त्यांना हीं संस्थानें फार उपयोगी पडतात. वाटेल तीं वाईट कृत्यें संस्थानिकांकडून इंग्रजी अधिकाऱ्यांस करून घेतां येतील. अनियंत्रित अधिकाराचा उपयोग करण्याच्या संवयीमुळें ज्यांचें आचरण वाईट आहे व ज्यांचें मन नेहमीं भीतियुक्त आहे असे संस्थानिक पोलिटिकल एजंटाची गैरवाजवी इच्छाहि पार पाडण्यास तयार असणार. तर थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे हीं संस्थानें मनुष्यस्वातंत्र्यास विघातक व मनुष्याच्या अब्रूस आणि संपत्तीस भयप्रद आहेत. ही संस्थाच नष्ट करून टाकली पाहिजे, किंवा तींत आमूलाग्र सुधारणा केल्या पाहिजेत. राजकुलाचा शिरच्छेद करून प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न या संस्थानांच्या प्रजेकडून होणें शक्य नाहीं. तथापि जरी तो झाला तरी त्यामुळें त्यांना लोकसत्ताक राज्य एकाएकी चालवितां येईल असें वाटत नाहीं. तसें होण्यास संस्थानची प्रजा स्वतंत्र वातावरणांत क्रमानें वाढत गेली पाहिजे. पण ती क्रिया आज शक्य नाहीं.

यासाठीं आपण देशांत खालील सुधारणा अमलांत आणण्यासाठीं लोकमत तयार केलें पाहिजे.

कोणत्याहि संस्थानिकास त्याच्या प्रजेविरुद्ध संरक्षण मिळूं देतां कामा नये. प्रत्येक संस्थानांतील प्रजेस आपली राज्यपद्धति बदलण्याचा आणि नबाब, महाराजे यांस पदच्युत करण्याचा अधिकार आहे; ही गोष्ट ब्रिटिश मुलखांत सर्वमान्य झाली पाहिजे. आणि सरकारकडून तसें स्पष्टीकरण प्रसिद्ध करविलें पाहिजे, असें झाल्यास इंग्रजसरकारकडून मिळणाऱ्या संरक्षणामुळें निर्भय असलेले संस्थानिक सत्तामूलक अनेक मोहांस बळी पडतात तसे पडणार नाहींत. त्यांचें डोकें सुरक्षित रहावयास त्यांस प्रजेची प्रीति संपादन करणें अवश्य आहे ही गोष्ट त्यांच्या मनांत भिनली पाहिजे. आज प्रजा अनेक संस्थानिकांविरुद्ध बंड करीत नाहीं याचें कारण संस्थानांस हिंदुस्थानसरकारचा पाठिंबा आहे हें होय. तर संस्थानिकांस अशी समज दिली पाहिजे कीं, ब्रिटिशसरकारनें जें त्यांचें संरक्षण करावयाचें तें केवळ परकीय सत्तेविरुद्ध आहे, संस्थानाच्या प्रजेविरुद्ध नाहीं, आणि वाटेल त्या संस्थानास आपल्या प्रदेशांतील राजसत्ता नष्ट करण्यास अखत्यार आहे.

संस्थानिक जुल्म करतात म्हणून त्यांचे अधिकार कमी करीत जाऊन त्यांस पोलिटिकल एजंटाचे बूटपुशे बनवावयाचें हे धोरण कधींहि योग्य होणार नाहीं. संस्थानिकांस सर्व माणुसकीचे हक्क असले पाहिजेत. त्यांचे अधिकार काढले तर त्यांचीं चांगलीं कामें करण्याची संधींहि कमी होईल.

संस्थानामध्यें संस्थानिकांनीं स्वतःच्या गृहकृत्यासाठीं खर्च किती करावा यावर पहिलें नियंत्रण पाहिजे. कित्येक राण्या आणि अगणित वेश्या राजे लोकांनीं ठेवणें ही गोष्ट प्रजेस अत्यंत अनिष्ट आहे. वेश्या असल्या म्हणजे त्यांच्या मार्फत हलकट माणसें महत्त्व पावतात आणि प्रजेस तें वाईट उदाहरणहि होतें. यासाठीं पहिल्याप्रथम

17 MAR 1924

संस्थानिकांनीं स्वतःसाठीं पैसा किती खर्च करावा यावर नियंत्रण पाहिजे. त्याशिवाय कोणतीहि सुधारणा होणार नाहीं.

दुसरी एक गोष्ट घडवून आणली पाहिजे ती ही कीं, न्यायाच्या सर्वसामान्य क्रियापरंपरेमध्यें ढवळाढवळ संस्थानिकानें करूं नये, ही गोष्ट खटपट करून संस्थानिकास मान्य करावयास लावली पाहिजे. याचा अर्थ असा नाहीं कीं, संस्थानिकानें न्यायपद्धतींत सुधारणा करूं नये. ती करण्याची मोकळीक पाहिजेच. पण अप्रिय मनुष्याची केस ऐकण्यास मुद्दाम निराळा न्यायाधीश आणणें वगैरे गोष्टी बंद केल्या पाहिजेत. जर संस्थानामध्यें न्याय खात्रीनें मिळूं लागला तर संस्थानें भरभराटतील. पण जोंपर्यंत वाटेल तेव्हां मुख्य न्यायाधिशाची हकालपट्टी करावयाचें स्वातंत्र्य संस्थानिकास ठेवलें आहे तोंपर्यंत संस्थानांतील न्यायाधीश भीतचीत्तच असणार; व जर न्यायाधीश भीतचित्त आहेत तर ते आपल्या प्रजेचें संरक्षण काय करणार ? यासाठीं असेंहि केलें पाहिजे कीं नरेंद्रमंडळानें किंवा दुसऱ्या कोणातरी संस्थानिकांच्या संघानें एक निराळें कोर्ट निर्माण करावें आणि त्या न्यायाधीशाकडे संस्थानांतून अपीलें जावींत; व संस्थानांतील न्यायाधिशाची नेमणूक वरिष्ठ कोर्टाच्या न्यायाधिशांच्या सल्ल्यानें करावी. असें केल्यानें संस्थानिकांची प्रजा बरीचशी निर्भय होईल आणि संस्थानिकांच्या प्रदेशांत ब्रिटिश प्रदेशाइतकी सुरक्षितता वाढून संस्थानांची भरभराट होईल. संपत्तिमान लोकांस संस्थानांत येऊन राहाण्यास हरकत वाटणार नाहीं आणि त्यामुळें त्याचें महत्त्वहि वाढेल. याचा आणखी एक फायदा होणार आहे; संस्थानें मुख्य न्यायाधिशास १५०–२०० पेक्षां अधिक पगार देऊं शकत नाहींत. महाराष्ट्रांतील मुख्य संस्थान जें कोल्हापूर तेथील मुख्य न्यायाधिशास साडेतीनशें रुपये पगार आहे. त्यामुळें महत्त्वाकांक्षी कायदेपंडित संस्थानची नोकरी कधीं करूं इच्छीत नाहींत.

जर त्यांस पुढें कांहीं प्रमोशन असेल तरच तो संस्थानांत नोकरी करील; आणि संस्थानी कोर्टांवरचें जें अपील कोर्ट असेल तेथें मोठाल्या पगारांचे न्यायाधीश नेमले, जातील व त्यांची निवडणूक सामान्यत: संस्थानी न्यायाधिशांमधूनच होणार. संस्थानी न्यायाधिशांस असें क्षेत्र झाल्यानें संस्थानांस चांगल्या अकलेचीं माणसें मिळतील व त्या माणसांस आपण संस्थानाच्या मुख्याचे नोकर असें न वाटतां आपण न्यायदेवतेचे नोकर आहों असें वाटेल.

संस्थानांची सुधारणा दुसऱ्या तऱ्हेनें करतां येण्याजोगी आहे. संस्थानांत आज संस्थानकर्ज काढण्याची पद्धति पडली नाहीं. पुष्कळ संस्थानांस कर्ज काढावयाचें तें इंग्रजी ग्यारंटीवर काढावें लागतें आणि पुष्कळ संस्थानिक पैशाचा संचय करून त्याचे इंग्रजी बांड्स्‌ही घेऊन ठेवतात. त्यामुळें संस्थानामध्यें कराचें प्रमाण ब्रिटिश मुलखापेक्षां अधिक ठेवावें लागतें. संस्थानांनीं संचय करावयाचा नाहीं; उलट संस्थानीकर्ज करून संस्थानसुधारणा (रेल्वे, कालवे यांसारखी) करण्यास हरकत नाहीं या तऱ्हेचें धोरण ठरविलें गेलें म्हणजे संस्थानांतील आयुष्य अधिक सुखकर होईल.

कांहीं लहान लहान संस्थानें आहेत तीं नष्ट झालीं तर चांगलें. उत्पन्न थोडकें आणि खर्च मात्र सर्व खात्यांचा, अशी अनेक संस्थानांची स्थिति आहे. ती स्थिति अनेक संस्थानिकांसहि बोंचत असली पाहिजे. यासाठीं जर संस्थानिकांनीं संस्थानिकाची स्टेटस सोडून जमीनदारांची पदवी पत्करली तर अधिक चांगलें. संस्थानिकांस जमीनदार होण्यास हरकत वाटणार नाहीं. उलट आनंदच वाटेल अशी योजना करतां येण्याजोगी आहे. तिकडे आमच्या सरकारी मुत्सद्यांना लक्ष घालतां येण्याजोगें आहे.

# प्रकरण ११ वें.

## महात्मा गांधींशीं मुख्य मतभेद.

निःशस्त्रांचें राजकारण आम्ही येथें मांडीत आहों आणि महात्मा गांधींनीं अनत्याचारी असहकारितेचा मार्ग उपदेशिला आहे तर त्यांच्या मतांत आणि आम्हीं पुढें मांडलेल्या मतांत फरक काय आहे याविषयीं दोन शब्द येथें देतों.

महात्मा गांधींची चळवळ अनत्याचारी भावना प्रसृत करण्यासाठीं होती, आमचीहि चळवळ तशीच आहे, ही दोहोंमध्यें साम्यता आहे. तथापि आमच्या चळवळीच्या मागें कांहीं विशिष्ट अर्थशास्त्र आहे. महात्मा गांधींच्या मतामागें असलेलें अर्थशास्त्र स्पष्ट होत नाहीं. त्यांनीं आपल्या मतास अध्यात्मिक तत्त्वज्ञानाची जोड देण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा गांधींच्या मताची सुसंगत मांडणी मला करतां येत नाहीं आणि ज्यांनीं ती मांडणी करण्याचा प्रयत्न केला त्यांना त्यांत यश आलें आहे असें मला वाटत नाहीं. यासाठीं मतभेद दाखविण्यासाठीं देखील महात्माजींच्या मतांची मांडणी मला करतां येणार नाहीं व यासाठीं आम्हां दोघांमध्यें असलेले दृष्टीचे अगदीं स्थूल फरक मात्र येथें दाखवितां येतील.

महात्मा गांधींनां पाश्चात्त्य पद्धतीचा औद्योगिक विकास नको आहे. मला तो हवा आहे. माझें असें मत आहे कीं ज्याअर्थीं भौतिक शक्तींचा उपयोग उत्पादन सवंग करण्याकडे होत आहे आणि तो वाढत जाईल, त्याअर्थीं त्यांचा उपयोग न करणें हा वेडेपणा आहे. गांधींनीं तो वेडेपणा व्यवहारांत कधींच दाखविला नाहीं. आगगाडी, मोटार, तारायंत्र इत्यादि सर्व गोष्टी वापरल्याच आहेत. गांधींनीं लोक-

राज्य हें जगांतले अर्वाचीन हत्यार आणण्यासाठीं जी धडपड केली तीवरून त्यांस अर्वाचीन विकास नको आहे असें कसें म्हणतां येईल? जुन्या प्रकारच्या आणि नष्ट होऊं पहाणाऱ्या साध्या आयुष्य-क्रमाकडे त्यांतील माधुर्याची आठवण ठेवून स्नेहबुद्धीनें पहाणारा परंतु अर्वाचीन हत्यारांचा उपयोग होतां होईतों पण क्रमप्राप्त म्हणून कर-णारा असें महात्मा गांधींच्या मनोवृत्तीचें स्पष्टीकरण होतें. यापलीकडे त्यांच्या विचारांतील संगती दृष्टीस पडत नाहीं.

'अनत्याचारीकडे असहकारिता' या तत्त्वाचा उपदेश महात्माजी करतात आणि आम्हींहि करितों. फरक एवढाच आहे कीं, हत्यार वापरून वैयक्तिक सूड घेण्याच्या ऐवजीं कायदेशीर इलाज करणें हें व्यवहारज्ञानाचें तत्त्व ज्याप्रमाणें लोकांत वैयक्तिक व्यवहारांत पसरलें आहे त्याप्रमाणें तेंच तत्त्व सार्वजनिक व्यवहारांत लागू आहे. कायदेपद्धती देखील हत्यार न वापरण्याच्या तत्त्वास स्वसंरक्षणाची मर्यादा ठेवतात. त्या मर्यादेस आम्हीं विरोध करूं इच्छित नाहीं. जर कोणी आततायी दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस मारावयास आला तर स्वसंरक्षण करूं नका असा आम्हीं उपदेश करीत नाहीं. तुमचा शेजारी तुमच्याशीं दुष्टत्वानें वागणारा असला तर त्यास तुमची गरज उद्यां पडेलच व यासाठीं आपण आणखी त्यास दुखापत करून वैर वाढवूं नये हें व्यवहारांतलें धोरण आहे. पण जर कोणी धंदेवाईक चोऱ्या करणारा मनुष्य तुमच्या घरीं चोरी करावयाला आला तर त्याशीं निराळी नीति ठेविली पाहिजे. त्यावेळेस स्वसंरक्षण हेंच मुख्य कर्म होईल, व त्यावेळेस तुम्हीं त्यास कुऱ्हाड घेऊन दुखापत केली तरी त्यास हरकत नाहीं. येणेंप्रमाणें प्रतिक्रिया करण्यास कायद्यानें व त्याप्रमाणेंच व्यावहारिक दृष्टीनें परवानगी मिळते. प्रतिक्रिया करावयाचीच नाहीं हें आमचें तत्त्व

नाहीं. उलट प्रतिक्रिया अधिक यशस्वी आणि पद्धतशीर व्हावी यासाठींच निःशस्त्रांचें राजकारण उपदेशिलें जात आहे.

महात्मा गांधींच्या खादीच्या चळवळींत आम्हीं सत्य समजतों तें एवढेंच कीं, खेड्यापाड्यांत वर्षांतले अनेक दिवस फुकट जातात, लोकांस काम नसतें, अशा प्रसंगीं लोकांस कांहीं काम मिळावें म्हणून चळवळ पाहिजे आणि त्या दृष्टीनें महात्मा गांधींस ही चळवळ सुचली. त्यांचा प्रदेश कापसाचा आहे आणि त्यांनीं त्यांच्या लहानपणीं खेडोंखेडीं घरोघर सूत काढण्याची क्रिया पाहिलेली आहे. आज तसलें सूत महाग पडत गेल्यामुळें आणि तें कच्चें दिसून येऊं लागल्यामुळें सूत काढण्याची क्रिया बंद पडूं लागली, तेव्हां त्यांस स्वाभाविकपणें असें वाटूं लागलें कीं, जर खादीचा प्रसार झाला आणि सर्व लोक कामास लागले तर देशांत उत्पादनक्रिया मोठी जोरानें होईल. या सर्व कल्पनेमध्यें चूक ही होती कीं, प्रत्येक ठिकाणीं कापूस किंवा वळू पोंचविणें आणि त्यापासून सूत काढवून तें पुन्हां बाजारांत आणणें या क्रियांनांच इतका खर्च लागतो कीं, अनेक ठिकाणीं सुतांत मजुरीचा नफा मुळींच रहात नाहीं, आणि अत्यंत अनुकूल ठिकाणीं मजुरी इतर मजुरीपेक्षां निम्मी पडे. यामुळें ही चळवळ नष्ट झाली. तथापि या चळवळीमागें जें तत्त्व होतें तें उपेक्षिण्याजोगें नाहीं. उलट तें तत्त्व भावी राजकारणांतील महत्त्वाचा भाग आहे असें मी समजतों. सर्व राजकारण आर्थिक उन्नतीसाठीं आहे. आर्थिक उन्नती उद्योगामुळेंच होणार, आणि देशांत उद्योग वाढविणें म्हणजे मनुष्याचे निरुद्योगाचे दिवस कमी करणें ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे; आणि हें समाजांतील पुढाऱ्यांचें म्हणजे स्थानिक शासनसंस्थांचें कर्तव्य आहे. स्थानिक शासनसंस्थांनीं आणि तेथील कार्यकर्त्या आणि भांडवलवाल्या वर्गांनीं आपापल्या ठिकाणीं वर्षांतील अनुद्योगाचे अनेक दिवस कमी कमी

करून दारिद्र्यनाश केला पाहिजे; नाहीं तर ज्या मालाची विक्री होणार नाहीं पण स्वतः उपयोग करतां येईल असा माल काढला पाहिजे; आणि या सर्व गोष्टींचें महत्त्व इतकें आहे कीं, स्वराज्य म्हणजे हेंच आहे एवढेंच नव्हे तर स्वराज्य हें केवळ राष्ट्राला वर्षभर उद्योगाला लावणाऱ्या कार्यक्रमाचें साधन आहे, हीं सर्व अमर्त्य तत्त्वें महात्माजींच्या खादीच्या आग्रहाच्या मूळाशीं आहेत, आणि याविषयीं मी असें सांगतो कीं या तत्त्वांचें भावी राजकारणांत इतकें महत्त्व आहे कीं त्या तत्त्वांसाठीं महात्मा गांधीसारख्यांचें आयुष्य खर्चीं पडलें तरी त्यांनीं स्वराज्यसंपादनाइतकीच महत्त्वाची कामगिरी केली असें मी समजेन.

---

# प्रकरण १२ वें.

## समारोप.

स्वयंनिर्णयीसंघ जो तयार व्हावयाचा तो स्वराज्यसंपादनासाठीं आहे. हा संघ स्थापन होण्यापूर्वीं मी जो विचार प्रस्तुत पुस्तकांत मांडला आहे त्याचा प्रसार व्हावयाचा आहे. सर्व भाषांतून म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या जनतेस हें पुस्तक उपलब्ध करून द्यावयाचें आहे, आणि या पुस्तकानें कार्याच्या शक्यतेसंबंधानें जो लोकांत विश्वास उत्पन्न होईल त्या विश्वासावर संघ उभारावयाचा आहे. संघामध्यें दोन प्रकारच्या व्यक्ती असणार. कार्यावर विश्वास उत्पन्न होऊन कार्यास अप्रत्यक्ष मदत करणारी मंडळी, व हें कार्य अंगावर घेऊन तोच आपला उपजीविकेचा धंदा करणारी मंडळी, म्हणजे

प्रचारक, चळवळे वगैरे. या तऱ्हेची मंडळी प्रचार करतील, नवीन अनुयायी मिळवितील व कार्यास लागणारें द्रव्यहि गोळा करतील.

हिंदुस्थानांत पावणेतीनशेंवर जिल्हे व हजारावर तालुके आहेत. तर या सर्व ठिकाणीं स्वयंनिर्णयीसंघाचे काम करणारे सभासद पाहिजेत. व प्रत्येक जिल्ह्यांत व तालुक्यांत काम करणाऱ्या वर्गाचा योगक्षेम चालविणारा अप्रत्यक्ष सहकारींचा वर्ग पाहिजे. ही स्वयंनिर्णयाची चळवळ वकील, व्यापार व सुशिक्षित शेतकरी इत्यादि वर्गांतच ठेवावयाची नाहीं तर ती सरकारी नोकरांतहि पसरावयाची आहे. सरकार आपल्या नोकरांस वाटेल तर या चळवळीशीं सहकार्य करण्यास निषेध करो, पण मतप्रसाराची चळवळ त्यांच्यामध्यें नेली पाहिजे, हें उघड आहे. पहिलें वर्ष दीडवर्ष प्रस्तुत पुस्तकाचा प्रसार करण्यांत जाईल, आणि त्याच्या नंतरचा काल संघ स्थापन करून राज्याची जबाबदारी त्या संघानें मिळविण्याकडे जाईल. सध्यांची नोकरशाही ज्या भावी मंत्रिमंडळाला जबाबदार राहील तें भावी मंत्रिमंडळ उत्पन्न करण्याचें कामस्वयंनिर्णयी संघ करील.

ज्याअर्थीं आम्हांस राज्य लोकोन्नतीसाठीं पाहिजे आहे त्याअर्थीं लोकोन्नतीचा अनेक प्रकारचा कार्यक्रम पार पाडावा म्हणून तो कार्यक्रम स्वयंनिर्णयीसंघास अगोदरच उत्पन्न करावा लागणार आहे. उदाहरणार्थ, डोमिनियन स्टेटसमध्यें लष्करी जबाबदारीचा अंतर्भाव होतो; तर यासाठीं लष्करी शिक्षणास प्रोत्साहन देण्याचें काम आम्हास फार अगोदर करावें लागेल. साम्राज्याचें प्रधानमंडळ आज ना उद्यां आम्हाला डोमिनियन स्टेटस देणार हें तर ठरलेलेंच आहे. तर दहा पंधरा वर्षें लष्करी वर्ग तयार करण्याचा आम्ही निकरानें प्रयत्न केल्याशिवाय आम्ही देशरक्षणाची जबाबदारी पत्करावी तरी कशी? साम्राज्याच्या मंत्रिमंडळाचे हेतू पूर्णपणें लक्ष्यांत न आल्यामुळें हिंदुस्थानच्या लष्करी खात्याकडून

व्हावी तितकी सहकारिता झाली नाहीं. डेहराडून वगैरे ठिकाणीं केलेली सोय अत्यंत तुटपुंजी आहे, अशा प्रसंगीं हजार दीड हजार तरुणांनीं जिकडे लष्करी शिक्षण मिळेल तिकडे गेलें पाहिजे आणि ते आल्यावर त्यांना लष्करांत नोकरी लावून देण्याची कायदेमंडळानें हमी घेतली पाहिजे. सरकारची शिक्षणाची तयारी लोकांच्या अपेक्षांच्या व राष्ट्राच्या गरजेच्या मानानें अल्पच असावयाची. उदाहरणार्थ, सरकारला जितके शास्त्रज्ञ व डॉक्टर वगैरे लागतात तितके सर्व पुरविण्यासाठीं शिक्षणसंस्था काढणें हें आजच्या सरकारास कोठें शक्य आहे? सध्यांचें सरकार प्राथमिक शिक्षणाची योजना करतां करतांच रडकुंडीस आलें आहे. अशा प्रसंगीं देशांतील लष्करी शिक्षणाची व लष्करी नोकरीची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या तरुणांनीं आपली सोय निरनिराळ्या देशांत खटपट करून लावून घेतली पाहिजे. सँडहर्स्ट, वूलिच येथील कॉलेजें सर्व जणांची सोय करण्यास समर्थ होणार नाहींत.

देशांत लष्करी शिक्षण वाढविणें व तरुणांच्या लष्करी शिक्षणाची अनेक देशांत सोय करणें असल्या विधायक क्रिया उत्पन्न करणें हें जरी स्वयंनिर्णयी संघाचें काम आहे तरी तें काम स्वयंनिर्णयी संघ प्रत्यक्ष अंगावर घेणार नाहीं. त्याच्यासाठीं डिफेन्स एज्युकेशन कमिटी किंवा दुसरी कोणती तरी मंडळी उत्पन्न करून एक निराळी संस्था काढील व त्या संस्थेमार्फत तें काम चालवील.

राष्ट्रविकासासाठीं शिक्षणविषयक ज्या अनेक गोष्टी करावयाच्या आहेत त्या गोष्टी स्वतःच्या संस्थेमार्फत करणें हें देखील स्वयंनिर्णयी संघाचें काम नाहीं. कां कीं, देशामध्यें शिक्षणास उत्तेजन देणाऱ्या संस्था अनेक आहेत त्या संस्थांस स्वयंशासित राष्ट्र करण्यासाठीं ज्ञान-विकासाची व शास्त्रविकासाची किती मर्यादा वाढली पाहिजे हें

फार तर स्वयंनिर्णयी संघ भासवून देईल. अनेक संकल्पित सुधारणा घडवून आणण्याचा काल राज्याधिकारग्रहाणानंतरचा आहे. स्वयंनिर्णयी संघ शिक्षणविषयक किंवा दानविषयक किंवा सामाजिक सुधारणाविषयक ज्या अनेक गोष्टी आहेत त्या अंगावर घेणार नाहीं, तर त्यांची आवश्यकता भासवील; व त्या साध्य होण्यास प्रत्यक्ष कारभारांत हात न घालतां जी मदत करावयाची ती इतरांस उत्तेजन देऊन वगैरे साधनांनीं करील. जरूर पडल्यास त्यासाठीं नवीन संस्था उत्पन्न करण्यास प्रोत्साहन देईल. स्वयंनिर्णयी संघापुढील मुख्य क्षेत्र म्हणजे चळवळ हेंच ठेवावयाचें आहे. याच्यामध्यें इंग्लंडमध्यें जाऊन इंग्लिश मुत्सद्यांची मतें स्वराज्यास अनुकूल करावेणें व इकडे यूरोपियन जनता व अधिकारी वर्ग यांचा स्वराज्यव्यवस्थेस आक्षेप काढून टाकणें, देशांतील अनेक अल्पसंख्यांकांचा आक्षेप काढून टाकणें त्यांस अन्याय होणार नाहीं अशा तऱ्हेनें आम्ही राज्यकारभार करूं असें अभिवचन देणें म्हणजे स्वराज्यपराङ्मुखास स्वराज्योन्मुख बनविणें एवढेंच काम आम्ही आपणांपुढें आंखून ठेवलें आहे.

आम्हांस स्वराज्य जर ब्रिटिश मंडळानें मिळूं दिलें नाहीं तर सरकारास पेंचांत पाडण्याकरितां ज्या गोष्टी कराव्या लागणार त्यांची सर्व पूर्वतयारी करणें हें काम मुख्य आहे तें आम्ही प्रस्तुत पुस्तकाचा प्रसार झाल्यानंतर ताबडतोब सुरू करणार. त्याची रूपरेषा चवथ्या पांचव्या व सहाव्या प्रकरणांत स्पष्ट केलीच आहे.

हें निःशस्त्रांचें राजकारण जें पुढें मांडलें जात आहे त्या राजकारणामध्यें शत्रु फक्त एकच आहे; तो शत्रु म्हटला म्हणजे देशावरील सत्ताधिकारी देशास जबाबदार नाहींत ही गोष्ट होय. इंग्रज लोकांचा द्वेष करण्यास किंवा त्यांचें देशांतून उच्चाटण करण्यास हें राजकारण सांगत नाहीं तर तें सहकार्य उच्च तत्त्वावर करण्याची पद्धति बोधीत आहे. हें राजकारण पाश्चात्य संस्कृतीस सैतानी म्हणत नाहीं,

या राजकारणाचें देशांतील न्यायसंस्थांविरुद्धहि भांडण नाहीं. देशांतील न्यायसंस्थेंत कांहीं दोष असतील ते अनुभवानें सुधारतां येतील पण तें सुधारण्यासाठीं लागणारी शक्ति कायदेमंडळ नोकरशाहीच्या धोंड्याखालून सोडविल्यानेंच उत्पन्न होणार आहे. आम्ही कोर्टाशीं असहकारिता करण्यास सांगत नाहीं, आणि तशी असहकारिता करण्याचा मूढपणा म. गांधींनीं व्यवहारांत कधींच दाखविला नाहीं. गांधीनीं कोर्टावर जो बाहिष्कार पुकारला त्याचें अनुयायीसंग्रहयोगांतील एक क्रिया या दृष्टीनें स्पष्टीकरण होण्याजोगें आहे. कांग्रेसमध्यें आपलें मताधिक्य ठेवण्याच्या कामांत यश कसें मिळवावें, "ब्राह्मणानां अनेकत्वं " कसें टाळावें, वादविवाद करून कार्याला विरोध करणाऱ्या व्यक्ती बाहेर कशा घालवाव्यात व कांग्रेस धोपटमार्गी एकतंत्री पण कार्यसंमुख कशी करावी या दृष्टीनें केलेली ही कोर्टबहिष्काराची म्हणजे वकील वर्गास राजकारणांतून हांकलून देण्याची कल्पना होती. पण गांधीना आतां निकराच्या युद्धाचा कार्यक्रमच नाहीं. आणि यासाठीं आतां कायदेपंडिताच्या गांधींनीं उत्तेजिलेल्या उपक्षेचें व उपहासाचें प्रयोजनच नाहीं.

देशांतलि निरनिराळया पक्षांविषयीं आणि वर्गांविषयीं आम्ही आपली वृत्ति येणेंप्रमाणें मांडतों.

आम्हांस सर्व पक्ष विशिष्ट दिशेनें देशाची सेवा करणारेच दिसतात. प्रत्येक पक्ष आपल्या अभिरुचीप्रमाणें आणि आपल्या अवलोकनाप्रमाणें व कर्तृत्वशक्तीप्रमाणें कार्य करीत आहे. आम्हांस आपल्या मतांचा प्रसार सर्वच पक्षांत आणि सर्वच वर्गांत करावयाचा आहे. आमच्या संघास यूरोपियन, मुसुलमान, पारशी, खिस्ती ब्राह्मण ब्राह्मणेतर हे सर्व वर्ग पाहिजे आहेत. या सर्व वर्गांचें स्वराज्यानें कल्याण आहे, आणि प्रत्येक वर्गांत मेहनती माणसें आहेत.तीं स्वयंनिर्णयी संघ एकत्रित करणार आहे. तसेंच प्रागतिक,

स्वराजिस्ट, प्रतियोगी--सहकारितावादी व कट्टर या सर्वांशीं आम्हांस सहकार्य करावयाचें आहे.

निःशस्त्रांचें राजकारण म्हणजे प्रत्येक समाजहितपर प्रयत्न कायदेशीर पद्धतीनें करतां यावा यासाठीं प्रयत्न आहे. हा प्रयत्न यशस्वी करण्याचें कार्य देशांतील कायदेपंडितांनीं उत्साहानें हातीं घेतलें पाहिजे. राजकारणांत अनेक तऱ्हेच्या माणसांची जरूर असते. व्यवहारी वर्ग आपल्या गरजा पुढें मांडीत असतो, लेखक वर्ग त्या गरजांचें ज्ञान लोकांत पसरवितो, तत्त्ववेत्ता त्या गरजांचें सामाजिक किंवा आर्थिक स्वरूप दाखवितो, आणि या सर्वांच्या इच्छेमुळें जो कार्यक्रम उत्पन्न होतो त्यास कार्यक्रमास कायदेशीर स्वरूप कायदे पंडित देतो. निःशस्त्राच्या राजकारणाचा अधिकाधिक विकास आपल्या देशांतील कायदे पंडितांकडून होईल अशी आमची अपेक्षा आहे.वकील वर्गानें अधिक निश्चयानें आतां राजकारणांत पुढाकार घेणें अवश्य आहे. त्यांच्याशिवाय राजकारणास योग्य शिस्त लागणार नाहीं.

ज्या अनेकविध सामाजिक आणि राजकीय कार्यक्रमासाठीं आम्हांस स्वराज्य पाहिजे आहे त्या गोष्टी येथें सागणें शक्य नाहीं. त्या गोष्टी सांगावयाच्या म्हणजे एक मोठा शासनशास्त्रीय समाजशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय कर्तव्यें सांगणारा ग्रंथ लिहावयाचा.कार्यक्रम पुष्कळ आहे तो समजावून घेऊन कर्तव्य अंगावर घेण्यास तयार असा वर्ग निर्माण करणें हेंच प्रस्तुत निबंधाचें कार्य होय.

आमच्या हातीं राज्यकारभार घेऊन आम्हांस काय सुधारणा करावयाच्या आहेत किंबहुना कोणत्या तऱ्हेची समाजप्रगति साधण्यासाठीं आम्ही स्वराज्य मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोंत तें सांगण्यासाठीं एक स्वतंत्र पुस्तक लवकरच प्रसिद्ध करूं. प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य उद्देश आपल्या शक्तीची आपणांस ओळख पटावी हाच आहे

१४८८

समाप्त.

# स्वयंनिर्णयी संघ.

"निःशस्त्रांचें राजकारण" या पुस्तकांत जी विचारपद्धति आणि कार्यपद्धति मांडली आहे ती ज्यांस संमत आहे अशांचाच हा संघ बनवावयाचा आहे. तर हें पुस्तक वाचून ज्यांचें मत अनुकूल होईल अशांनीं तसें मला कळविण्याची कृपा करावी.

श्री. व्यं. केतकर, पुणें.